पीईएसच्या मुख्यालयात असोसिएशन ऑफ सेल्फ फायनान्स इंस्टीट्यूटतर्फे घेण्यात आलेल्या या पत्रकार परिषदेला डॉ. एकबोटे यांच्यासह असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, पी. ई. सोसायटीचे कार्यवाह श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह डॉ. निवेदिता एकबोटे आदी उपस्थित होते.

डॉ. एकबोटे व प्रा. झोळ यांनी या वेळी सांगितले की, चंद्रकांत पाटील यांच्याशी अत्यंत सकारात्मक बातचित झाली. त्यांनी शिक्षण संस्थाचालकांच्या सर्व अडीअडचणी ऐकून घेतल्या. त्यातील अनेक विषयांवर त्यांनी तात्काळ अधिकाऱ्यांना निर्देश देऊन या अडचणी सोडवण्याचे निर्देश दिले. या वेळी संस्थाचालकांनी एकूण १४ मागण्या मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या समक्ष ठेवल्या होत्या. यामध्ये ईडब्ल्यूएस आरक्षणाची एक समान अंमलबजावणी, अंतिम गुणवत्ता यादीनंतर राबवली जाणारी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेतील एक समानता, सीईटीची संख्या कमी करणे, अनुसूचित जातीची पोस्ट-मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सुलभ करणे, महा-डीबीटी वरील शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया सोपी करणे, सीईटीचे सर्व विद्यार्थी संपल्यानंतर रिकाम्या जागी नॉन सीईटी विद्यार्थ्यांना रिक्त जागांवर प्रवेश देणे, खासगी विद्यापीठे व विना अनुदानित व्यावसायिक महाविद्यालयांची प्रवेशाची तारीख एकच असणे, शिष्यवृत्तीसाठी अभ्यासक्रमांची संख्या सर्व जाती धर्मांना एक समान असावी, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी दिल्या जाणाऱ्या वसतिगृह भत्त्यात एक समानता असावी, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची वाहतूक करणाऱ्या बस टॅक्सीची रक्कम एकसारखी असावी, शैक्षणिक संस्थांसाठी जमीन खरेदी वेळी आकारला जाणार कर सुलभ करावा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नोलॉजीकल युनिव्हर्सिटीमध्ये महाविद्याल-विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण करणे, एफआरए-एफएफसी यांच्याकडून शुल्क जाहीर करावयाच्या नियमांमध्ये दुरुस्ती करण्यात यावी, औषध निर्माण शास्त्र अभ्यासक्रमाची मान्यता प्रक्रिया व प्रवेश प्रक्रिया वेळेत पार पाडली जावी, अशा विविध समस्या या वेळी मांडण्यात आल्या.

या सर्व समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्याच्या दृष्टीने मंत्री चंद्रकांत पाटील यांनी निर्देश जारी केले. तसेच शिक्षण संस्थाचालकांना वारंवार येणाऱ्या लहान-मोठ्या समस्यांच्या निराकरणासाठी एक टास्क फोर्स स्थापन करण्याचे आश्वासन मंत्र्यांनी दिल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

मंत्र्यांशी झालेल्या चर्चेनंतर शिक्षण संस्थांच्या समस्या शासन दरबारी लवकरच मार्गी लागतील, अशी अपेक्षा संस्थेच्या उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

Yuva Prerna Samvad: Tricentenary Celebrations of the Birth Anniversary of Punyashlok Ahilyadevi Holkar in the august presence of Hon'ble Chief Minister of Maharashtra Shri. Devendra Fadnavis

Yuva Prerna Samvad: Tricentenary Celebrations of the Birth Anniversary of Punyashlok Ahilyadevi Holkar in the august presence of Hon'ble Chief Minister of Maharashtra Shri. Devendra Fadnavis

Yuva Prerna Samvad: Tricentenary Celebrations of the Birth Anniversary of Punyashlok Ahilyadevi Holkar in the august presence of Hon'ble Chief Minister of Maharashtra Shri. Devendra Fadnavis

लोकमत

अहिल्याबाई होळकर जयंती; आज 'युवा प्रेरणा संवाद'

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने 'युवा प्रेरणा संवाद' कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्या शुक्रवारी (ता. ३०) दुपारी २:०० वाजता शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या प्रांगणात हा कार्यक्रम होणार आहे.

राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्ताने सकाळी वेशभूषा स्पर्धा घेण्यात येणार असून, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्पर्धेचे बक्षीस वितरण, तसेच समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे. केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेचे आमदार व महासचिव विक्रांत पाटील, आमदार सिद्धार्थ शिरोळे, भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, भाजपा प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे कार्य व आदर्श समाजापर्यंत पोहोचवण्याचा मुख्य उद्देश असल्याचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी सांगितले.

Hello Pune
Page No. 3 May 30, 2025
Powered by: erelego.com

Media Coverage of Yuva Prerna Samvad

पुढारी

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित युवा प्रेरणा संवाद कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करताना मान्यवर.

अहिल्यादेवींकडून हिंदू संस्कृतीचे पुनरुज्जीवन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वाहिली आदरांजली

पुणे : पुढारी वृत्तसेवा

औरंगजेबाने उद्ध्वस्त केलेली मंदिरे, घाट यांचे पुनर्निर्माण करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी हिंदू संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचे स्मरण करीत त्यांना आदरांजली वाहिली. वाराणसीतील काशी विश्वेश्वर मंदिराचे, तेथील घाटांचे अहिल्यादेवी यांनी पुनर्निर्माण केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या मंदिराचे पुनर्निर्माण करून त्याला मोठे स्वरूप दिल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने आयोजित युवा प्रेरणा संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार हेमंत रासने, विक्रांत पाटील, योगेश टिळेकर, शंकर जगताप, भारतीय युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले की, दुर्दैवाने आपल्याला खरा इतिहास शिकवला गेला नाही. मुघलांचे राज्य जाऊन इंग्रजांची राजवट आली, हे खरे नाही. यादरम्यानच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य वेगवेगळ्या प्रांतांत वेगवेगळ्या स्वरूपात चालविले जात होते. माळवा प्रांतात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी २८ वर्षे राज्य कारभार चालवत तळागाळातील लोकांचा उत्कर्ष केला.

भारताची ताकद येथील एकसंध समाज, आध्यात्मिक ताकद आहे. परकीय आक्रमकांनी भारताची ही मानके उद्ध्वस्त करण्याचे काम केले. राममंदिर, ज्योतिर्लिंग मंदिर तोडण्याचे काम केले. अहिल्यादेवी होळकर यांनी ही संस्कृती पुन्हा जिवंत करण्याचे काम केले. त्यांनी हिंदू धर्माची प्रतीके असलेले घाट, ज्योतिर्लिंग मंदिर बांधत भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले.

ऑपरेशन सिंदूरची चर्चा आपण आता करीत आहोत, त्या वेळी अहिल्यादेवी यांनी महिलांची सैन्य तुकडी नेमून सुरक्षेची फळी निर्माण केली, शस्त्रनिर्मितीचा कारखाना काढला. जलसंधारणाची, जलसंचयाची कामे केली. न्यायव्यवस्था निर्माण केली. त्यांचे कार्य पुढे नेण्याचे काम आपल्याला करायचे आहे. त्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने त्यांचे जन्मगाव चौंडीत मंत्रिमंडळाची बैठक घेऊन ज्योतिर्लिंग विकासाचा बृहत् आराखडा तयार केला, महिलांच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली. त्यातून राज्यात सक्षम अहिल्यादेवी घडवून महाराष्ट्र प्रगतिपथावर नेण्याचे कार्य करण्याचा विश्वास फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

या वेळी विविध क्षेत्रांत देदीप्यमान कामगिरी करणाऱ्या तरुणांना युवा प्रेरणा पुरस्कार देऊन फडणवीस यांच्या हस्ते गौरविण्यात आले. आमदार विक्रांत पाटील, भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांची भाषणे झाली. भाजयुमोचे शहराध्यक्ष करण मिसाळ यांनी प्रास्ताविक केले. निवेदिता एकबोटे यांनी सूत्रसंचालन केले.

Pune Edition
May 31, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

लोकमत

मर दिल्यान हा विजय साकारला.

अहिल्यादेवींच्या आदर्शाप्रमाणेच पंतप्रधान मोदी यांचे काम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : खरी आत्मनिर्भरता त्यांनीच आणली

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : तीर्थस्थळांचा विकास, समान न्याय, महिलांची सैनिकी तुकडी, स्वदेशी शस्त्रात्रांची निर्मिती या लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या आदर्श राज्यकारभाराप्रमाणेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचेही काम सुरू आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. देशात खरी आत्मनिर्भरता त्यांनीच आणली असे ते म्हणाले.

अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मत्रिशताब्दीनिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने युवा संवाद कार्यक्रमाचे शुक्रवारी मॉडर्न महाविद्यालयाच्या मैदानात आयोजन केले होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी उपस्थित युवकांशी संवाद साधला. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार हेमंत रासने, योगेश टिळेकर, युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रभारी विक्रांत पाटील, प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे आदी उपस्थित होते.

फडणीस म्हणाले, "पतीनिधनानंतर सासरे मल्हारबा होळकर यांनी अहिल्यादेवींना सती जाऊ न देता राज्यकारभार करण्याचा आदेश दिला. तो त्यांनी पाळला. सलग २८ वर्षे त्यांनी राज्य केले. त्यांनी असा कारभार केला की आजही त्याचा आदर्श कायम आहे. तीर्थस्थळांचा त्यांनी विकास केला. केंद्र सरकारला काशी विश्वेश्वर स्थळी विकासकामे करता आली, याचे कारण तिथे अहिल्यादेवींनी आधीच कितीतरी कामे केली होती.

महिलांची स्वतंत्र सैनिकी तुकडी करून त्यांना संरक्षणाचे काम देणाऱ्या त्या महाराणी होत्या. शस्त्रात्रांचे संशोधन तर त्यांनी केलेच, शिवाय त्याचे कारखानेही काढले. सर्वांना समान न्याय हे त्यांच्या कामकाजाचे वैशिष्ट्य होते. त्यामुळेच २८ वर्षांच्या कार्यकाळात त्यांच्या राज्याकडे कोणीही वाकडी नजर टाकू शकले नाही."

युवा मोर्चाचे शहराध्यक्ष करण मिसाळ यांनी प्रास्तविक केले. अनुप मोरे यांनी स्वागत केले. शंखनाद करून फडणतीस यांचे स्वागत करण्यात आले. विक्रांत पाटील यांचेही भाषण झाले. निवेदिता एकबोटे यांनी सूत्रसंचालन केले.

ऑपरेशन सिंदूरच्या ब्रिफिंगचे काम महिलांना

१. पंतप्रधान मोदी यांनीही ऑपरेशन सिंदूरची ब्रिफिंग करण्याचे काम दोन महिला सैनिकी अधिकाऱ्यांना दिले. आपण विकसित केलेल्या ब्रह्मोस या प्रणालीने पाकिस्तानचे एअरबेस उद्ध्वस्त केले.

२. **मोदींनी राममंदिराचे पुनर्निर्माण केले. केंद्र सरकारचे सगळे काम हे अहिल्यादेवींच्या राज्यकारभाराप्रमाणेच आदर्श आहे, असे फडणवीस यांनी थेट तुलना न करता स्पष्ट केले.**

३. छत्रपती शिवाजी महाराज ज्याप्रमाणे महाराज असूनही कशाचाही उपभोग न घेणारे श्रीमंत योगी होते, अगदी त्याप्रमाणेच अहिल्यादेवीसुद्धा राजमाता, महाराणी असूनही अतिशय साध्या राहत असत, असे फडणवीस म्हणाले.

Pune Main
Page No. 3 May 31, 2025
Powered by: erelego.com

Media Coverage of Yuva Prerna Samvad

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती
PDF SUBSCRIBE
ON HD
May 31 ▾ | Pune ▾
पुणे दिनांक
शनिवार, ३१ मे २०२५ । ३

पंतप्रधानांकडून अहिल्यादेवींची परंपरा पुढे नेण्याचे काम

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी मंदिरे, घाट यांचे पुनर्निर्माण करून हिंदू संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले. त्यांची हीच परंपरा पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे नेत आहेत,' असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी सांगितले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने पुण्यात 'युवा प्रेरणा संवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते. राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार हेमंत रासने, शंकर जगताप, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, शहराध्यक्ष करण मिसाळ, भाजपचे शहराध्यक्ष धीरज घाटे, राजेश पांडे या वेळी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, 'औरंगजेबाने उद्ध्वस्त केलेली मंदिरे, घाट यांचे पुनर्निर्माण करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी हिंदू संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले. अहिल्यादेवी यांच्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काशी विश्वेश्वर मंदिराचे पुनर्निर्माण केले. अहिल्यादेवींनी २८ वर्षे राज्य कारभार करताना आत्मनिर्भर होत शस्त्रनिर्मितीचा पहिला कारखाना सुरू केला. महिलांना सैन्यात स्थान देऊन महिलांची पहिली तुकडी स्थापन केली. हाच वारसा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चालविला आहे.'

'दुर्दैवाने आपल्याला खरा इतिहास शिकविला गेला नाही. मुघलांचे राज्य जाऊन इंग्रजाची राजवट आली, हे खरे नाही. मुघल आणि इंग्रजांची सत्ता या दरम्यानच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य वेगवेगळ्या प्रांतांत वेगवेगळ्या स्वरूपात चालविले जात होते. अहिल्यादेवींनी २८ वर्षे राज्य केले. तळागाळातील लोकांचा उत्कर्षाचा प्रयत्न केला,' असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

'अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य पुढे नेण्याचे काम राज्य सरकार करत आहे. यासाठी राज्य मंत्रिमंडळाने त्यांच्या जन्मगावी, चौंडी येथे मंत्रिमंडळाची बैठक घेऊन महाराष्ट्रातील ज्योतिर्लिंग विकासाचा बृहत् आराखडा तयार केला. तसेच महिलांच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली. त्यातून राज्यात सक्षम अहिल्यादेवी घडवून महाराष्ट्र प्रगतिपथावर नेण्यात येत आहे,' असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

या वेळी अनुप मोरे, करण मिसाळ यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदिता एकबोटे यांनी केले.

Media Coverage of Yuva Prerna Samvad

सकाळ

मॉर्डन महाविद्यालय, शिवाजीनगर : पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत करताना पदाधिकारी.

अहिल्यादेवींकडून हिंदू संस्कृतीचे पुनरुज्जीवन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

पुणे, ता. ३० : ''नालायक औरंगजेबाने उद्ध्वस्त केलेली मंदिरे, घाट यांचे पुनर्निर्माण करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी हिंदू संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले,'' अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अहिल्यादेवी यांच्या कार्याचे शुक्रवारी स्मरण केले. 'अहिल्यादेवी यांच्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काशीविश्वेशर मंदिराचे पुनर्निर्माण केले, असेही ते या वेळी म्हणाले.

भारतीय युवा मोर्चाच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित 'युवा प्रेरणा संवाद' या कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. या वेळी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार हेमंत रासने, शंकर जगताप, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील आदी उपस्थित होते.

दुर्दैवाने आपल्याला खरा इतिहास शिकवला गेला नाही. मुगलांचे राज्य आणि त्यानंतरच्या इंग्रजांच्या राजवटीत काहीच झाले नाही, हे अजिबात खरे नाही, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''देशाला एकसंध ठेवणाऱ्या शक्तीस्थळांवर परकीयांनी आक्रमणे करून ती उद्ध्वस्त केली. परंतु अहिल्यादेवी या अशा एकच शासक होत्या, त्यांनी २८ वर्षांच्या कारभारात तळागाळातील लोकांचा उत्कर्षाचा प्रयत्न केला. न्यायदान, जलसंधारण, एक कर पद्धती, शेतकऱ्यांना संरक्षण अशा विविध क्षेत्रांत काम केले. देशात महिला सैनिकांची पहिली तुकडी त्यांनी उभी केली. आज आपण 'मेड इन इंडिया, 'आत्मनिर्भर भारत' यावर बोलतो. हिंदू धर्माची प्रतीके असलेले घाट, बारा ज्योतिर्लिंग, शक्तीस्थळे यांचे पुनरुज्जीवन केले. म्हणून तीनशे वर्षांनंतर ही त्यांचे नाव आणि त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेतली जात आहे.''

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ''त्यासाठी राज्य सरकारने त्यांचे जन्मगाव चौंडी येथे मंत्रिमंडळाची बैठकी घेऊन बारा ज्योतिर्लिंग देवस्थानांचा विकासाचा बृहत् आराखडा तयार केला. महिलांच्या विकासाची मुहूर्तमेढ रोवली. त्यातून राज्यात सक्षम अहिल्यादेवी घडवून महाराष्ट्र प्रगतिपथावर नेण्याचे कार्य केले जात आहे.''

कार्यक्रमाच्या सुरुवातीला विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम केलेल्या मान्यवरांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन आणि आभार निवेदिता एकबोटे यांनी मानले.

Pune, Main
31/05/2025 Page No. 4

Media Coverage of Yuva Prerna Samvad

नवभारत
www.navbharatlive.com

अहिल्यादेवी के कार्य युवाओं के लिए प्रेरणा

युवा प्रेरणा संवाद कार्यक्रम में मुख्यमंत्री फडणवीस ने की शिरकत

■ **पुणे, (सं).** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होलकर न केवल एक आदर्श राजमाता थीं, बल्कि वे देश की पहली स्वतंत्र महिला सैन्य टुकड़ी की संस्थापक भी थीं. उनका प्रशासन, जनसंपर्क और आध्यात्मिक दृष्टिकोण आज भी युवाओं के लिए प्रेरणास्रोत हैं. यह राय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ने व्यक्त की है. वे पुणे के मॉडर्न कॉलेज मैदान में 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होलकर त्रिशताब्दी जयंती उत्सव' के उपलक्ष्य में आयोजित 'युवा प्रेरणा संवाद' कार्यक्रम में बोल रहे थे.

संपूर्ण विश्व जाने अहिल्यादेवी के गौरवशाली कार्य : मुख्यमंत्री फडणवीस ने कहा कि अहिल्यादेवी को यह भलीभांति ज्ञात था कि भारत पर केवल राजनीतिक आक्रमण नहीं हुए, बल्कि विदेशी आक्रांताओं ने भारतीय संस्कृति की जड़ों को भी नष्ट करने का प्रयास किया. उन्होंने काशी विश्वनाथ और ज्योतिर्लिंगों जैसे प्रेरणास्थलों को पुनर्स्थापित कर हिंदू संस्कृति के पुनरुद्धार का ऐतिहासिक कार्य किया. उन्होंने आगे कहा कि इतिहास में हम मुगल साम्राज्य की चर्चा करते हैं, लेकिन उसी कालखंड में और बाद में भी कई तेजस्वी योद्धा हुए, जिनका समुचित उल्लेख नहीं हुआ. अहिल्यादेवी होलकर का गौरवशाली कार्य संपूर्ण विश्व को ज्ञात होना चाहिए. मुख्यमंत्री ने यह भी बताया कि अहिल्यादेवी के जन्म स्थान चौंडी गांव के विकास हेतु 681 करोड़ रुपए की योजना तैयार की गई है.

12 ज्योतिर्लिंगों के जीर्णोद्धार का उद्देश्य

देश के 12 ज्योतिर्लिंगों का जीर्णोद्धार करने का भी उद्देश्य रखा गया है. अहिल्यादेवी की जलसिंचन और कृषि नीति का अध्ययन कर वर्तमान आर्थिक नीतियों को दिशा दी जा सकती है. उन्होंने कहा कि 'ऑपरेशन सिंदूर' जैसे अभियानों में ब्रीफिंग से लेकर फ्रंटलाइन तक महिलाओं को सर्वत्र अवसर प्रदान करने का श्रेय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी को जाता है. लेकिन भारत में पहली बार महिलाओं की स्वतंत्र सैन्य टुकड़ी गठित करने का कार्य पुण्यश्लोक अहिल्यादेवी होलकर ने किया था. उन्होंने आत्मनिर्भरता के सिद्धांत पर आधारित शस्त्र निर्माण का कारखाना भी स्थापित किया था. इस कार्यक्रम में भाजपा युवा मोर्चा के प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे, विधायक विक्रांत पाटिल, विधायक शंकर जगताप, विधायक योगेश टिलेकर, राजेश पांडे और पुणे शहर युवा मोर्चा के अध्यक्ष करण मिसाल समेत कई लोग उपस्थित थे.

Pune plus Edition
May 31, 2025 Page No. 1
Powered by: navbharatlive.com

Media Coverage of Yuva Prerna Samvad

‘मोदींकडून महिलांना लढाईत स्थान’

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

स्वप्नील शिंदे

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सामाजिक कार्याबद्दल विविध क्षेत्रांतील युवतींचा सत्कार करण्यात आला.

म. टा. प्रतिनिधी, पुणे

‘औरंगजेबासारख्या नालायक शासकाने उद्ध्वस्त केलेल्या काशी विश्वेश्वराच्या मंदिरासह घाटांचे राजमाता अहिल्यादेवी होळकरांनी पुनर्निर्माण करून भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले. महिलांची सैन्याची प्रशिक्षित तुकडी तयार करणाऱ्या त्या पहिल्या शासक आहेत. त्यांच्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काशी विश्वेश्वराच्या मंदिराचे पुनर्निर्माण व विस्तारीकरण केले; तसेच महिलांना लढाऊ विमाने चालविण्यासह प्रत्यक्ष युद्धात स्थान दिले,’ असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

युवा प्रेरणा संवाद

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चातर्फे मॉडर्न महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित ‘युवा प्रेरणा संवाद’ कार्यक्रमात ते बोलत होते. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार हेमंत रासने, योगेश टिळेकर, शंकर जगताप, विक्रांत पाटील, भाजपचे राज्य उपाध्यक्ष राजेश पांडे, मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, शहराध्यक्ष करण मिसाळ आदी उपस्थित होते.

‘अहिल्यादेवींना आत्मनिर्भरतेची जाण’

‘पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या ‘आत्मनिर्भर भारत’ आणि ‘मेक इन इंडिया’च्या विचारांतून साकारलेल्या ब्राह्मोस क्षेपणास्त्राने पाकिस्तानाचे लष्करी हवाई तळ उद्ध्वस्त करून, त्यांना गुडघे टेकण्यास भाग पाडले. या आत्मनिर्भरतेच्या महत्त्वाची जाण अहिल्यादेवी होळकरांना होती. त्यांनी शस्त्रनिर्मितीचा कारखाना तयार करून तोफा, बंदुका तयार केल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या राज्याला कोणी नख लावू शकले नाही,’ असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी आवर्जून नमूद केले.

‘अहिल्यामातेचे स्मरण करा’

‘मुघलांच्या राजवटीनंतर इंग्रजांचे राज्य आले, हा इतिहास खरा नसून, या दरम्यानच्या शंभर-सव्वाशे वर्षांत छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचा देशाच्या वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या स्वरूपात अंमल होता. माळवा प्रांतात अहिल्यादेवी होळकरांनी २८ वर्षे उत्कृष्ट राज्यकारभार करून, सर्वसामान्यांचा उत्कर्ष केला. परकीय आक्रमकांनी अयोध्येचे राममंदिर, काशीतील विश्वनाथाच्या मंदिरांसह विविध ज्योतिर्लिंगे, शक्तिस्थळे नष्ट करून भारतीय संस्कृतीची पाळेमुळे खोदण्याचा प्रयत्न केला. अहिल्यादेवींनी हिंदू धर्माची प्रतीके असलेली मंदिरे, घाट, पुण्यस्थळांचे पुनर्निर्माण करून धर्म व संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले. त्यामुळे ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेताना आपण खऱ्या अर्थाने अहिल्यामातेचे स्मरण केले पाहिजे,’ असेही फडणवीस म्हणाले. निवेदिता एकबोटे यांनी सूत्रसंचालन केले.

Maharashtra Times 31.5.2025

Media Coverage of Yuva Prerna Samvad

Legacy of Ahilyadevi Holkar must be known to youth: CM

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

PUNE: Maharashtra chief minister Devendra Fadnavis emphasised the need to make the younger generation aware of the exemplary governance and legacy of Punyashlok Rajmata Ahilyadevi Holkar, stating that her contributions to Indian history are often overlooked.

Fadnavis was speaking at an inspirational event for the youth organised by the Bharatiya Janata Yuva Morcha on the occasion of the 300th birth anniversary of Ahilyadevi Holkar.

Fadnavis noted that history often wrongly teaches that India moved from Mughal to British rule without acknowledging the regional rulers who governed during the interim 100 to 125 years.

"Ahilyadevi Holkar ruled for 28 years with great administrative vision wherein the common man was at the centre of governance. She was a queen who led with compassion and efficiency. Many government schemes are now named after her, but her full legacy must be known to the youth," Fadnavis asserted.

The chief minister highlighted that Ahilyadevi Holkar played a critical role in preserving India's cultural and spiritual heritage at a time when foreign invaders were targeting temples and sacred sites. "She restored temples, rebuilt pilgrimage spots, and ensured that all Jyotirlingas remained intact. Her leadership was marked by economic strength, drought management, fair taxation, and transparent governance," Fadnavis said.

Chief minister Devendra Fadnavis at the event organised by Bharatiya Janata Yuva Morcha on the occasion of the 300th birth anniversary of Ahilyadevi Holkar. HT

> What Ahilyadevi did for empowering women centuries ago echoes today in the work we are doing under Prime Minister Narendra Modi.
>
> **DEVENDRA FADNAVIS,** chief minister

Praising Ahilyadevi Holkar for her efforts towards the empowerment of women, Fadnavis drew parallels to modern initiatives such as 'Operation Sindoor' saying, "What Ahilyadevi did for empowering women centuries ago echoes today in the work we are doing under Prime Minister Narendra Modi. She recognised the need for self-reliance and created job markets by inviting weavers and artisans to Maheshwar," Fadnavis said.

The programme - held at Modern College, Shivajinagar - was attended by higher and technical education minister Chandrakant Patil; Bharatiya Janata Party (BJP) leaders Vikrant Patil, Yogesh Tilekar and Hemant Rasane; and many youth and women leaders. On this occasion, a costume competition was organised to honour the queen's legacy, with awards distributed by the chief minister. Women who have made notable contributions to various fields were also felicitated.

Hindustan Times 31.5.2025

Media Coverage of Yuva Prerna Samvad

अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याची तरुण पिढीला माहिती व्हावी

पुणे : आपल्याला शिकवल्या गेलेल्या इतिहासात मुघल गेल्यावर थेट ब्रिटिश आले आणि राज्य केले असे सांगितले जाते. पण ते चुकीचे आहे. दरम्यानच्या १०० ते १२५ वर्षांत वेगवेगळ्या स्वरूपात ठिकठिकाणी राज्यकारभार सुरू होता. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी २८ वर्ष उत्कृष्ट कारभार चालवला. त्यांच्या कारभारात सामान्य माणूस सर्वप्रथम होता. अहिल्यादेवी महाराणी होत्या. त्यांच्या नावाने राज्यात अनेक योजना सुरू केल्या आहेत. अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य तरुण पिढीला माहिती व्हायला हवे, असे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने 'युवा प्रेरणा संवाद' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमावेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विधान परिषदेचे आमदार व महासचिव विक्रांत पाटील, आमदार योगेश टिळेकर, आमदार हेमंत रासने, आमदार शंकर जगताप, भाजपचे पुणे शहराध्यक्ष धीरज घाटे, भाजपा प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजपा युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस सुदर्शन पाटसकर, निखिल चव्हाण, योगेश मेंद, महिला शहराध्यक्ष निवेदिता एकबोटे, युवा मोर्चाचे शहराध्यक्ष करण मिसाळ, कुणाल टिळक, संदीप सातव आदी उपस्थित होते. याप्रसंगी राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्ताने वेशभूषा स्पर्धा घेण्यात आली. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते स्पर्धेचे बक्षीस वितरण, तसेच समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी संपूर्ण देशातील पुण्यस्थळे आणि शक्तीस्थळे, घाटांचे पुनर्जीवन करण्याचे काम केले. त्यांच्यामुळेच आज सर्व ज्योतिर्लिंग शाबूत आहेत. अनेक चांगले उत्कृष्ट जलशास्त्र वापरून जलसंधारणाचे काम त्यांनी केले. एक कर पद्धत लावून सामान्यांना दिलासा दिला. योग्य दुष्काळ नियोजन केले. राज्यकारभार चालवताना अर्थव्यवस्था मजबूत ठेवण्याचे काम त्यांनी केले.

Kesari 1.6.2025

Events Conducted by the Library during May 2025

1. Chhatrapati Sambhaji Maharaj Jayanti: 14th May 2025

On 14.05.2025, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated Chhatrapati Sambhaji Maharaj Jayanti as per the Government of Maharashtra GR.

Under the guidance of Respected Principal Dr. R S Zunjarrao Sir, Librarian Dr. Shantashree Sengupta, Library Staff members paid their respect to Chhatrapati Sambhaji Maharaj.

Principal Sir mentioned that Chhatrapati Sambhaji Maharaj was the eldest son of Chhatrapati Shivaji Maharaj and the second Chhatrapati of the Maratha Empire. Sir also briefed about the early life, military expeditions and conflicts, governance, innovations and literary contributions of Chhatrapati Sambhaji Maharaj. Sambhaji Maharaj composed several books during his lifetime. The most notable is 'Budhbhushanam' written in Marathi and Sanskrit.

I am thankful to all the Staff Members who were present during the program.

Regards,
Dr. Shantashree Sengupta,
Librarian.

Events Conducted by the Library during May 2025



Events Conducted by the Library during May 2025

Events Conducted by the Library during May 2025

2. National Anti-terrorism Day: 21st May 2025

On 21st May 2025, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 observed National Anti-terrorism Day (दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस) as per the Maharashtra Government GR.

Under the guidance of Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir and the Library Staff took the pledge of 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस'.

Principal Sir mentioned that the objective of the day is to promote national harmony, mitigate terrorism, and unity among people of all caste, creed, and gender. The day is observed in order to wean away the youth from terrorism and cult of violence by highlighting the sufferings of common people and showing as to how it is prejudicial to the national interest.

The official announcement of National Anti-Terrorism Day was made after the assassination of India's seventh Prime Minister Rajiv Gandhi on 21 May 1991. He was killed in Sriperumbudur, Tamil Nadu in a campaign by a terrorist. Then, under the V.P. Singh government, the centre has decided to observe 21st May as Anti-Terrorism Day.

I am thankful to the library staff members who were present during the programme.

Regards,
Dr.Shantashree Sengupta,
Librarian.



<u>दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाच्या निमित्ताने घ्यावयाची प्रतिज्ञा.</u>

"आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तिनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करत आहोत. आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवबंधूमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू व वर्धिष्णू करु, तसेच मानवी जिवित आणि मूल्ये धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्तींचा प्रतिकार करु."

PLEDGE

We, the people of India, having abiding faith in our country's tradition of non-violence and tolerance, hereby solemnly affirm to oppose with our strength, all forms of terrorism and violence. We pledge to uphold and promote peace, social harmony, and understanding among all fellow human beings and fight the forces of disruption threatening human lives and values.

Events Conducted by the Library during May 2025

Events Conducted by the Library during May 2025

3. Swantantrayveer Savarkar Jayanti: 28th May 2025

On 28th May 2025, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated 'Swantantrayveer Savarkar Jayanti' as per the Maharashtra Government GR.

Under the guidance of Respected Principal Dr.Rajendra S. Zunjarrao Sir, Library Staff paid their respect to Veer Savarkar.

Principal Sir mentioned that Vinayak Damodar Savarkar is remembered as a lawyer, a poet, an author, a social reformist, a freedom fighter among other things. He was a versatile person with a command in every subject matter he dealt with. Veer Savarkar had unique qualities with very straightforward thoughts based on rational and scientific thinking. He never hesitated to pinpoint age-old wrong practices in the society and had unapologetic, uncompromising nationalism. Veer Savarkar's patriotism was also demonstrated by his unique characteristic as a social reformer.

I am thankful to the library staff members who were present during the programme.

Regards,
Dr.Shantashree Sengupta,
Librarian.

Events Conducted by the Library during May 2025

स्वातंत्र्यवीर सावरकर
(दि.२८ मे, १८८३-२६ फेब्रुवारी, १९६६)
(अल्प परिचय)

भारतीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी सशस्त्र क्रांतीचा पुरस्कार करणारे थोर देशभक्त, साहित्यिक आणि समाजसुधारक. विनायक दामोदर सावरकर हे "स्वातंत्र्यवीर" म्हणून विख्यात आहेत. जन्म नाशिक जवळील भगूर ह्या गावी. सावरकरांचे शिक्षण भगूर, नाशिक, पुणे आणि मुंबई येथे एल.एल.बी.पर्यंत झाले. पुढे "बॅरिस्टर" ही पदवी त्यांनी लंडनला जाऊन घेतली.

सन १८९७ साली पुण्यात आलेल्या प्लेगच्या साथीत इंग्रज सैनिकांनी नागरिकांवर अतोनात अत्याचार केले, त्याचा सूड घेण्यासाठी चापेकर बंधूंनी पुण्याचे कमिशनर रॅंड ह्याचा खून केला. चापेकर बंधूंना फाशी देण्यात आली. त्यांच्या बलिदानाचा सावरकरांच्या मनावर खोल ठसा उमटला आणि त्यांनी स्वातंत्र्यासाठी सशस्त्र युद्ध करण्याची शपथ घेतली. सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळविण्याच्या उद्देशाने त्यांनी "मित्रमेळा" अर्थात "अभिनव भारत" ची (१९०४) स्थापना केली.

एल.एल..बी. झाल्यानंतर लंडनमध्ये बॅरिस्टरीचे शिक्षण घेण्यासाठी दि.९ जून, १९०६ या दिवशी सावरकरांनी भारताचा किनारा सोडला. लंडनमध्ये असताना "*जोसेफ मॅझिनी यांचे आत्मचरित्र*" लिहीले व "*राजकारण*"(१९०७) हा ग्रंथ अनुवादित केला. "*१८५७ चे स्वातंत्र्यसमर*" या ग्रंथाचे हस्तलिखितही पूर्ण केले (१९०८). लंडनला सावरकरांच्याबरोबर असलेले *सेनापती बापट* यांनी काही रशियन क्रांतिकारकांच्या साहाय्याने बॉंब तयार करण्याची विद्या आत्मसात केली. ही माहिती भारतात क्रांतिकारकांच्या विविध केंद्रांवर पाठविण्यात आली. सावरकरांनी काही पिस्तुले मिळवून तीही भारतात पाठविली होती.

नाशिकचा ब्रिटिश कलेक्टर जॅक्सन यांच्या खूनामध्ये साहाय्य केल्याचा आरोप ठेवून इंग्रजांनी सावरकरांना दि.१३ मार्च, १९१० रोजी अटक केली. पुढे चौकशीसाठी त्यांना भारतात नेले जात असताना "पोर्ट होल" मधून समुद्रात उडी घेतली आणि ते मार्सेच्या धक्क्यावर फ्रेंच हद्दीत आले. फ्रान्सच्या भूमीवर केलेली अटक कायदेशीर नसल्याची हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात मागितलेली दादही व्यर्थ ठरली.

सावरकरांना हिंदुस्थानात आणून त्यांच्यावर दोन खटले चालविण्यात आले. जॅक्सनच्या वधाला साहाय्य केल्याचा तसेच अन्य काही आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आले होते. या दोन्ही खटल्यांचा निकाल लागून सावरकरांना पन्नास वर्षांच्या जन्मठेपेची शिक्षा झाली. (दि.२४ डिसेंबर, १९१० आणि दि.३० जानेवारी, १९११).

सावरकर हिंदीचे अभिमानी होते. हिंदी भाषेच्या प्रचाराचेही त्यांनी अंदमानात काम केले. हिंदी ही राष्ट्रभाषा झाली पाहिजे, या मताचे ते होते. मात्र, इतर प्रांतांच्या भाषाही शिकल्या पाहिजेत, असे ते सहबंदिवानांना सांगत असत.

सन १९२१ मध्ये सावरकरांना अंदमानामधून हिंदुस्थानात आणण्यात आले आणि रत्नागिरीच्या तुरुंगात ठेवण्यात आले. तिथे त्यांनी "*हिंदुत्व*"(मूळ ग्रंथ इंग्रजी मराठी अनुवाद, १९२५) आणि "*माझी जन्मठेप*" (१९२७) हे ग्रंथ लिहिले. सावरकर हे वृत्तीने कवी होते. "सागरा प्राण तळमळला" ही कविता त्यांना एका तीव्र भावावेगाच्या प्रसंगी सूचली. "सावरकरांची कविता" (१९४३) या नावाने त्यांच्या कविता संकलित करण्यात आल्या आहेत. "रानफुले" (१९३४), "माझ्या आठवणी" (१९४९), "भारतीय इतिहासातील सहा सोनेरी पाने" (१९६३), "शत्रुंच्या शिबिरात" (१९६५) हे त्यांचे अन्य काही उल्लेखनीय ग्रंथ होत. तसेच "शत्रुंच्या शिबिरात" हे आत्मचरित्रात्मक पुस्तक, "मोपल्यांचे बंड अर्थात मला काय त्याचे? " "काळे पाणी" या त्यांच्या दोन कांदबऱ्या व "उःशाप" (१९२७) "संन्यस्त खड्ग" (१९३१) आणि "उत्तरक्रिया" (१९३३) ही त्यांनी लिहिलेली नाटके होत.

अस्पृश्य व उच्चवर्णीय यांच्यात सामाजिक अभिसरण घडून यावे, यावर त्यांच्या अस्पृश्यत: निवारण चळवळीचा विशेष भर होता. अस्पृश्यांना मंदिर प्रवेश बंदी असल्यामुळे त्यांनी सर्वांसाठी प्रवेश असलेले "पतित पावन मंदिर" बांधविले. रत्नागिरीतील विठ्ठल मंदिरात होणाऱ्या गणेशोत्सवात अस्पृश्यांना प्रवेश देणार नाही, अशी भूमिका सनातन्यांनी घेताच सावरकरांनी अखिल हिंदू गणपती स्थापन करून त्याचा उत्सव केला आणि गणेशमूर्तीची पूजा एका सफाई कामगाराच्या हस्ते केली. धर्मांतरितांना पुन्हा हिंदू धर्मात सन्मानपूर्वक प्रवेश देऊन त्यांनी त्यांची लग्ने हिंदू समाजात लावून देण्यासाठी पुढाकार घेतला.

सन १९४३ मध्ये सांगली येथे भरलेल्या नाट्यशताब्दी महोत्सवाचे ते अध्यक्ष होते. त्याच वर्षी त्यांना नागपूर विद्यापीठाकडून डी.लिट्. ही सन्माननीय पदवी देण्यात आली.

सन १९६६ मध्ये मुंबई येथे त्यांची प्रकृती ढासाळली आणि त्यांनी प्रायोपवेशन करुन जीवनाचा अंत करण्याचे ठरविले व त्यातच त्यांचे देहावसान झाले.

******

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)

Events Conducted by the Library during May 2025

Events Conducted by the Library during May 2025

4. Maharana Pratap Singh Jayanti (तिथिनूसार): 29th May 2025

On 29.5.2025, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated 'Maharana Pratap Singh Jayanti' as per the Maharashtra Government GR.

Under the guidance of Respected Principal Dr.Rajendra S. Zunjarrao Sir, Librarian Dr. Shantashree Sengupta, Registrar Shri. Ganesh Sathe and Library Staff paid their respect to Maharana Pratap.

Principal Sir mentioned that Maharana Pratap was one of the greatest Indian warriors. He was the ruler of Mewar, a province in Modern Day Rajasthan. Maharana Pratap was famous as a fearsome warrior and an excellent combat strategist. He protected the Mewar region against repeated onslaughts from the Mughals. Maharana Pratap was titled as "Mewari Rana" and was notable for his military resistance against the expansionism of the Mughal Empire and was known for his participation in the Battle of Haldighati and Battle of Dewair.

I am thankful to the library staff members who organised and were present during the programme.

Regards,
Dr. Shantashree Sengupta,
Librarian.



महाराणा प्रतापसिंह तथा प्रतापसिंह पहिले
(१५४० - १९ जानेवारी १५९७)
(अल्प परिचय)

महाराणा प्रताप हे सिसोदिया कुळातील क्षत्रिय राजपूत राजे होते. महाराणांचे पूर्वज मेवाडचे शासक होते.

जन्म आणि बालपण

विक्रम संवत ज्येष्ठ शुक्ल तृतीया शके १५४० रोजी महाराणा प्रतापसिंह यांचा जन्म पाली मारवाड येथे झाला.

राज्याभिषेक

इ.स. १५७२ मध्ये प्रतापसिंहाचा राजा (महाराणा) म्हणून राज्याभिषेक झाला. अतिशय पराक्रमाने आणि कुशलतेने त्यांनी राज्यकारभार चालवला. एक कुशल योद्धा, संघटक व राजकारणनिपुण असा राज्यकर्ता म्हणून त्यांनी आपला लौकीक निर्माण केला. महाराणा प्रतापसिंह यांचा चेतक नावाचा घोडा होता. चेतकवर स्वार होऊन हातात ८० किलोचा भाला घेऊन युध्द करीत असत.

हळदीघाटीची लढाई

हल्दीघाटी येथील प्रसिध्द लढाई महाराणा प्रतापसिंह आणि अकबर यांच्या सैन्यामध्ये सन १५७६ मध्ये झाली. मुघल सेनेचे नेतृत्व अकबराचा सेनापती मानसिंग करीत होता. महाराणा प्रतापसिंह यांच्याजवळ सुमारे ३००० घोडदळ आणि ४०० भिल्ल तिरंदाजांची फौज होती. तर मुघलांच्या सैन्यात सुमारे ८५,००० हजार पायदळ, घोडदळ, बंदुकी व तोफा होत्या. कमी सैन्य असूनही महाराणा प्रतापसिंहांच्या सैन्याने मुघल सेनेला सळो की पळो करुन सोडले. परंतु कमी सैन्य असल्यामुळे राजपूत सेनेला पराभव पत्करावा लागला. युध्दात जखमी झालेल्या महाराणा प्रतापसिंह यांचे प्राण त्यांच्या चेतक नावाच्या घोड्याने स्वत:च्या जीवाची पर्वा न करता वाचवले.

मेवाडाचा विजय

१५८२ मध्ये, महाराणा प्रतापसिंहांनी दिवेर येथे मुघल चौकीवर हल्ला चढवला आणि ती ताब्यात घेतली. यामुळे मेवाडमधील मोगल सैन्याच्या ताब्यात असलेल्या सर्व ३६ चौक्या त्यांच्या ताब्यात आल्या. या पराभवानंतर अकबराने मेवाड विरुध्दची सैन्य मोहीम थांबवली. दिवेरचा विजय हा महाराणा प्रतापसिंहांसाठी एक मुख्य अभिमानाचा विषय होता. इतिहासकार जेम्स टॉडने "मेवाडचे मॅरेथॉन" असे वर्णन केले आहे.

****

(स्त्रोत : सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)

Events Conducted by the Library during May 2025

Events Conducted by the Library during May 2025



Events Conducted by the Library during May 2025

Events Conducted by the Library during May 2025

5. Ahilyadevi Holkar Jayanti: 31st May 2025

On 31.05.2025, the Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5 celebrated 'Ahilyadevi Holkar Jayanti' as per the Maharashtra Government GR.

Under the guidance of Respected Principal Dr. Rajendra S. Zunjarrao Sir, Junior College Vice Principal Prof. Sunil Doiphode, Librarian Dr. Shantashree Sengupta, Shri. Namdeo Mahade and Library Staff paid their respect to Ahilyadevi Holkar.

Principal Sir mentioned that Maharani Ahilyabai Holkar was the Holkar Queen of the Maratha Malwa kingdom, India. Rajmata Ahilyabai was born in the village of Chondi in Jamkhed, Ahmednagar, Maharashtra. She moved the capital to Maheshwar south of Indore on the Narmada River. She was noted for her piety, for her administrative ability, for her keen interest in all her people and for an extraordinary amount of building holy sites all over the country. Her rule of Malwa in the 18th century is still cited as a model of benevolent and effective government. Her greatest achievement was to rebuild the Kashi Vishwanath Temple in 1780, which was dedicated to Shiva; the presiding deity of the city of Varanasi, one of the holiest Hindu sites of pilgrimage.

I am thankful to the staff members who were present during the programme.

Regards,
Dr.Shantashree Sengupta,
Librarian.



अहिल्यादेवी होळकर

(दि.३१ मे, १७२५ - १३ ऑगस्ट, १७९५)

(अल्प परिचय)

एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांचा जन्म चौंडी या छोट्याशा गावात (जिल्हा - अहमदनगर) माणकोजी व सुशीलाबाई शिंदे या दांपत्यापोटी झाला. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी, खंडेरावांशी झाले. अहिल्याबाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले. पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले.

मल्हारराव होळकरांना पेशव्यांनी इंदूर संस्थानची जहागीर दिली होती. सन १७६६ मध्ये त्यांचे निधन झाले आणि अहिल्याबाईंवर फार मोठी जबाबदारी येऊन पडली. पुढील अठ्ठावीस वर्षे त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालविला. तिजोरीत भर घालीत त्यांनी प्रजाहिताकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले.

राजधानी इंदूरहून नर्मदातीरी महेश्वरला हलविली (१७७२). तिथे अनेक वास्तू बांधल्या. राजवाड्यात प्रशस्त देवघर होते. नदीवर घाट बांधले. मंदिरांचा जीर्णोद्धार केला.

अहिल्याबाईंनी प्रमुख तीर्थक्षेत्री विशेषतः अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषीकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंढी येथे मंदिरे बांधली. यांशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर, मल्लिकार्जुन, औंढा नागनाथ, काशी विश्वेश्वर, विष्णुपाद, महाकाळेश्वर आदी मंदिरांचा जीर्णोद्धार केला. वाराणसी, प्रयाग, पुणतांबे, चौंढी, नाशिक, जांब (इंदूर), त्र्यंबकेश्वर येथे नदीला विस्तीर्ण घाट बांधले आणि गोकर्ण महाबळेश्वर, उज्जयिनी, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उघडली. सप्तपुरे-चार धामे या ठिकाणी घाट, बाग, मंदिरे, कुंडे, धर्मशाळा बांधून यात्रिकांची सोय केली.

अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मिळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या.

महेश्वर येथे दि.१३ ऑगस्ट, १७९५ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले.

******

(स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ)

Events Conducted by the Library during May 2025



Events Conducted by the Library during May 2025

Events Conducted by the Library during May 2025

Events Conducted by the Departments during May 2025

Workshop on "Patent filling" on 26th April 2025

Celebration of World Intellectual Property Right day 2025
Workshop on "Patent filling" on 26th April 2025

On the occasion of The World Intellectual Property Right day, IPR committee of Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune 05, had arranged an workshop on "Research, IPR and Patent filling" on 26th April 2025. The guest speakers for the workshop were Dr. Shirish Y. Khedikar, Scientist 'D', Climate and Data Management Group, Indian Meteorological Department , Shivajinagar, Pune, Maharashtra, India.

The workshop was coordinated by Dr. Shilpa S. Mujumdar, Vice-Principal (Research), chairperson IPR committee and Head, Department of Microbiology. Dr. Rajendra Zunzarrao, Principal, Dr. Shubhangi Puranik, Vice-Principal (P.G.Section), members of IPR committee and a total of about 55 participants attended the workshop. The program started with a welcome speech given by Dr. Shilpa S. Mujumdar, chairperson IPR committee which was then followed by Dr. Rajendra Zunzarrao who guided the participants how to develop an innovative mindset and on the importance of patent filling..

After a brief introduction of the speaker by the lecture started. Dr. Khedikar vividly described different types of patents with numerous examples. He also illustrated in detail the various steps of patent registration in India. Lastly, he explained the common mistakes to avoid during patent filling and the various benefits of patenting in academia.

All the participants enthusiastically participated and were very happy and satisfied with this workshop. They all gave positive and affirmative feedback.

Workshop on "Patent filling" on 26th April 2025

Superannuation Program of Junior College Vice Principal Prof. Sunil B. Doiphode and Library Attendant Shri. B.M.Bhadekar on 31.05.2025

Superannuation Program of Junior College Vice Principal Prof. Sunil B. Doiphode and Library Attendant Shri. B.M.Bhadekar on 31.05.2025

Superannuation Program of Junior College Vice Principal Prof. Sunil B. Doiphode and Library Attendant Shri. B.M.Bhadekar on 31.05.2025

NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING MAY 2025

Author	Title
• DESHMUKH LAXMIKANT	• राजकीय न्याय : प्रतिनिधिक आणि राज्यसंस्थेचे उत्तरदायित्व
• DESHMUKH LAXMIKANT	• आर्थिक न्याय : संकल्पना , संविधान आणि अर्थकारण

News Paper Clippings : May 2025

Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .

[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf*]

Clipping is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff.

The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous*** **.**

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

'प्रोग्रेसिव्ह'चा वर्धापन दिन

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचा ९१वा वर्धापनदिन नुकताच साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष विघ्नहरी देव महाराज, उपाध्यक्ष डॉ. अरविंद पांडे, संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सहकार्यवाह प्रा. सुरेश तोडकर, उपकार्यवाह चित्तरंजन कांबळे, उपकार्यवाह डॉ. प्रकाश दीक्षित, डॉ. निवेदिता एकबोटे, दीपक मराठे या वेळी उपस्थित होते. या निमित्ताने नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खा. डॉ. मेधा कुलकर्णी, आ. अमित गोरखे, हेमंत रासने, तसेच माधुरी सहस्रबुद्धे, जगदीश मुळीक, कुलगुरू डॉ. प्रकाश करमळकर, माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर, कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, परीक्षा विभागप्रमुख डॉ. प्रभाकर देसाई, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन, वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख संजय तांबट, डॉ. प्रफुल्ल पवार, प्रसेजनजित, माधव भांडारी, रवींद्र शिंगणापूरकर यांनी भेट दिली.

Loksatta 10.5.2025

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

दहावीत देदीप्यमान यशाची परंपरा पी.ई.एस.कडून कायम

१० वीचा निकाल १०० टक्के

पुणे : याही वर्षी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मराठी माध्यमाच्या सहा आणि इंग्रजी माध्यमाच्या चार माध्यमिक शाळांनी देदिप्यमान यशाची परंपरा कायम राखली. यातील सर्व १० विद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. मॉडर्न हायस्कूल, निगडीतील अंकिता अडसूळ ९५.२० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम आली.

मॉडर्न हायस्कूल, भोसे, येथे नेहा दळवी ९५.२० टक्के गुण मिळवून प्रथम. मॉडर्न हायस्कूल, शिवाजीनगर, संकल्प जामगावकर व कार्तिक दिवटे ९६ टक्के मिळवून प्रथम आले. मॉडर्न हायस्कूल (इंग्रजी माध्यम), शिवाजीनगर, सोहम काकडे ९८.२० टक्के मिळवून प्रथम. मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गणेशखिंड, अमेया पवार ९४.४० टक्के गुण मिळवून प्रथम. मॉडर्न हायस्कूल (इंग्लिश मीडियम), वारजे, साईराज अंभोरे ९२.८० टक्के गुण मिळवून प्रथम. मॉडर्न हायस्कूल वारजे (मराठी माध्यम), चैत्राली कदम ९५ टक्के गुण मिळवून प्रथम. मॉडर्न हायस्कूल (इंग्लिश मीडियम), यमुनानगर, निगडी, नीरजा मुळे ९७.६० टक्के गुण मिळवून प्रथम. मॉडर्न हायस्कूल (इंग्रजी माध्यम), एन.सी.एल., पाषाण, हर्षदा भोंगाळे ९६.४० टक्के गुण मिळवून प्रथम, पी.ई.एस. मॉडर्न गर्ल्स हायस्कूल, शिवाजीनगर, जाधव समीक्षा प्रशालेत ९५.४० टक्के गुण मिळवून प्रथम. या शाळांमधील सुमारे १४० विद्यार्थ्यांना ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळाले आहेत. त्याचप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांना निरनिराळ्या विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण मिळाले.

या घवघवीत यशाचे श्रेय संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. सुरेश तोडकर, उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, सर्व मुख्याध्यापक, तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांना जाते. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या उत्तुंग यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे व माध्यमिक विद्यालयातील सर्व पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

Kesari 14.5.2025

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या कनिष्ठ महाविद्यालयांचा शंभर टक्के निकाल

पुणे : एकान्नव वर्षांचा उज्ज्वल शैक्षणिक वारसा लाभलेल्या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या कनिष्ठ महाविद्यालयांनी इयत्ता बारावी परीक्षेत यंदाही यशाची परंपरा कायम राखली आहे. यंदाही सोसायटीच्या सहा कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल उल्लेखनीय असून, यातील चार कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालय, निगडी (विज्ञान व वाणिज्य शाखा) यांचा निकाल शंभर टक्के लागला असून विज्ञान शाखेत अथर्व निकम याने ९२ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेत कुणाल गायकवाड याने ८७.८३ टक्के गुण मिळवले.

पाषाण येथील मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयाचा निकालही शंभर टक्के लागला असून, सिध्दी करंजकर हिने ८७.३३ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला.

भोसे (ता. खेड, जि. पुणे) येथील मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचा वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के लागला. श्रृती कुटे हिने ७९.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. वारजे येथील मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयाचा विज्ञान व वाणिज्य शाखेचा निकाल १०० टक्के लागला. विज्ञान शाखेत अवनी वैद्य हिने ८८.३३ टक्के गुण मिळवले, तर वाणिज्य शाखेत सोहम जगताप याने ८३.८३ टक्के गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळवला.

शिवाजीनगर येथील मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयात कला शाखेचा निकाल ७५ टक्के, वाणिज्य शाखेचा ९९ टक्के, तर विज्ञान शाखेचा ९० टक्के लागला आहे. गणेशखिंड येथील मॉडर्न कनिष्ठ महाविद्यालयात वाणिज्य शाखेचा निकाल ९९ टक्के असून, अर्पिता काकडे हिने ७३.५० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. एम.सी.व्ही.सी. विभागाचा निकाल ८९ टक्के लागला असून, स्वाती राठोड हिने ७५.५० टक्के गुण मिळवले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्स्ना गु. एकबोटे, प्रा. सुरेश तोडकर, उपकार्यवाह प्रा. निवेदिता एकबोटे, तसेच सर्व मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व महाविद्यालयीन कर्मचारीवर्गाचे अभिनंदन केले.

Kesari 14.5.2025

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

सामना

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संचालित १० माध्यमिक शाळांचा १०० टक्के निकाल

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्थेच्या सहा मराठी माध्यम, चार इंग्रजी माध्यम माध्यमिक शाळांनी यशाची परंपरा कायम राखली. यांतील सर्व १० माध्यमिक विद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय (गणेशखिंड) – एकूण निकाल १०० टक्के. अमेया पवार हिने ९४.४० टक्के इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. मॉडर्न हायस्कूल (इंग्लिश मीडियम) (वारजे) – एकूण निकाल १०० टक्के. साईराज अंभोरे याने ९२.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. मॉडर्न हायस्कूल (मराठी माध्यम) (वारजे) – एकूण निकाल १०० टक्के. चैत्राली कदम हिने ९५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. मॉडर्न हायस्कूल (इंग्लिश मीडियम) (यमुनानगर, निगडी) – एकूण निकाल १०० टक्के. नीरजा मुळे हिने ९७.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला. मॉडर्न हायस्कूल (इंग्रजी माध्यम) (एनसीएल, पाषाण) – एकूण निकाल १०० टक्के. हर्षदा भोंगाळे हिने ९६.४० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकाविला. पीईएस मॉडर्न गर्ल्स हायस्कूल (शिवाजीनगर) – एकूण निकाल १०० टक्के. समीक्षा जाधव हिने ९५.४० टक्के गुण मिळवून प्रशालेत प्रथम क्रमांक पटकाविला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, प्रा. श्यामकांत देशमुख, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. सुरेश तोडकर, डॉ. निवेदिता एकबोटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे न्यू इंग्लिश स्कूल (टिळक रोड) – एकूण निकाल ९६.७६ टक्के. शेख आयान मुख्तार याला ९५.४० टक्के, ओसवाल हिमांशू कैलास ९३.८० टक्के, निमिष फाटक याला ९२.८०टक्के गुण मिळाले. न्यू इंग्लिश स्कूल रमणबाग शाळा – एकूण निकाल ९९.७२ टक्के. देवांश धामणगावकर याला ९७.४० टक्के, सार्थक जाधव, ९४.८० टक्के, ध्रुव भागडे ९४.४० टक्के, ओंकार खेडेकर ९३.४० टक्के, आदित्य खराडे ९३.२०टक्के, अथर्व खुळे याला ९३.२० टक्के मिळाले आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक चारुता प्रभुदेसाई यांनी कौतुक केले.

Pune Edition
May 14, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

प्रभात
City 15 may 2025_015
प्रभात 15 May 2025
बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

प्रोग्रेसिव्ह सोसायटीच्या शाळांचे दहावीत यश

१० माध्यमिक विद्यालयांनी राखली यशाची परंपरा

पुणे, दि. १४ - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संस्थेच्या ६ (मराठी माध्यम), ४ (इंग्रजी माध्यम) माध्यमिक शाळांनी देदीप्यमान यशाची परंपरा कायम राखली आहे. यातील सर्व १० माध्यमिक विद्यालयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. मॉडर्न हायस्कूल, निगडी शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, अंकिता अडसूळ या विद्यार्थिनीने ९५.२० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक मिळवला.

मॉडर्न हायस्कूल, भोसे शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, नेहा दळवी हिने ९५.२० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. मॉडर्न हायस्कूल, शिवाजीनगर शाळेचा एकूण निकाल १०० टक्के लागला असून, संकल्प जामगावकर या विद्यार्थ्याने ९६ टक्के मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. मॉडर्न हायस्कूल (इंग्रजी माध्यम), शिवाजीनगर शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, काकडे सोहम हा विद्यार्थी ९८.२० टक्के मिळवून प्रथम आला.

यासोबतच मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, गणेशखिंड, मॉडर्न हायस्कूल (इंग्लिश मीडियम), वारजे, मॉडर्न हायस्कूल वारजे (मराठी माध्यम), वारजे, मॉडर्न हायस्कूल (इंग्लिश मीडियम), यमुनानगर, निगडी, मॉडर्न हायस्कूल (इंग्रजी माध्यम), एन.सी.एल., पाषाण, पी.ई.एस. मॉडर्न गर्ल्स हायस्कूल, शिवाजीनगर या शाळांचा निकाल १०० टक्के लागला. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

लोकमत

पीईएस सोसायटी मॉडर्न हायस्कूल

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न हायस्कूल इंग्रजी माध्यम या शाळेने माध्यमिक शालान्त परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा यंदाही कायम राखली आहे. सोहम काकडे या विद्यार्थ्याने ९८.२० टक्के प्राप्त करून प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय क्रमांकावर वैष्णवी नलावडे आणि राघव गोखले या दोघांनी ९८ टक्के प्राप्त केले. तृतीय क्रमांकावर रुचिरा जाचक या विद्यार्थिनीने ९७.८० टक्के गुण मिळवून बाजी मारली.

सोहम काकडे या विद्यार्थ्याने गणित विषयात १०० पैकी १०० तर वरदा थिटे या विद्यार्थिनीने विज्ञान विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून यशाचे शिखर गाठले. विशेष कौतुकाची बाब म्हणजे एकूण ४७ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त केले आहेत. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, संस्थेचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, संस्थेच्या सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, संस्थेचे उपकार्यवाह व शाळेचे व्हिजिटर प्रा. डॉ. प्रकाश दीक्षित आणि शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली पिंपळखरे यांचे विशेष मार्गदर्शन सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना लाभले.

Hello Pune
Page No. 5 May 16, 2025
Powered by: erelego.com

सकाळ

'प्रोग्रेसिव्ह'च्या दहा शाळांचा निकाल १०० टक्के

पुणे, ता. १७ : शिक्षण क्षेत्रात गेली ९१ वर्षे आपली उज्ज्वल परंपरा जपणाऱ्या प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या दहा माध्यमिक शाळांनी यंदाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेतही आपली गुणवत्ता सिद्ध करत १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.

या दहा शाळांमध्ये सहा मराठी माध्यम, तर चार इंग्रजी माध्यमाच्या शाळांचा समावेश आहे. या सर्व शाळांमधून १४० हून अधिक विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविले. या उल्लेखनीय यशामागे संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्रा. सुरेश तोडकर, उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, तसेच सर्व मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थ्यांचे परिश्रम आणि पालकांच्या सहकार्य यांचे श्रेय आहे.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या निगडी येथील मॉडर्न हायस्कूल अंकिता अडसूळ, भोसे येथील मॉडर्न हायस्कूल नेहा दळवी, शिवाजीनगर येथील मॉडर्न हायस्कूलचे संकल्प जामगावकर आणि कार्तिक दिवटे, शिवाजीनगर येथील मॉडर्न हायस्कूल सोहम काकडे, गणेशखिंड येथील मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय अमेया पवार, वारजे येथील शाळेत साईराज अंभोरे आणि चैत्राली कदम, यमुनानगर येथील इंग्रजी माध्यम शाळा नीरजा मुळे, पाषाण येथील मॉडर्न हायस्कूल हर्षदा भोंगाळे, तसेच शिवाजीनगर येथील पी.ई.एस. मॉडर्न गर्ल्स हायस्कूल समीक्षा जाधव यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक पटकाविला.

Pune, Pune-Today
18/05/2025 Page No. 7

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

'पदव्युत्तर पदवी'च्या प्रवेशांची तयारी अंतिम टप्प्यात

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : एकीकडे अकरावी, पदवी प्रवेशांची लगबग सुरू असतानाच पदव्युत्तर प्रवेशांचीही तयारी आता अंतिम टप्प्यात आली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांमध्ये उपलब्ध असलेल्या ८८ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची ऑनलाइन प्रवेश परीक्षा ३ ते ५ जून दरम्यान घेतली जाणार आहे. या अभ्यासक्रमांना अर्ज करण्यासाठी मंगळवार (२० मे) शेवटचा दिवस आहे.

विद्यापीठाच्या उपनिबंधक सुनीता हजारे यांनी परिपत्रकाद्वारे याबाबतची माहिती दिली. विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांमध्ये पदवी, पदविका, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबवण्यात येतात. त्यासाठी सामायिक ऑनलाइन प्रवेश परीक्षा घेतली जाते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ प्रवेशांसाठी यापूर्वी विद्यापीठाने पदवी अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश परीक्षा घेतली आहे. आता पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यासाठी उमेदवारांना २० मे रोजी रात्री ११.५९ पर्यंत अर्ज करता येणार आहे. विद्यापीठात मानव्यविज्ञान, वाणिज्य आणि व्यवस्थापन, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आंतरविद्याशाखीय अभ्यास या विद्याशाखांमध्ये एकूण ८८ अभ्यासक्रम आहेत. वाणिज्य आणि व्यवस्थापन शाखेत एमबीए, एम. कॉम. असे पाच अभ्यासक्रम मानव्यविज्ञान शाखेत मानवशास्त्र, इतिहास ते परकीय भाषांपर्यंतच्या २५ अभ्यासक्रमांचा, आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेत ललित कला केंद्रातील नृत्य, नाटक, गायन, पत्रकारिता, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र, योग, ग्रंथालयशास्त्र अशा १४ अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

पदव्युत्तर प्रवेशांसाठी प्रक्रिया

शहरातील नामांकित महाविद्यालयांतही पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठीची प्रवेशप्रक्रिया राबवण्यात आली आहे. फर्ग्युसन महाविद्यालयातील कला आणि विज्ञान शाखेतील विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी ३० मेपर्यंत अर्ज करता येणार आहे, ऑनलाइन प्रवेश परीक्षा ८ ते १७ जून दरम्यान होणार आहे. बृहन्महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयातील पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी १४ जूनपर्यंत अर्ज भरता येईल, तर परीक्षा १८ जून रोजी घेण्याचे नियोजित आहे. आबासाहेब गरवारे महाविद्यालयात कला आणि विज्ञान शाखेतील विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेशपरीक्षा घेतली जाणार आहे. अर्ज भरण्याची मुदत, परीक्षेची तारीख वेगळी आहे. परशुरामभाऊ महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयातील प्रवेशप्रक्रिया जूनमध्ये सुरू होणार असल्याचे प्राचार्य डॉ. सुनील गायकवाड यांनी सांगितले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे म्हणाले, 'मॉडर्न महाविद्यालयात जैवतंत्रज्ञान, संगणकशास्त्र, संगणक उपयोजन अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षेद्वारे तर अन्य अभ्यासक्रमांसाठी प्रवेश महाविद्यालय स्तरावर आहे.

Loksatta 20.5.2025

सकाळ

मॉडर्न हायस्कूलचा १०० टक्के निकाल

पुणे, ता. १९ : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी संचलित शिवाजीनगर येथील मॉडर्न इंग्लिश मीडियम हायस्कूलने दहावीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा यंदाही कायम राखली.

सोहम काकडे (९८.२० टक्के), वैष्णवी नलावडे, राघव गोखले (९८ टक्के) रुचिरा जाचक (९७.८० टक्के) यांनी उत्तम गुण मिळवले. सोहम काकडे याने गणित विषयात १०० पैकी १००; तर वरदा थिटे हिने विज्ञान विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून यशाचे शिखर गाठले. विशेष कौतुकाची बाब म्हणजे एकूण ४७ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण प्राप्त केले. संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ.गजानन एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, उपकार्यवाह डॉ. प्रकाश दीक्षित आणि मुख्याध्यापिका वैशाली पिंपळखरे यांचे विशेष मार्गदर्शन सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना लाभले.

Pune, Pune-Today
20/05/2025 Page No. 4

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

संस्थांतर्गत अकरावी प्रवेश नियमात बदल

शाळा आवारात कनिष्ठ महाविद्यालयाची अट

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील पालक संस्था अर्थात 'इनहाऊस' कोट्यांतर्गत प्रवेशांसाठी यंदा मोठा बदल केला आहे. या कोट्यातून प्रवेश घेण्यासाठी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात असणे बंधनकारक आहे. मात्र, या नियमाला संस्थाचालकांकडून विरोध करण्यात येत असून, या नियमामुळे राज्यभर अडचणी येणार असल्याचे संस्थाचालकांचे म्हणणे आहे.

यंदा शिक्षण विभागाने अकरावीची प्रक्रिया राज्यभर ऑनलाइन पद्धतीने राबवण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवेश प्रक्रियेचे माहितीपुस्तक नुकतेच प्रसिद्ध करण्यात आले. त्यात, शिक्षण संस्थेची शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय, हे दोन्ही एकाच संकुलात असतील, तरच त्या संस्थेचे विद्यार्थी इनहाऊस कोट्यातील प्रवेशांस पात्र ठरणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या बदलाबाबत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, 'इनहाऊस या शब्दाचा अर्थ संस्थांतर्गत असा आहे. त्यामुळे शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात असण्याचा नियम चुकीचा आहे.

इनहाऊस कोट्यातील प्रवेशासाठी संबंधित संस्थेची शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात असणे अपेक्षित आहे. शासननिर्णयानुसार प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे.

– **डॉ. महेश पालकर**, संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण

७५ टक्के प्रवेश झाल्यावर वर्ग सुरू

कनिष्ठ महाविद्यालयांतील ७५ टक्के प्रवेश पूर्ण झाल्यावर अकरावीचे वर्ग सुरू करण्याचे स्वातंत्र्य कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात आले आहे. मात्र, ११ ऑगस्टपर्यंत वर्ग सुरू करणे आवश्यक असेल. त्यापैकी जे आधी घडेल, ते करणे आवश्यक असेल, असे स्पष्ट केले आहे.

'द्विलक्ष्यी'चे प्रवेश कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर

ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतून केवळ कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखांसाठीचेच प्रवेश केले जाणार आहेत. द्विलक्ष्यी (बायफोकल) अभ्यासक्रमांसाठीचे प्रवेश कनिष्ठ महाविद्यालयांच्या स्तरावर केले जाणार आहेत. नियमित फेऱ्यांतील प्रवेशित विद्यार्थ्यांतून कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर समांतरपणे ते करण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

Loksatta 22.5.2025

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

FYJC ADMISSIONS

Inhouse quota if school on same premises as junior college, state new guidelines

SOHAM SHAH
PUNE, MAY 21

INHOUSE QUOTA in junior colleges will only be available to students of schools run by the same management that are located on the "same premises", states new guidelines for class 11 or First Year Junior College (FYJC) admissions by the State Directorate of Education.

The information booklet published by the Directorate of Secondary and Higher Education regarding the class 11 centralised online admission process says, "Students who have passed std. 10th from secondary school (within same premises) of the same management who run Junior Colleges are eligible for Inhouse quota admission in those Jr. Colleges."

This will affect multiple educational institutes and trusts in the state that have inhouse quota systems. For example, the Deccan Education Society has multiple schools in Pune and students from these schools could avail the inhouse quota to get admission in Fergusson Junior College. However, these schools are not located on the same premises as the junior college, meaning that from this year, students from these schools will not be eligible for the quota.

Mahesh Palkar, Director of Secondary and Higher Education, said, "It is expected that for inhouse quota the school and the junior college be in the same premises. If a junior college is in Colaba [Mumbai] and the same management has a school on the Karnataka border, and a student from that school applies for the Colaba junior college, that cannot be considered inhouse quota."

Colleges oppose move

D D Kumbar, Vice Principal of Fergusson Junior College objected to the new rule and told The Indian Express, "This will affect Fergusson 100 per cent. The students from DES schools in the city used to take advantage of the inhouse quota, and not just DES but other institutions as well have similar situations. The previous inhouse quota was important. They have not held discussions on this with heads of institutes, they have directly made the law themselves."

Dr Gajanan Ekbote, chairman of Progressive Education Society, which runs the Modern College of Arts, Science, and Commerce junior college, said, "This rule is wrong. This is a huge injustice to the meritorious students from schools of the same management. Modern High School and Junior College are in the same premises so it won't affect them, however this is not possible for all institutions...although it will affect our other school. I'm sure the government will rethink this decision"

The Indian Express 22.5.2025

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

इनहाउस कोट्याचा बदल अन्यायकारक

कोटा असूनही विद्यार्थ्यांना प्रवेशच घेता येणार नसल्याची बाब

मटा मालिका

भाग १ : अकरावीचा गोंधळ

हर्ष दुधे

harsh.dudhe@timesofindia.com

पुणे : दहावीची शाळा आणि ज्युनिअर कॉलेज एकाच शैक्षणिक संकुलात असेल, तरच विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशासाठी इनहाउस (संस्थांतर्गत) कोट्याचा लाभ घेता येणार आहे. त्यामुळे मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर अशा महानगरांमधील मोठ्या शैक्षणिक संस्थांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना फटका बसणार आहे. राज्यातील काही शैक्षणिक संस्थांचे जाळे एकापेक्षा अधिक जिल्ह्यात विशेषतः ग्रामीण भागात असल्याने तेथील विद्यार्थ्यांनाही हक्काच्या इनहाउस (संस्थांतर्गत) कोट्याचा लाभ घेता येणार नाही.

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सर्व ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी प्रवेशप्रकिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येत आहे. यापूर्वी मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, नाशिक, अमरावती या महानगरांमध्ये अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबवण्यात येत होती. या प्रवेशप्रक्रियेत नेहमीप्रमाणे कोट्यांतर्गत प्रवेश होणार आहे. मात्र, केंद्रीय ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेत ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी प्रवेशासाठी राखीव असणाऱ्या पाच टक्के इनहाउस कोट्यातून विद्यार्थ्यांना प्रवेश घेणे अडचणीचे ठरणार आहे.

राज्यातील नामांकित मोठ्या शैक्षणिक संस्थांमध्ये 'केजी टू पीजी' शिक्षण घेता येते. या शैक्षणिक संस्थांची एकापेक्षा अधिक शैक्षणिक संकुले असल्याने काही ठिकाणी शाळा, तर काही ठिकाणी ज्युनिअर कॉलेज अशी व्यवस्था आहे. त्याचप्रमाणे काही ठिकाणी ज्युनिअर आणि सीनिअर कॉलेज एकत्र आहेत. काही शिक्षण संस्थांचे 'केजी टू पीजी' वर्ग एकाच ठिकाणी आहे.

इनहाउस कोट्यासाठी नामांकित शैक्षणिक संस्थेच्या शैक्षणिक संकुलांत शाळा आणि ज्युनिअर कॉलेज एकाच ठिकाणी असावे, असा नियम गेल्या वर्षीच्या प्रवेशप्रक्रियेत नव्हता. त्यामुळे संबंधित संस्थेच्या शाळेतून दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इनहाउस कोट्याचा वापर करून त्याच संस्थेच्या शहरात विविध ठिकाण उपलब्ध असलेल्या ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेश घेता येत होता.

दरम्यान, यंदा नियमात बदल करण्यात आला आहे. सुधारित नियमानुसार इनहाउस कोट्याचा वापर करण्यासाठी शाळा आणि ज्युनिअर कॉलेज एकाच ठिकाणी (एकाच परिसरात / शैक्षणिक संकुलात) असावी, असे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे इनहाउस कोट्यातून प्रवेश घेण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांचा हिरमोड झाला आहे. या नियमात बदल न झाल्यास विद्यार्थ्यांना सामान्य कोट्यातून प्रवेश घेण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

(क्रमशः)

(चित्र : एआय)



कोटा असूनही फायदा नाही

नामांकित ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी प्रवेशासाठी चुरस असते. या कॉलेजांचे कटऑफ गुण साधारण ९० टक्क्यांपेक्षा अधिक असतात. अशा वेळी विद्यार्थी इनहाउस कोट्यातून आपल्या संस्थेच्या ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज करतात. या कोट्यातून प्रवेशासाठी पाच टक्के जागा विद्यार्थ्यांसाठी राखीव असतात. या कोट्यातून अनेकांचा प्रवेश निश्चित होतो. त्यामुळे प्रवेशासाठी हक्काचा मार्ग म्हणून इनहाउस कोट्याचा विचार विद्यार्थी आणि पालकांकडून केला जातो. मात्र, बदलल्या नियमामुळे विद्यार्थ्यांना कोटा असूनही त्याचा लाभ घेता येणार नसल्याचे चित्र आहे.

“ आमच्यासारख्या अनेक शैक्षणिक संस्थांच्या शाळा आणि ज्युनिअर कॉलेज एका ठिकाणी नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार अध्यक्ष असणाऱ्या पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या अनेक शाळा आणि ज्युनिअर कॉलेज एका ठिकाणी नाही. अशा परिस्थितीत त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांनी कुठे प्रवेश घ्यायचा? सरकारने इनहाउस कोट्याच्या नियमात बदल करून पूर्वीच्या नियमाप्रमाणे प्रवेशप्रक्रिया राबवावी.

- डॉ. गजानन एकबोटे, कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

अकरावी प्रवेशप्रक्रियेत इनहाउस कोट्याच्या नियमात झालेला बदल अन्यायकारक आहे. या नियमामुळे संस्थेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना संस्थेच्याच ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रवेश घेताना अडचण येणार आहे. या नियमात बदल करण्यासाठी शिष्टमंडळासह शालेय शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेण्यात येईल.

- प्रा. आनंद काटीकर, कार्यवाह, डेक्कन एज्युकेशन सोसायटी

Maharashtra Times 23.5.2025

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

सकाळ

'इन-हाउस' कोट्यांतर्गत नियमात बदल

अकरावी प्रवेशाबाबत विद्यार्थी-पालकांमध्ये तीव्र नाराजी

पुणे, ता. २२ : विद्यार्थी एखाद्या शैक्षणिक संस्थेच्या शाळेतून दहावी उत्तीर्ण झाला असेल, तर त्याला आतापर्यंत त्या संबंधित संस्थेच्या कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयात 'इन-हाउस' कोट्यांतर्गत प्रवेश मिळत होता. परंतु, राज्य सरकारने अकरावी प्रवेशाच्या नियमात यंदा नव्याने केलेल्या बदलामुळे संबंधित विद्यार्थ्याला शाळेच्या आवारातच असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासाठी 'इन-हाउस' कोटा लागू असणार आहे. अकरावी प्रवेशाच्या 'इन-हाउस' कोट्याच्या नियमात केलेल्या बदलामुळे विद्यार्थी-पालकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

राज्यात यंदापासून अकरावीसाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेत संस्थांतर्गत कोट्यातील (इन-हाउस) नियमात बदल केला आहे. या कोट्यातून प्रवेश घेण्यासाठी शाळा आणि संबंधित कनिष्ठ महाविद्यालय हे एकाच संकुलात असणे बंधनकारक असणार आहे. या नियमामुळे विद्यार्थी-पालकांची डोकेदुखी वाढणार असून संस्था चालकांकडूनही नाराजी व्यक्त होत आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने अकरावीच्या प्रवेशाची माहिती पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. यात शिक्षण संस्थेची शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय हे दोन्ही एकाच आवारात असतील, तरच त्या संस्थेचे विद्यार्थी इन-हाउस कोट्यांतर्गत प्रवेशास पात्र ठरतील, असे स्पष्टपणे नमूद केले आहे.

> पालक मोठ्या अपेक्षेने चांगली शिक्षण संस्था निवडून विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेश करतात. दहावीनंतर त्याच शिक्षण संस्थेच्या चांगल्या महाविद्यालयात मुलांचे इन-हाउस कोट्यांमार्फत पुढील शिक्षण व्हावे, अशी पालकांची अपेक्षा असते. परंतु, शिक्षण विभागाने यंदा अकरावीसाठी इन-हाउस कोट्यांतर्गत प्रवेशात शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच आवारात असावेत, असा नियम केला आहे. हा नियम विद्यार्थ्यांचा हक्क डावलणारा आहे. शिक्षण विभागाने त्वरित हा निर्णय बदलावा.
>
> **- डॉ. गजानन एकबोटे,**
> कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

> संपूर्ण राज्यात यंदापासून अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. त्यामुळे कोणत्याही ठिकाणचा विद्यार्थी हा कोणत्याही अन्य ठिकाणच्या महाविद्यालयातील प्रवेशासाठी अर्ज करू शकणार आहे. दरम्यान, एखाद्या शिक्षण संस्थेतील एका शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला त्याच शिक्षण संस्थेच्या दुसऱ्या गावी असणाऱ्या महाविद्यालयात इन-हाउस कोट्यांतर्गत प्रवेश देणे शक्य होणार नाही, म्हणून राज्य सरकारने इन-हाउस कोट्यांतर्गत संबंधित संस्थेची शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच आवारात असणे अपेक्षित आहे, असा बदल नियमात केला आहे.
>
> **- डॉ. महेश पालकर,**
> संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभाग

Pune, Main
23/05/2025 Page No. 3

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5



Edu institutes to submit demand to change new in-house quota rule for FYJC admissions

Ardhra.Nair@timesofindia.com

Pune: Managements of different educational institutes in the city plan to submit a representation to the school education minister, requesting a change in the in-house quota admission rules for the first year of junior college (FYJC).

The new in-house quota rule states that even if a junior college and some schools belong to the same management and city, only students from schools within the junior college premises will be eligible for the in-house quota. Students of schools outside the premises of a junior college will not be eligible for the in-house quota, even if their management is the same, which is the case for most city managements due to space constraints.

Speaking to **TOI,** officials from different educational societies that run schools as well as colleges in the city said that 10% of seats in their colleges must be reserved for students belonging to schools under their own management, even if they are situated outside the college premises, as was the rule previously.

Online centralised application process (CAP) for FYJC admissions started anew on Monday across the state after technical issues crashed the portal on May 21, the earlier scheduled starting date.

Gajanan Ekbote, chairperson of the Progressive Education Society, which runs the Modern College of Arts, Science and Commerce among other institutes, said that he would be submitting a letter to the director of secondary education, along with an email to the education minister. "The NEP talks about flexibility and a student-centric approach, but by introducing such absurd conditions, they are making things harder for students. The admissions are all done according to merit. The new rule will affect thousands of students in both urban and rural areas. Some trusts run schools in rural regions, but due to the in-house quota rule, even meritorious students may not get admission to the junior college run by the same management in cities."

Anxious parents have been calling up management members, said Anand Katikar, secretary of Deccan Education Society, which runs Fergusson College and BMCC. "We have six schools and two colleges in the city, but none of the schools are located on the college premises. Parents are getting anxious because of the decision and have been calling us. We want the department to revert to the old rule, which states that students from schools within the district are eligible for the in-house quota in colleges run by the same management. We will be submitting our representation to the officials," said Katikar.

S K Jain, chairman of Shikshan Prasarak Mandali that runs SP College, said their school Nutan Marathi Vidyalaya (NMV) is on Bajirao Road and the college is on Tilak Road. "Both are in the same neighbourhood but the new rule will deprive students from NMV from applying under the 10% in-house quota in SP College. Why should the students suffer just because they are not on the same premises as the college, which is the case with many institutions across the state? This rule must be struck down," said Jain.

On Sunday, school education minister Dada Bhuse told reporters that if the management of the institutions had an issue with the new rule regarding the in-house quota, they could send their suggestions to the education department and a decision would be taken after scrutinising their suggestions.

OBJECTION TO FRESH NORMS

What's the new rule?

- The new in-house quota rule states that even if a junior college and some schools belong to the same management and city, only students from schools within the junior college premises will be eligible for the in-house quota
- **Students of schools outside the premises of a junior college will not be eligible for the in-house quota,** even if their management is the same, which is the case for most city managements due to space constraints

What do institutes want?

Various educational societies that run schools and colleges said **10% of seats in their colleges must be reserved for students of schools under their management,** even if situated outside college premises, as was the rule previously

The Times of India 27.5.2025

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

'इनहाउस कोटा' नियम अन्यायकारक

अकरावी प्रवेश प्रक्रिया पूर्वीप्रमाणे राबविण्याची मागणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'अकरावी प्रवेश प्रक्रियेतील संस्थांतर्गत कोट्यातील (इनहाउस) प्रवेशासाठीचा सुधारित नियम विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा आहे. त्यामुळे तो तातडीने रद्द करावा आणि पूर्वीच्याच नियमाप्रमाणे अकरावी प्रवेश प्रक्रिया राबवावी,' अशी मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

'यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील अकरावी प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. या प्रवेश प्रक्रियेत अकरावी प्रवेशासाठी राखीव असणाऱ्या पाच टक्के इनहाउस कोट्यातून विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावे लागतात. यापूर्वीच्या कालावधीमध्ये इनहाउस कोट्यामध्ये एकाच संस्थेची माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात असणे बंधनकारक नव्हते. त्यामुळे एकाच संस्थेच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याच संस्थेच्या शहरातील किंवा प्रतिष्ठित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेता येणे शक्य होते. मात्र, यंदा संस्थेची माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात नसतील, अशा शाळांमधील दहावी विद्यार्थ्यांना इनहाउस कोट्यातून त्याच संस्थेच्या अकरावीमध्ये प्रवेश घेता येणार नाही, असा नियम केला आहे. त्यामुळे ज्या संस्थेची माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात नसतील, अशा शाळांमधील दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इनहाउस कोट्यातून त्याच संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेणे शक्य नाही. तसेच संस्थेला कनिष्ठ महाविद्यालयातील इनहाउस कोट्यातून करायच्या दहा टक्के जागांवर प्रवेश करता येणार नाहीत. परिणामी हा नियम अन्यायकारक आहे. त्याचा पुनर्विचार करावा,' अशी मागणी डॉ. एकबोटे यांनी शालेय शिक्षण विभागाकडे केली आहे.

विद्यार्थी, पालकांची मागणी

शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी इनहाउस कोट्यासंदर्भात संस्थाचालकांचे काही म्हणणे असल्यास ते ऐकून घेतले जाईल. त्यामध्ये काही बदल केले जातील, असे आश्वासन नुकतेच पुणे दौऱ्यावर आल्यानंतर दिले होते. आता शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. एकबोटे यांनी या विषयाकडे लक्ष वेधले आहे. त्यामुळे याबाबतच प्रवेश फेरी सुरू होण्यापूर्वी ठोस निर्णय व्हावा, अशी मागणी पालक, विद्यार्थ्यांकडून होत आहे.

मिशन ॲडमिशन

Maharashtra Times 28.5.2025

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 28 May 2025_013
28 May 2025

सुधारित नियम तातडीने रद्द करावा

डॉ. गजानन एकबोटे; अकरावी इनहाउस कोट्यातील प्रवेश

पुणे, दि. २७ - अकरावी प्रवेश प्रक्रियेतील संस्थांतर्गत कोट्यातील (इनहाउस) प्रवेशासाठीचा सुधारीत नियम विद्यार्थ्यांवर अन्याय करणारा



असल्याने तो ताबडतोब रद्द करावा आणि पूर्वीच्याच नियमाप्रमाणे अकरावी प्रवेश प्रक्रिया राबवावी, अशी मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी शालेय शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे.

अकरावी प्रवेशासाठी राखीव असणाऱ्या पाच टक्के इनहाउस कोट्यातून विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावे लागतात. यापूर्वीच्या कालावधीमध्ये इनहाउस कोट्यामध्ये एकाच संस्थेची माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात असणे बंधनकारक नव्हते. त्यामुळे एकाच संस्थेच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याच संस्थेच्या शहरातील किंवा प्रतिष्ठित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेता येणे शक्य होते. तरी हा सुधारित नियम रद्द व्हावा, अशी मागणी डॉ. एकबोटे यांनी आहे.

पालकांचीही मागणी

शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी इनहाउस कोट्यासंदर्भात संस्थाचालकांचे काही म्हणणे असल्यास ते ऐकून घेतले जाईल. त्यामध्ये काही बदल केले जातील, असे आश्वासन पुण्यात दोन दिवसांपूर्वी दिले होते. आता शिक्षण संस्थांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. एकबोटे यांनी या विषयाकडे लक्ष वेधले आहे. त्यामुळे याबाबतच प्रवेश फेरी सुरू होण्यापूर्वी ठोस निर्णय व्हावा, अशी मागणी पालकांतून होत आहे.

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

May 29 ▾ | Pune ▾

संस्थांतर्गत कोट्यातील प्रवेशाबाबतच्या सुधारित नियम रद्द करण्याची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेतील संस्थांतर्गत (इनहाऊस) कोट्यातील प्रवेशासाठीचा सुधारित नियम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांवर प्रतिकूल परिणाम करणारा आहे. त्यामुळे हा निर्णय रद्द करून पूर्वीच्याच नियमाप्रमाणे संस्थांतर्गत कोट्याची प्रवेश प्रक्रिया राबवण्याची मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी शालेय शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे.

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राज्यभर राबवण्यात येत आहे. या प्रवेश प्रक्रियेमध्ये अकरावी प्रवेशासाठी राखीव असणाऱ्या संस्थांतर्गत कोट्यातील प्रवेशासाठी एकाच संस्थेची माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात असणे बंधनकारक नव्हते. त्यामुळे एकाच संस्थेच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याच संस्थेच्या शहरातील किंवा प्रतिष्ठित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेता येणे शक्य होते. मात्र, यंदा संस्थेची माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात नसतील, अशा शाळांमधील दहावीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संस्थांतर्गत कोट्यातून त्याच संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयात अकरावीमध्ये प्रवेश घेता येणार नाही, असा नियम केला आहे. ग्रामीण भागातील हुशार, गरजू विद्यार्थ्यांना इच्छा असूही त्याच संस्थेच्या महाविद्यालयात प्रवेश घेता येणार नाही. त्यामुळे संस्थांतर्गत कोट्यातील प्रवेशासाठीचा सुधारित नियम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांवर प्रतिकूल परिणाम करणारा आहे. त्यामुळे संस्थांतर्गत कोट्यातून प्रवेशासंबंधित सुधारित नियम ताबडतोब रद्द करून पूर्वीच्याच नियमाप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबवावी, असे डॉ. एकबोटे यांनी नमूद केले आहे.

Loksatta 29.5.2025

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

सकाळ

मॉडर्न गर्ल्स हायस्कूलचा निकाल शंभर टक्के

शिवाजीनगर, ता. २८ : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न गर्ल्स हायस्कूल येथे उपकार्यवाह डॉ. निवेदिता एकबोटे व माजी विद्यार्थिनींच्या हस्ते दहावीच्या विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. प्रशालेचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला असून, प्रथम क्रमांक समीक्षा जाधव, द्वितीय क्रमांक गुंजन पडोळे, तृतीय क्रमांक आदिती नऱ्हे यांनी प्राप्त केले. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ. ज्योत्स्ना एकबोटे आदींनी मुख्याध्यापिका माया नाईक, डॉ. उज्ज्वला हातागळे, वैशाली घोडके, अनुप्रीती गाजरे, सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थिनींचे कौतुक केले.

Pune, Pune-Today
29/05/2025 Page No. 5

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 29 may 2025_015
29 May 2025

मॉडर्नमध्ये दहावीच्या गुणवंत विद्यार्थिनींचा सत्कार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २८ - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर येथील मॉडर्न गर्ल्स हायस्कूलचा दहावीचा १०० टक्के निकाल लागला आहे. यातील यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला.

प्रशालेत पहिल्या पाच क्रमांकावरील विद्यार्थी असे १) समीक्षा जाधव (९५.४० टक्के),२) गुंजन पडोळे (९३.२० टक्के), ३) आदिती नऱ्हे (९२.२० टक्के) , ४) तनुजा अर्जुन (९१.२० टक्के), ५) कोमल मोरे ९० (टक्के) ९० टक्के हुन अधिक गुण मिळविणाऱ्या ५ विद्यार्थीनी आहेत. ८० टक्केच्या पुढे गुण मिळविणाऱ्या २० विद्यार्थिनी, ७० टक्केच्या पुढे गुण मिळविणाऱ्या ४५ विद्यार्थिनी तर ६० टक्क्यांच्या पुढे गुण मिळविणाऱ्या ७७ विद्यार्थिनी आहेत.

पुणे - प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगरमधील मॉडर्न गर्ल्स हायस्कूलमधील दहावीच्या यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या उपकार्यवाह डॉ. निवेदिता एकबोटे व शाळेच्या सन २००० बॅचच्या माजी विद्यार्थिनींच्या हस्ते या यशस्वी उल्लेखनीय यश मिळविलेल्या विद्यार्थिनींचा सत्कार करण्यात आला. सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह शामकांत देशमुख, सहकार्यवाह डॉ.निवेदिता एकबोटे, शाला समिती अध्यक्षा पल्लवी जाधव, व्हिजिटर उद्धव खरे, संस्थेच्या नियमक समितीच्या सदस्या मोनिका वैद्य व सर्व शाळा समिती सदस्य, पालक संघ कार्यकारिणीचे सदस्य, शाळेच्या मुख्याध्यापिका माया नाईक, उपमुख्याध्यापिका डॉ. उज्ज्वला हातागळे, पर्यवेक्षिका वैशाली घोडके, संस्था समन्वयिका अनुप्रिती गाजरे यांनी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व यशस्वी विद्यार्थीनीचे कौतुक केले.

News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5

नवराष्ट्र
www.navarashtra.com

'इन-हाऊस'मुळे ग्रामीण, गरीब विद्यार्थ्यांवर गदा

नियम रद्द करण्याची डॉ. एकबोटे यांची मागणी

पुणे, शहर प्रतिनिधी. इ. ११ वी प्रवेश प्रक्रियेतील इन-हाऊस कोट्यासंदर्भातील नव्या सुधारीत नियमांमुळे ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे कठीण झाले आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे सांगत प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी हा नियम तात्काळ रद्द करून पूर्वीच्या नियमांप्रमाणे प्रवेश प्रक्रिया राबवण्याची मागणी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, मा. उपसंचालक, उच्च माध्यमिक, पुणे विभाग, मा. आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे. यांच्याकडे केली आहे.

राज्यात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सर्व उच्च माध्यमिक महाविद्यालयांमध्ये इ. ११ वी प्रवेश प्रक्रिया केंद्रीकृत ऑनलाईन पद्धतीने राबवली जाणार आहे. या प्रक्रियेत कनिष्ठ महाविद्यालयांना इन-हाऊस कोट्यांतर्गत ५ टक्के जागा राखीव ठेवून प्रवेश द्यावा लागणार आहे. मात्र नव्या नियमांनुसार इन-हाऊस कोट्यात प्रवेश मिळवण्यासाठी संबंधित संस्थेची माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात असणे अनिवार्य ठरवण्यात आले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर अन्याय

- सध्याच्या सुधारीत नियमांमुळे अनेक विद्यार्थ्यांना आपल्या संस्थेच्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेता येणार नाही. संस्थांनाही आपल्याच विद्यार्थ्यांसाठी राखीव इन-हाऊस कोट्यातील ५ टक्के जागा भरता येणार नाहीत.
- त्यामुळे या बदलामुळे ग्रामीण भागातील आणि गरीब विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचे डॉ. गजानन एकबोटे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार सुनिल कांबळे, आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी देखील विद्यार्थ्यांच्या हितासाठी या सुधारीत नियमाचा पुनर्विचार करून तो रद्द करण्याची आणि पूर्वीप्रमाणेच इ. ११ वी प्रवेश प्रक्रिया राबविण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

Pune Edition
May 30, 2025 Page No. 2
Powered by: Navarashtra.com

संस्थांतर्गत कोटा प्रवेश प्रक्रिया पूर्वीप्रमाणेच हवी

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी) - इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेतील संस्थांतर्गत (इनहाऊस) कोट्यातील प्रवेशासाठीचा सुधारित नियम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्कांवर प्रतिकूल परिणाम करणारा आहे. त्यामुळे हा निर्णय रद्द करून पूर्वीच्याच नियमाप्रमाणे संस्थांतर्गत कोट्याची प्रवेश प्रक्रिया राबवण्याची मागणी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी शालेय शिक्षणमंत्र्यांकडे केली आहे.

Samana 30.5.2025

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

First-come, first-served basis online admissions launched for UG courses

SwatiShindeGole
@timesofindia.com

Pune: Many colleges in the city will offer admission on a first-come, first-served basis to undergraduate degree courses for applicants who passed the Higher Secondary Certificate (HSC) Std XII board exams, as per results declared on Monday this week.

Colleges have started an online admission process, wherein candidates can fill out forms for courses of their choice, especially in traditional streams such as arts, science, and commerce. Besides these, applications are also being invited for courses like business management, business administration, biotech, computer applications, etc.

The principal of Modern College of Arts, Science, and Commerce in Ganeshkhind, Sanjay Kharat, told **TOI**, "Those who apply and meet the requirements earliest are given priority for admission by following norms of Savitribai Phule Pune University (SPPU) and govt reservation policy. This year, we have not decided on any cut-off policy due to the introduction of NEP in higher education."

He added that the most in-demand courses are BSc data science, BSc blended, BCA science, BA psychology, BVoc (food and technology), and skill and professional courses related to the field of engineering and medical sciences.

Brihan Maharashtra College of Commerce (BMCC) principal RP Kuchekar said some courses would have entrance tests for students, while traditional undergraduate commerce degree admissions will be conducted based on applications received. "We have some specialised programmes like BCom Honours and a fintech course that will have an entrance test. However, admissions for the undergraduate commerce degree course will be conducted as per applications received," he said, adding that students will have to fill out online applications for admissions through the BMCC website.

At the Progressive Education Society's (PES) Modern College of Arts, Science, and Commerce in Shivajinagar, the admission system is completely online. College vice principal Shamkant Deshmukh said, "At our college, there is a greater demand for courses like computer science, BBA-BCA, animation, biotechnology and microbiology, psychology, economics, and commerce. This year, in view of the demand of the present competitive world and industry, we also started BSc (data science), MSc (animation), BSc (medical laboratory technology), BSc (imaging technology) and MSc (organic chemistry) courses."

Meanwhile, principal of St Mira's College for Girls, Neeru Bhagat, told **TOI**, "A slight dip in the HSC pass percentage is seen this year with 91.88% passing compared to 92.77% last year. This may result in lower cut-off percentages across colleges and streams. We have introduced improvements to our processes that will reduce time required and make the entire admission experience much more convenient."

PREPARATIONS FOR A NEW ACADEMIC YEAR

- **The online admission process has begun, wherein candidates can fill out forms for courses of their choice, especially in traditional streams such as arts, science, and commerce**
- Applications are also being invited for courses like business management, business administration, biotechnology, computer applications, and more
- **Some other new courses to look forward to that have been introduced by colleges this year include MSc (bioinformatics), MSc (industrial mathematics), MSc (food science and technology), MCom (advanced accounting and taxation), AI/ML and data analytics**

State board counsellors swamped with distress calls

Ardhra.Nair@timesofindia.com

Pune: Counsellors appointed by the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education were inundated with calls from anxious students and distressed parents after the declaration of HSC (Class XII) results on Monday.

Some counsellors reported fielding as many as 150 calls in a single day, many from students grappling with feelings of shame, fear, or hopelessness due to lower-than-expected marks. "Some students were worried about facing their families and society, while parents were equally distraught, seeking advice on how to support their children and prevent extreme reactions," said one of the counsellors.

This year's overall pass percentage dropped by 1.49%. The arts stream recorded the highest failure rate among all streams. With reports of Class XII students from different parts of Maharashtra committing suicide following declaration of results, board chairman Sharad Gosavi appealed to students not to equate exam results with their self-worth. "This is just one exam, not the final exam of life," he told **TOI**. "Students who failed can appear for the supplementary exam in June/July, the result of which will be out by the end of July. That way, they won't lose an academic year and can still pursue the course of their choice."

"Many students are anxious after receiving lower marks. But once they speak to us and we reassure them that this is not the end and that they still have many options ahead, they begin to calm down. So far, we haven't received any calls that required alerting the authorities. Even when we sense that a student may be feeling low or possibly depressed, we encourage them to call back as often as they need to," said a counsellor.

She further said, "A lot of the calls are about future career options. Yesterday, I received nearly 150 calls. Every time I was on a call, at least three to four were on call-waiting. We make sure to call each of them back."

One counsellor said that apart from societal pressure, many students feel guilt because their parents provided them with everything, yet they couldn't score well. "They struggle to face their parents. We counsel them."

According to the notification on the board's website, students and parents can call for free-of-cost counselling between 8 am and 8 pm for 8 days from the day of announcement of examination results. Counsellors can be contacted on these numbers: 9011302997, 8263876896, 8767753069, 7387400970, 9960644411, 7208775115, 8169202214.

Std XII girl found dead at home in Daund

Pune: An 18-year-old Std XII student was found hanging from the ceiling of her house in Daund on Monday afternoon, an hour after the state board declared the results at 1pm.

Inspector Narayan Deshmukh of the Yavat police said the student was taken to a hospital, where she was declared dead by the doctors. The officer said, according to her family members, the student was upset over her marks.

"In Std X, she got about 85% marks. She passed the Std XII examination with 65%. Her parents told us that the marks were less than her expectations," Deshmukh said.

"We have registered a case of accidental death," the officer said. TNN

Scanned with CamScanner

The Times of India 7.5.2025

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

Cut-offs for degree courses may decrease slightly: Experts

Dheeraj Bengrut

dheeraj.bengrut@htlive.com

PUNE : With the state board announcing the class 12 results early, the rush for admissions to undergraduate courses at universities and autonomous colleges in the city is about to begin. Due to a drop in overall results, it is expected that the eligibility marks for traditional degree courses may also decrease slightly.

Prof Rajendra Zunjarrao, principal, Modern College, Shivaji Nagar, said, "This year, the overall class 12 result is slightly lower, which may lead to a 1 to 2% drop in eligibility cut-off scores. Also, since the results have been declared earlier than usual, the admission process for the first-year degree programmes is expected to begin earlier compared to previous years."

At Savitribai Phule Pune University (SPPU), the admission process for various undergraduate programmes has already begun. The university

ination for these programmes online on May 15. Iinformation regarding the entrance test and admission process is available on the university's official website.

"Our aim is to complete the admission process by the end of June," said professor Parag Kalkar, pro-vice chancellor, SPPU.

exams are conducted by the State Common Entrance Test (CET) Cell.

Additionally, universities like SPPU and various private universities conduct their own entrance tests for admission to undergraduate programmes. The admission process for these courses begins only after the respective entrance exam

State announces FYJC online admission schedule statewide

MUMBAI: While the date for Class 10 results is yet to be announced by the Maharashtra State Board, the state government has officially declared that the First Year Junior College (FYJC) admission process will begin on May 19.

Students can register by entering their basic details such as name, address, and Aadhaar number on the official admission portal, which will also be announced shortly by the government. After completing this initial step, they can select their preferred junior colleges through the same online system.

The admission will take place in four regular rounds, followed by a special 'Open Admission for All' round to fill remaining vacant seats. The last round will be strictly based on merit. **HTC**

Hindustan Times 7.5.2025

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 7 May 2025_015
07 May 2025

कला-विज्ञान शाखेसाठी थेट प्रवेश; 'वाणिज्य'त मात्र चुरस

गुणवत्ता यादीला रामराम : आता थेट प्रवेशाची सुविधा; 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश; प्रवेशासाठी नवा ट्रेंड'

व्यंकटेश भोळा

पुणे, दि. ६ - बारावीचा निकाल जाहीर झाल्यानंतर पारंपरिक अभ्यासक्रमांच्या पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेशाला तत्काळ सुरुवात झाली आहे. गेल्या वर्षी ऑनलाईन अर्ज, गुणवत्ता यादी व त्यानुसार अशी प्रवेशप्रक्रिया राबविण्यात आली होती. मात्र, त्या प्रक्रियेमुळे काही महाविद्यालयांमध्ये बी.ए. आणि बी.एस्सी.च्या प्रथम वर्षाच्या अनेक जागा रिक्त राहिल्या होत्या. ही पार्श्वभूमी लक्षात घेता यंदा काही महाविद्यालयांनी गुणवत्ता यादी न लावता 'अर्ज करा आणि थेट प्रवेश घ्या' अशी पद्धत स्वीकारली आहे. त्यामुळे यंदा प्रथमच शाळांबरोबरच महाविद्यालयांचे वर्गही लवकर सुरू होण्याची चिन्हे आहेत.

महाविद्यालये यंदा जूनमध्येच सुरू होणार

गेल्या काही वर्षांपासून पारंपरिक अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल कमी होत आहे. यंदा बारावीच्या परीक्षेचा निकालही मागील वर्षांच्या तुलनेत कमी लागला असून, विशेषतः कला शाखेचा निकाल ५ टक्क्यांनी घटलेला आहे. त्यामुळे पालकांमध्ये चिंता वाढली आहे. बी.एस्सी. प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठीही विद्यार्थी फारसे उत्सुक नसल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर काही महाविद्यालयांनी 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्रवेश' या तत्त्वानुसार प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे.

वाणिज्य शाखेसाठी मात्र गुणवत्ता यादी आवश्यक

वाणिज्य शाखेच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी अर्ज केल्यानंतर गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाणार आहे आणि त्यानुसारच प्रवेश दिला जाणार आहे. बहुतांश महाविद्यालयांमध्ये इनहाऊस (स्वतःच्या महाविद्यालयातील बारावीतून आलेल्या) विद्यार्थ्यांसाठी आरक्षित जागा असतात. त्यामुळे उर्वरित जागा कमी आणि अर्ज अधिक असल्याने वाणिज्य शाखेत सहज प्रवेश मिळणार नाही, असे चित्र आहे.

> 'आम्ही वाणिज्य शाखा वगळता कला व विज्ञान शाखेच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी कोणतीही गुणवत्ता यादी प्रसिद्ध करणार नाही. विद्यार्थ्यांना थेट प्रवेश दिला जाईल. मात्र, आरक्षणाच्या सर्व नियमांची पूर्तता करूनच प्रवेश दिला जाणार आहे.'
>
> **- प्राचार्य राजेंद्र झुंजारराव,**
> मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर

कॉम्प्युटर सायन्सकडे सर्वाधिक कल

> 'गतवर्षी महाविद्यालयात बी.ए. आणि बी.एस्सी.च्या प्रवेशासाठी गुणवत्ता यादीची पद्धत वापरली होती. त्यामुळे २५० प्रवेशाच्या जागा रिक्त राहिल्या. यंदा मात्र अर्ज करताच, त्यांना तत्काळ प्रवेश देण्याचा निर्णय घेतला आहे.'
>
> **- प्राचार्य विलास उगले,**
> गरवारे महाविद्यालय

सध्या महाविद्यालयांमध्ये पदवी प्रथम वर्षाचे वर्ग सुरू होत आहेत. पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांपेक्षा कॉम्प्युटर सायन्स, बायोटेक्नॉलॉजीसारख्या अभ्यासक्रमांना अधिक पसंती आहे.

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

अकरावी प्रवेशात स्थानिकांना अडचणी

'कॅप'मुळे नामांकित महाविद्यालयांचा 'कटऑफ' वाढणार

मटा मालिका

हर्ष दुधे
Harsh.Dudhe@timesofindia.com

अकरावी प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने (कॅप) राबविण्याचा निर्णय घेतल्यामुळे, राज्यातील विद्यार्थ्यांना कोणत्याही कॉलेजमध्ये प्रवेशासाठी संधी मिळणार आहे. यामुळे राज्यभरातील अकरावीचे प्रवेश गुणवत्तेनुसार होणार असले, तरी महानगरांमधील नामांकित महाविद्यालयांत प्रवेश घेण्यासाठी गुणवंतांचा भर असेल. अशा वेळी स्थानिकांना त्यांच्याच शहरात प्रवेश मिळवणे अवघड होणार आहे. त्याचप्रमाणे शहरातील महाविद्यालयांमध्ये स्पर्धा राहणार असून, ग्रामीण भागातील महाविद्यालये ओस पडण्याची शक्यता आहे.

शालेय शिक्षण विभागाने यंदापासून राज्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी, राज्यातील मुंबई (महानगर क्षेत्र), पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, नाशिक, अमरवाती अशा पाच महानगरांच्या महापालिका हद्दीत ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया, तर इतर ठिकाणी ऑफलाइन प्रवेश प्रक्रिया होती. सीईटी सेलद्वारे राबविण्यात येणाऱ्या 'कॅप' प्रवेश फेऱ्यांच्या धर्तीवर ही प्रवेश प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानुसार कला, वाणिज्य, आणि विज्ञान शाखेच्या महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम अर्जात भरून, विद्यार्थ्यांना आवडीच्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळणार आहे. विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलद्वारे प्रवेशाचा अर्ज घरबसल्या भरता येणार आहे. त्यामुळे राज्यातील गुणवंत विद्यार्थी (प्रामुख्याने ९० टक्क्यांच्या वरील) मुंबई (महानगर क्षेत्र), पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, सोलापूर, सांगली या शहरांमधील नामवंत कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी इच्छुक राहणार आहेत.

अशा वेळी स्थानिकांसह राज्यातील आणि परराज्यांतील विद्यार्थ्यांचा नामांकीत महाविद्यालयांमध्ये प्रवेशावर भर राहणार आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांकडून प्राधान्यक्रम म्हणून अर्जात नामांकीत महाविद्यालयांचे पर्याय भरण्यात येईल. विद्यार्थ्यांना दहावीच्या गुणांनुसार प्रवेश जाहीर होतील. मात्र, त्यात प्रामुख्याने ९५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांचा समावेश राहणार आहे. अशा वेळी चांगले गुण मिळवूनही स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार नसल्याची शक्यता येत आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांनी प्रवेश कुठे घ्यावा, हा प्रश्न प्रामुख्याने निर्माण होणार आहे. शाखानिहाय शिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या राज्यातील काही नामांकित महाविद्यालयांमध्ये 'कटऑफ' गुण ९९ टक्के राहण्याची शक्यता आहे. या परिस्थितीत स्थानिक गुणवंत विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा प्रश्न निर्माण होणार आहे.

(पूर्वार्ध)

अकरावीचे प्रवेश ऑनलाइन

इंजिनीअरिंगच्या धर्तीवर प्रवेश प्रक्रिया होणार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अकरावी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

- शाळा, महाविद्यालयांची माहिती पोर्टलवर नोंद करणे : ८ ते १५ मे
- उच्च माध्यमिकच्या शाखांची माहिती प्रमाणित करणे : ८ ते १६ मे
- ऑनलाइन प्रोफाइल तयार करणे आणि अर्ज करणे : १९ ते २८ मे
- विद्यार्थ्यांनी ज्युनिअर कॉलेजांनी प्रधान्यक्रम भरणे : १९ ते २८ मे
- शुल्क फेरी, व्यवस्थापन कोटा, अल्पसंख्याक व इनहाउस कोट्यातील प्रवेश निश्चिती : प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यापूर्वी.

ग्रामीण महाविद्यालये ओस पडणार

दहावीनंतरच्या उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी ग्रामीण भागातून शहरात येतात. अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र, शेतीशास्त्र, व्यवस्थापन, विधी, शिक्षणशास्त्र अशा अभ्यासक्रमांसाठी तर विद्यार्थी महानगरांची निवड करीत असल्याचे चित्र आहे. आता अकरावी प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने पार पडणार असल्याने, विद्यार्थ्यांना घरबसल्या राज्यातील महाविद्यालयांची निवड करता येईल. या पार्श्वभूमीवर शहरातील कॉलेजांमध्ये गर्दी वाढणार असून, ग्रामीण भागातील महाविद्यालये ओस पडण्याची शक्यता आहे.

> **"नव्या निर्णयामुळे शहरांमधील नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी स्पर्धा वाढेल. ग्रामीण भागातून शहरातील महाविद्यालयांमध्ये शिकायला येणाऱ्या विद्यार्थ्यांप्रमाणेच, घराजवळच्या महाविद्यालयांमध्ये शिकण्यासाठी प्राधान्य देणारेही विद्यार्थी आहेत. ही प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी दोन फेऱ्यांमधील कालावधी कमी करावा. त्याचप्रमाणे समतोल साधण्यासाठी नियमावलीची गरज आहे.**
>
> **- डॉ. राजेंद्र झुंझारराव,** प्राचार्य, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स

> **"नामांकित महाविद्यालयांना स्थानिक; तसेच अन्य जिल्ह्यांतील गुणवंताच्या प्रवेश स्पर्धेत उड्या पडणे स्वाभाविक आहे. मात्र, त्याखालोखाल गुणवंतांना त्यांचा स्थानिक जिल्हा सोडून किंवा निम्न दर्जाच्या महाविद्यालयात प्रवेश घेणे भाग पडू शकते. यासाठी ८०-२० टक्के पॅटर्न पद्धती लागू करणे आवश्यक आहे.**
>
> **- जयवंत कुलकर्णी,** समुपदेशक

Maharashtra Times 8.5.2025

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

प्रा. मानसी ठाकूर

करिअर 'डिझाइन' करणारी संधी

श्रीमंत वस्त्रपरंपरा ही आपल्या देशाची खासियत आहे. ही परंपरा फॅशन इंडस्ट्रीने हेरली आणि यात भारताचे नाव उंचावले. यामध्ये आता आणखी प्रतिभावान निर्माण होण्याची गरज जागतिक पातळीवर आहे. अशात 'बी.व्होक. इन फॅशन टेक्नॉलॉजी अँड ॲपरेल डिझायनिंग.' हा कोर्स महत्त्वाचा ठरतो.

प्राचीन काळापासून भारतामध्ये निरनिराळ्या प्रकारचे वस्त्र शिवणे व ते परिधान करणे एक पारंपरिक कौशल्य; तसेच कला म्हणून प्रतिष्ठित आहे. उच्च दर्जाच्या कपड्यांची जागतिक मागणी सातत्याने वाढल्याने फॅशन उद्योगांची मागणीही वाढली आहे. भारतीय फॅशन उद्योगाने आता जागतिक स्तरावर आपले स्थान निर्माण केले असून, देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. भारताच्या कापड आणि वस्त्र उद्योगाचा निर्यातीत सुमारे आठ टक्के आणि देशाच्या जीडीपीमध्ये दोन टक्के वाटा आहे. भारतीय फॅशन उद्योगासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे; जेणेकरून हा उद्योग अधिक सशक्त बनू शकेल. म्हणूनच या क्षेत्रातील करिअर अनेक संधी देऊ करणारे आहे.

औद्योगिकरणामुळे व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण प्रणालीचे महत्त्व वाढले आहे. अलीकडच्या काळात फॅशन उद्योगाने शाश्वतता आणि नैतिक फॅशनच्या दिशेने एक आदर्श बदल घडवून आणला आहे. डिझायनर आणि ब्रँड्स हे कॉटन, लिननसारखे पर्यावरणपूरक कापड आणि टिकाऊ साहित्य वापरून सामाजिक जबाबदारी सांभाळत आहेत.

केंद्र सरकारने 'स्किल इंडिया' उपक्रमाद्वारे तरुणांना उपजीविकेच्या विकासासाठी प्रशिक्षित करण्यासाठी अनेक नवीन योजना आखल्या आहेत. सरकारने एनएसडीसी (नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) आणि यूजीसी (युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन)च्या मदतीने विविध क्षेत्रांच्या व्यावसायिक प्रशिक्षणावर लक्ष केंद्रित केले आहे. लोकप्रिय कोर्सपैकी एक म्हणजे 'बॅचलर ऑफ व्होकेशन (बी. व्होक.) इन फॅशन टेक्नॉलॉजी अँड ॲपरेल डिझायनिंग.'

यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करून स्थानिक विद्यापीठांशी संलग्न हा कोर्स विविध संस्था चालवत आहेत. राज्य सरकारने आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांतर्गतही फॅशनसंबंधित अनेक कोर्स या वर्षी सुरू केले आहेत. व्होकेशनल कोर्समुळे व्यावसायिक प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मिळते. विद्यार्थी स्वतःचा व्यवसाय किंवा नोकरी करण्यास सक्षम व आत्मनिर्भर होतात. व्यावसायिक प्रशिक्षणमुळे तरुणांचे उत्पन्न वाढले आहे. स्वतःचा व्यवसाय चालू करून किंवा नोकरीच्या माध्यमातून विद्यार्थी स्वतःच्या पायावर लवकर उभे राहतात; त्यामुळे समाजामध्ये वावरताना त्यांच्यातील आत्मविश्वास वाढतो व संवाद कौशल्य सुधारते.

बी. व्होक.चे ठळक मुद्दे

- कौशल्यावर आधारित पदवी शिक्षण मिळवून मनुष्यबळ विकसित करण्याचा केंद्र सरकारचा हा अतिशय यशस्वी उपक्रम आहे.
- अभ्यासक्रमाची रचना एनएसडीसीच्या (नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) मार्गदर्शक तत्त्वांनुसार 'एनएसक्यूएफ लेव्हल' लक्षात घेऊन तयार केली आहे.
- हा कोर्स कौशल्यावर आधारित असल्यामुळे अभ्यासक्रमामध्ये ६० टक्के प्रॅक्टिकल आणि ४० टक्के थिअरी प्रमाण असते.

वेबसाइटवर ऑनलाइन पद्धतीने होणार.

- विद्यार्थिनी बाहेरगावची असणे अपेक्षित.
- पुणे, पिंपरी-चिंचवड मोशी प्राधीकरण येथील महाविद्यालयात शिक्षण आवश्यक.
- प्रवेशासाठी गेल्या वर्षाची गुणपत्रिक सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र, वडिलांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र, महाविद्यालयाचा बोनाफाइड दाखला, अधिवास प्रमाणपत्र, आधारकार्ड (मुलीचे व पालकांचे), शिधापत्रिकेसोबत आवश्यक.
- अधिक माहितीसाठी संपर्क ७७७४००१९२६ आणि ७५०७५९०६४७.

- इंडस्ट्री एक्स्पर्ट, व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचे अधिकारी यांची व्याख्याने; तसेच गारमेंट इंडस्ट्री भेटींसह इंटर्नशिपलाही प्रोत्साहन दिले जाते.
- पदवी अभ्यासक्रमानंतर स्वतःचा व्यवसाय उद्योग सुरू करण्यासाठी कौशल्यावर आधारित उद्योगांना मदत करण्यास समर्थन देते.

पात्रता

- कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण

विद्यार्थ्यांना लाभ

- टेक्स्टाइल डिझायनिंग, फॅशन डिझायनिंग, अन्नतंत्रज्ञान, कचरा आणि पाणी व्यवस्थापन, ऑटोमोबाइल, आयटी, प्रवास आणि पर्यटन, दुग्धशाळा तंत्रज्ञान, कृषी आणि यांसारखे अनेक कोर्स यामध्ये समाविष्ट आहेत.
- बी.व्होक पदवीनंतर विद्यार्थी पदव्युत्तर एम. व्होक करू शकतात.
- बी.व्होक पदवी घेतल्यानंतर विद्यार्थी एमबीए; तसेच विविध स्पर्धा परीक्षांसाठीही पात्र ठरतात.
- बॅचलर ऑफ व्होकेशन 'फॅशन टेक्नॉलॉजी अँड ॲपरल डिझायनिंग' अभ्यासक्रमामध्ये विविध पॅटर्न, स्टीचिंग, एम्ब्रॉयडरी, फॅशन इलस्ट्रेशन, कम्प्युटर एडेड डिझायनिंग, फॅशन कम्युनिकेशन, स्टायलिंग, मार्केटिंग, क्वालिटी चेकिंग, पॅकिंग, ॲडव्हर्टायझिंग या विषयांचा अंतर्भाव आहे.
- इंटर्नशिप हा या अभ्यासक्रमाचा अविभाज्य भाग आहे, ज्यामध्ये विद्यार्थ्यांना विविध औद्योगिक क्षेत्रात काम करण्याची संधी मिळते.
- या विद्यार्थ्यांना फॅशनशी संबंधित विविध संस्थांमध्ये नोकऱ्या किंवा गारमेंट उद्योग, स्वतःचा व्यवसाय इत्यादी अनेक ठिकाणी मुबलक संधी.

या बाबी पडताळून घ्याव्यात

- संस्था कोणत्या विद्यापीठाशी संलग्नित आहे, त्याची कागदपत्रे तपासून घ्या.
- प्रवेश प्रक्रियेच्या आधी अभ्यासक्रम नीट बघून घ्या.
- हा कोर्स प्रात्यक्षिकांवर आधारित असल्यामुळे त्याचे तास कशा पद्धतीने होतात ते तपासा.
- मशिनरीज, लागणारी उपकरणे योग्य व पुरेशी असावीत.
- प्राध्यापकांचे शिक्षण व अनुभव
- आधीच्या विद्यार्थ्यांकडून, कशा प्रकारे शिकवले जाते याची चौकशी करावी.
- ग्लॅमरकडे न पाहता शैक्षणिक दर्जा कसा आहे ते पाहावे.

(लेखिका मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्समधील 'डिपार्टमेंट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी'मध्ये कार्यरत आहेत.)

Maharashtra Times 14.5.2025

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

ॲनिमेशन क्षेत्रात करिअरच्या वाटा

भाग-१
समीर नेर्लेकर
(दृश्य कला अभ्यासक)

अफाट कल्पनाशक्ती, इतरांपेक्षा वेगळे काही तरी करून दाखवण्याची जिद्द, नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी परिश्रम करण्याची तयारी असणाऱ्यांसाठी ॲनिमेशन क्षेत्राची दालने खुली आहेत.

आज मनोरंजनाच्या क्षेत्रात ॲनिमेशन आणि व्हीएफएक्स हे अगदी महत्त्वाचे शब्द बनले आहेत, परंतु ॲनिमेशन हे कार्यक्षेत्र केवळ मनोरंजनापुरते मर्यादित नाही. माहिती तंत्रज्ञान आणि औद्योगिक क्षेत्रातही ॲनिमेशन फार मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. खिशातला स्मार्टफोन काढून बघितल्यास त्यातील विविध ॲप्समध्ये ॲनिमेशन बघायला मिळते. त्याचबरोबर इंटरनेटवरील विविध वेबसाइट्स, ई-लर्निंग ॲप्लिकेशन्स, टीव्हीवरील जाहिराती, व्हिडिओ गेम्स, आर्किटेक्चरल वॉक-थ्रू अशा अनेक ठिकाणी ॲनिमेशनचा वापर होतो.

कलेचे क्षेत्र हे प्रामुख्याने तीन भागांत विभागले जाते. पहिले फाइन आर्ट्स, दुसरे इंडस्ट्रिअल डिझाइन आणि तिसरे कम्युनिकेशन डिझाइन. ॲनिमेशनची गणना तिसऱ्या प्रकारात म्हणजेच कम्युनिकेशन डिझाइन या विभागात होते. त्यामुळे या क्षेत्रात प्रवेश करू इच्छिणाऱ्या व्यक्तीचे कम्युनिकेशन स्किल उत्तम असणे आवश्यक आहे. कला आणि तंत्रज्ञान यांचा मिलाफ असलेले हे क्षेत्र आहे. म्हणून ॲनिमेशनचे अनेक अभ्यासक्रम हे विज्ञान शाखेच्या अंतर्गत राबविले जातात.

ॲनिमेशन हा शब्द 'ॲनिमा' या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा अर्थ आहे 'प्राण' किंवा 'आत्मा,' एखाद्या निर्जीव वस्तूत प्राण ओतणे हा अर्थ त्यातून अभिप्रेत आहे. निर्जीव चित्रांमध्ये हालचालीचा आभास निर्माण करून त्या चित्रांना जिवंत करण्याचेच हे कौशल्य आहे. आज भारतासह अनेक देशांमध्ये ॲनिमेशन ही कला इंडस्ट्रीच्या स्वरूपात विकसित होत आहे. जागतिक स्तरावर पिक्सार, वॉल्ट डिस्ने स्टुडिओ, ड्रीम वर्क ॲनिमेशन, फ्रेम स्टोअर, कार्टून नेटवर्क, निकेलोडियन, वॉर्नर ब्रदर्स, मूव्हिंग पिक्चर कंपनी, सोनी पिक्चर्स, रिदम अँड ह्यूज, नाइन सोनी एंटरटेनमेंट, पोगो अशा अनेक कंपन्या मोठ्या प्रमाणावर ॲनिमेशन प्रोजेक्ट्सची निर्मिती करून अब्जावधी डॉलर्सचा व्यवसाय करीत आहेत. भारतात माया एंटरटेनमेंट, पेंटामोडिया ग्राफिक्स, क्रेस्ट ॲनिमेशन, टून्झ ॲनिमेशन, यूटीव्ही टून्झ, पद्मालया टेलिफिल्म्स, ॲनिब्रेन, रिलायन्स मीडिया वर्क्स अशा कंपन्या जागतिक दर्जाचे कार्य करीत आहेत.

ॲनिमेशनचे अनेक प्रकार आहेत, पण मुख्य दोन प्रकारे म्हणजे ट्रेडिशनल ॲनिमेशन (पारंपरिक) आणि सी. जी. ॲनिमेशन (कॉम्प्युटर जनरेटेड), पारंपरिक ॲनिमेशनमध्ये एका सेकंदाला २४ चित्रे या दराने हजारो चित्रे हाताने रेखाटली जातात आणि नंतर त्याचे फ्रेम बाय फ्रेम चित्रीकरण केले जाते. हे काम अत्यंत जिकिरीचे आणि चिकाटीचे आहे. आजदेखील काही खास प्रोजेक्ट्समध्ये पारंपरिक ॲनिमेशनचा आवर्जून वापर केला जातो. कॉम्प्युटर जनरेटेड ॲनिमेशनमध्ये टूडी ॲनिमेशन आणि थ्रीडी ॲनिमेशन असे दोन मुख्य प्रकार आहेत. याशिवाय स्टॉप मोशन, क्ले-मेशन, पपेट ॲनिमेशन, कटआउट ॲनिमेशन, रोटोस्कोपी असे अनेक प्रकार आहेत. अलीकडच्या काळातील सर्वच चित्रपट-मालिकांमधील स्टंट दृश्ये, स्पेशल इफेक्ट्स यासाठी ॲनिमेशनचा वापर केला जातो.

ॲनिमेशन म्हणजे फक्त कार्टून असा अनेकांचा गैरसमज आहे. प्रत्यक्षात मात्र आज अनेक क्षेत्रांत ॲनिमेशनचा वापर केला जात आहे. बांधकाम व्यवसायात एखादा गृहप्रकल्प प्रत्यक्ष बांधून पूर्ण होण्यापूर्वी कसा दिसेल याची कल्पना येण्यासाठी ॲनिमेशनचा वापर करून त्या प्रकल्पाचा थ्रीडी वॉक-थ्रू तयार केला जातो. वैद्यकीय क्षेत्रात शरीराच्या अंतर्गत सूक्ष्म कार्यप्रणालीचा अभ्यास करण्यासाठी ॲनिमेशनचा आधार घेतला जातो. अंतराळ विज्ञान क्षेत्रात एखादी अंतराळ मोहीम प्रत्यक्षात साकार करण्याअगोदर त्या मोहिमेचे ॲनिमेशन केले जाते आणि त्याचा सखोल अभ्यास करून मगच त्या मोहिमेला मान्यता दिली जाते. औद्योगिक क्षेत्रात मशीन डिझाइन, प्रॉडक्ट डिझाइन, रोबोटिक सायन्स, ऑटोमोबाइल, वेब टेक्नॉलॉजी, गेमिंग इंडस्ट्री अशा अनेक क्षेत्रांत ॲनिमेशनचा वापर केला जातो.

(क्रमशः)

Prabhat 19.5.2025

News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

संगणक क्षेत्रात करिअरची नामी संधी

डेटा सायन्स, बिझनेस ॲनालिटिक्स, मशीन लर्निंग अशा अनेक क्षेत्रात मनुष्यबळ व कौशल्याची गरज दिवसेंदिवस वाढणार आहे. त्यामुळे आपली आवड, कल व कुवत ओळखून संगणक क्षेत्रात करिअरची नामी संधी आहे.

प्रा. शामकांत देशमुख

सध्याच्या संगणक, माहिती तंत्रज्ञान व माहिती दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगात सर्वांना संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. बऱ्याचदा पालकांना असे वाटते, की आपला पाल्य घरातील संगणक व मोबाइल सहजगत्या हाताळतो, त्यावरील विविध गेम, ॲप्लिकेशनचा वापर करतो, म्हणजे तो भविष्यात संगणक क्षेत्रात निश्चितच चांगले करिअर करेल किंवा पाल्याचा या क्षेत्राकडे जाण्याचा कल आहे, असे आराखडे बांधले जातात. खरे तर, संगणक व संगणकावरील विविध प्रणाली वापरणे किंवा हाताळणे याचा अर्थ संगणक क्षेत्रात उत्तम करिअर करता येईल असा होत नाही, हे प्रथम लक्षात घेणे गरजेचे आहे.

■ 'एमएससीआयटी'चे महत्त्व

संगणक, माहिती तंत्रज्ञान व माहिती दळणवळण तंत्रज्ञानाच्या युगात संगणक वापरण्याचे व हाताळण्याचे ज्ञान सर्वांनी घेणे हे क्रमप्राप्त झाले आहे. हे ज्ञान मिळवण्यासाठी 'महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल)'च्या माध्यमातून 'एमएससीआयटी' हा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर 'ॲडव्हान्स डिप्लोमा'चे पर्याय खुले आहेत. महाराष्ट्र सरकारने या अभ्यासक्रमाला मान्यता दिली असून, सर्व कर्मचाऱ्यांना; तसेच नव्याने सेवेत येणाऱ्या कर्मचाऱ्यांना हा अभ्यासक्रम पूर्ण करणे सक्तीचे केले आहे.

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास संगणकाचे प्राथमिक ज्ञान, ऑपरेटिंग सिस्टीम, मायक्रोसॉफ्ट ऑफिसमधील एमएस वर्ड, एमएस एक्सेल, एमएस पॉवर पॉइंट, एमएस ॲक्सेस या प्रणालीचा अभ्यास होतो; तसेच इंटरनेटचा वापर सर्चिंग, ब्राउझिंग आणि ई-मेल या गोष्टी कशा प्रकारे कराव्यात व हाताळाव्यात हे समजते.

दहावीच्या परीक्षेनंतरच्या सुट्टीत हा अभ्यासक्रम पूर्ण करणे सोयीचे ठरते. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी 'एमकेसीएल'च्या कोणत्याही अधिकृत संस्थेमध्ये प्रवेश घेता येतो. या अभ्यासक्रमाची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने 'एमकेसीए'द्वारा घेण्यात येते व अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्रही दिले जाते. शासकीय; तसेच खासजी क्षेत्रात नोकरी करताना हा अभ्यासक्रम पूर्ण असणे आवश्यक झाले आहे, तर काही ठिकाणी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्याने नोकरी मिळते, असा अनुभव आहे.

■ संगणक क्षेत्रात कल असणाऱ्या पाल्यांसाठी दहावीनंतर असणारे पर्याय...

दहावीनंतर डिप्लोमा इन कम्प्युटर इंजिनीअरिंग किंवा डिप्लोमा इन आयटी या दोन पदविका अभ्यासक्रमांचा पर्याय विद्यार्थ्यांसमोर असतो. हा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असतो व त्याचे प्रवेश केंद्रीय पद्धतीने तंत्रशिक्षण संचालनालयमार्फत (डीटीई) केले जातात.

बरेच पालक विद्यार्थ्यांना दहावीला जास्त गुण मिळाल्यास; तसेच इतरांच्या अनुभवावरून अकरावी-बारावी (सायन्स) जेईई/एमएचसीईटी प्रवेश परीक्षा त्यातील संभाव्य धोके लक्षात घेऊन दहावीच्या परीक्षेत मिळालेल्या मार्कांवर डिप्लोमा इन इंजिनीअरिंगचा पर्याय निवडतात. डिप्लोमानंतर मात्र बी.ई. अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश मिळतो; पण त्यासाठी डिप्लोमा अभ्यासक्रमास किमान ७० टक्क्यांहून अधिक गुण असल्यास चांगल्या महाविद्यालयाचा पर्याय मिळतो.

तुलनेने द्वितीय वर्षाच्या जागा अभियांत्रिकी महाविद्यालयात कमी उपलब्ध असतात व त्या महाविद्यालाच्या प्रथम वर्षाचा निकालावरून ठरतात. काही वेळेस डिप्लोमाला चांगले गुण मिळूनही पसंतीचे / आवडीचे महाविद्यालय मिळणे विद्यार्थ्यांना अवघड जाते. अशा प्रसंगी काही विद्यार्थी बी.ई.च्या दुसऱ्या वर्षात प्रवेश न घेता प्रथम वर्षाच्या पर्यायाचा विचार करतात; पण त्यामध्ये एक वर्ष वाया जाते अथवा जास्तीचे लागते. डिप्लोमानंतर बी.एस्सी. कम्प्युटर, बी.सी.ए.चा पर्यायही पदवीधर होण्याच्या दृष्टीने उपलब्ध असतात.

डिप्लोमानंतर बी.एस्सी., बी.एस्सी. कम्प्युटर व बी.सी.ए ला द्वितीय वर्षात प्रवेश घेता येतो व पदवी नंतर एम.सी.ए. व एम.एस्सी. चे पर्याय उपलब्ध होतात.

■ दहावीनंतर परंपरागत अकरावी व बारावीचा पर्याय निवडल्यास...

१. विज्ञान शाखेअंतर्गत कम्प्युटर किंवा आयटी द्विलक्षी अभ्यासक्रमाचे पर्याय असतात. वाणिज्य शाखेअंतर्गत आयटी हा एक विषय निवडता येतो. एच.एच.सी. विज्ञान शाखेतील संगणक, इलेक्ट्रॉनिक शास्त्र हे पर्याय विषय निवडल्यास बारावीनंतर डिप्लोमा, डिग्रीच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेश घेता येतो; तसेच अभियांत्रिकी क्षेत्रात करिअर करण्याच्या दृष्टीने हे ज्ञान उपयोगी ठरते. अकरावी व बारावी करत असताना वरील पर्याय निवडल्यास वैद्यकीय क्षेत्राशी संबंधित सर्व पर्याय बंद होतात. हे समजून घेणे गरजेचे आहे.

संगणक क्षेत्रात करिअर करताना अकरावी व बारावी विज्ञान शाखेतूनच करावे असे नाही. बारावी विज्ञान, वाणिज्य व कला यानंतरचे पर्याय आपण जाणून घेऊ.

१. बारावी विज्ञान शाखेअंतर्गत पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्राशी संबंधित बीई. (कम्प्युटर इंजि.), बीई (आयटी), बीएस्सी (कम्प्युटर सायन्स), बीएस्सी. (ॲनिमेशन), सीसीए (सायन्स),बीसीए (डेटा सायन्स) या अभ्यासक्रमांचे पर्याय असतात. संगणकशास्त्र व गणित या दोन्ही विषयांचा अतिशय जवळचा संबंध असतो. पाल्यांची ॲनालिटिकल अँड लॉजिकल रिझनिंगचा कल लक्षात घेऊन वरीलपैकी अभ्यासक्रम निवडणे योग्य ठरते.

२. बीएस्सी (ॲनिमेशन) या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना जाहिरात, मोबाइल गेम, मोबाइल ॲप, ई-लर्निंग, ग्राफिक्स डिझाइन, ई-कंटेंट डेव्हलपमेंट, बॉलिवूड इंडस्ट्री या क्षेत्रामध्ये चांगल्या संधी उपलब्ध आहेत. ज्या विद्यार्थ्यांना मुळात चित्रकलेची आवड असेल त्या विद्यार्थ्यांसाठी हा चांगला पर्याय असू शकतो.

- वरील सर्व अभ्यासक्रम हे पुणे विभागाचा विचार करता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयामध्ये उपलब्ध असतात. अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे शुल्क महाविद्यालयानुसार ठरते व हे शुल्क शासनाची शुल्क निर्धारण समिती निर्धारित करते.
- बारावी वाणिज्य व कला या शाखेअंतर्गत पूर्ण केल्यानंतर बीबीए (कम्प्युटर ॲप्लिकेशन) या अभ्यासक्रमाचा पर्याय विद्यार्थ्यांसमोर खुला असतो. वाणिज्य व कला शाखेच्या विद्यार्थ्यांना संगणक क्षेत्रात करिअर करण्याच्या दृष्टीने हा अभ्यासक्रम उपयुक्त व महत्त्वाचा ठरतो.
- संगणक क्षेत्राशी संबंधित बीई (कम्प्युटर/ आयटी) हे पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एमई, एमएस., एमएस्सी. (कम्प्युटर सायन्स), एमसीए अँड एमबीए (सिस्टीम्स) हे पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे पर्याय उपलब्ध असतात. एमई अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा असतो.
- बीएस्सी (कम्प्युटर सायन्स), बीएस्सी (ॲनिमेशन), बीसीए (सायन्स) हे पदवी अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एमएस्सी (कम्प्युटर सायन्स.), एमसीए (इंजि/मॅनेजमेंट.), एमएस्सी (कम्प्युटर ॲप्लिकेशन), एमबीए (सिस्टीम्स),एमएस्सी. (ॲनिमेशन) हे पर्याय विद्यार्थ्यांसमोर उपलब्ध असतात.
- एमसीए., एमएस्सी (कम्प्युटर सायन्स), एमएस्सी (कम्प्युटर ॲप्लिकेशन), एमबीए (सिस्टीम्स) या अभ्यासक्रमाचा कालावधी दोन वर्षांचा असतो.

वरील सर्व अभ्यासक्रमांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने श्रेयांक पद्धत (क्रेडिट सिस्टीम्स) अवलंबली आहे. पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर संशोधनाची आवड असणाऱ्या विद्यार्थ्यांना पीएच.डी. पूर्ण करून संशोधनाच्या संधीही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

■ संगणक प्रणाली कुठे कुठे आवश्यक?

विविध क्षेत्रातील संगणकीकरण, भ्रमणध्वनीमुळे झालेली क्रांती, जागतिकीकरणामुळे झालेले बदल, कालानुरूप बदल, ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा, समाजातील आव्हाने, आर्टिफिशियल इंटेलिजेंस, डेटा सायन्स, बिझनेस ॲनालिटिक्स, मशीन लर्निंग, ई-कॉमर्स, एम-कॉमर्स, डिजिटल इंडिया, स्टार्ट-अप इंडिया, वेब बेस्ड ॲप्लिकेशन्स, इंटरनेट टेक्नॉलॉजी, नेट बँकिंग, मोबाइल बँकिंग, मोबाइल ॲप्स, गेम्स, सायबर सिक्युरिटी, नेटवर्किंग, नेटवर्क ॲडमिनिस्ट्रेशन आणि मॅनेजमेंट; तसेच सेवा क्षेत्र.

(लेखक शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयात उपप्राचार्य आहेत.)

दहावी गुणपत्रिकांचे सोमवारी वाटप

पुणे टाइम्स टीम

राज्य मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. राज्यभरातील विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप येत्या सोमवारी, २६ मे रोजी करण्यात येणार आहे, राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे ही माहिती दिली. परीक्षेच्या गुणपत्रिका आणि तपशीलवार गुण दर्शवणारे अभिलेखे यांचे वाटप विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त शाळांना २६ तारखेला सकाळी ११ वाजता करण्यात येईल. त्याच दिवशी शाळांकडून दुपारी तीन वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रिकांचे वाटप करण्यात येणार आहे. या बाबत विभागीय मंडळांमार्फत शाळांना सूचित करण्यात आले.

Maharashtra Times (Pune Plus) 21.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

दहावी-बारावीचा निकाल १३ मेच्या आतच

६ ते ७ मेदरम्यान बारावीचा आणि १० ते १३ मेदरम्यान दहावीचा निकाल होणार जाहीर

पुढारी विशेष

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी-बारावीच्या परीक्षेतील मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बारावीचा, तर दुसऱ्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर करण्यात येणार आहे. साधारण ६ ते ७ मेदरम्यान बारावीचा आणि १० ते १३ मेदरम्यान दहावीचा निकाल जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती राज्य मंडळातील अधिकाऱ्यांनी दिली आहे.

डिजीलॉकरमध्ये मिळणार दहावी-बारावीचा निकाल

राज्य मंडळाने दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांचे अपार आयडी कळवावेत, असे शाळा-महाविद्यालयांना आवाहन केले होते. त्यानुसार दहावी-बारावीला बसलेल्या तब्बल ३१ लाख विद्यार्थ्यांपैकी २१ लाख विद्यार्थ्यांचे अपार आयडी राज्य मंडळाला प्राप्त झाले आहेत. आता ज्या विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढलेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना निकाल जाहीर झाल्यानंतर त्यांच्या डिजीलॉकर ॲपमध्ये निकाल उपलब्ध करून दिला जाणार आहे. अन्य विद्यार्थ्यांना राज्य मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या संकेतस्थळांवर निकाल पाहता येणार आहे. अपार आयडी असलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल कायमस्वरूपी त्यांना थेट डिजीलॉकर ॲपमध्ये उपलब्ध होणार असल्याने संबंधित विद्यार्थ्यांना त्याचा भविष्यात कोठेही उपयोग करता येणार आहे.

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदा दहावी-बारावीच्या परीक्षा दरवर्षीपेक्षा दहा ते पंधरा दिवस अगोदर घेण्यात आल्या. परीक्षा सुरू असतानाच पेपर तपासणीचे काम सुरू करण्यात आले. तसेच क्रीडा गुणांची नोंद करण्यासाठी २१ एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यामुळे क्रीडा गुणांसह सवलतीचे गुण राज्य मंडळाकडे प्राप्त झाले आहेत.

गेल्या वर्षापासून दहावी-बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण ऑनलाइन घेण्यात येत आहेत. त्यामुळे हे गुण देखील वेगाने राज्य मंडळाला प्राप्त झाले आहेत. राज्य मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून विभागीय मंडळे तसेच शाळा-महाविद्यालयांकडे निकालाच्या कामासंदर्भात सतत पाठपुरावा करण्यात आला. यावर्षी शिक्षकांनी देखील पेपर तपासणीवर बहिष्कार घातला नाही. त्यामुळे पेपर तपासणीची प्रक्रिया वेगवान पद्धतीने पूर्ण झाली आहे.

गेल्या काही वर्षांत बारावीच्या परीक्षेचा निकाल मे महिन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यात, तर दहावीचा निकाल जूनच्या पहिल्या आठवड्यात जाहीर केला जात आहे. परंतु, यंदा पहिल्यांदाच दहावी आणि बारावी या दोन्ही परीक्षांचा निकाल १३ मेपर्यंत जाहीर करण्यात येणार आहे. बुधवारी ३० एप्रिलला कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशन अर्थात सीआयएससीई मंडळाचा निकाल जाहीर झाला आहे.

Pune Edition
May 01, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
City 1 May 2025_013
01 May 2025

तासिका तत्त्वावरील मानधनात दुप्पट वाढ

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ३० - राज्य मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या मानधनात दुप्पटीने वाढ करण्यात आली आहे. अनेक, वर्षानंतर मानधनात वाढ करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतल्यामुळे शिक्षकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

राज्यातील मान्यताप्राप्त प्राथमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातून एखाद्या विषयासाठी अर्धवेळ शिक्षकांसाठी आवश्यक असलेला कार्यभार उपलब्ध होऊ शकत नसेल तर अशा विषयाच्या अध्यापनासाठी अर्हता प्राप्त व्यक्तीची तासिका तत्वावर नियुक्ती करण्यात येते. त्यांना घड्याळी तासिकेनुसार मानधन देण्यात येते.

तासिका तत्वावरील शिक्षकांना तुटपुंजे मानधन देण्यात येते. त्यात कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे ही कठीण होते. त्यामुळे मानधनात वाढ करावी, असा आग्रह शिक्षक संघटनांनी राज्य शासनाकडे अनेकदा धरला होता. अखेर त्यास मान्यता देण्याचा मुहुर्त लागला.

उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांसाठी मानधना पूर्वीचा दर प्रति तास १५० रुपये होता. आता तो ३०० रुपये प्रति तास करण्यात आला आहे. तर माध्यमिकच्या शिक्षकांसाठी पूर्वीचा दर १२० रुपये होता. तो आता सुधारित करून २५० रुपये करण्यात आला आहे. अर्हता पूर्ण नसलेल्या शिक्षकांची घड्याळी तासिका तत्त्वावर नियुक्ती करण्यात येऊ नये. मानधन वाढीच्या निर्णयाची अंमलबजावणी १ मे २०२५ पासून लागू करण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी नमूद केले आहे.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

तासिका तत्त्वावरील शिक्षकांच्या मानधनात दुप्पट वाढ

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्य सरकारने माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या शिक्षकांच्या मानधनात अनेक वर्षांनंतर वाढ केली आहे. राज्यातील मान्यताप्राप्त खासगी अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये घड्याळी तासिका तत्त्वावर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांच्या मानधनामध्ये वाढ करण्यात आली आहे. त्यानुसार उच्च माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षकांसाठी पूर्वीचा दर प्रतितास १५० रुपये होता आता तो ३०० रुपये प्रतितास करण्यात आला आहे. तर माध्यमिकच्या शिक्षकांसाठी पूर्वीचा दर १२० रुपये होता जो सुधारित करून २५० रुपये करण्यात आला आहे.

घड्याळी तासिका तत्त्वावर नियुक्त करण्यात येणारे शिक्षक पूर्णवेळ शिक्षकांप्रमाणे अर्हताप्राप्त असावेत. अर्हता पूर्ण नसलेल्या शिक्षकांची घड्याळी तासिका तत्त्वावर नियुक्ती करण्यात येऊ नये. तसेच घड्याळी शिक्षकांचे मानधन नियमितपणे दिले जाईल, याची शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पुणे यांनी दक्षता घ्यावी, असे शिक्षण विभागामार्फत सांगण्यात आले आहे.

Pune Edition
May 01, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

सांस्कृतिक वारशाचा पुनर्शोध

डॉ. भूषण पटवर्धन
mtedit@timesofindia.com

नवीन शिक्षण धोरणाचे (एनईपी) दूरदर्शी चित्र उभे केले जात असले, तरी अंमलबजावणीच्या पातळीवर काहीसे चिंताजनक चित्र दिसते आहे. या धोरणानुसार, भारतीय ज्ञानप्रणालीचा (आयकेएस) अंतर्भाव हा उच्च शिक्षणाच्या पातळीवर अधिक आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई) आणि विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) २०१८-२०१९ पासूनच 'आयकेएस'वर आधारित नॉन-क्रेडिट अभ्यासक्रमांची सुरुवात करून यामध्ये आघाडी घेतली आहे. त्यानंतरच्या काळात काही विद्यापीठांनीदेखील 'आयकेएस'वर आधारित ऐच्छिक, क्लस्टर आणि किरकोळ पदवी अभ्यासक्रम सुरू केले आहेत.

मात्र, उच्च शिक्षणाच्या पातळीवर असणारी गती शालेय शिक्षणाच्या पातळीवर दिसत नाही. वास्तविक, 'एनईपी-२०२०'मध्ये शालेय शिक्षणावर मुख्यतः लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. भारतीय ज्ञानप्रणालीचा अंतर्भाव शालेय शिक्षणाच्या पातळीवर करण्यात यावा, असे धोरणात सुस्पष्टपणे म्हटले आहे. भारतीय मूल्ये, भारतीयत्वाची ओळख आणि त्यायोगे निर्माण होणारी वैश्विकदृष्टी; तसेच शिक्षणाचा संज्ञानात्मक आराखडा या बाबी पदव्युत्तर शिक्षणापेक्षा बाल्यावस्थेत आणि पौगंडावस्थेत अधिक प्रमाणात तयार व्हायला हव्यात, हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

भारतीय ज्ञानप्रणालीवर आधारित शालेय पाठ्यपुस्तकांचा सध्या मोठा तुटवडा आहे. सध्या उपलब्ध असणारा अभ्यासक्रम हा विसंगत, काहीसा वरवरचा आणि शालेय शिक्षणाशी सुसंगत नाही. शिक्षकांच्या प्रशिक्षणाची स्थिती याहूनही भयानक आहे. भारतीय ज्ञानपरंपरेमधील सांस्कृतिक, वैज्ञानिक आणि तात्त्विक गाभा जाणणारे पुरेसे शिक्षक तयार केल्याशिवाय अभ्यासक्रमात 'आयकेएस'चा समावेश आगाऊपणाचा ठरेल. बरेचदा शिक्षक स्वतःच पक्षपाती असतात. भारतीय ज्ञानप्रणालीशी त्यांचा दूरान्वयानेही संबंध नसल्याने यापूर्वी कधीच न शिकवलेल्या गोष्टी ते कशा शिकवू शकतील?

राष्ट्रीय शिक्षक प्रशिक्षण परिषदेने (एनसीटीई) 'अंडरस्टँडिंग इंडिया : इंडियन इथॉस अँड नॉलेज सिस्टिम' या शीर्षकाने एकदा सुरू केलेल्या अभ्यासक्रमात या प्रणालीतील उणिवा स्पष्टपणे दिसून आल्या. उद्देश चांगला असूनही, हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी सुसंगत नव्हता. तसेच, त्यामध्ये बऱ्याच जुन्या संकल्पना आणि चुकीच्या संज्ञा होत्या. महत्त्वाचे म्हणजे, त्याची रचना अतिशय यांत्रिक पद्धतीने करण्यात आली होती. प्रातिनिधिक प्रयत्नांतून बरेचदा चांगली फलनिष्पत्ती होत नाही. त्यामुळेच भारतीय ज्ञानप्रणालीविषयी आदराची भावना निर्माण होण्याऐवजी त्याकडे काहीशा उपहासाने पाहिले जाण्याचा धोका त्यातून संभवतो. शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाची रचना करणाऱ्यांनी त्यामध्ये तत्त्वज्ञान, साहित्य, विज्ञान, शिक्षण आणि संस्कृती या विषयांतील तज्ज्ञांचा समावेश केला नाही, तर 'एनईपी-२०२०'चा उद्देश सफल होणार नाही. शिक्षकांच्या प्रशिक्षणाशिवाय पाठ्यक्रमातील



भारतीय ज्ञानप्रणालीचे शिक्षणातील समावेशन हे केवळ गतकाळातील आठवणींपुरते मर्यादित राहू नये. या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांना प्राचीन काळातील कल्पनांकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळायला हवी.

सुधारणा निष्फळ आहेत, हे जाणण्याची वेळ आली आहे. क्षमतानिर्मितीसाठी प्रशंसनीय प्रयत्न करणारी 'एनसीईआरटी'सारखी संस्थाही कोणत्या प्रकारचे परिवर्तन आवश्यक आहे, हे व्यवस्थित जाणू शकलेली नाही. शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे विकेंद्रीकरण आणि लोकशाहीकरण तातडीने अत्यावश्यक आहे; तसेच विद्यापीठे आणि शिक्षक प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना शाळांबरोबर काही नावीन्यपूर्ण कार्यक्रमांची रचना करण्यासाठी प्रोत्साहन द्यायला हवे. विद्यापीठे, भारतीय ज्ञानप्रणालीतील तज्ज्ञ, हा अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळा, त्या शाळांमधील शिक्षक आणि अशा प्रकारे केल्या जाणाऱ्या अध्यापनाचे मूल्यमापन करणारे एक 'मॉडेल नेटवर्क' तयार करणे अत्यावश्यक आहे.

आपली तरुणाई आपल्या शैक्षणिक संस्थांकडे कशी पाहते याचाही विचार केला पाहिजे. 'ऑक्सफर्ड ऑफ दी ईस्ट' होण्याची आकांक्षा बाळगण्यापेक्षा आपण ऑक्सफर्डला 'पाश्चिमात्य नालंदा' म्हणू शकतो. ही अहंकारयुक्त भावना नाही, तर वसाहतवाद मुक्तीच्या दिशेने एक पाऊल आहे. मात्र, हे केवळ घोषणांमध्ये न राहता प्रत्यक्षात उतरले, तर समग्र आकलन, नैतिकतेवर आधारलेले संशोधन, आध्यात्मिक बुद्धिमत्ता आणि सामाजिक कल्याणाला महत्त्व देणारे आपले प्रारूप जगापुढे येईल.

यासाठी युवकांच्या आकांक्षामध्ये बदल करणे यामध्ये गरजेचे आहे. आजच्या काळातील मुले सेलिब्रिटी, इन्फ्लुएन्सर आणि काल्पनिक कथांमधील पात्रांना आदर्श मानतात. हॅरी पॉटरच्या जागी हनुमान किंवा कृष्ण यांना आणणे हे काही सोपे नाही; पण हे आव्हान शिक्षणव्यवस्थेने स्वीकारायला हवे. याचा अर्थ हॅरी पॉटरच्या जागी लगेच हनुमान किंवा कृष्णाला आणावे, असा होत नाही; परंतु आपल्या शिक्षणपद्धतीतूनच त्याग, शक्ती, मानवता, सेवा आणि धैर्य हे गुण ज्यांच्या ठायी आहेत अशा हनुमानासारख्या व्यक्तिरेखांचे संस्कार विद्यार्थ्यांवर व्हायला हवेत. यासाठी स्वतः शिक्षकांनीच 'रोल मॉडेल' व्हायला पाहिजे. अशा व्यक्तिरेखांमधील बौद्धिक खोली, नैतिक स्पष्टता आणि सांस्कृतिक प्रगल्भता या चांगल्या गोष्टींचे आदर्श घेऊन विद्यार्थी उपभोगतावाद आणि वरवरची प्रसिद्धी अशा प्रलोभनांच्या पलीकडे विचार करू शकतील.

आयुर्वेदप्रणित बायोमेडिसिनपासून ते भाषाशास्त्रचलित संगणकीय प्रारूपांपर्यंत तसेच पर्यावरणीय नीतिमत्तेपासून ते वास्तूशास्त्रापर्यंत अनेकविध विद्याशाखांचा संपन्न वारसा लाभलेल्या भारतीय ज्ञानप्रणालीला विज्ञान-तंत्रज्ञानयुक्त आणि समाजाला आकार देणारी एक जागृत पद्धती म्हणून घडविण्याचे आव्हान आज आपल्यासमोर आहे. यासाठी भारतातील विद्यापीठांनी केवळ पाश्चात्यपद्धती-परंपरा यांचे अनुकरण न करता आपल्या बौद्धिक परंपरांवर आधारित नवे मापदंड जागतिक पातळीवर प्रस्थापित करायला पाहिजेत.

भारतीय ज्ञानप्रणाली ही गतकाळाच्या उदात्तीकरणासाठी नाही; तसेच त्याबाबत अंधश्रद्धा किंवा फुका अभिमान बाळगण्याचीही गोष्ट नाही. त्यामुळे भारतीय ज्ञानप्रणालीचे शिक्षणातील समावेशन हे केवळ गतकाळातील आठवणींपुरते मर्यादित राहू नये. या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांना प्राचीन काळातील कल्पनांकडे पाहण्याची नवी दृष्टी, तसेच, विद्यार्थ्यांमधील नवोपक्रमांना चालना मिळायला हवी. उदाहरणार्थ, आयुर्वेदाने प्रतिबंधात्मक आणि वैयक्तिक औषधांमध्ये प्रगती केली पाहिजे. वास्तू आणि पारंपरिक वास्तूशास्त्राने शाश्वत शहरांच्या प्रारूपांबद्दल मार्गदर्शन करायला हवे. स्वदेशी कृषी ज्ञान आणि गोमाता या संकल्पनांनी भविष्यातील अन्नसुरक्षा आणि आरोग्याच्या समस्यांविषयी माहिती द्यायला हवी. संस्कृत भाषा ही कृत्रिम बुद्धिमत्तेतील (एआय) नावीन्यता आणि संगणकीय मॉडेलिंगला साहाय्यभूत ठरायला हवी. आपल्याकडील तत्त्वज्ञान आणि नैतिकता ही जबाबदार तांत्रिक प्रगतीसाठीचा ढाचा तयार करू शकते. सांस्कृतिकदृष्ट्या देशाला कमकुवत करणाऱ्या शक्ती सध्या प्रबळ आहेत. अनेक लोक पाश्चिमात्य मूल्यांमध्ये आकंठ बुडालेली; भारतीय ज्ञानापासून पूर्णतः अलिप्त झालेली पिढी घडवत आहेत. 'एनईपी'मुळे आता आपल्याला पिढीतून एकदा मिळणारी संधी उपलब्ध झालेली आहे. पण, आता वेळ निसटून चालली आहे. त्यासाठी आता हेतू आणि अंमलबजावणीची सांगड गरजेची आहे. धोरण आणि व्यवहारांमध्ये एकवाक्यता आणली पाहिजे. दूरदृष्टीने घेतलेल्या निर्णयांचे प्रत्यंतर शालेय वर्गातील प्रत्यक्ष शिक्षणात आले पाहिजे. भारतीय ज्ञानप्रणालीच्या शिक्षणातील समावेशनाची सुरुवात तरुणांमध्ये खरा इतिहास, कठोरतेच्या कसोटीवर तावून-सुलाखून निघालेले विज्ञान, मानवी मूल्ये आणि प्रेरणादायी गोष्टी यांच्या वास्तवदर्शी उदाहरणांमधून करायला हवी. शिक्षकांच्या प्रशिक्षणातही ते झिरपले पाहिजे आणि शालेय शिक्षणातही ते रुजले पाहिजे. उच्च शिक्षणाने केवळ प्रतिकृतीवर भर न देता संशोधन आणि नवोपक्रम यांच्यावर लक्ष केंद्रित करायला हवे.

(लेखक विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी उपाध्यक्ष आहेत.)

Maharashtra Times 1.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उन्हाळी सुट्या रद्द

- विविध कामांसाठी शाळेत हजर राहावे लागणार
- शिक्षण संचालनालयाचे आदेश

पुणे : पुढारी वृत्तसेवा

मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उन्हाळी सुट्या रद्द केल्या आहेत. अकरावी प्रवेशाचे ऑनलाइन कामकाज, विद्यार्थ्यांचे अपार आणि आधाराचे काम अद्ययावत करणे, तसेच स्कूल मॅपिंग, संचमान्यता दुरुस्ती यांसारखी कामे दिली आहेत. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्यांना नियमित शाळेत उपस्थित राहण्याचे आदेश शिक्षण संचालनालयाने दिले आहेत.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक, लिपिक व इतर शिक्षकेतर कर्मचारी यांना उन्हाळी सुटीत विविध कामकाजासाठी शालेय कार्यालयात उपस्थित राहणे आवश्यक आहे. यामध्ये अकरावी ऑनलाइन कामकाज, आधार/अपार आयडी कामकाज, स्कूल मॅपिंग कामकाज, संचमान्यता दुरुस्ती व इतर अनुषंगिक महत्त्वाची कामे दिली आहेत. संबंधित सर्व कामे करण्यासाठी उन्हाळी सुटीत शाळेतील मुख्याध्यापक, लिपिक व इतर शिक्षकेतर कर्मचारी यांनी शाळेत उपस्थित राहून कामकाज करण्यासंदर्भात विभागातील सर्व शाळेच्या मुख्याध्यापक यांना तत्काळ निर्देशित करावे, असे स्पष्ट निर्देश माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे प्रभारी संचालक डॉ. श्रीराम पानझाडे यांनी विभागीय उपसंचालक, माध्यमिकचे सर्व शिक्षणाधिकारी यांना पत्राद्वारे दिले आहेत.

Pune Edition
May 01, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

‘एनईपीशी सुसंगत अभ्यासक्रम आखा’

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठांना त्यांच्या चालू अभ्यासक्रमांचा सखोल आढावा घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. विद्यापीठांनी आपल्या अभ्यासक्रमांमध्ये 'एनईपी'च्या तरतुदींचा समावेश करून त्यांना अधिक सुसंगत बनवावे, असे आयोगाने स्पष्ट केले आहे.

‘यूजीसी’ची विद्यापीठांना सूचना

'यूजीसी'ने जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार, विद्यापीठांनी त्यांच्या अभ्यासक्रमांची पुनर्रचना करताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर द्यावा. यामध्ये कौशल्यविकास, बहुविषयकता, लवचिकता आणि व्यावसायिकता यांचा समावेश असावा. विद्यापीठांनी त्यांच्या अभ्यासक्रमांचे पुनरावलोकन करून त्यांना 'एनईपी'च्या उद्दिष्टांशी सुसंगत बनवावे, असे आयोगाने सुचवले आहे.

'यूजीसी'ने विद्यापीठांना त्यांच्या अभ्यासक्रमांच्या पुनर्रचनेसाठी एक निश्चित वेळापत्रक तयार करण्याची सूचना केली आहे. यामध्ये अभ्यासक्रमांचे पुनरावलोकन, सुधारणा आणि अंमलबजावणी यांचा समावेश आहे. विद्यापीठांनी त्यांच्या अभ्यासक्रमांचे पुनरावलोकन करताना विद्यार्थ्यांच्या गरजा, उद्योगजगतातील मागणी आणि जागतिक स्तरावरील शैक्षणिक घडामोडींचा विचार करावा, असे आयोगाने नमूद केले आहे.

विद्यापीठांनी त्यांच्या अभ्यासक्रमांच्या पुनर्रचनेसाठी संबंधित विभागांशी सल्लामसलत करून एक व्यापक योजना तयार करावी. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन निर्णय घेण्यात यावेत, असे आयोगाने सुचवले आहे. या सूचनेनंतर, देशभरातील विद्यापीठांनी त्यांच्या अभ्यासक्रमांच्या पुनर्रचनेसाठी आवश्यक त्या उपाययोजना हाती घेण्याची अपेक्षा आहे.

क्षमता विकसित करण्यावर भर

विद्यापीठांनी त्यांच्या अभ्यासक्रमांमध्ये नवीन तंत्रज्ञान, संशोधन आणि नवोपक्रम यांचा समावेश करून विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यास सक्षम बनवावे. तसेच, विद्यार्थ्यांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनवण्यावर भर द्यावा, असेही आयोगाने स्पष्ट केले आहे.

Maharashtra Times, Mumbai, 2.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

अभ्यासक्रम अद्ययावत करा

यूजीसीचे महाविद्यालये, विद्यापीठांना आवाहन

पुणे : पुढारी वृत्तसेवा

विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने देशातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांना त्यांच्या शैक्षणिक अभ्यासक्रमांमध्ये बदल करून अभ्यासक्रम अद्ययावत करण्याचे आवाहन केले आहे. आयोगाने स्पष्ट केले आहे की, शिक्षण केवळ पुस्तकांपुरते मर्यादित नसावे, तर त्यात व्यावहारिक अनुभव, जीवन कौशल्ये आणि विद्यार्थ्यांना 'करून शिकणे' यासारख्या घटकांचा समावेश असावा, जेणेकरून विषयाचा अनावश्यक भार कमी करता येईल आणि शिक्षण अधिक प्रभावी होऊ शकेल. वेगाने बदलणाऱ्या जगाच्या गरजा लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

यूजीसीने सर्व विद्यापीठांना अभ्यासक्रम सुधारणेला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. तसेच संलग्न महाविद्यालयांद्वारे ऑफर केलेल्या सर्व कार्यक्रमांचे अभ्यासक्रम अद्ययावत करण्यासाठी, पुनरावलोकन करण्यासाठी आणि अंमलात आणण्यासाठी त्वरित पावले उचलण्याच्या सूचना दिल्या आहेत. या दिशेने ठोस पाऊल उचलत, यूजीसीने सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंना आणि महाविद्यालयांच्या प्राचार्यांना एक पत्र पाठवले आहे. त्यात स्पष्ट केले आहे की, सर्व शैक्षणिक कार्यक्रमांचा अभ्यासक्रम एनईपी -२०२० च्या शिफारशींनुसार तत्काळ सुधारित केला पाहिजे. या अभ्यासक्रमांमधील क्रेडिट फ्रेमवर्क आणि पात्रता रचना अशा प्रकारे डिझाइन केली पाहिजे की, अप्रेंटिसशिप, इंटर्नशिप आणि कौशल्य विकासाला योग्य स्थान देता येईल.

यूजीसी सचिव मनीष आर. जोशी यांनी पत्रात स्पष्ट केले आहे की, 'जगात तंत्रज्ञान आणि नवोपक्रम प्रत्येक क्षणी बदलत आहेत, त्यामुळे शिक्षक आणि संस्थांनी काळासोबत स्वत:ला अपडेट करणे महत्त्वाचे आहे. आपल्याला आजच्या आणि भविष्यातील आव्हानांनुसार, नवीन पिढी तयार करावी लागेल. शालेय शिक्षणात हा बदल आधीच सुरू झाला आहे.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) अंतर्गत, शालेय स्तरावर अभ्यासक्रमात वेगाने बदल होत आहेत. अलीकडेच प्रकाशित झालेल्या नवीन पाठ्यपुस्तकांमध्ये विषयांची सामग्री कमी करण्यात आली आहे आणि विद्यार्थ्यांची कौशल्ये, जीवन व्यवस्थापन क्षमता विकसित करणे आणि सर्जनशील विचारसरणीला चालना देण्यावर भर देण्यात आला आहे.

Pune Edition
May 03, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
City 03 May 2025_005
प्रतीक 03 May 2025
बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

सर्वच विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत मोठा बदल

कौशल्य आणि व्यावसायिकता आणा

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २ - राष्ट्रीय शिक्षण धोरणाची प्रभावी अंमलबजावणीसाठी विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सध्याच्या अभ्यासक्रमांचा आढावा घ्या आणि नवीन शैक्षणिक धोरणानुसार बदला, असे यूजीसीने सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांना निर्देश दिले आहेत. त्यामुळे लवकरच अभ्यासक्रमात मोठे बदल होण्याची चिन्हे आहेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या (एनईपी) अंमलबजावणीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) अभ्यासक्रम बदलांच्या अनुषंगाने सूचना दिल्या आहेत. विद्यापीठांनी आपल्या अभ्यासक्रमांमध्ये 'एनईपी'च्या तरतुदींचा समावेश करून त्यांना अधिक सुसंगत बनवावे. अभ्यासक्रमात कौशल्ये, लवचिकता आणि व्यावसायिकता आणा. विद्यार्थ्यांच्या गरजा व उद्योगातील मागणी लक्षात घ्या. त्यानुसार विद्यापीठांनी वेळापत्रक तयार करून कार्यवाही करावी, असेही यूजीसीने स्पष्ट केले आहे. यूजीसीने जाहीर केलेल्या अधिसूचनेनुसार विद्यापीठांनी त्यांच्या अभ्यासक्रमांची पुनर्रचना करताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर द्यावा. यामध्ये कौशल्यविकास, बहुविषयकता, लवचिकता आणि व्यावसायिकता यांचा समावेश असावा, असेही नमूद करण्यात आले आहे.

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

यूजीसीने विद्यापीठांना त्यांच्या अभ्यासक्रमांच्या पुनर्रचनेसाठी एक निश्चित वेळापत्रक तयार करण्याची सूचना केली आहे. यामध्ये अभ्यासक्रमांचे पुनरावलोकन, सुधारणा आणि अंमलबजावणी यांचा समावेश आहे. विद्यापीठांनी त्यांच्या अभ्यासक्रमांचे पुनरावलोकन करताना विद्यार्थ्यांच्या गरजा, उद्योग जगतातील मागणी आणि जागतिक स्तरावरील शैक्षणिक घडामोडींचा विचार करावा, असेही आयोगाने म्हटले आहे.

विद्यापीठांनी त्यांच्या अभ्यासक्रमांच्या पुनर्रचनेसाठी संबंधित विभागांशी सल्लामसलत करून एक व्यापक योजना तयार करावी. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन निर्णय घ्यावेत, असे आयोगाने सुचवले आहे. या सूचनेनंतर देशभरातील विद्यापीठांनी त्यांच्या अभ्यासक्रमांच्या पुनर्रचनेसाठी आवश्यक त्या उपाययोजना हाती घेतील, अशी अपेक्षा यूजीसीने व्यक्त केली आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकमत

दहावी-बारावीच्या परीक्षा शुल्कात १० टक्के वाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी-बारावीच्या परीक्षा शुल्कात १० टक्क्यांची वाढ करण्याचा निर्णय २४ एप्रिल रोजी घेतला आहे. आता विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कापोटी ४७० रुपयांऐवजी ५२० रुपये भरावे लागणार आहेत. १७ नंबर फॉर्म भरून परीक्षा बसणाऱ्या खासगी विद्यार्थ्यांना १,११० रुपये नोंदणी शुल्क भरावे लागेल. शासनाने ३० टक्के परीक्षा शुल्क वाढीचा निर्णय घेतला होता. दरवर्षी १० टक्के वाढ करण्याचे ठरवण्यात आले.

Pune Main
Page No. 16 May 03, 2025
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

28 हजार विद्यार्थी पुन्हा देणार सीईटी

पुणे : पुढारी वृत्तसेवा
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी नव्याने घेतल्या जाणाऱ्या ५ मे रोजी होत असलेल्या पुनर्परीक्षेचे प्रवेशपत्र शुक्रवारी जारी केले असून, २७ हजार ८३७ विद्यार्थ्यांपैकी शुक्रवार सायंकाळपर्यंत २२ हजार विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेतल्याची माहिती सीईटी सेलच्या वतीने देण्यात आली.

एमएचटी सीईटी परीक्षेत पीसीएम गटातील २७ एप्रिल रोजी एका सत्रातील गणित विषयाच्या ऑनलाइन प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचे पर्याय बदलल्याने २७ हजार ८३७ विद्यार्थ्यांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागले. यामुळे या विद्यार्थ्यांची परीक्षा ५ मे रोजी पुन्हा घेतली जाणार आहे. गणित विषयातील तब्बल २० पेक्षा अधिक प्रश्नांच्या पर्यायांची अदलाबदल झाल्याचे हा गोंधळ झाल्याने या सत्रातील सर्व उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांची पुन्हा नव्याने ही परीक्षा घेतली जात आहे. यामुळे पुनर्परीक्षेचे प्रवेशपत्र शुक्रवारी दुपारीच संकेतस्थळावर जारी केले असून, २७ हजार ८३७ विद्यार्थ्यांपैकी शुक्रवार सायंकाळपर्यंत २२ हजार विद्यार्थ्यांनी प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेतल्याची माहिती सीईटी सेलच्या वतीने देण्यात आली. परीक्षा देऊन गावी गेलेल्या विद्यार्थ्यांना या परीक्षेला पुन्हा मुंबईला यावे लागले आहे. जे विद्यार्थी परीक्षा झाल्यानंतर मुंबई व पुण्यातून आपापल्या गावी गेले आहेत, त्यांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत असल्याच्याही तक्रारी आहेत.

विधी सीईटीसाठी ७९.०९ टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती...

विधी तीन वर्षे अभ्यासक्रमाची ४ मे रोजी होणारी परीक्षा २ मे रोजी घेण्यात आली. या परीक्षेला नोंदणी केलेल्या ५७ हजार २९५ उमेदवारांपैकी ४५ हजार ३१५ उपस्थित राहिले. उपस्थितीचे प्रमाणे ७९.०९ टक्के इतके होते. ११ हजार ९८० विद्यार्थी गैरहजर राहिले. पहिल्या सत्रात सकाळी ८:३० ते १०:३० या वेळेत, १२० परीक्षा केंद्रांवर एकूण १८ हजार ९७४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, त्यापैकी १४ हजार ६८० विद्यार्थी उपस्थित राहिले. त्यांचे उपस्थिती प्रमाण ७७.३७ टक्के होते. दुसऱ्या सत्रात, म्हणजे दुपारी १२:३० ते २:३० या वेळेत, १२१ केंद्रांवर १९ हजार १९८ उमेदवारांनी नोंदणी केली होती, ज्यापैकी १५ हजार २६९ उपस्थित होते. त्यांचे उपस्थिती प्रमाण ७९.५३ टक्के होते. तिसऱ्या सत्रात, म्हणजे संध्याकाळी ४:३० ते ६:३० या वेळेत, १२१ केंद्रांवर १९ हजार १२३ उमेदवारांची परीक्षा होती. त्यापैकी १५ हजार ३६६ विद्यार्थी उपस्थित होते. त्यांचे उपस्थिती प्रमाण ८०.३५ टक्के होते.

Pune Edition
May 03, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
City 5 May 2025_001
प्रतीक 05 May 2025
बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

इयत्ता बारावीच्या परीक्षेचा आज निकाल

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ४ - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा ऑनलाइन निकाल सोमवारी (दि. ५) दुपारी १ वाजता जाहीर करण्यात येणार आहे. यामुळे विद्यार्थी, पालक, शिक्षकांना निकालाबाबत उत्सुकता लागली आहे.

राज्य मंडळाच्या वतीने पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत इयत्ता बारावी परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती.

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे विषयनिहाय संपादित केलेले गुण संकेतस्थळांवरून उपलब्ध होतील व माहितीची प्रत प्रिंटआउट घेता येईल. त्याचप्रमाणे डिजिलॉकर ॲप मध्ये डिजिटल गुणपत्रिका संग्रहित करून ठेवण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. कनिष्ठ महाविद्यालयांना https://mahahsscboard.in या संकेतस्थळावर एकत्रित निकाल उपलब्ध होणार आहे. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा १५ दिवस आधी परीक्षा घेण्यात आल्या होत्या. त्यामुळे निकालही लवकर लागत आहे. मागील वर्षी २१ मे रोजी निकाल जाहीर करण्यात आला होता. यंदा त्या तुलनेत १५ दिवस आधीच निकाल जाहीर होत आहे. ऑनलाइन निकालानंतर

(पान २ पहा) ▸▸

गुणपडताळणी व उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी ६ ते २० मे पर्यंत मुदत

ऑनलाईन निकाल पाहण्यासाठी अधिकृत संकेतस्थळ

https://results.digilocker.gov.in
https://mahahsscboard.in
http://hscresult.mkcl.org
https://results.targetpublications.org
https://results.navneet.com

इयत्ता बारावीच्या परीक्षेचा आज निकाल

परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यास स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने संपादित केलेल्या गुणांची गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाइन पद्धतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळ https://mahahsscboard.in वरून स्वत: किंवा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासाठी आवश्यक अटी, शर्ती व सूचना संकेतस्थळावर देण्यात आल्या आहेत. गुणपडताळणीसाठी व उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी ६ ते २० मेपर्यंत अर्ज ऑनलाइन पद्धतीने करता येणार आहे, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी दिली आहे. परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज राज्य मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून, छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करून विहित नमुन्यात विहित शुल्क भरून संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. ज्या विद्यार्थ्यांना उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करावयाचे असेल, त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या परीक्षेत सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या तीन संधी (जून-जुलै २०२५, फेब्रुवारी-मार्च २०२६ व जून-जुलै २०२६) श्रेणी, गुणसुधार योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील. जून-जुलै २०२५ मध्ये आयोजिण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार व खासगीरीत्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ७ मेपासून राज्य मंडळाच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरून घेण्यात येणार आहेत.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

City | PuneTimesMirror Monday, May 5, 2025 | 7

Panel to study law on varsities

Committee will suggest changes to the Maharashtra Public Universities Act, 2016; SPPU to bear costs

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
@YashPune_Mirror

In line with the changes in the higher education sector, amendments will be made to the Maharashtra Public Universities Act 2016. For this, a nine-member committee has been appointed under the chairmanship of former Vice Chancellor Dr. Nitin Karmalkar, and a period of three months has been given to recommend new acts consistent with the Central Government's National Education Policy 2020.

The Higher and Technical Education Department has issued a government resolution in this regard. The implementation of the National Education Policy 2020 has been started in non-agricultural universities, autonomous colleges, and affiliated colleges.

In the backdrop of the radical changes in the higher education sector and new educational trends, it is necessary for higher education to be more relevant, research-oriented, employable, and accessible to all sections of the society. It is necessary to create a healthy and nurturing environment in educational institutions, colleges, and universities providing higher education through the University Act and plan accordingly, considering the student as the centre of higher education.

Therefore, in accordance with the National Education Policy 2020 and in line with the changes taking place in the educational sector, a high-level committee has been appointed to amend the Maharashtra Public Universities Act, 2016 as required.

SPPU TO BEAR COMMITTEE EXPENSES



The Higher Education Department has placed the responsibility of bearing the expenses for the committee on proposed changes to the University Act on the Savitribai Phule Pune University. It has stated: "Savitribai Phule Pune University should provide all the necessary administrative support to the committee, and the entire cost of the committee, including meeting allowance, should be borne by the university from its funds as per the university regulations."

The committee, headed by former Vice Chancellor of Savitribai Phule Pune University Dr Nitin Karmalkar, includes Vice Chancellor of Shivaji University Dr DT Shirke, Vice Chancellor of SNDT Women's University Dr Ujjwala Chakradev, Vice Chancellor of Dr Homi Bhabha State University Dr Rajnish Kamat, former Vice Chancellor Dr RS Mali, Senior Law Officer of Savitribai Phule Pune University Dr Parveen Syed, Registrar of Yashwantrao Chavan Maharashtra Open University Dilip Bharad, Director of Technical Education, and Director of Higher Education.

The committee's terms of reference have been set as follows: To study and amend all the sections of the existing Act; to ensure that the revised new Act is consistent with the National Education Policy 2020 of the Central Government; to consider the measures and acts being adopted at the national and international levels; and to make feasible, objective, and implementable recommendations.

HIGHLIGHTS

- Implementation of the NEP 2020 begins in non-agricultural universities, autonomous colleges, and affiliated colleges
- Proposal to amend Maharashtra Public University Act, 2016
- Higher Education Dept forms a nine-memberpanel headed by former Vice Chancellor of SPPU Dr Nitin Karmalkar
- SPPU to pay honorarium and allowances of committee members
- The committee's terms of reference have been set

CS Scanned with CamScanner

Pune Mirror 5.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com

बारावीच्या १२४ केंद्रांची मान्यता होणार रद्द!

गैरमार्गांची पडताळणी करून कारवाई करणार असल्याची गोसावी यांची माहिती

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या बारावीच्या परीक्षेत गैरप्रकार घडलेल्या राज्यातील १२४ परीक्षा केंद्रांची मान्यता धोक्यात आली आहे. या परीक्षा केंद्रांवर घडलेल्या एकूण ३६७ गैरप्रकारांची पडताळणी करून सुनावणीत दोषी आढळणाऱ्या संबंधित परीक्षा केंद्रांची मान्यता कायमस्वरूपी रद्द करण्यात येणार असल्याची माहिती राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली.

राज्यात यंदा बारावीच्या परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यासाठी बैठे पथक, भरारी पथक, महिला पथक, विशेष भरारी पथक, आकस्मिक भेटी, परीक्षा केंद्रांवर चित्रीकरण, ड्रोनद्वारे देखरेख, अशा विविध उपाययोजना करण्यात आल्या. तसेच गैरप्रकार होणाऱ्या परीक्षा केंद्रांची मान्यता कायमस्वरूपी रद्द करण्याचाही इशारा देण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर राज्यभरातील एकूण १२४ परीक्षा केंद्रांवर परीक्षेदरम्यान गैरप्रकार घडल्याचे निदर्शनास आले.

गोसावी म्हणाले, 'राज्यभरातील १२४ परीक्षा केंद्रांवरील गैरप्रकार भरारी पथक, पर्यवेक्षक, बैठे पथक यांच्यापैकी कोणी पकडले? याची चौकशी करण्यात येईल. संबंधित केंद्रांची सुनावणी घेऊन चौकशीअंती दोषी केंद्रांची मान्यता कायमस्वरूपी रद्द करण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात संबंधित परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांना दहावी-बारावीची परीक्षा देता येणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

गैरप्रकार आढळलेली विभागनिहाय केंद्र

विभाग	केंद्र	संख्या
पुणे	२५	४५
नागपूर	१९	३३
छत्रपती संभाजीनगर	४४	२१४
मुंबई -	०५	०९
कोल्हापूर	०३	०७
अमरावती	१०	१७
लातूर	११	२९
नाशिक	६	१२
कोकण	०१	०१

Pune Edition
May 06, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

१,९२९ महाविद्यालयांचा निकाल शंभर टक्के

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या बारावीच्या निकालात एक हजार ९२९ महाविद्यालयांचा निकाल शतप्रतिशत, तर ३८ महाविद्यालयांचा निकाल शून्य टक्के लागल्याचे स्पष्ट झाले आहे.

बारावीच्या परीक्षेसाठी राज्यातील एकूण १४ हजार ४९६ महाविद्यालयांनी नोंदणी केली होती. यात १ ते १० टक्के निकाल लागलेली १६ महाविद्यालये आढळून आलेली आहेत.

१० ते २० टक्के - ४३, २० ते ३० टक्के - ६२, ३० ते ४० टक्के - १०७, ४० ते ५० टक्के - १७८, ५० ते ६० टक्के २८५, ६० ते ७० टक्के - ५०४, ७० ते ८० टक्के - ९६६, ८० ते ९० टक्के - १८०६, ९० ते ९९.९९ टक्के - ४५६२, १०० टक्के - १९२९ याप्रमाणे महाविद्यालयांचे निकाल लागले आहेत.

३८ महाविद्यालयांचा शून्य टक्के निकाल : परीक्षेसाठी केली होती १४ हजार ४९६ महाविद्यालयांनी नोंदणी

विभागनिहाय महाविद्यालयांचा निकाल

विभाग	शून्य टक्के	१०० टक्के
पुणे	६	३१०
नागपूर	६	२७६
छत्रपती संभाजीनगर	६	१७१
मुंबई	५	२४०
कोल्हापूर	२	१९८
अमरावती	३	२८३
नाशिक	४	२४७
लातूर	५	९२
कोकण	१	११२
एकूण	३८	१९२९

१०० टक्के निकालात पुणे आघाडीवर

पुणे विभागात सर्वाधिक ३१० महाविद्यालयांचा १०० टक्के निकाल लागला आहे. लातूर विभागात १०० टक्के निकालाची सर्वांत कमी ९२ महाविद्यालये आढळली आहेत.

Pune Edition

May 06, 2025 Page No. 05

Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

चार वर्षांत १० टक्क्यांनी घटला कला शाखेचा निकाल

अभ्यासाकडे लक्ष दिले जात नसल्याने वाढतेय अनुत्तीर्णांचे प्रमाण

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीच्या निकालात कला शाखेच्या निकालात सातत्याने घट होत असून, गेल्या चार वर्षांत हा निकाल १० टक्क्यांनी घटला आहे. यंदा तर तब्बल ५.३६ टक्क्यांनी निकाल घटला आहे.

हा निकाल घटण्याचे कोणतेही ठोस कारण नसल्याची माहिती राज्य मंडळाने दिली आहे. परंतु, अकरावीला विज्ञान आणि वाणिज्य शाखेकडे गुणवंत विद्यार्थ्यांचा ओढा वाढल्याने, कला शाखेत उर्वरित विद्यार्थी प्रवेश घेतात. या विद्यार्थ्यांकडून अभ्यासाकडे व्यवस्थित लक्ष न दिल्याने, अनुत्तीर्णांचे प्रमाण वाढत असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली.

राज्य मंडळाच्या बारावीच्या परीक्षेतील कला शाखेच्या निकालात कमालीची घट झाल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते. त्या तुलनेत विज्ञान आणि वाणिज्य शाखेमध्ये उत्तीर्ण होण्याच्या प्रमाणात फारसा बदल झालेला नाही. गेल्या चार वर्षांत या शाखेच्या निकालात साधारण एक टक्क्याचा फरक जाणवतो. त्याचवेळी कला शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण हे ९.९९ टक्क्यांनी घटले आहे.

गेल्या वर्षी बारावीच्या परीक्षेच्या निकालात उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण ८५.८८ टक्के होते, तर यंदाच्या निकालात ते ८०.५२ टक्के झाले आहे. त्यामुळे एकाच वर्षात हे प्रमाण ५.३६ टक्क्यांनी कमी झाले आहे. कला शाखेतील उत्तीर्णांचे प्रमाण घटणे ही कला शाखेसाठी धोक्याची घंटा असल्याचे सांगितले जात आहे. याचा थेट परिणाम हा पदवी अभ्यासक्रमांवर होणार असल्याचे काही अभ्यासकांनी स्पष्ट केले आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांनी फिरवली पाठ

विज्ञान आणि वाणिज्य शाखेतून उच्च शिक्षण घेतल्यानंतर रोजगाराच्या अन् नोकरीच्या चांगल्या संधी उपलब्ध होतात. परंतु, त्या तुलनेत कला शाखेतून शिक्षण घेतल्यानंतर उपलब्ध होत नाहीत. त्यातच जगात सध्या तंत्रज्ञानाचा बोलबाला असल्याने विज्ञान शाखेचे महत्त्व वाढले आहे. त्या खालोखाल वाणिज्य शाखेतील पदवीधरांनाही खासगी क्षेत्रात चांगल्या संधी आहेत. ही बाब लक्षात घेता कला शाखेकडे गुणवंत विद्यार्थ्यांनी पाठ फिरवल्याचे चित्र आहे.

" कला शाखेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे प्रमाण घटण्याचे ठोस कारण सांगता येणार नाही. परंतु, दहावीत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रवेशाचा ओढा हा विज्ञान आणि वाणिज्य शाखेकडे वाढला आहे. त्यानंतर विद्यार्थी कला शाखेत प्रवेश घेत असल्याचे चित्र आहे. तरीदेखील यंदा जो निकाल घटले आहे, त्याची कारणमीमांसा करण्यात येणार आहे.

- शरद गोसावी, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

कला शाखेचा निकाल

वर्ष	टक्केवारी
२०२२	९०.५१
२०२३	८४.०५
२०२४	८५.८८
२०२५	८०.५२

Pune Edition
May 06, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

बारावीत 'कले'ची घसरण!

कला शाखेतीलच तब्बल ६८ हजार विद्यार्थी नापास

५.३६ टक्क्यांनी घटला निकाल

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने यंदा पहिल्यांदाच सीबीएसईच्या अगोदर निकाल लावण्याची किमया साधली. राज्य मंडळाने राबविलेले कॉपीमुक्त अभियान, परीक्षा केंद्रांवर करण्यात आलेला ड्रोनचा वापर, यामुळे विद्यार्थ्यांवर चांगलीच जरब बसली. परिणामी, यंदा निकालात तब्बल १.४९ टक्क्यांनी घट झाली. निकालात कला शाखेची मोठी घसरण झाली असून, कला शाखेचा निकाल ५.३६ टक्क्यांनी घटला. कला शाखेतील तब्बल ६८ हजारांहून अधिक विद्यार्थी नापास झाले तर सर्व शाखांमधील तब्बल एक लाख १५ हजार ९६ विद्यार्थी नापास झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

यंदा बारावीचा निकाल ९१.८८ टक्के लागला असून, गतवर्षीच्या तुलनेत १.४९ टक्क्यांनी निकालात घट झाली आहे. सर्वाधिक ९६.७४ टक्के निकाल कोकण विभागाचा, तर लातूर विभागाचा सर्वांत कमी ८९.४६ टक्के निकाल लागला. कोकण आणि कोल्हापूरनंतर निकालात मुंबई विभाग आघाडीवर आहे. यंदा पुणे विभागाची चांगलीच पिछेहाट झाली असून, सहाव्या क्रमांकावर पुणे विभाग फेकला गेला आहे.

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी सोमवारी (दि. ५) पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला. मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. यंदा बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्चदरम्यान तीन हजार ३७३ केंद्रांवर घेण्यात आली. दरवर्षीप्रमाणेच यंदाही मुलांच्या तुलनेत मुलींच्या उत्तीर्णतेचे प्रमाण जास्त आहे. यंदा ८९.५१ टक्के मुले, तर ९४.५८ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी यंदा मुलांपेक्षा तब्बल ५.७ टक्क्यांनी जास्त आहे. गेल्यावर्षी आठ हजार ७८२ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले होते. तर यंदा आठ हजार ३५२ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण आहेत. त्यामुळे गुणवंतांचा टक्का यंदा काही प्रमाणात घटल्याचे स्पष्ट झाले आहे.

नऊ विभागीय मंडळांमध्ये परीक्षेसाठी १४ लाख २७ हजार ८५ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४ लाख १७ हजार ९६९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यातील १३ लाख २ हजार ८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तर एक लाख १५ हजार ९६ विद्यार्थी नापास झाले. कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक, तर त्याखालोखाल कोल्हापूर, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, पुणे, नाशिक, नागपूर विभागाचा निकाल आहे. लातूर विभागाचा निकाल सर्वांत कमी लागला आहे. परीक्षा केंद्रांवर परीक्षेदरम्यान होणारे गैरप्रकार टाळण्यासाठी आवश्यक सर्व कडक उपाययोजना करत परीक्षा घेण्यात आली, त्यामुळे निकालात मोठी घट पाहायला मिळाली आहे.

यंदा विज्ञान शाखेतील सात लाख ३७ हजार २०५ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली. प्रत्यक्ष परीक्षा दिलेल्या सात लाख ३५ हजार तीन विद्यार्थ्यांपैकी सात लाख १५ हजार ५९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विज्ञान शाखेत सर्वाधिक ९७.३५ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कला शाखेत तीन लाख ५४ हजार ६९९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. परीक्षा दिलेल्या तीन लाख ४९ हजार ६९६ विद्यार्थ्यांपैकी दोन लाख ८१ हजार ६०६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८०.५२ टक्के आहे. वाणिज्य शाखेतून नोंदणी केलेल्या तीन लाख ७६६ विद्यार्थ्यांपैकी दोन लाख ९९ हजार ५२७ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. त्यातील दोन लाख ७७ हजार ६२९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची उत्तीर्णतेची टक्केवारी ९२.६८ टक्के आहे. व्यवसाय अभ्यासक्रमाच्या ३० हजार ७६६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २९ हजार ३६३ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. त्यातील २४ हजार ४५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ८३.२६ टक्के आहे. तर आयटीआयच्या नोंदणी केलेल्या चार हजार ३९८ विद्यार्थ्यांपैकी चार हजार ३८० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी तीन हजार ५९३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांची उत्तीर्णतेची टक्केवारी ८२.०३ टक्के आहे.

यंदा बारावीचा निकाल ९१.८८ टक्के

- सर्व शाखांमधील तब्बल १ लाख १५ हजार ९६ विद्यार्थी नापास
- गेल्या वर्षीच्या तुलनेत बारावीच्या १.४९ टक्क्यांची निकालात घट
- निकालात यंदाही मुलींचीच बाजी
- मुलींची उत्तीर्णतेची टक्केवारी मुलांपेक्षा तब्बल ५.७ टक्क्यांनी जास्त
- राज्यात एकाही विद्यार्थ्याला शतप्रतिशत गुण नाही
- निकालात कोकण यंदाही अव्वल, तर कोल्हापूर दुसऱ्या स्थानावर
- पुणे विभाग फेकला गेला सहाव्या क्रमांकावर

"जेईई, नीटसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांना वेळ मिळण्याच्या दृष्टीने यंदा बारावीची परीक्षा दहा दिवस लवकर घेण्यात आली. परीक्षेच्या काळात कॉपीमुक्त परीक्षा अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या. अंतर्गत परीक्षेचे गुण ऑनलाइन घेतल्यामुळे निकाल लवकर जाहीर होण्यास मदत झाली. कॉपीमुक्त अभियानामुळे निकालाचा टक्का घटल्याचे दिसून येत आहे. कला शाखेचा निकाल यंदा जास्त घटला आहे. त्याची कारणमीमांसा करण्यात येणार आहे.

- **शरद गोसावी,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

गेल्या ५ वर्षांचा निकाल

२०२५ - ९१.८८ टक्के
२०२४ - ९३.३७ टक्के
२०२३ - ९१.२५ टक्के
२०२२ - ९४.२२ टक्के
२०२१ - ९९.६३ टक्के

गुणपडताळणी, छायाप्रतीबाबत

ऑनलाइन निकालानंतर बारावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने मिळवलेल्या गुणांची गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाइन पद्धतीने मंडळाच्या http:///verification.mh- hsc. ac.in या संकेतस्थळाद्वारे स्वतः किंवा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करता येणार आहे. गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी ६ ते २० मे या कालावधीत ऑनलाइन अर्ज करता येईल. उत्तरपत्रिकेचे पुनर्मूल्यांकन करण्यासाठी आधी उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य आहे. तसेच छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करून संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे.

येथे पाहा निकाल

mahahsscboard.in, mahresult.nic.in या संकेतस्थळावरून निकाल पाहता येणार आहे.

पुरवणीसाठी ७ मेपासून अर्ज

सर्व विषय घेऊन बारावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना श्रेणीसुधार योजनेअंतर्गत जुलै-ऑगस्ट २०२५ आणि फेब्रुवारी-मार्च २०२६ आणि जुलै-ऑगस्ट २०२६ या लगतच्या तीन संधी उपलब्ध राहतील. पुरवणी परीक्षा जून-जुलैमध्ये घेतली जाणार आहे. या परीक्षेसाठी ७ मेपासून मंडळाच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज भरता येईल. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येणार आहे, असे मंडळाने स्पष्ट केले.

समुपदेशन सेवा उपलब्ध

निकालानंतर काही विद्यार्थी नकारात्मक विचाराने मानसिक दडपणाखाली येण्याची शक्यता असते. त्यामुळे अशा विद्यार्थ्यांना नैराश्यातून बाहेर काढण्यासाठी राज्य मंडळाने मोफत ऑनलाइन समुपदेशन सेवा उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठीचे भ्रमणध्वनी क्रमांक राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध केले आहेत.

दृष्टिक्षेपात निकाल

- नोंदणी केलेले नियमित विद्यार्थी - १४ लाख २७ हजार ८५
- परीक्षा दिलेले नियमित विद्यार्थी - १४ लाख १७ हजार ९६९
- उत्तीर्ण झालेले नियमित विद्यार्थी -१३ लाख ०२ हजार ८७३
- उत्तीर्णांची टक्केवारी - ९१.८८
- पुनर्परीक्षार्थी नोंदणी - ४२ हजार ३८८
- परीक्षा दिलेले पुनर्परीक्षार्थी - ४२ हजार २४
- उत्तीर्ण झालेले पुनर्परीक्षार्थी - १५ हजार ८२३
- पुनर्परीक्षार्थ्यांच्या उत्तीर्णतेची टक्केवारी - ३७.६५
- खासगी विद्यार्थी नोंदणी - ३६ हजार १३३
- परीक्षा दिलेले खासगी विद्यार्थी - ३५ हजार ६९७
- उत्तीर्ण झालेले खासगी विद्यार्थी - २९ हजार ८९२
- खासगी विद्यार्थी उत्तीर्णतेची टक्केवारी - ८३.७३
- नियमित विद्यार्थी, खासगी आणि पुनर्परीक्षार्थी उत्तीर्णतेची एकत्रित टक्केवारी ९०.१६
- दिव्यांग विद्यार्थी नोंदणी - सात हजार ३१०
- परीक्षा दिलेले दिव्यांग विद्यार्थी - सात हजार २५८
- उत्तीर्ण झालेले दिव्यांग विद्यार्थी - सहा हजार ७०५
- दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्णतेची टक्केवारी ● ९२.३८
- परीक्षेसाठी उपलब्ध विषय - १५४
- शंभर टक्के निकाल लागलेले विषय - ३७
- उत्तीर्ण मुली - सहा लाख २५ हजार ९०१
- उत्तीर्ण मुले - सहा लाख ७६ हजार ९७२
- क्रीडा, एनसीसी, स्काऊट-गाइडसाठी सवलतीच्या गुणांचा लाभ मिळालेले विद्यार्थी - २० हजार ९४३
- निकाल राखून ठेवलेले विद्यार्थी - १४७
- प्रतिबंधित केलेले विद्यार्थी - १३०
- ९० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळालेले विद्यार्थी - आठ हजार ३५२
- ७५ टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळालेले विद्यार्थी - ७४ हजार १७२
- ६० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळालेले विद्यार्थी - एक लाख ८१ हजार ७५५
- ४५ टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळालेले विद्यार्थी - सहा लाख २७७
- ४५ टक्के किंवा त्याहून कमी गुण मिळालेले विद्यार्थी - एक लाख ८० हजार ५४७.

शाखानिहाय निकाल

विज्ञान :	९७.३५ टक्के
कला :	८०.५२ टक्के
वाणिज्य :	९२.६८
व्यवसाय अभ्यासक्रम :	८३.२६ टक्के
आयटीआय :	८२.०३ टक्के
एकूण :	९१.८८ टक्के

विभागीय मंडळनिहाय निकाल

कोकण :	९६.७४ टक्के
कोल्हापूर :	९३.६४
मुंबई :	९२.९३ टक्के
छत्रपती संभाजीनगर :	९२.२४ टक्के
अमरावती :	९१.४३ टक्के
पुणे :	९१.३२ टक्के
नाशिक :	९१.३१ टक्के
नागपूर :	९०.५२ टक्के
लातूर :	८९.४६ टक्के
एकूण :	९१.८८ टक्के

Pune Edition
May 06, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

प्राध्यापकपदी स्थाननिश्चिती निवड समितीमध्ये सुधारणा

डॉ. होमी भाभा विद्यापीठाच्या कुलगुरूंकडे अध्यक्षपद

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्याच्या उच्च शिक्षण संचालक कार्यालयाने प्रस्तावित केल्याप्रमाणे सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक या पदांवर स्थाननिश्चिती करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या निवड समितीमध्ये सुधारणा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक या पदांवर स्थाननिश्चिती करणाऱ्या समितीमध्ये सुधारणा करून, डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्याकडे या समितीचे अध्यक्षपद देण्यात आले आहे.

निवड समितीमध्ये सुधारणा करण्यासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सहसचिव, उपसचिव, सहसचिव/उपसचिव (मागासवर्गीय प्रतिनिधी), संबंधित विषयातील तीन तज्ज्ञ, बहिस्त विद्यापीठातील दोन विषयतज्ज्ञ प्राध्यापक हे सदस्य असतील; तर संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य हे सदस्य सचिव असतील.

विद्यापीठ अनुदान आयोगाने १८ जुलै २०१८ रोजीच्या अधिसूचनेन्वये केंद्रीय विद्यापीठे व महाविद्यालये आणि संस्था यांमधील शिक्षक व समकक्ष पदावरील नियुक्त्या, शैक्षणिक अर्हता इत्यादींसाठी निकष निर्धारित केले आहेत. याशिवाय अध्यापकांची वेतनश्रेणी, अनुषंगिक लाभ, प्रोत्साहनपर वेतनवाढ इत्यादी देण्याबाबतची कार्यपद्धती जाहीर केलेली आहे. संबंधित कार्यपद्धतीमधील तरतुदी राज्यातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक, महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण संचालक या पदांना लागू करण्याचा शासन निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यातील शासकीय महाविद्यालये, संस्थांमधील शिक्षकांना सेवांतर्गत प्रगती योजनेंतर्गत स्थाननिश्चिती करण्यासाठी छाननी समिती व निवड समिती गठित करण्यात आली आहे. या निवड समितीचे अध्यक्ष अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्याऐवजी राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा), मुंबई हे असतील अशी सुधारणा करण्यात आलेली आहे.

Pune Edition
May 07, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

प्रवेश प्रक्रियेची लगबग सुरू

पदवी अभ्यासक्रमांसाठी यंदा लवकर प्रक्रिया होणार पूर्ण

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने सोमवारी (दि. ५) बारावीचा निकाल जाहीर केल्यानंतर आता पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची लगबग सुरू झाली आहे. निकालात यंदा घट झाल्यामुळे पारंपरिक पदवी अभ्यासक्रमाच्या पात्रता गुणांमध्ये काही प्रमाणात घट होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. शहरातील विद्यापीठे, स्वायत्त महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, निकाल जाहीर झाल्याने पदवी अभ्यासक्रमाचे वर्गही यंदा लवकर सुरू होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

> यंदा बारावीचा निकाल कमी झाल्याने पात्रता गुणांमध्ये एक ते दोन टक्के घट होऊ शकेल. तसेच, निकाल लवकर जाहीर झाल्याने पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाचे प्रवेश दरवर्षीच्या तुलनेत यंदा लवकर सुरू झाले आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांचा कल पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांपेक्षा कौशल्य शिक्षणाकडे जास्त असल्याचे चित्र दिसत आहे.
>
> **-डॉ. ज्ञानदेव निटवे,** विभागप्रमुख, वाणिज्य आणि व्यवस्थापन विभाग, पुणे विद्यार्थिगृहाचे, कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालय.

उच्च शिक्षणाकडे जाण्यासाठी बारावीचा टप्पा महत्त्वाचा असतो. बारावीमध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी उच्च शिक्षणात पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांसह अभियांत्रिकी, वैद्यकीय, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापनशास्त्र अशा विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी इच्छुक असतात. परंतु, व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी स्वतंत्रपणे प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात. राज्यात या परीक्षांची प्रक्रिया राज्य समाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलकडून राबवण्यात येत आहे. तसेच, विविध पदवी अभ्यासक्रमांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह खासगी विद्यापीठेही प्रवेश परीक्षा घेतात. या प्रवेश परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतरच प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. राज्य मंडळाने बारावीचा निकाल जाहीर केल्यानंतर महाविद्यालयांतील कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित महाविद्यालयांच्या वेबसाईटवरून विद्यार्थ्यांना प्रवेशाचे अर्ज भरावे लागतात. त्यानंतर संबंधित महाविद्यालयांकडून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी जाहीर केली जाते. त्यानंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात जाऊन प्रवेश घ्यावा लागतो. दरवर्षीपेक्षा बारावीचा निकाल लवकर लागल्यामुळे आणि प्रवेश प्रक्रिया लवकर सुरू झाल्यामुळे यंदा दरवर्षीच्या तुलनेत प्रवेश प्रक्रिया लवकर पूर्ण होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

Pune Edition
May 07, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

यूजीसीकडून २७ डिफॉल्टिंग विद्यापीठांची यादी जाहीर

- **देशातील १९ राज्य विद्यापीठांचा समावेश असून, पाच खासगी आणि तीन अभिमत विद्यापीठांचा समावेश**

पुणे : पुढारी वृत्तसेवा

विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने वेळोवेळी सूचना देऊन प्रत्येक विद्यापीठात लोकपाल नियुक्त करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. परंतु, देशभरातील अनेक राज्य विद्यापीठांनी, खासगी विद्यापीठांनी व अभिमत विद्यापीठांनी यूजीसीच्या या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. त्यामुळे यूजीसीने देशातील २७ डिफॉल्टिंग विद्यापीठांची यादी प्रसिद्ध केली आहे. त्यात महाराष्ट्रातील राज्य शासनाने स्थापन केलेल्या विद्यापीठाचा समावेश आहे. यूजीसीने म्हाळुंगे-बालेवाडीतील इंटरनॅशनल स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीचे नाव डिफॉल्टिंग विद्यापीठांच्या यादीत प्रसिद्ध केले आहे.

राज्यात पहिले क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्याची घोषणा गेल्या पाच वर्षांपूर्वी गाजावाजा करून करण्यात आली. परंतु, अजूनही हे विद्यापीठ केवळ कागदावरच आहे. अद्याप या विद्यापीठाला पूर्णवेळ कुलगुरू किंवा इतर अधिकारीवर्ग नियुक्त केला गेला नाही. त्यामुळे पाच वर्षांपासून या विद्यापीठाच्या माध्यमातून अभ्यासक्रम सुरू होऊ शकले नाहीत. त्यात यूजीसीने सर्व विद्यापीठांना लोकपाल नियुक्तीचे आदेश दिले होते. परंतु, म्हाळुंगे-बालेवाडीतील इंटरनॅशनल स्पोर्ट्स युनिव्हर्सिटीने अद्याप लोकपाल नियुक्त केले नाहीत. त्यामुळे यूजीसीने डिफॉल्टिंग विद्यापीठांची यादी जाहीर केली आहे. त्यात देशातील १९ राज्य विद्यापीठांचा समावेश असून, पाच खासगी आणि तीन अभिमत विद्यापीठांचा समावेश आहे.

यादीमध्ये कर्नाटकमधील पाच, राजस्थानमधील तीन, मध्य प्रदेशातील तीन, ओडिशामधील दोन, दिल्लीतील दोन, सिक्कीममधील दोन, गुजरातमधील एक, महाराष्ट्रातील एक, गोव्यातील एक, पश्चिम बंगालमधील एक, मेघालयातील एक, आसाममधील एक, उत्तर प्रदेशातील एक, केरळमधील एक, उत्तराखंडमधील एक, बिहारमधील एका विद्यापीठाचा समावेश असल्याचे स्पष्ट झाले आहे.

Pune Edition
May 07, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

अकरावीचे अर्ज भरण्यास १९ मेपासून सुरुवात

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : बारावीचा निकाल लागल्यानंतर आता दहावीच्या निकालाकडे विद्यार्थी व पालकांचे डोळे लागले आहेत. दहावीच्या निकालाबाबत अद्याप राज्य मंडळाकडून कोणतीही तारीख जाहीर करण्यात आली नसली तरी शिक्षण उपसंचालक कार्यालयामार्फत १९ मेपासून अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेस सुरुवात होणार आहे.

तसेच, अकरावी प्रवेशप्रक्रिया गुणवत्ताधिष्ठित, पारदर्शक आणि एकसंध असावी यासाठी यंदापासून संपूर्ण राज्यात उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे.

दहावीच्या निकालानंतर अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थ्यांची धावपळ सुरू होते. त्यामुळे अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठीची नोंदणी शिक्षण उपसंचालक कार्यालयांमार्फत १९ ते २८ मेपर्यंत करता येणार आहे. त्यानंतर राज्यभरातील शासनाने निर्धारित केलेल्या अधिकृत संकेतस्थळाच्या माध्यमातून महाविद्यालय निवडण्याची मुभा देण्यात येणार आहे. चार प्रवेश फेऱ्या राबविल्यानंतर विशेष फेरी राबविण्यात येणार आहे. त्यात महाविद्यालयांतील रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येणार आहे.

संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ही शेवटच्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळेपर्यंत गुणवत्तेनुसार ऑनलाईन पध्दतीने होणार असून ऑनलाईन प्रणाली व्यतिरिक्त अन्य प्रणालीमधून एकही प्रवेश शाळा व्यवस्थापनास करता येणार नसल्याचे शालेय शिक्षण विभागाकडून जाहीर करण्यात आले आहे.

नोंदणीचे वेळापत्रक

- विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रोफाईल तयार करणे - १९ मे ते २८ मे
- विद्यार्थ्यांनी प्राधान्यक्रम भरणे - १९ मे ते २८ मे

07/05/2025 | Pune | Page : 04
Source : https://epaper.loksatta.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 7 May 2025_005
07 May 2025

अकरावीची प्रवेश प्रक्रिया गुरुवारपासून सुरू

वेळापत्रक जाहीर; ऑनलाइन व गुणवत्तेनुसार प्रवेश करण्यात येणार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि.६ - शालेय शिक्षण विभागाकडून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षा पासून संपूर्ण राज्यातील सर्व मान्यता प्राप्त उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावी प्रवेश ऑनलाइन पद्धतीने व गुणवत्तेनुसार करण्यात येणार आहेत. प्रवेशासाठीची कार्यपद्धतीही ठरविण्यात आली असून, वेळापत्रकही जाहीर करण्यात आले आहे. गुरुवार (दि. ८) पासून प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.

राज्यातील सर्व क्षेत्रासाठी उच्च माध्यमिक कला, वाणिज्य व विज्ञान शाखेच्या उच्च माध्यमिक शाळा, स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालय यांचेशी संलग्न सर्व शाखांमधील इयत्ता ११ वीच्या प्रवेशासाठी या शासन निर्णयातील तरतुदी लागू राहतील. राज्यातील अल्पसंख्याक दर्जासह अन्य सर्व उच्च माध्यमिक कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांसाठी या शासन निर्णयातील तरतूदी लागू राहतील. राज्यातील राज्यमंडळ संलग्नित उच्च माध्यमिक कला, वाणिज्य व विज्ञान या शाखांचे इयत्ता ११ वीचे प्रवेश केंद्रीय व ऑनलान प्रणालीद्वारे होतील. एसएसव्हीसी व्यवसायिकचे प्रवेश ऑफलाइन पद्धतीने होणार आहेत.

शाळा, महाविद्यालयांची माहिती संकेतस्थळावर भरणे व अद्ययावत करण्यासाठी ८ ते १५ मे अशी मुदत दिली आहे. विभागीय शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी उच्च माध्यमिकच्या शाखांची माहिती प्रमाणित करण्यासाठी ८ ते १६ मे कालावधी आहे. विद्यार्थ्यांचे ऑनलाइन प्रोफाईल तयार करण्यासाठी १९ ते २८ मे असा कालावधी आहे. विद्यार्थ्यांना १९ ते २८ मे या कालावधीत कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम भरता येणार आहेत. प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यापुर्वी शून्य फेरी - व्यवस्थापन कोटा, अल्पसंख्यांक व इनहाऊस कोट्यातील प्रवेश निश्चित करता येणार आहे. प्रवेश फेरींचे वेळापत्रक टप्प्याटप्प्याने जाहीर होणार आहे. सर्व प्रवेश फेरींची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर अकरावीचे वर्ग ११ ऑगस्टपासून सुरू होतील.

व्यवस्थापनास प्रवेश देता येणार नाही

संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ही शेवटचा विद्यार्थी प्रविष्ट होईपर्यंत गुणवत्तेनुसार ऑनलाईन पद्धतीने करावी. त्याशिवाय एकही प्रवेश शाळा व्यवस्थापनास करता येणार नाहीत. राज्यस्तर समितीने संपूर्ण प्रवेश प्रक्रियेची माहिती पुस्तिका, आरक्षण, प्रवेश प्रक्रिया, टप्पे, वेळापत्रक या अनुषंगिक माहिती प्रकाशित करावी, अशा सूचना शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी दिल्या आहेत.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

अकरावीला आता राज्यात कोठेही प्रवेश

एकाच अर्जाद्वारे कोणतेही महाविद्यालय निवडता येणार : ऑनलाईन पोर्टलवरच पार पडणार प्रक्रिया

पुणे : पुढारी वृत्तसेवा

अकरावी प्रवेश प्रक्रियेत सहभागी झाल्यानंतर ते राहत असलेल्या परिसरातच विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याची संधी होती. परंतु, आता संपूर्ण राज्याकरिता विद्यार्थ्यांना एकच प्रवेश अर्ज करावा लागेल. या प्रवेश अर्जानुसार संबंधित विद्यार्थ्याला राज्यातील कोणत्याही ठिकाणच्या उच्च माध्यमिकची शाखा निवडण्याचा पर्याय उपलब्ध असेल. त्यामुळे विद्यार्थी कोठेही राहत असला, तरी त्याला संपूर्ण राज्यातील महाविद्यालये प्रवेशासाठी उपलब्ध राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

येत्या शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीची प्रवेश प्रक्रिया पूर्णतः ऑनलाइन पद्धतीनेच राबविणे बंधनकारक करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ६ मे रोजी सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध करत अकरावी प्रवेशासाठी स्पष्ट आणि सुसंगत नियमावली जाहीर केली आहे. यामध्ये संपूर्ण प्रक्रिया गुण-वत्ताधिष्ठित, पारदर्शक आणि एकसंध असावी, यासाठी आवश्यक त्या सूचनांचा समावेश करण्यात आला असून प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक देखील जाहीर केले आहे.

संपूर्ण राज्यभरातील महाविद्यालये शासनाने निर्धारित केलेल्या अधिकृत ऑनलाइन पोर्टलवरच प्रवेश प्रक्रिया पार पाडणार आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या गुणांनुसार महाविद्यालय निवडण्याची मुभा देण्यात आली असून, चार फेऱ्यांद्वारे प्रवेश दिला जाणार आहे. या चार फेऱ्यांनंतर 'सर्वांसाठी खुला प्रवेश' (ओपन फॉर ऑल) नावाची विशेष फेरी जाहीर करण्यात येणार असून, उर्वरित रिक्त जागांवर त्या माध्यमातून प्रवेश मिळणार आहे. प्रवेश अर्ज सादर करताना विद्यार्थ्यांना त्यांचे वैयक्तिक माहितीपत्रक, गुणपत्रक व प्राधान्यक्रमानुसार निवडलेली महाविद्यालयांची यादी ऑनलाइन प्रणालीत भरावी लागेल. संबंधित शाळांनीही ही माहिती पडताळून प्रमाणित करणे आवश्यक आहे.

विशेष म्हणजे, व्यवस्थापन, अल्पसंख्याक व इनहाऊस कोट्यांतर्गत प्रवेशासाठी स्वतंत्र 'शून्य फेरी' आयोजित करण्यात येणार आहे. मात्र या प्रवेशांची नोंदसुद्धा संबंधित संस्थांनी ऑनलाइन प्रणालीवर अनिवार्यपणे करावी लागणार आहे. प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यावर महाविद्यालयांनी अंतिम यादीही ऑनलाइन प्रसिद्ध करावी लागणार आहे. ऑफलाइन पद्धतीने करण्यात आलेली कोणतीही प्रवेश प्रक्रिया वैध मानली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा शासनाने दिला आहे.

शासनाच्या या निर्णयामुळे अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत सुसूत्रता, पारदर्शकता आणि गैरप्रकाराला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शिक्षण विभागाकडून प्रत्येक टप्प्यावर प्रक्रिया पारदर्शकपणे राबवली जावी यासाठी विशेष समन्वयक नेमण्यात आले आहेत आणि संबंधित यंत्रणांवर देखरेख ठेवली जाणार आहे. ऑनलाइन पद्धतीतून संपूर्ण प्रक्रिया राबवल्याने विद्यार्थ्यांना आणि पालकांना अधिक सोयीची, विश्वासार्ह आणि स्पष्ट अशी प्रणाली उपलब्ध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

Pune Edition
May 07, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

SSC, HSC marksheets on DigiLocker this yr

SwatiShindeGole
@timesofindia.com

Pune: Over 30 lakh SSC and HSC students in the state will be given the option to receive their marksheets through govt's internet cloud-based DigiLocker service this year.

While the Higher Secondary Certificate (HSC) Std XII board exams results were announced on Monday, the Secondary School Certificate (SSC) Std X board exam results are expected over the next few days.

While many students will receive their marksheets via DigiLocker, those who have not registered for their Automated Permanent Academic Account Registry (APAAR) identification — a specialized ID system for students nationwide — will miss out on this access. The DigiLocker facility can be accessed anytime and anywhere with a password-protected login system.

Regardless of the availability of marksheets in DigiLocker, students will also receive hard copies through their schools and colleges, the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE) has clarified.

State board chairman Sharad Gosavi said, "Maharashtra is the first state in the country to provide marksheets to students through DigiLocker. The advantage is that it can be accessed from anywhere and anytime, and also the verification of marksheets in DigiLocker is easy to provide to universities and colleges when students apply for new courses in future."

The APAAR card given to students in schools, colleges, and universities across India. This digital ID stores students' academic records in a digital format. So, only students whose ID is ready can access their grade sheets available in DigiLocker.

Gosavi added, "Schools and junior colleges were instructed to record the APAAR ID against the students' seat numbers to make their marksheets available in DigiLocker. The deadline had been set for April 21 for the same."

HOW TO ACCESS

Here's how to get your marksheet from DigiLocker

- Register using a mobile number or Aadhaar on DigiLocker (digilocker.gov.in)
- Search for your board/ university/institution
- **Fill in details such as roll number, year of passing, etc., and submit the details**
- DigiLocker will search for your requested certificate, and **students can then download it**

The Times of India 8.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

मॅनेजमेंट, इन हाउस कोट्यावर भिस्त

मटा मालिका

अकरावी प्रवेशासाठी स्थानिक विद्यार्थ्यांना झगडावे लागणार

हर्ष दुधे
Harsh.Dudhe
@timesofindia.com

पुणे : राज्यातील सर्व ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन केंद्रीय पद्धतीने राबविण्याचा निर्णय घेतल्याने, महानगरांमधील नामांकित कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी चुरस राहणार आहे. त्यामुळे १० टक्के जागा असणाऱ्या इन हाउस (संस्थांतर्गत) कोट्यातून, तर पाच टक्के कोटा असणाऱ्या मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश घेण्यासाठी स्थानिक विद्यार्थ्यांचा भर राहणार आहे. त्यामुळे दर वर्षी सरेंडर (प्रत्यार्पित) केला जाणारा मॅनेजमेंट कोटा यंदा, आपल्याकडे ठेवण्याकडे शिक्षण संस्थांचा कल राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

शालेय शिक्षण विभागाने यंदाच्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शहरांसह ग्रामीण भागातील आर्ट्स, सायन्स, कॉमर्स शाखेच्या कॉलेजांमधील प्रवेश ऑनलाइन पद्धतीने होणार असून, त्यासाठी विद्यार्थ्यांना घरबसल्या कोणत्याही शहरातील कॉलेजमध्ये प्रवेशासाठी अर्ज करता येणार आहे. त्यामुळे प्रवेश हे गुणवत्तेनुसार होणार असले, तरी राज्यभरातील गुणवंत विद्यार्थी मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर, अमरावती अशा शहरांमधील नामांकित कॉलेजांमध्ये एकवटण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित शहरांमधील स्थानिक गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना प्रवेश घेतांना नाकी नऊ येणार आहे.

या प्रवेश प्रक्रियेत कॉलेजमध्ये अकरावी प्रवेशासाठी असणाऱ्या एकूण जागांपैकी १० टक्के जागा इनहाउस कोट्यासाठी, तर ५ टक्के जागा मॅनेजमेंट कोट्यासाठी राखीव आहेत. यापूर्वी, कॉलेजांनी मॅनेजमेंट कोट्याच्या जागा भरत नसल्याने, त्या प्रवेश प्रक्रियेच्या सामान्य जागांमध्ये प्रत्यार्पित करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, नव्या निर्णयामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येण्यासाठी यंदा मॅनेजमेंट कोटा प्रत्यार्पित होणार नसल्याचे अभ्यासकांनी सांगितले. शिक्षण संस्थांना मॅनेजमेंट कोट्यातून चांगला आर्थिक फायदा होण्याची चिन्हे आहेत.

'इन हाउस कोट्या'साठीही स्पर्धा

राज्यातील अनेक शिक्षण संस्था मोठ्या असून, त्यांच्या शैक्षणिक संकुलात 'केजी टू पीजी' शिक्षणाची संधी आहे. अनेक शाळांची ज्युनिअर कॉलेज आहेत; त्याचप्रमाणे ज्युनिअर-सीनिअर कॉलेज एकत्रित आहेत. ही प्रामुख्याने नामांकित कॉलेज आहेत. अशा परिस्थितीत इन हाउस कोट्यातून प्रवेश मिळवण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांचा नेहमीच भर असतो. मात्र, आता नव्या निर्णयामुळे या कोट्यातून प्रवेश मिळविण्याचे प्रयत्न वाढतील. त्यामुळे या कोट्यातील कटऑफ गुणांमध्येही कमालीची वाढ होणार असून, प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण

Maharashtra Times 9.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

शोधनिबंध प्रसिद्ध करताना विद्यापीठाचे नाव अनिवार्य

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, परिसंस्थांतील प्राध्यापक, पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना शोधनिबंध प्रसिद्ध करताना विद्यापीठाचा संबंधित विभाग, महाविद्यालय, परिसंस्थेचे नाव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाव नमूद करणे अनिवार्य करण्यात आले आहे. संशोधनपत्रिकेत संबंधित नावे नसल्यास शोधनिबंधाला मान्यता देणार येणार नसल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, परिसंस्थांतील प्राध्यापक, पीएच.डी चे विद्यार्थी विविध विषयांमध्ये शोधनिबंध प्रसिद्ध करतात; तसेच, कुलगुरूंच्या आदेशानुसार पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गोषवारा अथवा प्रबंध जमा करताना 'रेफरीड जर्नल'मध्ये कमीत कमी एक लेख प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे. त्यास अनुसरून संशोधक विद्यार्थी आणि संबंधित संशोधन मार्गदर्शक संयुक्तरीत्या संशोधनपर लेख प्रसिद्ध करीत असतात. मात्र, हे लेख प्रसिद्ध करताना काही प्राध्यापक, पीएच.डी विद्यार्थी विद्यापीठाच्या नावाचा उल्लेखच करीत नसल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे यापुढे आता संशोधनपर लेख प्रसिद्ध करताना विद्यापीठाचा संबंधित विभाग, महाविद्यालय, परिसंस्थेचे नाव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाव नमूद करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

Kesari 9.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

'नेट' परीक्षेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ

उमेदवारांनो, १२ मेपर्यंत करा अर्ज!

पुणे : पुढारी वृत्तसेवा

नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीएने जून २०२५ सत्रासाठी विद्यापीठ अनुदान आयोग यूजीसी राष्ट्रीय पात्रता चाचणी नेटच्या ऑनलाइन अर्जाची तारीख वाढवली आहे. त्यानुसार उमेदवारांना येत्या सोमवार (दि. १२ मे) पर्यंत अर्ज करण्याची संधी मिळणार आहे.

'नेट' परीक्षेसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख १२ मे २०२५ (रात्री ११:५९ पर्यंत) निश्चित करण्यात आली आहे, तर परीक्षा शुल्क १३ मे २०२५ रात्री ११:५९ पर्यंत भरता येईल. उमेदवारांना त्यांचा अर्ज दुरुस्त करण्यासाठी १४ ते १५ मे २०२५ पर्यंत वेळ मिळेल. शिवाय, यूजीसी नेट जून २०२५ परीक्षेच्या तात्पुरत्या तारखा २१ जून ते ३० जून २०२५ दरम्यान निश्चित करण्यात आल्या आहेत, ज्यामध्ये ही परीक्षा घेतली जाईल.

जून २०२५ च्या यूजीसी नेट परीक्षेसाठी अर्ज शुल्क श्रेणीनुसार वेगळ्या पद्धतीने निश्चित केले आहे. सामान्य श्रेणीतील उमेदवारांना एक हजार १५० रुपये, ईडब्ल्यूएस/ ओबीसी (नॉन-क्रिमीलेयर) यांना ६०० रुपये, तर एससी/ एसटी आणि दिव्यांग श्रेणीतील उमेदवारांना ३२५ रुपये परीक्षा शुल्क भरावे लागेल. परीक्षेला बसण्यासाठी, उमेदवाराने मान्यताप्राप्त विद्यापीठातून संबंधित विषयात किमान ५५ टक्के गुणांसह पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण केलेली असावी. राखीव प्रवर्गातील उमेदवारांना नियमांनुसार सवलत दिली जाईल. पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षात असलेले किंवा ज्यांचा निकाल प्रलंबित आहे असे उमेदवार देखील अर्ज करण्यास पात्र आहेत, असे एनटीएच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

My Pune Edition
May 10, 2025 Page No. 08
Powered by: erelego.com

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City 10 May 2025_015
10 May 2025
www.dainikprabhat.com

यूजीसी नेट परीक्षा अर्जास मुदतवाढ

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ९ - देशातील विद्यापीठे व महाविद्यालयात सहायक प्राध्यापकपदासाठी अनिवार्य असलेलेल्या राष्ट्रीय पात्रता परीक्षा अर्थात नेट परीक्षेसाठी अर्ज करण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अद्यापि अर्ज केले नाहीत, त्यांना दि. १२ मे पर्यंत अर्ज करण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) मार्फत देशात यूजीसी नेट परीक्षेचे आयोजन केले जाते. त्यासाठी दि. १६ एप्रिलपासून अर्ज मागविण्यास सुरुवात झाली आहे. अर्ज करण्याची मुदत दि. ७ मे रोजी संपली होती. मात्र, विद्यार्थ्यांच्या मागणीचा विचार करता १२ मे पर्यंत मुदत वाढविण्यात आली. उमेदवारांना त्यांचा अर्ज दुरुस्त करण्यासाठी १४ ते १५ मे २०२५ पर्यंत वेळ मिळेल. शिवाय यूजीसी नेट जून २०२५ परीक्षेच्या तात्पुरत्या तारखा २१ जून ते ३० जून २०२५ दरम्यान निश्चित करण्यात आहेत.

नेट परीक्षेला बसण्यासाठी उमेदवाराने संबंधित विषयात किमान ५५ टक्के गुणांसह पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण केलेली असावी. राखीव प्रवर्गाला नियमांनुसार सवलत दिली जाईल. याशिवाय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत ४ वर्षांची पदवीधर पदवी उमेदवारदेखील नेट परीक्षेसाठी अर्ज करू शकतात, असेही नमूद करण्यात आले आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

नियमबाह्य संस्थांतील व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ नका !

तंत्र शिक्षण संचालनालयाचे विद्यार्थी-पालकांना आवाहन

पुणे : पुढारी वृत्तसेवा

राज्यात कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची मान्यता न घेता अनेक शैक्षणिक संस्था विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांना प्रवेश देतात आणि विद्यार्थ्यांची आर्थिक तसेच शैक्षणिक फसवणूक करतात. त्यामुळे अशा नियमबाह्य संस्थांमध्ये प्रवेश घेऊ नये, असे आवाहन तंत्र शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी विद्यार्थी आणि पालकांना केले आहे.

डॉ. मोहितकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रवेश नियामक प्राधिकरणांतर्गत राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राज्यातील अभियांत्रिकी, तंत्रशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, प्लॅनिंग, अभिकल्प, बीबीए, बीएमएस, बीबीएम, बीसीए या पदवी तसेच एमबीए, एमएमएस, एमसीए, एम. फार्मसी, एमई, एम. टेक, एम. आर्किटेक्चर, एम. एचएमसीटी, फार्म. डी, अभिकल्प, प्लॅनिंग या पदव्युत्तर पदवी, त्याचप्रमाणे प्रथम वर्ष एमई, एम. टेक., एम. प्लॅनिंग, एम. एचएमसीटी, एमबीए, एमएमएस, एमसीए हे एकात्मिक पदवी अभ्यासक्रम व ज्या अभ्यासक्रमांत थेट द्वितीय वर्षात प्रवेश दिला जातो, त्या अभ्यासक्रमांसाठीच्या कार्यरत व्यावसायिकांची स्वतंत्र तुकडी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहेत.

तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहेत. या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर, विद्यापीठ अनुदान आयोग, विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व महाराष्ट्र शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे. संचालनालयाच्या https:/// dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संबंधित सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या संस्था आणि संस्थेत चालविल्या जाणाऱ्या अधिकृत अभ्यासक्रमांची यादी उपलब्ध आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी, पशू व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यामधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई करण्याकरिता अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (तक्रारी, अपील व सुधारात्मक उपाययोजना) नियम, २०२४ प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. त्यानुसार राज्यात उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षणामधील अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करण्यास सक्त मनाई आहे. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी सक्षम प्राधिकरण व महाराष्ट्र शासनाची मान्यता नसलेल्या विद्यापीठे, संस्थांमध्ये प्रवेश घेऊ नये. सक्षम प्राधिकरणांची मान्यता नसलेल्या विद्यापीठ अथवा अनधिकृत संस्था प्रवेशेच्छुक विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून संस्था मान्यताप्राप्त आहे, असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात व नंतर विद्यार्थ्यांना फसवणूक होते, याबाबत जागरूक व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

My Pune Edition
May 10, 2025 Page No. 08
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

स्थापना १९३९

पुढारी

www.pudhari.com

अकरावी प्रवेशासाठीचे संकेतस्थळ कार्यान्वित

पुणे : पुढारी वृत्तसेवा

येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील अकरावीच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने होणार आहेत. त्यासाठी शिक्षण विभागाने स्वतंत्र संकेतस्थळाची निर्मिती केली आहे. या संकेतस्थळाच्या माध्यमातून १५ मेपर्यंत शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी करण्यात येणार असून, १९ मेपासून विद्यार्थी नोंदणीची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.

गेल्या वर्षापर्यंत मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर आणि अमरावती या पाच विभागांतील अकरावीच्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवली जात होती, तर उर्वरित राज्यात पारंपरिक पद्धतीने कनिष्ठ महाविद्यालय-स्तरावरच प्रवेश देण्यात येत होते. परंतु, येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यात सर्वत्रच अकरावीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठीची कार्यपद्धती, नियमावली शिक्षण विभागाकडून जाहीर केली आहे. त्यानुसार ऑफलाइन पद्धतीने केलेला कोणताही प्रवेश अवैध ठरणार आहे.

- १९ मेपासून विद्यार्थी नोंदणीची प्रक्रिया होणार सुरू
- ऑफलाइन पद्धतीने केलेला प्रवेश वैध मानला जाणार नाही

१९ ते २८ मेदरम्यान विद्यार्थ्यांची नोंदणी

शिक्षण विभागाकडून अकरावीच्या प्रवेशासाठी https:///mahafyjcadmissions.in हे अधिकृत संकेतस्थळ विकसित केले आहे. नवे संकेतस्थळ ९ मेपासून कार्यान्वित केले आहे. शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार १५ मेपर्यंत शाळा, महाविद्यालयांनी नोंदणी, त्याचे प्रमाणीकरण करण्यात येणार आहे. दहावीचा निकाल १५ मेपूर्वी जाहीर होणे अपेक्षित आहे, तर १९ ते २८ मे या कालावधीत विद्यार्थ्यांनी नोंदणी करणे, प्राधान्यक्रम नोंदविले जाणार आहेत.

My Pune Edition
May 10, 2025 Page No. 08
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

अकरावीच्या १६ लाख ७६ हजार जागांसाठी राबविणार प्रवेश प्रक्रिया

- **१५ ऑगस्टपर्यंत प्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट**

पुणे : पुढारी वृत्तसेवा

दरवर्षी दिवाळीपर्यंत सुरू राहणारी इयत्ता अकरावीची केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया यंदा १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालयाचे उद्दिष्ट आहे. ११ ऑगस्टपासून कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग सुरू केले जाणार आहेत. केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी राज्यातील जवळपास ११ हजार ७०० कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या सुमारे १६ लाख ७६ हजार जागा उपलब्ध होणार असून, या माध्यमातून अकरावीच्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर लक्ष राहणार असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचे संचालक संपत सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी शिक्षण सहसंचालक श्रीराम पानझडे उपस्थित होते.

राज्यात आतापर्यंत पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह मुंबई, नागपूर, नाशिक आणि अमरावती महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन प्रक्रिया राबवली जात होती. त्या अंतर्गत सुमारे एक हजार ७३० महाविद्यालयांतील सुमारे सव्वासहा लाख जागांवर साडेचार लाख विद्यार्थी प्रवेश घेत होते. आता संपूर्ण राज्यभरात केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे.

सूर्यवंशी म्हणाले, अकरावीच्या प्रवेशासाठी https:/// mahafyjcadmissions. in/ हे स्वतंत्र संकेतस्थळ कार्यान्वित केले आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या नोंदणीची प्रक्रिया १९ मेपासून सुरू होणार आहे. केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना एका अर्जातच राज्यभरातील महाविद्यालयांतील प्रवेशाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी समन्वय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांच्या देखरेखीखाली जिल्ह्यातील प्रवेश प्रक्रिया राबवली जाणार आहे. तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी प्रत्येक महाविद्यालयात मार्गदर्शन केंद्रे सुरू करण्याचे नियोजन आहे.

अनधिकृतरीत्या प्रवेश देणाऱ्या संस्थांना चाप

संकेतस्थळावर अकरावीच्या प्रवेशासाठी उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी सुरू करण्यात आली आहे. त्यात विभागीय शिक्षण उपसंचालक आणि संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेल्या महाविद्यालयांनाच संबंधित संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे. विद्यार्थ्यांना अकरावीला प्रवेश द्यायचा असल्यास महाविद्यालयांना विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातून मान्यता घ्यावी लागणार आहे. मान्यता नसलेल्या किंवा अनधिकृतरीत्या अकरावी-बारावीला प्रवेश देणाऱ्या संस्थांना चाप लागणार असल्याचेही सूर्यवंशी यांनी नमूद केले.

My Pune Edition
May 10, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

अकरावीसाठी तुकडीवाढ, नव्या शाखांच्या प्रस्तावांना मान्यता द्यावी

शिक्षण विभागाकडे शिक्षण संस्थांची मागणी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

अकरावी प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम भरण्याची प्रक्रिया ही नवीन तुकड्यांना; तसेच शाखांना मान्यता मिळाल्यानंतर सुरू करावी. प्रवेश प्रक्रिया लवकर पार पडण्यासाठी शिक्षण विभागाने तुकडीवाढ आणि शाखांच्या प्रस्तावांना लवकर मान्यता द्यावी, अशी मागणी 'असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ अनएडेड इन्स्टिट्यूट्स इन रूरल एरीया'च्या वतीने करण्यात आली आहे.

शालेय शिक्षण विभागाने नव्या निर्णयानुसार यंदा राज्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रवेश हे केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाने प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक प्रसिद्ध केले आहे. या वेळापत्रकानुसार सध्या महाविद्यालयांची नोंदणी प्रक्रिया सुरू आहे. त्यानंतर १९ मेपासून विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करून, प्रवेशाचा अर्ज आणि महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम भरायचे आहे. ही परिस्थिती असताना, शिक्षण विभागाने अकरावीच्या नवीन तुकड्यांना; तसेच अतिरिक्त तुकड्यांना मान्यता देण्याची प्रक्रिया ऑनलाइन केली आहे. त्यासाठी शिक्षणसंस्थांना प्रस्ताव दाखल करावे लागतील. या संपूर्ण प्रक्रियेला कालावधी लागणार आहे.

या परिस्थितीत अकरावी प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम भरण्याची सुरुवात केल्यास, त्यांना नवीन तुकड्या किंवा शाखांमधील जागांसाठी अर्जच करता येणार नाही. अशा वेळी नवीन तुकड्या किंवा शाखांना मान्यता मिळाल्यानंतर, विद्यार्थ्यांना अधिक महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम भरण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांची नोंदणी करून, त्यांची प्रोफाइल तयार करून घ्यावी. महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम भरण्याची प्रक्रिया नवीन तुकड्यांना; तसेच शाखांना मान्यता मिळाल्यानंतर सुरू करावी,' अशी मागणी संस्थेचे अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांनी केली आहे.

> राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांनी अकरावीच्या नवीन तुकड्या आणि अतिरिक्त शाखांसाठी प्रस्ताव सादर केले आहेत. परंतु, आजपर्यंत मान्यता देण्यात आलेली नाही. आता शिक्षण विभागाने नवीन तुकड्या आणि अतिरिक्त शाखांसाठी ऑनलाइन प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, याबाबत कोणतीही माहिती नसून, प्रक्रियाही सुरू झालेली नाही. विद्यार्थीहीत लक्षात घेऊन, शिक्षण विभागाने तातडीने ही प्रक्रिया सुरू करावी.
>
> \- **प्रा. रामदास झोळ**, अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ अनएडेड इन्स्टिट्यूट्स इन रुरल एरिया

My Pune Edition
May 10, 2025 Page No. 08
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
City 10 May 2025_005
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे 10 May 2025
www.dainikprabhat.com

अकरावीच्या नवीन शाखा, तुकडीवाढीला मान्यता द्या

शिक्षण संस्थांची शासनाकडे मागणी

पुणे, दि. ९ - राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने शैक्षणिक संस्थाच्या इयत्ता अकरावीच्या नवीन अतिरिक्त शाखा व तुकडीवाढीच्या प्रस्तावांना लवकर मान्यता द्यावी, अशी मागणी असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ अनएडेड इन्स्टिट्यूट्स इन इंडियाच्या वतीने करण्यात आली आहे.

शिक्षण विभागाने अकरावीच्या नवीन, तसेच अतिरिक्त तुकड्यांना मान्यता देण्याची प्रक्रिया ऑनलाइन केली आहे. त्यानुसार काही महाविद्यालयांनी प्रस्ताव दिले आहेत. पण त्यांना अद्याप मान्यता मिळालेली नाही. बहुसंख्य महाविद्यालयांना प्रस्ताव दाखल करायचे आहेत. त्यासाठी त्यांना काही कालावधी लागणार आहे.

अकरावी प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम भरण्याची सुरुवात केल्यास त्यांना नवीन तुकड्या किंवा शाखांमधील जागांसाठी अर्जच करता येणार नाही. नवीन तुकड्या किंवा शाखांना मान्यता मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्राधान्यक्रम भरण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे प्राधान्यक्रम भरण्याची प्रक्रिया नवीन तुकड्या, तसेच शाखांना मान्यता मिळाल्यानंतर सुरू करावी, अशी मागणी असोसिएशनने अध्यक्ष प्रा. [illegible] यांनी केली आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

नामांकित महाविद्यालयांचे पदवीप्रवेश सुरू

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत नुकताच बारावीचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. त्यानंतर आता लगेच पदवीच्या प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेला काही महाविद्यालयांनी सुरुवात केली आहे. पुण्यातील नामांकित फर्ग्युसन महाविद्यालय, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, सर परशुरामभाऊ महाविद्यालय आदी महाविद्यालयांची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयांच्या वेबसाइटवरून प्रवेशासाठी अर्ज करावा लागणार आहे.

फर्ग्युसन महाविद्यालयाच्या बीए आणि बीएस्सी पदवीच्या पहिल्या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १७ मेपर्यंत असणार आहे. त्यानंतर सर्वसाधारण गुणवत्ता यादी १९ मे रोजी प्रसिद्ध करण्यात येईल तसेच २१ मे रोजी

- **महाविद्यालयांकडून त्यांच्या वेबसाइटवर केले प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर**

अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची संधी दिली जाईल. तर २२ मे रोजी पहिली अंतिम गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येणार आहे.

सर परशुरामभाऊ महाविद्यालयाच्या बीए आणि बीएस्सी पदवीच्या पहिल्या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेच्या नोंदणी अर्जासाठी सुरुवात झाली असून, त्यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २० मेपर्यंत देण्यात आली आहे. त्यानंतर सर्वसाधारण गुणवत्ता यादी २२ मे रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, महाविद्यालयाची अंतिम गुणवत्ता यादी २४ मे रोजी प्रसिद्ध केली जाईल. पहिल्या यादीची प्रवेश प्रक्रिया ३० मेपर्यंत राबवली जाईल.

आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या बीए आणि बीएस्सी पदवीच्या पहिल्या वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेच्या नोंदणी अर्जासाठी सुरुवात झाली असून, त्यासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २८ मेपर्यंत देण्यात आली आहे. त्यानंतर सर्वसाधारण गुणवत्ता यादी २ जून रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, महाविद्यालयाची अंतिम गुणवत्ता यादी ४ जून रोजी प्रसिद्ध केली जाईल. पहिल्या यादीची प्रवेश प्रक्रिया ६ जूनपर्यंत राबवली जाईल. अशाच प्रकारे अन्य महाविद्यालये देखील पदवी प्रवेश प्रक्रिया राबवत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा आहे, त्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळाला भेट देऊन ऑनलाइन अर्ज भरण्याची आवश्यकता आहे.

My Pune Edition
May 10, 2025 Page No. 08
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 10 May 2025_013
10 May 2025

विद्यापीठात ग्रंथ प्रदर्शन व ग्रंथ भेट

पुणे, दि. ९ - बुद्ध जयंतीच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभाग आणि तथागत प्रेरणा पब्लिक ट्रस्ट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. पुण्यातील संदर्भतज्ज्ञ प्रसाद भडसावळे यांच्या प्रयत्नातून प्राप्त विविध विषयांवरील ग्रंथांचे प्रदर्शन व पुस्तक भेट उपक्रम झाला. प्रदर्शन उद्घाटनप्रसंगी पाली व बौद्ध अध्ययन विभागाचे विभागप्रमुख प्रा. महेश देवकर, प्रसाद भडसावळे, पाली अभ्यासक प्रा. रितेश ओव्हाळ, राजश्री मोहाडीकर, तलत परवीन, प्रणाली वैंगणकर, तृप्तीराणी तायडे, शीला डोंगरे, प्रज्वला भिंगारे, बाबासाहेब गायकवाड, कैलास वंजारे, संभाजी साळवे, उत्तम साळवे, भगवान धेंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

११वी प्रवेश; अधिकृत संकेतस्थळ सुरू

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ९ - शालेय शिक्षण विभागातर्फे इयत्ता अकरावी प्रवेशासाठीचे अधिकृत संकेतस्थळ अखेर शुक्रवार (दि. ९) पासून सुरू करण्यात आले आहे. या संकेतस्थळावर प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी राज्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी करून आवश्यक ती सर्व माहिती भरणे बंधनकारक करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार राज्यातील सर्व जिल्ह्यांमधील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ शैक्षणिक वर्षापासून ऑनलाइन पद्धतीने राबविली जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरूनच अकरावीला प्रवेश

अधिकृत संकेतस्थळ
https://mahafyjcadmissions.in

मिळणार आहे. राज्य शासनातर्फे ६ मे रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अध्यादेशानुसार ८ मे पासून प्रवेश प्रक्रिया सुरू होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात मात्र संकेतस्थळच सुरू नसल्यामुळे गुरुवारी पहिल्या दिवशी प्रवेश प्रक्रियेचे काहीच कामकाज झाले नाही.

दरवर्षी इयत्ता दहावीचा निकाल जाहीर होण्यापूर्वी अकरावी प्रवेशासाठीचे संकेतस्थळ उपलब्ध करून दिले जाते. त्यात ऑनलाईन प्रवेश अर्जासाठीचे दोन भाग असतात. पहिल्या भागात विद्यार्थी वैयक्तिक माहिती भरतात. दुसऱ्या भागात कनिष्ठ महाविद्यालयांचे पसंतीक्रम भरतात. यंदा इयत्ता दहावीचा निकाल जाहीर होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना वैयक्तिक माहिती भरण्याची सुविधा उपलब्ध होणार नाही. राज्य मंडळांनी येत्या १५ मे पूर्वी दहावीचा निकाल जाहीर करण्याची घोषणा झाली आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रोफाइल तयार करून माहिती भरण्यासाठी १९ ते २८ मे अशी मुदत दिली आहे.

शिक्षण विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर कनिष्ठ महाविद्यालयांना १५ मे पर्यंत नोंदणी करता येणार असून, विद्यार्थी नोंदणी प्रक्रिया येत्या १९ मे पासून सुरू होणार आहे. विद्यार्थी व पालकांनी शिक्षण विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावी, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

सामना

अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया १५ ऑगस्टपर्यंत

पुणे, दि. १० (प्रतिनिधी) – दिवाळीपर्यंत सुरू राहणारी इयत्ता अकरावीची केंद्रीय ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया यंदा १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालयाचे उद्दिष्ट आहे. कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग ११ ऑगस्टपासून सुरू केले जाणार आहेत. केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी राज्यातील जवळपास ११ हजार ७०० कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या सुमारे १६ लाख ७६ हजार जागा उपलब्ध होणार असून, या माध्यमातून अकरावीच्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रवेशावर लक्ष राहणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी शिक्षण सहसंचालक श्रीराम पानझडे उपस्थित होते. राज्यात आतापर्यंत पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह मुंबई, नागपूर, नाशिक आणि अमरावती महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन प्रक्रिया राबवली जात होती. त्या अंतर्गत सुमारे एक हजार ७३० महाविद्यालयांत सुमारे सव्वा सहा लाख जागांवर साडेचार लाख विद्यार्थी प्रवेश घेत होते. आता संपूर्ण राज्यभरात केंद्रीय ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबवली जाणार आहे.

सूर्यवंशी म्हणाले, 'अकरावीच्या प्रवेशासाठी 'https://mahafyjcadmissions.in' हे स्वतंत्र संकेतस्थळ कार्यान्वित केले आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या नोंदणीची प्रक्रिया १९ मेपासून सुरू होणार आहे. केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना एका अर्जातच राज्यभरातील महाविद्यालयांतील प्रवेशाचा पर्याय उपलब्ध होणार आहे. ही प्रवेशप्रक्रिया राबविण्यासाठी समन्वय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. त्यांच्या देखरेखीखाली जिल्ह्यातील प्रवेशप्रक्रिया राबवली जाणार आहे. ग्रामीण भागातील महाविद्यालयांत मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचे नियोजन आहे.

प्रमाणित महाविद्यालयांचीच नोंदणी

संकेतस्थळावर अकरावीच्या प्रवेशासाठी उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी सुरू करण्यात आली आहे. त्यात विभागीय शिक्षण उपसंचालक आणि संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेल्या महाविद्यालयांनाच संबंधित संकेतस्थळावर नोंदणी करता येणार आहे. अकरावीला प्रवेश द्यायचा असल्यास महाविद्यालयांना विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातून मान्यता घ्यावी लागणार आहे. मान्यता नसलेल्या किंवा अनधिकृतरीत्या अकरावी-बारावीला प्रवेश देणाऱ्या संस्थांना चाप लागणार आहे.

Pune Edition
May 11, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकमत

संजय घुडर आदी उपस्थित होते.

अकरावी प्रवेश प्रक्रिया आता शंभर रुपयांत

वेळेसह खर्चातही होणार बचत; नोंदणी शुल्कात कपात

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : अकरावी प्रवेश प्रक्रिया यंदा केंद्रीय पद्धतीने राबविण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. विशेष म्हणजे, त्यासाठी विद्यार्थ्यांना भराव्या लागणाऱ्या नोंदणी शुल्कातही कपात केली असून, आता केवळ शंभर रुपये शुल्क आकारले जाणार आहे. पूर्वी यासाठी उर्वरित विभागांत १२५ रुपये, तर मुंबईसाठी २२५ रुपये शुल्क आकारण्यात येत होते. तसेच महाविद्यालयांकडून घेतली जाणारी माहिती पुस्तिका फी, प्रवेशासाठीच्या शिफारसी या प्रकारांनाही ब्रेक लागेल. यामुळे पालक, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात येण्यासाठी लागणाऱ्या वेळ आणि पैशाचीही बचत होईल.

विद्यार्थ्यांसह पालकांची गैरसोय होऊ नये म्हणून यंदा राज्यभर प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन राबविली जाणार आहे. पूर्वी मर्यादित ठिकाणी ऑनलाइन

प्रक्रिया राबविली जात असे. ऑनलाइन प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार आवडीचे महाविद्यालय घरबसल्या निवडता येणार आहे. प्रवेश प्रक्रियेचा यापूर्वीचा अनुभव पाहता, दरवर्षी तारीख पे तारीख करून प्रवेश प्रक्रिया लांबविली जात असे. अर्धे वर्ष संपले तरी प्रवेश दिले जाई. आता मात्र ११ ऑगस्टपासून महाविद्यालये सुरू होणार असून, प्रवेशाचे सर्व टप्पे १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहेत. यात पालकांसह विद्यार्थ्यांची फसवणूक होऊ नये म्हणून राज्य सरकारच्या वतीने अधिकृतपणे mahafyjcadmissions.in या संकेतस्थळ आणि ८५३०९५५५६४ हा हेल्पलाइन क्रमांक देण्यात आला आहे.

जिल्हापातळीवर आता नोडल ऑफिसर

अकरावी प्रवेशाची ऑनलाइन प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी जिल्हा पातळीवर नोडल अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहेत. या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली प्रवेश प्रक्रिया राबविली जाईल. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचे नियोजन आहे.

अनधिकृत महाविद्यालये 'आऊट'

महाविद्यालयाला विद्यार्थ्यांना अकरावीला प्रवेश द्यायचा असल्यास विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातून मान्यता घ्यावी लागणार आहे. यामुळे मान्यता नसलेल्या किंवा अनधिकृतरीत्या अकरावी-बारावीला प्रवेश देणाऱ्या संस्थांना आळा बसणार आहे, असे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाचे संचालक संपत सूर्यवंशी यांनी स्पष्ट केले.

Pune Main
Page No. 4 May 11, 2025
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

अकरावी प्रवेश १५ ऑगस्टपर्यंत

११ ऑगस्टला कॉलेज सुरू करण्याचे नियोजन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'शालेय शिक्षण विभागाने यंदाची अकरावी प्रवेश प्रक्रिया १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. राज्यातील ज्युनिअर कॉलेज ११ ऑगस्टला सुरू करण्याच्या दृष्टीने प्रवेश प्रक्रियेचे नियोजन करण्यात आले आहे,' अशी माहिती राज्याचे माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालक संपत सूर्यवंशी यांनी शुक्रवारी दिली.

अकरावी प्रवेश प्रक्रियेची माहिती देण्यासाठी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत सूर्यवंशी बोलत होते. या वेळी शिक्षण सहसंचालक श्रीराम पानझडे उपस्थित होते.

राज्यात अकरावीच्या प्रवेशासाठी यंदापासून केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यासाठी 'https://mahafyjcadmissions.in/' ही स्वतंत्र वेबसाइट कार्यान्वित केली आहे. राज्यात यापूर्वी साधारण एक हजार ७३० महाविद्यालयांमधील उपलब्ध असलेल्या सव्वासहा लाख जागांवर साडेचार लाख विद्यार्थी प्रवेश घेत होते. राज्याचा विचार केल्यास, एकूण ११ हजार ७०० ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावीच्या प्रवेशासाठी साधारण १६ लाख ७६ हजार जागा उपलब्ध होत्या. त्यावर साधारणत १३ लाख विद्यार्थी प्रवेश घेतात, अशी माहिती सूर्यवंशी यांनी दिली.

"राज्यात अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडण्यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहेत. या अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली संबंधित जिल्ह्यातील प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचे नियोजन आहे.

– संपत सूर्यवंशी, संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय

तक्रारीसाठी हेल्पलाइन क्रमांक, ई-मेल आयडी

यंदा संपूर्ण राज्यातील ज्युनिअर कॉलेजांमधील अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार आहे. त्यासाठी शिक्षण विभागाने https://mahafyjcadmissions.in/ वेबसाइट कार्यान्वित केली असून, विद्यार्थी-पालकांनी त्याचाच वापर करावा. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अडचणी उद्‌भवू शकतात. ही बाब लक्षात घेत, हेल्पलाइन क्रमांकासह एक स्वतंत्र ई-मेल आयडी तक्रारींसाठी देण्यात येईल, असे संपत सूर्यवंशी यांनी सांगितले.

Maharashtra Times 11.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकमत

राज्यामधील सर्वच विद्यापीठांच्या विभागांचेही होणार आता 'रँकिंग'

'एनआयआरएफ'च्या धर्तीवर महाराष्ट्रात 'यूडीआरएफ' उपक्रमास सुरुवात; याद्वारे प्राध्यापकांना विभागाची दर्जात्मक उंची वाढविण्यास मिळेल प्रोत्साहन

लोकमत विशेष

उद्धव धुमाळे
लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : शिक्षण क्षेत्रातही हेल्दी स्पर्धा झाल्यास समाजाच्या पर्यायाने देशाच्या विकासाच्या दृष्टीने बरचं काही चांगल करू शकतो. याच उद्देशाने केंद्र सरकार नॅशनल इन्स्टिट्यूट रँकिंग फ्रेमवर हा उपक्रम राबवित आहे. त्याच धरतीवर आता राज्यातही युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट रँकिंग फ्रेमवर हा उपक्रम राबवून हेल्दी स्पर्धा घडवली जाईल. यात उत्कृष्ट रँकिंग मिळवणाऱ्यांना योग्य बक्षीस मिळणार आहे. त्याचबरोबर विभागाच्या पातळीवर चालणाऱ्या उपक्रमांची योग्य नोंद घेतली जाणार असल्याने काम करणाऱ्यांना यातून बळ मिळणार आहे.

याबाबत उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर म्हणाले की, राज्यातील अनेक विद्यापीठात विविध विभाग त्या-त्या पातळीवर उत्कृष्ट काम करीत आहेत. पण त्यांची म्हणावी तशी नोंद घेतली जात नाही. या स्पर्धेच्या निमित्ताने राज्यभरातील ते ते विभाग राबवत असलेले उपक्रम आणि त्यातून समाजाला होणारा लाभ याची एकत्रित माहिती राज्य सरकारकडे उपलब्ध होणार आहे. तसेच उत्कृष्ट कामांचा गौरव होणार असून, मागे पडणाऱ्या विभागांना त्यांच्या त्रुटी निदर्शनास येणार आहेत. त्यामुळे अडचणी दूर करून प्रगतीची वाट धरणे अधिक सुलभ होणार आहे.

या उपक्रमाच्या निमित्ताने योग्य संशोधन समाजासमोर येईल आणि त्यातून सकारात्मक बदल घडतील आणि इतरांना प्रेरणादेखील मिळेल. तसेच 'नॅशनल इन्स्टिट्यूट रँकिंग फ्रेमवर'ची पूर्व तयारी म्हणून युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट रँकिंग फ्रेमवर या उपक्रमाकडे आपण पाहिले पाहिजे. विभागनिहाय पब्लिकेशन काय आहे? त्यांनी किती प्रोजेक्ट पूर्ण केले. प्रत्येक विभागाकडे खूप सारे डॉक्युमेंटेशन आहे, परंतु राज्यात एकत्रित डॉक्युमेंटेशन झालेले नाही. त्या-त्या विभागानेच याच संकलन केलं तर अधिक चांगलं होईल.

विद्यापीठातील विभागांना तुलनेने शैक्षणिक स्वातंत्र्य अधिक असते. त्यातही विज्ञान विभागांना मोठे अर्थसाहाय्य उपलब्ध असते. काही विभाग संशोधन आणि शिक्षण यात उत्तम कामगिरी करतात. विद्यापीठ विभाग मानांकन प्रणाली चालू केल्यास विद्यापीठांतर्गत आणि आंतरविद्यापीठीय विविध शैक्षणिक विभागांमध्ये दर्जा उंचावण्यासाठी स्पर्धात्मक वातावरण निर्माण होईल.

> **शैक्षणिक क्षेत्रातही हेल्दी स्पर्धा व्हावी म्हणून आणि 'नॅशनल इन्स्टिट्यूट रँकिंग फ्रेमवर'ची पूर्व तयारी म्हणून आपण युनिव्हर्सिटी डिपार्टमेंट रँकिंग फ्रेमवर हा उपक्रम राबवित आहोत. यात जे विभाग उत्कृष्ट ठरेल त्या विभागाला योग्य पारितोषिकही मिळणार आहे.**
>
> **डॉ. शैलेंद्र देवळाणकर,**
> संचालक, उच्च शिक्षण

स्पर्धेतून घडवले जाणार सकारात्मक वातावरण

विद्यापीठातील प्रत्येक विभागाला आता आपण काय-काय करत आहोत याची सविस्तर माहिती द्यावी लागणार आहे. त्यामुळे जे चांगल काम करत आहेत, ते सर्वांसमोर येईल आणि जे काम करत नाहीत, केले नाहीत, त्यांनाही यापुढे चांगले काम करावे लागेल. यातून सकारात्मक स्पर्धा घडेल.

संशोधनाची खोली अन् उंची वाढविण्यास चालना

देशाच्या शिक्षणाला दिशा देणारे राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. सध्या क्यूएस आणि एनआरआयएफनुसार विद्यापीठांची दर्जात्मक क्रमवारी ठरवली जाते. विद्यापीठाचे विभाग स्वायत्त असतात.

नवीन प्रणालीमुळे विद्यार्थी केंद्रबिंदू मानून नवोपक्रम आणि संशोधनाची खोली, उंची वाढविण्यास चालना मिळेल. याचा प्रथम लाभार्थी विद्यार्थीच असेल. यामुळे शैक्षणिक विभाग केवळ प्रशासन केंद्री न राहता विद्यार्थी केंद्री होतील.

विभागातील शैक्षणिक कार्याची पारदर्शकता निर्माण होऊ शकेल. कर्मचाऱ्यांमध्ये जबाबदारी आणि उत्तरदायित्वाचे भान वृद्धिंगत होण्यास मदत होईल. विद्यार्थी जागतिक स्तरावर आपल्या ज्ञानाद्वारे ओळख निर्माण करू शकेल. यासाठी सकारात्मकपणे पुढे जाण्याची गरज आहे. या उपक्रमाच्या निमित्ताने प्रत्येक विभागा त्याच्या त्याच्या पातळीवर जे उपक्रम राबवित होते, त्यातील चांगले उपक्रम सर्वदूर पोहोचतील आणि आदर्श ठरतील.

डॉ. हरिश्चंद्र नवले,
विभागप्रमुख, तत्त्वज्ञान विभाग

Hello Pune
Page No. 3 May 12, 2025
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

School education dept to undertake major staff mapping drive

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

PUNE: In a bid to instil discipline and accountability among teaching and non-teaching staff, the state school education department will undertake a mapping of all sanctioned positions and corresponding salaries in government and aided schools across the state, with a strict timeline set for completion.

The education department will map all teaching and non-teaching staff positions based on sanctioned posts approved under the 'Sanction Structure' and match these with salary records in the 'Shalarth' portal, which is the official system used for processing school staff payments. This data compilation is expected to be completed by the end of June 2025.

As per the information shared by the education department, the process is being implemented to prevent irregularities such as payments to unauthorised or bogus staff and to ensure that only valid, sanctioned positions receive government funding. Strict action, including withholding of salaries, will be taken against teachers and schools delaying or neglecting the data submission.

Official directives have already been issued Monday to all government, fully- and partially- aided secondary schools to begin the mapping process. Responsibility for accurate submission of data has been placed on school heads and principals.

STRICT ACTION, INCLUDING WITHHOLDING OF SALARIES, WILL BE TAKEN AGAINST TEACHERS AND SCHOOLS DELAYING OR NEGLECTING THE DATA SUBMISSION

The mapping will utilise the Application Programming Interface (API) provided by the National Informatics Centre (NIC) to cross-check the information in the Sanction Structure with that in the Shalarth portal, ensuring data synchronisation and validity. According to the latest notification issued by the Directorate of Secondary and Higher Secondary Education, schools will not be allowed to process salary payments beyond the highest sanctioned position listed in the Sanction Structure. Technical adjustments are being made in the Shalarth system to enforce this restriction.

"We are taking a data-driven approach to ensure that only legitimate employees are drawing salaries from government funds. The mapping of posts and salary systems will bring transparency and accountability at every level," said a senior education officer on condition of anonymity.

Hindustan Times 13.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 14 May 2025_001
14 May 2025

दहावीचा निकाल १.७१ टक्क्यांनी घसरला : पुणे विभागाचा निकाल ९४.८१ टक्के

शंभर टक्के गुण मिळवणारे राज्यात २११ विद्यार्थी

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १३ - राज्य शिक्षण मंडळाने घेतलेल्या दहावी परीक्षेत यंदा राज्यातील तब्बल २११ विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी म्हणजेच शंभर टक्के गुण मिळाले आहेत. विशेष म्हणजे गतवर्षीच्या तुलनेत यंदा निकाल १.७१ टक्यांनी घटला असून दहावीचा राज्याचा निकाल ९४.१० टक्के लागला आहे. दहावीच्या निकालात **कोकण** विभागाने (९८.८२) बाजी मारली असून नागपूर विभागाचा निकाल सर्वात कमी (९०.७८) लागला आहे. पुणे विभागाचा निकाल ९४.८१ टक्के लागला आहे.

यंदाही मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्णतेचे प्रमाण ३.८३ ने जास्त

राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दहावी निकालाची माहिती दिली. यंदा दहावीला नऊ विभागीय मंडळामधून एकूण १५ लाख ४६ हजार ५७९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी १४ लाख ५५ हजार ४३३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्याची टक्केवारी (पान २ पहा)

विभागनिहाय टक्केवारी

कोकण	९८.८२	पुणे	९४.८१	संभाजीनगर	९२.८२
कोल्हापूर	९६.८७	नाशिक	९३.०४	लातूर	९२.७७
मुंबई	९५.८४	अमरावती	९२.९५	नागपूर	९०.७८

...गुण मिळवणारे राज्यात २११ विद्यार्थी

९४.१० टक्के इतकी आहे. गतवर्षी दहावीचा निकाल ९५.८१ टक्के इतका लागला होता. यावर्षी एकूण २८ हजार २० खासगी विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी २२ हजार ५१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्याची टक्केवारी ८०.३६ आहे. तसेच पुनर्परीक्षार्थी म्हणून २३ हजार ९५४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ९ हजार ४४८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, त्याची टक्केवारी ३९.४४ आहे. यावर्षी राज्यात दहावी परीक्षेला ९ हजार ५८५ दिव्यांग विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ८ हजार ८४४ दिव्यांग विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्याची टक्केवारी ९२.२७ एवढी आहे. कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक लागला असून, नागपूर विभागाचा निकाल सर्वांत कमी लागला आहे. मुलींच्या उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९६.१४ टक्के असून, मुलांचे प्रमाण ९२.३१ टक्के आहे. मुलींच्या उत्तीर्ण होण्याची टक्केवारी मुलांपेक्षा ३.९३ टक्क्यांनी जास्त आहे. यावर्षी एकूण ६२ विषयांची परीक्षा घेण्यात आली. त्यापैकी २४ विषयांचा निकाल शंभर टक्के लागला आहे. राज्यात सिंधुदुर्गाचा निकाल सर्वाधिक ९९.३२ टक्के, तर गडचिरोलीचा निकाल सर्वांत कमी ८२.६७ टक्के लागला.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

व्याख्यानमालेने रुजविली वैचारिक चळवळ

महाराष्ट्र टाइम्स

माझे पुणे

व्याख्यानांचे आख्यान

निगडीतील छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमाला

कल्याणी फडके
c-kalyani.phadke
@timesofindia.com

"छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमाला ही केवळ भाषणांचा कार्यक्रम नाही. ही विचारांना चालना देणारी, कृतीस प्रेरणा देणारी आणि जनजागृती घडवणारी एक प्रभावशाली वैचारिक चळवळ आहे. ४० वर्षांपूर्वी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी रुजवलेले हे बीज आज वटवृक्षासारखे बहरले आहे. करोनाकाळामध्ये मंडळाने ऑनलाइन व्याख्यानमालेचे आयोजन करत ही व्याख्यानमाला विनाखंड सुरू आहे. केवळ ज्येष्ठ श्रोतेच नव्हे, तर तरुणाईही यामध्ये सहभागी होत आहे. या व्याख्यानमालेच्या माध्यमातून राष्ट्रनिष्ठा, इतिहासाचे भान, सांस्कृतिक मूल्यांची जपणूक आणि सामाजिक सजगतेचा वसा सातत्याने रुजवला गेला आहे.

– रमेश बनगोंडे, कार्याध्यक्ष, स्वा. सावरकर मंडळ, निगडी

नुकत्याच झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेमध्ये संवाद साधताना शैलेंद्र देवळाणकर.

व्याख्यानमालेला डिजिटलची जोड

नागरिकांसाठी बौद्धिक पर्वणी ठरणाऱ्या व्याख्यानमालेला 'डिजिटल'ची जोड मिळाली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाची अनेक व्याख्याने आता मंडळाच्या अधिकृत यू-ट्यूब चॅनलवर उपलब्ध आहेत. त्यामुळे व्याख्यानमाला व्हिडीओद्वारे पुढील अनेक वर्षे ऐकता येणार आहे.

पिंपरी : उद्योगांच्या आगमनाने ८० च्या दशकानंतर शहराची आर्थिक आणि सामाजिक उन्नती झाली. या प्रगतीबरोबरच निगडी प्राधिकरणातील 'छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमाला' सलग ४१ वर्षे नागरिकांचे वैचारिक भरणपोषण करत आहे. करोनाकाळही याला अपवाद नाही. देदीप्यमान इतिहासाबरोबरच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील घडामोडींचा समावेश असणाऱ्या या व्याख्यानमालेने शहरात वैचारिक चळवळ रुजविली आहे.

औद्योगिक क्षेत्राच्या आगमनाने पिंपरी-चिंचवड आणि भोवतालच्या गावांचे रूपांतर महानगरपालिकेत झाले. आता या शहरामध्ये सांस्कृतिक क्षेत्र बहरले असून, विविध भागांमध्ये व्याख्यानमाला होत आहेत. यामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाच्या 'छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमाले'चे स्थान अग्रभागी आहे.

'निगडी प्राधिकरणातील स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळातर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमाले'चे आयोजन करण्यात येते. १९८३ मध्ये कॅप्टन जी. एस. कदम यांच्या पुढाकाराने या उपक्रमाची सुरुवात झाली. पूर्वी शिवजयंतीवेळी होणारी व्याख्यानमाला २००२ नंतर एक ते पाच मे दरम्यान होत आहे. नुकत्याच झालेल्या व्याख्यानमालेत 'अमेरिकन टेरिफ' हा विषय होता. आजवर शिवाजीराव भोसले, पांडुरंग बलकवडे, शेषराव मोरे, दादा इदाते, पुष्पेंद्र कुलश्रेष्ठ यांची व्याख्याने झाली आहेत. प्राधिकरणातील मंडळाच्या सभागृहात होणारी व्याख्यानमाला राज ठाकरे यांच्या व्याख्यानावेळी ज्ञानप्रबोधिनी शाळेच्या मैदानावर झाली होती. केवळ पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह बिहार, दिल्ली, काश्मीर या ठिकाणांहूनही वक्ते सहभागी झाले आहेत,' असे मंडळाचे कार्याध्यक्ष रमेश बनगोंडे यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवडमधील विविध व्याख्यानमालेतील विषय, वक्ते आणि नियोजनाचा समन्वय साधणाऱ्या 'पिंपरी-चिंचवड व्याख्यानमाला समन्वय समिती'मध्येही स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाचे योगदान असल्याचे त्यांनी नमूद केले.

Maharashtra Times 14.5.2025

प्रभात

City 15 may 2025_013
15 May 2025

इयत्ता बारावीच्या मूळ गुणपत्रिका उद्या मिळणार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १४ - इयत्ता बारावीच्या लेखी परीक्षेच्या ऑनलाइन निकालानंतर विद्यार्थ्यांना शुक्रवारी (दि. १६) गुणपत्रिकांचे वाटप केले जाणार आहे. कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये दुपारी तीन वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रिका देण्यात येणार आहे. त्यापूर्वी संबंधित कनिष्ठ महाविद्यालयांना दुपारी ११:०० वाजता गुणपत्रिका वितरित केल्या जातील, अशी माहिती राज्य मंडळाकडून प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली. बारावीचा ऑनलाइन निकाल दि. ५ मे या दिवशी जाहीर झाला. विद्यार्थ्यांना मंडळाच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन निकाल पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. यानंतर शुक्रवारी (दि. १६) विद्यार्थ्यांना गुणपत्रिका देण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक अभ्यासक्रमांना

News Paper Clippings During May 2025

Section: Education

Teacher data to be checked

State government tightens salary verification to prevent fraudulent claims

| Pune Mirror Bureau
feedback@punemirror.com
@ThePuneMirror

Following the revelation of a fake teachers' scam in April, the School Education Department has launched a data interception drive to scrutinise the records of teachers and non-teaching staff in government and grant-in-aid schools. Information from two key systems—Shalarth and Sanctioned Posts—will be merged for post-mapping. Schools must provide accurate details by the end of June, failing which salaries will be withheld.

The campaign is currently underway in secondary, grant-in-aid and partially aided schools, with principals and administrators held accountable. The Secondary and Higher Secondary Education Department's Joint Director, Shriram Panzade, issued a circular on May 9, instructing verification of whether teachers occupying sanctioned positions are legitimately employed.

FILE PHOTO

The government has opted to use the National Informatics Centre's API interface to cross-check and validate data from both systems. Shalarth serves as the state's salary system, disbursing wages to teachers and non-teaching staff. Previously, Shalarth operated separately from the Sanctioned Posts database, enabling schools to unofficially add non-existent teachers offline, leading to fraudulent salary claims.

An initial probe exposed a scam where five officials colluded with school managements to register 580 fake teachers and staff on Shalarth. Since 2019, they have been receiving salaries at the government's expense, resulting in a loss of Rs 100 crore.

In light of this, the Secondary and Higher Secondary Directorate has mandated a thorough verification of teacher and staff records across both systems. Schools must upload accurate data online by June 30. The new system will come into effect from July.

PRINCIPALS' ASSOCIATION WELCOMES MOVE

Former Vice President of State Principals' Association, Mahendra Ganpule, lauded the decision. He emphasised the necessity of verifying salary group allocations within Shalarth to ensure staff details align with their designated categories. This new mechanism, he asserted, will help eliminate systemic loopholes.

Pune Mirror 17.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 17 may 2025_015
17 May 2025

सावधान! अनधिकृत संस्थेत प्रवेश घेणे टाळा

राज्य तंत्रशिक्षण विभागाचे विद्यार्थ्यांना आवाहन; व्यावसायिक शिक्षण संस्थांबाबत महत्त्वाच्या सूचना

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १६ - मान्यता नसलेली विद्यापीठे आणि अनधिकृत संस्थांमधील पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, एकात्मिक पदवी, पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ नये, असे आवाहन राज्य तंत्रशिक्षण विभागाने केले आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश लवकरच सुरू होणार असल्याने तंत्रशिक्षण विभागाने संस्थेची खातरजमा करून प्रवेश घ्यावा, असा सल्ला दिला आहे.

राज्य सीईटी सेलमार्फत व्यावसायिक अभ्यासकमांची प्रवेशप्रक्रिया राबविली जाते. त्याचबरोबर तंत्रशिक्षण विभागामार्फत काही अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. या अभ्यासक्रमांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर, विद्यापीठ अनुदान आयोग, संबंधित विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ इत्यादी सक्षम प्राधिकरणांची व राज्य शासनाची मान्यता असणे आवश्यक आहे. शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर सक्षम प्राधिकरणांची मान्यता असलेल्या संस्था व संस्थेत चालविल्या जाणाऱ्या अधिकृत अभ्यासक्रमांची यादी उपलब्ध आहे.

राज्यात उच्च तंत्र व व्यवसाय शिक्षणअंतर्गत अनधिकृत संस्था स्थापन करण्यास आणि अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम सुरू करण्यास मनाई आहे. सक्षम प्राधिकरण व महाराष्ट्र शासनाची मान्यता नसलेल्या विद्यापीठ आणि संस्थांमध्ये प्रवेश घेऊ नये, असे तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहीतकर यांनी सांगितले.

मान्यता नसलेली विद्यापीठे अथवा अनधिकृत संस्था विद्यार्थ्यांना खोटी आमिषे दाखवून अथवा संस्था मान्यताप्राप्त आहे, असे भासवून प्रवेश घेण्यास प्रवृत्त करतात. नंतर फसवणूक झाल्याचे निदर्शनास येते. या पार्श्वभूमीवर संस्थेची मान्यता तपासून घेतल्यानंतर प्रवेश घ्यावा.

व्यावसायिक अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे

पदवी : अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, प्लॅनिंग, बीबीए, बीसीए.

पदव्युत्तर पदवी : एमबीए, एमसीए, एम. फार्मसी, एम.ई अथवा एम.टेक., एम. आर्किटेक्चर, एम. एचएमसीटी, एम. फार्म, प्लॅनिंग. एकात्मिक पदवी : प्रथम वर्ष एम.ई/एम.टेक., एम. प्लॅनिंग, एम. एचएमसीटी, एमबीए /एमएमएस, एमसीए.

विभागांतर्गत अभ्यासक्रम

अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकमत

दिवसातून तीन वेळा शाळेत घेतली जाणार हजेरी; शिक्षण विभागाचे निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व शाळांसाठी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात नवे नियम आणि सूचना जारी केल्या आहेत. याअंतर्गत शाळांमधील विद्यार्थ्यांची हजेरी दिवसांतून तीन वेळा घेतली जाणार असून, त्यांच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी संबंधित शाळेवरच राहणार आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार माजी निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या शिफारसींनुसार सकाळी, दुपारी व संध्याकाळी विद्यार्थ्यांची हजेरी होईल.

अनुपस्थिती असल्यास पालकांना त्वरित 'एसएमएस'द्वारे माहिती दिली जाईल, अशी प्रकारे दिवसातून तीन वेळा हजेरी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच खासगी शाळांमध्ये वर्गाचे दरवाजे, कॉरिडॉर, प्रवेशद्वार, मैदाने व स्वच्छतागृहाबाहेर कॅमेरे लावणे बंधनकारक असून एक महिन्याचा व्हिडीओ बॅकअप ठेवणे. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याआधी पोलिस चारित्र्य प्रमाणपत्र घेणे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्यास सेवा तत्काळ समाप्त, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, प्रत्येक स्वच्छतागृहाजवळ परिचर नेमणे, पाणी, प्रकाश आणि आपत्कालीन घंटा उपलब्ध असावी, मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक नेमणे, अनधिकृत व्यक्तींचा प्रवेश थांबविण्यासाठी दक्षता बाळगणे, १०९८ क्रमांक दृश्यमान ठिकाणी लावणे आणि त्यासंबंधी माहिती विद्यार्थ्यांना देणे, शाळेच्या भिंतींवर सुरक्षेविषयी माहिती देणारे फलक, चित्रे किंवा डिजिटल बोर्ड लावावेत. विद्यार्थ्यांवर मानसिक ताण येऊ नये म्हणून समुपदेशकाची नियुक्ती करावी. खासगी शाळांनी पात्र व अनुभवी समुपदेशक नियुक्त करणे, पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळांमध्ये 'चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श' यासंबंधी प्रात्यक्षिके आयोजित करावी. शाळा प्रशासनाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांबरोबर नियमित बैठक घेऊन या सर्व निर्देशांची अंमलबजावणी करावी, नियमांचे पालन न करणाऱ्या शाळांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

Pune Main
Page No. 2 May 17, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

अकरावीसाठी पुणे विभागातील १५२६ कॉलेजेसची नोंदणी पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : दहावीचा निकाल लागल्यानंतर अकरावी प्रवेशाच्या हालचालींना वेग आला आहे. सदर प्रवेशप्रक्रिया https://mahafyjcadmissions.in या अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन सुरू आहे. यात पुणे विभागातील १५३३ पैकी १५२६ महाविद्यालयांनी नोंदणी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. त्यापैकी १११७ महाविद्यालयांची पडताळणी करून अंतिम करण्यात आले आहे, अशी माहिती विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने दिली आहे.

विद्यार्थ्यांसाठी प्रवेशप्रक्रियेच्या सुविधा सोमवारपासून (दि. १९) उपलब्ध करून दिली जाणार आहे. सर्व संबंधित महाविद्यालयांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी. विद्यार्थ्यांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी तातडीने आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आदेशही महाविद्यालयांना देण्यात आले आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ यासाठी सुरू असलेली ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया महाराष्ट्रातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांसाठी लागू आहे. या नोंदणीप्रक्रियेदरम्यान काही तांत्रिक अडचणी आल्यास किंवा मार्गदर्शन हवे असल्यास महाविद्यालयांनी ८५३०९५५५६४ यावरकिंवा support@mahafyjcadmissions.in येथे मेल पाठवावा.

जिल्हानिहाय विभागातील चित्र काय?

जिल्हा	नोंदणी झालेली महाविद्यालयांची संख्या
अहिल्यानगर	४५३
सोलापूर	३८८
पुणे	६८५
एकूण	१५२६

Pune Main
Page No. 8 May 17, 2025
Powered by: erelego.com

प्रभात
City 18 May 2025_011
प्रतीक 18 May 2025
बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

अकरावी प्रवेशासाठी अर्ज भरण्यास उद्या प्रारंभ

जिल्ह्यात ६८५ महाविद्यालयांची नोंदणी

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १७ - दहावी निकालानंतर सर्वांचे लक्ष अकरावी प्रवेशाकडे लागले असून तिच्या ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेसाठी कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी पूर्ण झाली आहे. पुणे जिल्ह्यात ६८५ कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी पूर्ण केली आहे. आता, सोमवारपासून (ता. १९) विद्यार्थ्यांना अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे.

पुणे विभागात पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश आहे. विभागात १ हजार ५३३ कनिष्ठ महाविद्यालयांपैकी १ हजार ५२६ कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी झाली. यामध्ये पुणे जिल्ह्यात ६८५, अहिल्यानगर जिल्ह्यात ४५३ आणि सोलापूर जिल्ह्यात ३८८ कनिष्ठ महाविद्यालयांची नोंदणी पूर्ण झाली आहे. विभागातील महाविद्यालयांपैकी १ हजार ११७ महाविद्यालयांची पडताळणी करून ते अंतिम केले आहे. राज्यात ११ हजार ७०० कनिष्ठ महाविद्यालये असून सुमारे १६ लाख ७६ हजार जागांसाठी केंद्रीय प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. राज्यात अकरावीच्या प्रवेशासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये ही ऑनलाइन प्रक्रिया राबविली जात आहे. आतापर्यंत राज्यातील नऊ हजार ४८४ महाविद्यालयांनी नोंदणी केली आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकमत

वरिष्ठ, निवड वेतनश्रेणीस पात्र शिक्षकांना मिळणार प्रशिक्षण

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांची ओळख करून देण्यासाठी एससीईआरटीकडून आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : राज्यातील वरिष्ठ आणि निवड वेतनश्रेणीस पात्र असलेल्या शिक्षकांना २ ते १५ जूनदरम्यान राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांची ओळख करून देण्यासाठी पुणे जिल्ह्यातून वरिष्ठ वेतन श्रेणीस १४३३ आणि निवड वेतनश्रेणीसाठी १०६१ शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रत्येक वर्गात ४० ते ६० शिक्षकांचा समावेश असणार आहे.

६०
शिक्षकाचा एक वर्ग याप्रमाणे १०६१ शिक्षकांना प्रशिक्षण

प्रशिक्षणासाठी दररोज चार तासांचा कालावधी असेल आणि एकूण प्रशिक्षण १० दिवसांचे असेल. मार्गदर्शनासाठी चार तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात येणार आहे. यात ३० पेक्षा कमी प्रशिक्षणार्थी असलेल्या तालुक्यांतील शिक्षकांचे प्रशिक्षण शेजारील तालुक्यात घेण्यात येणार असून, याची जबाबदारी संबंधित 'डाएट'वर सोपविण्यात आली आहे.

प्रत्येक तासानंतर एससीईआरटीकडून १० गुणांची वस्तुनिष्ठ चाचणी ऑनलाइन घेण्यात येईल. याशिवाय लेखी चाचणी, स्वाध्याय व कृती संशोधन या घटकांचेही मूल्यमापन करण्यात येणार आहे. प्रत्येक घटकात किमान ५० टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. सर्व अटी पूर्ण करणाऱ्या शिक्षकांनाच एससीईआरटीतर्फे अधिकृत प्रमाणपत्र दिले जाईल. हे प्रमाणपत्र प्राप्त केल्यानंतरच शिक्षकांना वेतनश्रेणीचा लाभ मिळणार आहे.

प्रशिक्षणात असणार चार गट

प्राथमिक गट इयत्ता १ ते ८ वी च्या शिक्षकांचा

माध्यमिक गट इयत्ता ९ ते १०वी शिक्षकांचा

उच्च माध्यमिक गट ११ आणि १२वी च्या शिक्षकांचा

अध्यापक विद्यालयासाठींचा आणि पुन्हा निवडसाठी दोन गट एक कला शिक्षक आणि क्रीडा शिक्षक

हे प्रशिक्षण १६ जूनपासून सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक वर्षाच्या आधीच पूर्ण होणार असल्याने नवीन अभ्यासक्रम राबविताना शिक्षकांना अडचणी येणार नाहीत. प्रशिक्षणासाठी शंभर टक्के उपस्थिती आवश्यक असून, शिक्षकांनी या प्रशिक्षणात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

Hello Pune
Page No. 5 May 18, 2025
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

अकरावी प्रवेश प्रक्रिया बुधवारपासून

पहिल्या फेरीची अंतिम गुणवत्ता यादी ३ जूनला होणार जाहीर

पुणे, ता. १८ : राज्यात पहिल्यांदाच इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यभरातील नऊ हजार २९४ कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी केली आहे. विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशासाठी बुधवारपासून (ता. २१) ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. पहिल्या फेरीतील अंतिम गुणवत्ता यादी तीन जूनला जाहीर होणार आहे, तर या फेरीतील विद्यार्थ्यांना सहा ते १२ जून या कालावधीत प्रवेश घेता येणार आहे.

गेल्यावर्षी पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर, अमरावती या पाच विभागांत अकरावीची केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने तर, उर्वरित राज्यात महाविद्यालय स्तरावर राबवण्यात येत होती. शिक्षण विभागाकडून यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून (२०२५-२६) राज्यात प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येत आहे. यासाठी 'https://mahafyjcadmissions.in/' या स्वतंत्र संकेतस्थळाची निर्मिती केली आहे. कनिष्ठ महाविद्यालयांना नोंदणीसाठी १५ मेपर्यंतची मुदत दिली होती तर विद्यार्थ्यांची नोंदणी १९ मेपासून सुरू करणार असल्याचे जाहीर केले होते. प्रत्यक्षात, पहिली फेरी यापूर्वी जाहीर केलेल्या नियोजित कालावधीपासून दोन दिवस उशिराने सुरू होत आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार, प्रवेशाची पहिली फेरी २१ मेपासून सुरू होणार आहे. त्यात २१ ते २९ मे या कालावधीत विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरावा लागेल. कनिष्ठ महाविद्यालयांचे किमान एक ते कमाल दहा प्राधान्यक्रम विद्यार्थ्यांना नोंदवता येतील. पहिल्या फेरीची तात्पुरती गुणवत्ता यादी ३० मे ला जाहीर होईल. या यादीवर एक जूनपर्यंत हरकती-सूचना नोंदवता येतील. त्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी तीन जूनला जाहीर होऊन सहा ते १२ जून या कालावधीत पहिल्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करता येणार आहे.



अर्ज भरण्याचा करा सराव

विद्यार्थ्यांना दोन दिवस अर्ज भरण्याचा सराव करता येणार आहे. त्यानुसार सोमवारी (ता. १९) आणि मंगळवारी (ता. २०) विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरणे, प्राधान्यक्रम नोंदविण्याचा सराव करता येणार आहे. त्यानंतर २१ मेपासून नव्याने अर्ज भरावा लागणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली.

राखीव कोट्यातील प्रवेश ३ जूनपासून

पहिल्या फेरीसाठी अर्ज भरतानाच विद्यार्थ्यांना अंतर्गत, व्यवस्थापन, अल्पसंख्याक कोट्यातील राखीव जागांसाठीही अर्ज करता येईल. राखीव जागांवरील प्रवेश तीन जूनपासून देता येतील.

Sakal 19.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

ऑनलाइन अर्ज भरण्याआधी सराव करा

अकरावी प्रवेशासाठी २१ ते ८ मेदरम्यान अर्ज भरता येणार, सहा जूनला कॉलेजांचे ॲलॉटमेंट

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी प्रवेशासाठी राबविण्यात येणाऱ्या केंद्रीय अकरावी प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, विद्यार्थ्यांना आज (सोमवारी १९ मे) आणि उद्या (मंगळवारी २० मे) अर्ज भरण्याचा सराव करता येणार आहे. या सराव सत्रानंतर विद्यार्थ्यांना त्यांचा अर्ज २१ ते २८ मे या कालावधीत भरता येईल. या अर्जांच्या माहितीच्या आधारे सहा जूनला कॉलेजांचे ॲलॉटमेंट जाहीर होणार आहे.

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने प्रसिद्ध केलेल्या सुधारित वेळापत्रकानुसार विद्यार्थ्यांना २१ मेपासून अर्ज भरता येईल. यामध्ये विद्यार्थ्यांना प्राथमिक माहितीसह कॉलेजांचे पर्यायही भरावे लागणार आहेत. अर्ज भरण्याची प्रक्रिया २८ मे रोजी संपल्यानंतर, ३० मे रोजी तात्पुरती गुणवत्ता यादी प्रकाशित करण्यात येईल. या यादीवरील आक्षेप आणि हरकती ३० मे ते एक जून या कालावधीत नोंदवता येतील. त्यानंतर तीन जूनला अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येणार असून, पाच जूनला गुणवत्ता यादीवर आधारित प्रवेशांचे ॲलॉटमेंट करण्यात येईल. विद्यार्थ्यांना कॉलेजांचे ॲलॉटमेंट सहा जूनला सकाळी १० वाजता समजेल. कॉलेजांचे ॲलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांना सहा ते १२ जून या कालावधीत कागदपत्रे अपलोड करून, त्याची प्रत्यक्ष पडताळणी करायची आहे.

या प्रक्रियेनंतर प्रवेश निश्चित करता येतील. प्राधान्यक्रमातील पहिल्या क्रमांकाचे कॉलेज प्रवेशासाठी ॲलॉट झाल्यास, तेथे प्रवेश घेणे अनिवार्य राहणार आहे. दुसऱ्या फेरीसाठी कॉलेजांमधील रिक्त जागांची यादी १४ जून प्रसिद्ध करण्यात येईल, अशी माहिती माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांना दोन दिवस अर्ज भरण्याचा सराव करता येणार आहे. त्यानुसार १९ आणि २० मे रोजी विद्यार्थी ऑनलाइन अर्ज भरणे, प्राधान्यक्रम नोंदवण्याचा सराव करू शकणार आहेत. त्यानंतर २१ मे रोजी नव्याने अर्ज भरावा लागणार आहे. कॉलेजांना विद्यार्थ्यांकडून अकरावीच्या प्रवेश शुल्काची रक्कम ऑनलाइन पद्धतीनेच घ्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या वेबसाइटला भेट द्यावी, असे डॉ. महेश पालकर यांनी सांगितले

विभाग	उत्तीर्ण विद्यार्थी	कला	वाणिज्य	विज्ञान
अमरावती	१,४७,७३९	८०,७४०	२४,३४०	८१,३९५
छत्रपती संभाजीनगर	१,७०,७५०	१,११,१६५	४२,६१५	१,१२,६७०
कोल्हापूर	१,२५,३८०	६४,५७२	४८,४६६	८०,२४०
लातूर	९७,९९०	५२,८६०	२१,२६०	६३,४३०
मुंबई	३,२१,५६६	२२,९५५	२,७२,९३०	१,६०,७१५
नागपूर	१,३२,६५०	७६,३९५	३८,८३०	९९,८७०
नाशिक	१,८३,३०५	८३,०००	३७,०२०	८६,७३०
पुणे	२,४९,५०७	१,०३,७०५	१,०१,९७१	१,७०,१७०

२०,४३,२५४	राज्याची एकूण प्रवेशक्षमता
८,५२,२०६	विज्ञान
५,४०,३१२	वाणिज्य
६,५०,६८२	कला

पावणेदोन लाख जागा रिक्त राहण्याचा अंदाज

राज्यातील दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या १४ लाख ५५ हजार विद्यार्थ्यांसाठी २० लाख ४३ हजार जागा उपलब्ध आहेत. म्हणजेच एकूण पात्र विद्यार्थ्यांपेक्षा सुमारे सहा लाख जास्त जागा आहेत. पुणे विभागाचा विचार करता पुणे विभागातून (पुणे, अहिल्यानगर, सोलापूर) दोन लाख ४९ हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यासाठी विभागातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये तीन लाख ७५ हजार जागा आहेत. त्यामुळे पुणे विभागात विद्यार्थ्यांच्या तुलनेत सव्वा लाख जागा अधिक रिक्त आहेत. गेल्या काही वर्षांची प्रवेशप्रक्रिया पाहता पावणेदोन लाख जागा रिक्त राहण्याचा अंदाज आहे.

Maharashtra Times 19.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 19 May 2025_005
19 May 2025

अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज २१ मेपासून

प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक जाहीर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १८ - दहावी निकाल जाहीर केल्यानंतर अकरावीच्या प्रवेशाची लगबग सुरू झाली आहे. यंदा पहिल्यांदाच राज्यभर अकरावीची प्रवेशप्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार आहे.

त्यासाठी राज्यभरातील ९ हजार २९४ कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी केली आहे. विद्यार्थ्यांना बुधवारपासून (२१ मे) ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. पहिल्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ६ ते १२ जून या कालावधीत प्रवेश घेता येणार आहे. शिक्षण मंडळाने प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे.

पहिली फेरी दोन दिवस विलंबाने सुरू होत आहे. नव्या वेळापत्रकानुसार अकरावीच्या प्रवेशाची पहिली फेरी २१ मेपासून सुरू होणार आहे.

२१ ते २९ मे कालावधीत ऑनलाइन अर्ज भरावा लागणार आहे. तसेच, कनिष्ठ महाविद्यालयांचे किमान एक ते कमाल दहा प्राधान्यक्रम नोंदवता येणार आहेत. ऑनलाइन नोंदणीसाठी शंभर रुपये शुल्क भरावे लागतील. पहिल्या फेरीची तात्पुरती गुणवत्ता यादी ३० मे रोजी जाहीर होईल. यादीवर १ जूनपर्यंत हरकती-सूचना नोंदवता येणार आहेत. त्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होऊन ६ ते १२ जून या कालावधीत पहिल्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करता येणार आहे.

अर्ज भरण्याच्या सरावासाठी दोन दिवस

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार, विद्यार्थ्यांना दोन दिवस अर्ज भरण्याचा सराव करता येणार आहे. त्यानुसार १९ आणि २० मे रोजी विद्यार्थी ऑनलाइन अर्ज भरणे, प्राधान्यक्रम नोंदवण्याचा सराव करू शकणार आहेत. त्यानंतर २१ मे रोजी नव्याने अर्ज भरावा लागणार आहे.

राखीव कोट्यातील प्रवेश ३ जूनपासून

पहिल्या फेरीसाठी अर्ज भरतानाच विद्यार्थ्यांना अंतर्गत, व्यवस्थापन, अल्पसंख्यांक कोट्यातील राखीव जागांसाठीही अर्ज करता येईल. राखीव जागांवरील प्रवेश ३ जूनपासून दिले जातील.

प्रवेश शुल्क ऑनलाइनद्वारेच

कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थ्यांकडून अकरावीच्या प्रवेश शुल्काची रक्कम ऑनलाइन पद्धतीनेच घ्यावी लागणार आहे. त्याबाबतचे निर्देशही शिक्षण विभागाने दिले आहे. अकरावीच्या ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेसाठी https://mahafyjcadmissions.in/ या स्वतंत्र संकेतस्थळाची निर्मिती करण्यात आली आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकमत

अकरावीच्या केंद्रीय प्रवेशासाठी २१ मेपासून ऑनलाइन अर्ज

पहिल्या फेरीचे वेळापत्रक जाहीर; विद्यार्थ्यांना ६ ते १२ जूनदरम्यान घेता येणार प्रवेश

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : यंदा पहिल्यांदाच राज्यभर अकरावीची प्रवेशप्रक्रिया केंद्रीय पद्धतीने ऑनलाइन राबविण्यात येत आहे. त्यासाठी राज्यभरातील ९ हजार २१४ कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी केली असून, विद्यार्थ्यांना बुधवारपासून (दि. २१ मे) ऑनलाइन नोंदणी करता येणार आहे. पहिल्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ६ ते १२ जून या कालावधीत प्रवेश घेता येणार आहे. शिक्षण विभागाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून संपूर्ण राज्यभरात अकरावीची प्रवेशप्रक्रिया केंद्रीय, ऑनलाइन पद्धतीने राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

या प्रक्रियेसाठी 'mahafyjcadmissions.in' या संकेतस्थळाची निर्मिती करून त्यावर कनिष्ठ महाविद्यालयांना नोंदणीसाठी १५ मेपर्यंतची मुदत दिली होती. तर विद्यार्थ्यांची नोंदणी १९ मेपासून सुरू करण्यात येणार असल्याचे जाहीर केले होते. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, अकरावीच्या प्रवेशाची पहिली फेरी २१ मेपासून सुरू होत आहे. त्यात २१ ते २८ मेदरम्यान विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरावा लागणार आहे; तसेच कनिष्ठ महाविद्यालयांचे किमान एक ते कमाल दहा प्राधान्यक्रम नोंदविता येणार आहेत. या ऑनलाइन नोंदणीसाठी विद्यार्थ्यांना शंभर रुपये शुल्क भरावे लागणार आहे. पहिल्या फेरीची तात्पुरती गुणवत्तायादी ३० मे रोजी जाहीर केली जाणार आहे. या यादीवर १ जूनपर्यंत हरकती-सूचना नोंदविता येणार आहेत. त्यानंतर अंतिम गुणवत्तायादी जाहीर होऊन ६ ते १२ जून दरम्यान पहिल्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करता येणार आहे.

राज्याची प्रवेश क्षमता

२० लाख ४३ हजार २५४

शाखानिहाय क्षमता

विज्ञान : ८ लाख ५२ हजार २०६

वाणिज्य : ५ लाख ४० हजार ३९२

कला : ६ लाख ५० हजार ६८२

पुणे विभागात शाखानिहाय जागा किती ?

एकूण - ३ लाख ७५ हजार ८४६

विज्ञान - १ लाख ७० हजार १७०

वाणिज्य - १ लाख १ हजार ९७१

कला - १ लाख ३ हजार ७०५

सरावासाठी दोन दिवस

विद्यार्थ्यांना दोन दिवस अर्ज भरण्याचा सराव करता येणार आहे. त्यानुसार १९ आणि २० मे रोजी ऑनलाइन अर्ज भरणे, प्राधान्यक्रम नोंदविण्याचा सराव विद्यार्थी करू शकणार आहेत. त्यानंतर २१ मे रोजी नव्याने अर्ज भरावा लागणार आहे.

राखीव कोट्यातील प्रवेश ३ जूनपासून

पहिल्या फेरीसाठी अर्ज भरतानाच विद्यार्थ्यांना अंतर्गत, व्यवस्थापन, अल्पसंख्याक कोट्यातील राखीव जागांसाठी देखील अर्ज करता येणार आहे. या राखीव जागांवरील प्रवेश ३ जूनपासून देता येणार आहे.

प्रवेश शुल्कही 'ऑनलाइन'

कनिष्ठ महाविद्यालयांना विद्यार्थ्यांकडून अकरावीच्या प्रवेश शुल्काची रक्कम ऑनलाइन पद्धतीनेच घ्यावी लागणार आहे.

ही माहिती जाणून घ्या...

जे विद्यार्थी कॅप किंवा कोटामार्फत कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित करतात, त्यांची प्रवेशप्रक्रिया पूर्ण झालेली समजली जाईल.

एकदा उमेदवाराने संबंधित महाविद्यालयात प्रवेश घेतल्यास, त्याचा प्रवेश निश्चित मानण्यात येईल.

नोंदणी शुल्क डिजिटल माध्यमातूनच स्वीकारला जाईल.

सर्व संबंधितांनी वेळापत्रकाचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे.

व्यवस्थापन/ इन-हाऊस/अल्पसंख्याक कोट्यातील प्रवेश ६ जून २०२५ पासून सुरू होतील.

Pune Main
Page No. 12 May 19, 2025
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

City 19 May 2025_004
19 May 2025

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

कोचिंग क्लास संस्कृती ?

शैक्षणिक

- प्रा. डॉ. सुभाष राठोड

शाळा-महाविद्यालये केवळ नावापुरतीच उरली असून, 'क्लासेसमधूनच यश मिळते' अशी चुकीची समजूत समाजमनात खोलवर रूजली आहे. हे भयंकर वास्तव आहे.

आज भारतीय शिक्षणक्षेत्र एका गंभीर वळणावर येऊन ठेपले आहे. शिक्षणाचे केंद्रीकरण शाळा व महाविद्यालयांच्या हातून निसटून खासगी कोचिंग क्लासेसकडे झुकत चालले आहे. खरं शिक्षण क्लासमध्येच मिळतं ही अपप्रवृत्ती पालक, विद्यार्थी आणि समाजाच्या मानसिकतेत खोलवर रुजली आहे. या कोचिंग क्लास संस्कृती'चा प्रसार इतका वेगाने होत आहे की, शैक्षणिक व्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होऊ लागले आहेत.

आज शिक्षण म्हणजे केवळ 'गुण कसे मिळवायचे?' या प्रश्नाभोवती फिरणारी एक शर्यत बनली आहे. या शर्यतीत शाळा-महाविद्यालये मागे पडत असून पुढे निघाले ते कोचिंग क्लासेस! मुलांच्या आयुष्यातील सर्व वेळ, ऊर्जा आणि पालकांच्या खिशातील पैसा खासगी कोचिंगच्या विळख्यात अडकले आहेत. शिक्षणक्षेत्राची दिशाच बदलून टाकणारी ही 'कोचिंग संस्कृती' शैक्षणिक व्यवस्थेच्या मुळावर घाव घालू लागली आहे.

सध्याच्या शिक्षणपद्धतीत एक गंभीर आणि चिंताजनक प्रवृत्ती पाहायला मिळते- विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षण संस्था म्हणजेच शाळा व कॉलेजकडे पाठ फिरवून कोचिंग क्लासेसकडे धाव घेत आहेत. शिक्षण हे केवळ गुण मिळवण्याचं साधन' बनल्यामुळे, त्या दिशेने झपाट्याने चाललेली ही धाव वास्तवात अनेक शैक्षणिक प्रश्नांची जननी ठरली आहे.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक आयुष्याचा केंद्रबिंदू शाळा महाविद्यालये. जिथे शिक्षकांचा सुसंवाद, सहशिक्षकांच्या संवादातून होणारे समृद्धीकरण आणि अभ्यासाबरोबरच सहशालेय उपक्रमांची समांतर वाटचाल इत्यादी. पण आज विद्यार्थी जीवनातून हा सांघिक शिक्षणाचा गाभा हरवत चालला आहे की काय अशी परिस्थिती निर्माण होऊ पाहत आहे. कारण पालकांच्या मनात एक भीती बसवली गेली आहे- क्लास लावला नाही तर मूल मागे पडेल!

शिक्षक रिकाम्या वर्गाला शिकवतो आणि त्याचा थेट परिणाम अभ्यासाच्या गुणवत्तेवर होतो. वर्गात जे शिकवले जाते तेच क्लासमध्ये पुन्हा शिकवले जाते, पण फी च्या दुप्पट किमतीत. ही दुहेरी शिक्षण व्यवस्था समाजात एक गोंधळ निर्माण करते. त्यामुळे शाळा-कॉलेज केवळ 'सर्टिफिकेट मिळवण्याचे ठिकाण' बनून राहतात.

आजच्या स्पर्धेच्या युगात, महानगरांतील नामांकित क्लासेसमध्ये विद्यार्थ्यांकडून आठवी-नववीपासूनच IIT, JEE, NEET, MHT-CET, NDA यांसारख्या स्पर्धा परीक्षांची तयारी करवून घेतली जाते.

या साऱ्या पार्श्वभूमीवर शिक्षण व्यवस्थेचे विदारक वास्तव समोर येते. एकेकाळी शिक्षक म्हणजे ज्ञानदाते, मार्गदर्शक आणि आदर्श मानले जायचे. पण आज 'शिक्षण' एक व्यवसाय बनले आहे, तर 'कोचिंग' हे बाजारपेठेतील विक्रीयोग्य उत्पादन झाले आहे.

आज मोठमोठ्या शहरांपासून गावांपर्यंत NEET, JEE, MHT-CET, UPSC, NDA अशा परीक्षांच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची उलाढाल करणारे कोचिंग क्लासेस उभे राहिले आहेत. आज शिक्षक हे 'कोच' झाले आहेत आणि शिक्षण हे 'सेवा' न राहता थेट उद्योग बनले आहे. कोचिंग क्लासेसचं अवाजवी बाजारीकरण हे शिक्षणाच्या शुद्धतेवर आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यावर गडद सावली टाकत आहे.

एका वर्षासाठी लाखो रुपये फी भरावी लागते. अनेक कोर्सेससाठी विविध क्लासेस विद्यार्थ्यांना आकर्षित करतात. दरवर्षी लावलेल्या मोठ्या जाहिराती, टॉपर मुलांचे फोटो लावून मानसिक खेळ खेळला जातो. पालकही महागडा क्लास म्हणजे चांगले शिक्षण असा समज करून घेतात आणि मोठ्या आर्थिक ओझ्याखाली वावरतात. काही मोठ्या कोचिंग संस्थांचे टायअप इतके महागडे असतात की घरचं सोनं गहाण ठेवून फी भरावी लागते. ही रक्कम इतकी अवाजवी आहे की ती शिक्षणाच्या नैतिकतेवर प्रश्न उपस्थित करते. अनेक क्लासेस शुल्कपरतावा नाकारण्याचे स्पष्ट धोरण ठेवतात. प्रवेश घेतल्यानंतर कोणतीही तक्रार ग्राह्य धरली जात नाही. धोरणे नीट वाचूनच प्रवेश घ्या, हा त्यांचा ठाम आणि निर्भीड आग्रह असतो, जणू शिक्षण नव्हे तर करार केला जातो. काही शाळा-कॉलेजेस तर क्लासेससोबतच समन्वय साधून 'इंटिग्रेटेड' अभ्यासक्रम राबवत आहेत. कोचिंग क्लासेस आणि शाळा-कॉलेजमधील ही एक अपवित्र युती म्हणावी लागेल. यातून शाळा-कॉलेजलादेखील काही फायदा मिळत असल्याने ते मूग गिळून गप्प राहतात. हे या क्लास-शैक्षणिक संस्था युतीतून शिक्षणाचा खरा आत्मा हरवत चालला आहे. या सगळ्यातून शैक्षणिक दलालीचं भयंकर रूप तयार होत आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर, आज शिक्षण व्यवस्थेत एक खोल विषमता निर्माण होत आहे. एक सामाजिक विषमता वाढत आहे. गरीब विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळत नाही आणि शिक्षण फक्त श्रीमंतांसाठी आरक्षित होत आहे.

कोचिंग क्लासेसचे वाढते अस्तित्व हे केवळ शैक्षणिक संकट नाही; ते सामाजिक अन्याय, मानसिक आरोग्य आणि आर्थिक शोषणाचे मूळ बनत चालले आहे. त्यामुळे, आजही वेळ आहे शिक्षण क्षेत्राने स्वतःकडे बघण्याची. शाळा-कॉलेज हे शिक्षणाचे खरे केंद्र असावे आणि क्लासेस हे केवळ पूरक माध्यम असावे, याकडे धोरणात्मक पातळीवर लक्ष द्यायला हवे. अन्यथा 'शाळा' नावाच्या संस्थेचा समाजातला आदर संपेल आणि शिक्षण ही केवळ विक्रीसाठी असलेली वस्तू बनेल आणि ती स्थिती कोणालाही हितावह ठरणार नाही. या क्लास संस्कृतीला लगाम घालणे गरजेचे आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

First merit list for FYJC admission out on June 3, over 20L seats up for grabs

SwatiShindeGole
@timesofindia.com

Pune: The state education department is ready for the online admission process for the first year junior college (FYJC, Std XI) across Maharashtra. This year, online admissions will be available in 9,281 junior colleges across the state.

The first merit list for the centralised online admission process (CAP) for first year junior college (FYJC) will be out on June 3.

As many as 20.43 lakh seats are available across eight divisions in the state. These include Mumbai, Pune, Nagpur, Nashik, Kolhapur, Amravati, Latur, and Chhatrapati Sambhajinagar across science (8.52 lakh), commerce (5.40 lakh), and arts (6.50 lakh) streams. Konkan division is not in the statewide process.

The online admission process will begin with a practice session on May 19 and 20, aimed at familiarising students with the portal. Actual registrations and preference filling will start on May 21 and remain open till May 28 till 6pm.

Students can select up to 10 junior colleges and apply under applicable quotas such as management, in-house, or minority.

After the publication of the provisional merit list on May 30, a window for raising objections and making corrections will be available till 4pm on June 1.

The final merit list will be declared on June 3, followed by the zero round of seat allocation on June 5.

Students allotted their top-choice colleges can confirm their seats between June 6 and 12 by uploading documents and verifying them with the institutions. A list of remaining vacancies for the second round will be published on June 14.

Authorities have urged students and parents to adhere strictly to the schedule and guidelines provided on the official portal www.mahafyjcadmissions.in.

If colleges face any technical issues or need guidance regarding the admission process, the directorate has started a helpline where students can dial 8530955564. Additionally, contact can be made via the email ID support@mahafyjc admissions.in

HOW TO PROCEED WITH ONLINE PROCESS

Round 1 Schedule

Monday and Tuesday

- Practice session for students

From Wednesday up to May 28

- Start of actual registration and preference form filling
- Students can choose up to 10 junior colleges
- Applications accepted under management, in-house, and minority quotas
- Consent is mandatory before every round

May 30 | Provisional merit list will be published

Up to June 1 | Objection and correction window (via login)

June 3 | Final merit list

June 5 | Zero round seat allotment based on the merit list

June 6 | List of colleges allotted to students on the portal

Up to June 12 | Students must click "Proceed for Admission" and complete the admission process

June 14 | Vacant seats for the second round will be published

Colleges registered in 8 divisions

Division	Colleges
Amravati	1,422
Chhatrapati Sambhajinagar	1,323
Kolhapur	937
Latur	625
Mumbai	1,265
Nagpur	1,275
Nashik	913
Pune	1,521

"Students and parents must adhere strictly to the schedule and guidelines provided on the official portal www.mahafyjcadmissions.in. Students confirming admission in the first round will be considered fully admitted and ineligible for further rounds"

Mahesh Palkar | DIRECTOR OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION

Pics: Shyam Sonar & Sadanand Godse

The Times of India 19.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 20 May 2025_005
20 May 2025

अंगणवाडी, पहिलीसाठी यंदा नवा अभ्यासक्रम

दहावी, बारावीचा अभ्यासक्रम तीन वर्षांनी बदलणार

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १९ - नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या अनुषंगाने राज्यात टप्प्याटप्प्याने नवीन अभ्यासक्रम व पाठ्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अंगणवाड्यांमधील ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी आधारशिला हा नवीन अभ्यासक्रम लागू होणार आहे. तीन वर्षांनी म्हणजेच सन २०२८-२९ पासून दहावी, बारावीसाठी नवीन अभ्यासक्रम लागू होणार आहे.

महिला व बाल विकास विभागामार्फत राज्यात सुमारे १ लाख १० हजार ६३१ अंगणवाडी केंद्रे चालविण्यात येतात. त्यात ३ ते ६ वर्षे वयोगटातील साधारणतः ३० लाख बालकांचा समावेश आहे. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविकांमार्फत पूरक पोषण आहार, लसीकरण, आरोग्य तपासणी, पूर्व शालेय शिक्षण, आरोग्य व पोषण शिक्षण, संदर्भ सेवा दिल्या जातात.

केंद्राच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने अंगणवाड्यांमधील बालकांसाठी आधारशिला हा नवीन अभ्यासक्रम विकसित केला असून, याची अंमलबजावणी करण्याच्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. नवीन अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक हस्तपुस्तिका, प्रशिक्षण साहित्य व अनुषंगिक साहित्य राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत अंगणवाडी सेविका, पर्यवेक्षिकांना प्रशिक्षणावेळी देण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांनी स्पष्ट केले.

शैक्षणिक साहित्य कृतीपुस्तिका, समग्र प्रगती पुस्तिका, अन्य पूरक अध्ययन साहित्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांशी संलग्न निवडक अंगणवाड्यांमध्ये उपयोगात आणण्यासाठी प्रायोगिक तत्त्वावर देण्यात येईल. या साहित्याच्या उपयोगिता व परिणामकारकतेचे मूल्यमापन हे साहित्य एक वर्ष उपयोगात आणल्यानंतर करण्यात येईल.

बारावी उत्तीर्ण असलेल्या अंगणवाडी सेविकांसाठी पूर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षणासंदर्भात सहा महिन्यांचे प्रशिक्षण प्रमाणपत्र आणि बारावीपेक्षा कमी अर्हता धारण केलेल्या अंगणवाडी सेविकांसाठी एक वर्षाचा पदविका कार्यक्रम असणार आहे. हे प्रशिक्षण राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत देण्यात येणार आहे.

अंगणवाड्यांना जादुई पिटारा, ई-जादुई पिटारा या पूरक साहित्यांचा बालकांच्या कृतियुक्त शिक्षणात व अध्ययनात पुरेपूर उपयोग करावा लागणार आहे. महिला व बाल विकासाच्या सर्व अंगणवाड्यांचे जिओ-टॅगिंग करण्यात येईल. जिल्हा परिषद शाळांमधील रिकाम्या, अतिरिक्त वर्गखोलीमध्ये अंगणवाडी केंद्राचे स्थानांतरण करण्याबाबत महिला व बाल विकास आणि शालेय शिक्षण क्षेत्रीय अधिकारी परस्पर समन्वयाने कार्यवाही करतील.

नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी

अंमलबजावणी वर्ष	इयत्ता
२०२५ – २६	अंगणवाडी, पहिली
२०२६ – २७	२ री, ३ री, ४ थी व ६ वी
२०२७ – २८	५ वी, ७ वी, ९ वी व ११ वी
२०२८ – २९	८ वी, १० वी व १२ वी

News Paper Clippings During May 2025

Section: Education

Maha to launch new school curriculum from this year

Hemali.Chhapia
@timesofindia.com

Mumbai: Maharashtra is set to roll out its new school curriculum in phases starting 2025-26, closely following the National Education Policy (NEP) 2020. Over one lakh anganwadis will this year become the launchpads of a brand-new early learning framework called Aadharshila, drafted for Maharashtra's 30 lakh littlest learners aged 3 to 6.

At the heart of this initiative is the aim to ensure that by the time children turn 6, they are ready for grade 1. Developed by the Union ministry of women and child development and fine-tuned by Maharashtra's SCERT, Aadharshila introduces a play-based, stage-wise curriculum through Balvatika levels 1, 2, and 3. Anganwadi workers will soon be equipped with fresh teaching manuals, playful learning materials, and structured guides. Every hub will ensure health check-ups, nutrition, and vaccinations.

Maharashtra's school education department announced the plan on Monday in a govt resolution. "Training manuals, teaching material and structured guides will be distributed to Anganwadi workers and supervisors to ensure smooth execution of academic curriculum while focusing on its primary goals such as nutrition of children, health check-ups, immunisation, etc," states the GR.

Swati Popat Vats, president of Early Childhood Association, asked what many parents have on their minds: "When will the govt pass a new GR to change the age of entry in nursery (Balvatika 1) as currently 2.5-year-olds are entering? This circular once again states that a child should be 6 for grade 1. Then there is an urgent need for the govt to change the age of entry to 3 years in June/April."

The govt GR states the women and child development department will also roll out specialised training programmes for anganwadi workers. Those with a Class 12 qualification will be offered a six-month certification in Early Childhood Care and Education (ECE), while others will have access to a one-year diploma programme. The State Council of Educational Research and Training (SCERT), Maharashtra, Pune, will oversee these initiatives. Popat Vats raised concerns over the proposed six-month certification for anganwadi workers, insisting a full year is the least they need. Pilot programmes will soon take root in select anganwadis attached to local schools, and all anganwadis will be geo-tagged. The govt will ensure services under the Integrated Child Development Services scheme continue uninterrupted.

TRAINING FOR ANGANWADI WORKERS TOO

New curriculum rollout plans
The implementation roadmap for the new curriculum will be introduced progressively across different classes:

- **2025-26** for Class 1
- **2026-27** for classes 2, 3, 4, and 6
- **2027-28** for classes 5, 7, 9, and 11
- **2028-29** for classes 8, 10, and 12

➤ This includes changes such as new textbooks aligned to the NCERT model curriculum and the three-language policy

The Times of India 20.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
City 21 May 2025_013
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे 21 May 2025
www.dainikprabhat.com

'त्या' शिक्षकांसाठी पुन्हा समुपदेशन उपक्रम

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २० - अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे समुपदेशन करून त्यांचे अन्य शाळेत समायोजन करण्यात येते. ज्या शिक्षकांचे अजूनही समुपदेशन झालेले नाही, त्या शिक्षकांसाठी पुन्हा एकदा समुदेशन कार्यक्रम घ्यावा, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर सांगितले.

राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत राज्यमंत्री भोयर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. याप्रसंगी माध्यमिक शिक्षण संचालक महेश पालकर, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, शिक्षण उपसंचालक संदीप संगवेसह उपस्थित होते.

या बैठकीत शिक्षक संघटनांनी अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांचे वेतन यासह शिक्षकांच्या समस्या मांडल्या. शिक्षकांच्या समस्या सकारात्मकतेने सोडवल्या जातील, असे डॉ. भोयर यांनी सांगितले.

In-house quota for FYJC only if school is housed on 'same premises' as college

Yogita.Rao@timesofindia.com

Mumbai: In a move that could impact colleges with in-house quota, the state govt has revised the quota rule for first-year junior college (FYJC) admissions this year.

The new guidelines state only students from schools run by the same management and located on the same premises as the junior colleges, will be eligible for in-house quota seats. Many junior colleges in the city, which also have schools run by the same management, do not operate from the same premises. They are either in the vicinity or a few kilometres away. The rule has been notified in the information booklet released by the school education department.

Junior colleges set aside 10% of their seats for in-house quota students from schools run by the same management. Till last year, when first-year junior college admissions were online only for six regions in the state, in-house quota was available for all schools under the same management from the same division.

FYJC admissions started on Monday and this is the first year the process has gone online for the entire state.

An official said this has been decided taking into account that the process is now centralised in the state and there could be managements which have institutions in different regions. One cannot call a student from a Latur school an in-house student for a Mumbai college, even if both are run by the same management. The department wanted to allow in-house quota only for students on the same premises, they can be either in the same building or on the same campus, said the official.

The Times of India 21.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 22 May 2025_005
22 May 2025

अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत तांत्रिक विघ्न

अर्जाची नोंदणीच होईना; आता सुधारित वेळापत्रक जाहीर करण्याची नामुष्की

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २१ - इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत संकेतस्थळावर तांत्रिक विघ्न निर्माण झाल्यामुळे संकेतस्थळ ठप्पच झाले. विद्यार्थ्यांना नोंदणी, तसेच अर्जही भरता आले नाहीत. प्रवेश प्रक्रियेचा बोऱ्या वाजल्यामुळे शिक्षण विभागावर आता सुधारित वेळापत्रक जाहीर करण्याची नामुष्की ओढवली आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाच्या वतीने अकरावी प्रवेशासाठी पहिल्या नियमित प्रवेश फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. १९ मे ते १३ जूनदरम्यानचे विद्यार्थी नोंदणी, प्राधान्यक्रम व उच्च माध्यमिक विद्यालयांची अलॉटमेंट आदी बाबींच्या तारखा जाहीर केल्या होत्या. १९ व २० मे रोजी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया प्रणालीचा विद्यार्थी व पालकांना सरावासाठी पोर्टल सुरू करण्यात आले होते. त्या वेळी राज्यातील पालक, विद्यार्थी, तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी व शिक्षणतज्ज्ञ यांच्या सूचनाही प्राप्त झाल्या आहेत.

बुधवारी (दि. २१) ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या संकेतस्थळाबाबत तांत्रिक कारणास्तव संकेतस्थळ योग्य प्रकारे विद्यार्थी नोंदणी व प्राधान्यक्रम कामकाज पूर्ण होऊ शकले नाही. दिवसभर संकेतस्थळ सुरळीतपणे सुरूच झाले नाही. विद्यार्थी हित लक्षात घेता व तांत्रिक बाबींची दुरुस्ती करण्याची गरज आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्या फेरीचे सुधारीत वेळापत्रक गुरुवारी (दि. २२) दुपारी ३ वाजता जाहीर करण्यात येणार आहे.

संकेतस्थळावर अर्ज भरण्याची सुरुवात विलंबाने होत असली, तरी विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास व पसंतीक्रम नोंदविण्यास पुरेसा कालावधी देण्यात येईल. प्रवेशाचे पोर्टल परिपूर्ण व उत्कृष्ट स्वरूपात उपलब्ध झालेले असेल. कोणतीही छोट्यात छोटी त्रुटी राहू नयेत, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. पोर्टल सुरू होण्याची वेळ ऑनलाइन, तसेच विद्यार्थ्यांना ई-मेल व मोबाइल संदेशाद्वारे कळविण्यात येईल. त्रुटीसह अर्ज भरण्याच्या सुविधा देण्याऐवजी संकेतस्थळ सुलभ व त्रुटीरहित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे.

शिक्षण विभागाचे आवाहन

विद्यार्थ्यांना अर्ज भरणे सोयीचे व सुलभ व्हावे. प्रवेशाची कार्यवाही कमीत कमी वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांना नोंदणी करून प्रवेश अर्जाचा भाग १ व भाग २ एकदाच भरून प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संकेतस्थळाच्या प्रक्रियेत काही बदल करण्यासाठी चाचपणीही केली जात आहे. त्यासाठी विद्यार्थी, पालकांना पुरेसा वेळ, सोयीसुविधा व मार्गदर्शन करण्यात येईल. कोणीही गोंधळून जाऊ नये, असे आवाहन शिक्षण विभागाने केले आहे.

लोकमत

मस्ट READ

अकरावी प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक आज जाहीर होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : अकरावी ऑनलाइन प्रवेशासाठी प्रत्यक्ष अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होण्याच्या पहिल्याच दिवशी अधिकृत संकेतस्थळ ठप्प झाल्याने विद्यार्थी व पालकांचा गोंधळ उडाला होता. याची दखल घेत यात सुधारणा करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे शिक्षण संचालनालयाने सुधारित वेळापत्रक जाहीर करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यानुसार गुरुवारी (दि. २२) दुपारी ३ वाजता फेरी क्रमांक १ बाबतचे सविस्तर वेळापत्रक घोषित करण्यात येणार आहे. शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

दरम्यान, ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया प्रणालीचा विद्यार्थी आणि पालकांना सराव करता यावा म्हणून पोर्टल तीन दिवस आधीच सुरू केले होते. यात येणाऱ्या अडचणींबाबत राज्यातील पालक, विद्यार्थी तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी व शिक्षणतज्ज्ञ यांच्या अमूल्य सूचना शिक्षण संचालनालयाकडे आल्या आहेत. या सूचनांचा अंतर्भाव ऑनलाइन प्रवेश प्रणालीमध्ये करण्याबाबत सूचित केले आहे. त्यामुळे यापूर्वी घोषित केलेल्या वेळापत्रकानुसार फेरी क्रमांक १ चे सविस्तर नव्याने घोषित करण्यात येणार आहे.

पोर्टलवर अर्ज भरण्याची सुरुवात विलंबाने होत असले तरी विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास व पसंतीक्रम नोंदविण्यास पुरेसा कालावधी देण्यात येईल. प्रवेशाचे पोर्टल परिपूर्ण व उत्कृष्ट स्वरूपात उपलब्ध झालेले असेल. अगदी छोट्यात छोटी देखील समस्या राहू नये, यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

प्रवेशाचे पोर्टल सुरू होण्याची वेळ ऑनलाइन दर्शविण्यात येईल. तसेच विद्यार्थ्यांना ई-मेल व मोबाइल संदेशाद्वारे कळविण्यात येईल. पोर्टल सुलभ व त्रुटीरहित करून सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

> सुधारित पोर्टलमुळे विद्यार्थ्यांना अर्ज भरणे सोयीचे होईल. त्याचबरोबर प्रवेशाची कार्यवाही कमीत कमी वेळात पूर्ण करण्यासाठी आवश्यक सर्व उपाय सुरू आहेत. अर्ज करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यासह उचित सोयी-सुविधा, मार्गदर्शन केले जाईल. त्यामुळे पालक असो अथवा विद्यार्थी कोणीही गोंधळून जाऊ नये.
>
> - **डॉ. महेश पालकर,** शिक्षण संचालक

येथे करा संपर्क

अधिकृत संकेतस्थळ-
https://mahafyjcadmissions.in

ई-मेल आयडी -support@mahafyjcadmissions.in

हेल्पलाईन नंबर ८५३०९५५५६४

Pune Main
Page No. 9 May 22, 2025
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

Fresh timetable to be issued for FY admissions after website crash, edu department reveals

Niraj Pandit

niraj.pandit@hindustantimes.com

MUMBAI: Hours after complaints of technical glitches on the online portal for First Year Junior College (FYJC) admissions https://mahafyjcadmission.in on Day One, the state government decided to announce a fresh admission schedule on Thursday. The website crashed within an hour of opening, leaving hundreds of thousands of students and their parents anxious and confused.

Mahesh Palkar, director (Projects) of school education, stated in his official note "Keeping in mind the interests of the students and correction of technical matters, the revised schedule of 11th admission process will be announced on May 22 at 3pm in respect of Round No 1."

CAUSE OF CRASH WAS NEARLY 1.5 MILLION STUDENTS WERE ATTEMPTING TO ACCESS SITE SIMULTANEOUSLY

According to education officials, the cause of the crash was because nearly 1.5 million students were attempting to access the platform simultaneously. This year, the Maharashtra state government has for the first time rolled out a centralised online admission process for FYJC across the entire state.

Palkar's note stated that valuable suggestions related to technical changes in the online admission system had been received from parents, students as well as concerned officials, staff, and educationists in the state. "Although the application process starts late on the portal, students will be given sufficient time to fill the application form and register their preference," said the note, allaying any possible fears. "Efforts are being made to ensure that no error remains. The opening time of the admission portal will be indicated online. Students will also be informed through e-mail and mobile messages."

Despite these reassurances, the portal crash triggered widespread panic among parents and students. "We have been trying to register since morning, but the site just won't load. The school had told us to hurry, and now my daughter is worried she will miss out," said a parent from South Mumbai.

The state government has given colleges the green light to begin the new academic year for FYJC starting from July 1, provided that at least 50% of the seats are filled. Colleges that have not reached this threshold will have until August 11 to begin classes.

Palkar clarified this flexibility allowed in starting the academic session. "According to the government resolution, the Class 11 academic year officially begins on August 11," said his note. "However, school managements may begin classes earlier if 50% of the total intake is completed or by July 1, whichever comes first." The early start is encouraged in the interest of students' academic continuity.

Hindustan Times 22.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 23 May 2025_005
23 May 2025

प्रवेशफेरीचे सुधारित वेळापत्रक जाहीर

अकरावी प्रवेशासाठी सोमवारपासून सुविधा उपलब्ध

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २२ - इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेशाच्या पहिल्या फेरीसाठी विद्यार्थी नोंदणी आणि कनिष्ठ महाविद्यालयांचा पसंतीक्रम भरण्याची सुविधा सोमवारी (दि. २६) सकाळी ११ वाजता सुरू होणार असल्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे. संकेतस्थळावर तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेच्या पहिल्याच दिवशी बुधवारी (दि. २१) नोंदणी करता आली नव्हती.

आता पहिल्या प्रवेश फेरीचे सुधारित वेळापत्रक जारी करण्यात आले आहे. त्यानुसार २६ मे पासून ही प्रवेश प्रक्रिया होणार असून, ती २० जूनपर्यंत सुरू राहणार आहे, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे.

पहिल्या प्रवेश फेरीसाठी...

- २६ मे ते ३ जून – प्रवेशासाठी विद्यार्थी नोंदणी व कनिष्ठ महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम निश्चितीसह अर्ज प्रक्रिया अर्ज सुरु, कोटाअंतर्गत प्रवेशासाठी अर्ज सुविधा, प्रत्येक फेरीपूर्वी विद्यार्थ्याने संमती नोंदवणे
- **५ जून**– तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी
- ६ ते ७ जून – तात्पुरत्या सर्वसाधारण गुणवत्ता यादीबाबत विद्यार्थी त्यांच्या लॉगिनच्या माध्यमातून हरकती दाखल करू शकतात, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून हरकतींचे ऑनलाइन निराकरण
- **८ जून** – अंतिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध
- **९ ते ११ जून - शून्य फेरी प्रवेश** – व्यवस्थापन कोटा, संस्थाअंतर्गत कोटा, अल्पसंख्याक कोटाअंतर्गत विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करून व संबंधित महाविद्यालयात जाऊन मूळ कागदपत्रांची पडताळणी करून, शैक्षणिक शुल्क भरून प्रवेश निश्चित करणे
- **९ जून – कॅप फेरी प्रवेश** – गुणवत्ता यादीच्या आधारे विद्यार्थी व महाविद्यालय निवड व वाटप प्रक्रिया, विभागीय समितीद्वारे परीक्षण १० जून – कॅप प्रवेश फेरीसाठी महाविद्यालयनिहाय विद्यार्थी वाटप यादी जाहीर, विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये महाविद्यालय वाटप तपशील उपलब्ध, फेरीनिहाय कट ऑफ तपशिलाची वेब पोर्टलवर प्रसिद्धी
- **११ ते १८ जून** – विद्यार्थ्याने आवश्यक कागदपत्रे अपलोड करून व संबंधित महाविद्यालयात जाऊन मूळ कागदपत्रांची पडताळणी करून शैक्षणिक शुल्क भरून प्रवेश निक्षित करणे, प्रवेश नको असल्यास पुढील फेरीसाठी संमती देऊन सहभागी होणे, नवीन विद्यार्थ्यांसाठी पुढील फेरीतील समावेशासाठी नोंदणी व पसंतीक्रम भरणे.
- **जून** – दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांची यादी जाहीर करणे

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 23 May 2025_005
23 May 2025

चुकीच्या प्रश्नांसाठी मिळणार गुण

एमबीएच्या सीईटी परीक्षेत २८ प्रश्न चुकीचे

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २२ - राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत (सीईटी) घेण्यात आलेल्या एमबीए अभ्यासक्रमाच्या सीईटी परीक्षेत अनेक चुका झाल्याचे आढळून आले होते. या परीक्षेत तीन बॅचमध्ये मिळून तब्बल २८ प्रश्न चुकीचे आले होते. त्यामुळे या तिन्ही बॅचेसमधील सर्व विद्यार्थ्यांना चुकीच्या प्रत्येक प्रश्नामागे एक गुण देण्याचा निर्णय सीईटी सेलने घेतला आहे. विद्यार्थ्यांनी नोंदविलेल्या तक्रारींनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

सीईटी सेलने १ एप्रिल ते ३ एप्रिलदरम्यान एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी सीईटी परीक्षा घेतली होती. एकूण सहा सत्रांत ही परीक्षा घेण्यात आली होती. त्यावर विद्यार्थ्यांना हरकती आणि तक्रारी नोंदविण्यासाठी २८ एप्रिल ते ३० एप्रिलदरम्यान मुदत देण्यात आली होती. राज्यभरातून जवळपास २५३ विद्यार्थ्यांनी हरकती नोंदविल्या होत्या. यामध्ये १०१ प्रश्नांबाबत विद्यार्थ्यांनी हरकती मांडल्या होत्या. त्यामध्ये सर्वाधिक तक्रारी १३४ तक्रारी लॉजिकल रिझनिंगच्या प्रश्नांबाबत विद्यार्थ्यांनी नोंदविल्या होत्या. त्यात अबस्ट्रॅक्ट रिझनिंगच्या २१ तक्रारी, क्वांटिटेटिव्ह ऑप्टिट्यूडच्या ३५ तक्रारी, व्हर्बल ॲबिलिटीच्या ३५ तक्रारी होत्या.

विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या तक्रारींबाबत सीईटी सेलने शहानिशा केली. ३ बॅचेसमधील जवळपास २८ प्रश्नांमध्ये चुका असल्याचे निदर्शास आले आहे. त्यानंतर सीईटी सेलने या चुकीच्या प्रश्नांसाठी प्रत्येक प्रश्नामागे त्या बॅचेसमधील प्रत्येक विद्यार्थ्याला एक गुण देण्याचा निर्णय घेतला आहे. सहा प्रश्नांसाठी सीईटी सेलने उत्तरपत्रिका अपडेट केली आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात City 23 May 2025_013
23 May 2025

१० वी, १२ वीच्या पुरवणी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २२ - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या जून-जुलै २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी, बारावीच्या पुरवणी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. पुरवणी परीक्षा पुढील महिन्यांत दि. २४ जून पासून सुरु होणार आहेत, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी दिली.

पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत पुरवणी परीक्षा घेण्यात येणार आहेत. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा दि. २४ जून ते १६ जुलै या कालावधी होणार आहे. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच एनएसक्युएफ अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा दि. २४ जून ते ११ जुलै या कालावधी होतील. माहिती तंत्रज्ञान व सामान्य ज्ञान विषयांची प्रात्यक्षिक परीक्षाही याच कालावधीत होणार आहेत. इयत्ता बारावीची माहिती तंत्रज्ञान, सामान्यज्ञान विषयाची परीक्षा ऑनलाइन पद्धतीने दि. १५ ते १६ जुलै रोजी घेण्यात येणार आहे.

इयत्त दहावीची लेखी परीक्षा दि. २४ जून ते ८ जुलै या कालावधीत होतील. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन तसेच एनएसक्युएफ अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम प्रात्यक्षिक परीक्षा दि. २४ जून ते ८ जुलै याच कालावधीत होणार आहेत. दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा दि. २४ जून ते ४ जुलै या कालावधीत होतील. दिनांकनिहाय सविस्तर वेळापत्रक राज्य मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकमत

नोंदणी नाही केली, तर अकरावीचा प्रवेश अडणार !

अकरावी प्रवेश प्रक्रिया केंद्रीय पद्धतीने पोर्टलवर होणार, अर्ज करणाऱ्या सर्वांना ॲडमिशन मिळणार, परस्पर प्रवेश दिल्यास तो अवैध ठरणार

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : राज्यात यंदा अकरावी प्रवेश प्रक्रिया केंद्रीय आणि ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे. यापूर्वी ही प्रक्रिया ठराविक विभागात राबविली जात होती. विशेष म्हणजे अर्ज करणाऱ्या प्रत्येकाला प्रवेश मिळणार आहे. त्यामुळे ऑनलाइन प्रक्रिया वगळून कुणालाही परस्पर प्रवेश देता येणार नाही. तसा प्रयत्न केल्यास सदर प्रवेश अवैध ठरविण्यात येईल, असे शिक्षण विभागाने या आधीच स्पष्ट केले आहे.

राज्य मंडळाने यंदा दहावी आणि बारावीचा निकाल लवकर जाहीर केला आहे. मात्र, तांत्रिक बिघाडामुळे अकरावीच्या प्रवेशाचे ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी सोमवारपर्यंत (दि. २६) प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यानंतर पहिल्या नियमित फेरीची अंतिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी ८ जूनला जाहीर होणार आहे. पहिली नियमित फेरी २६ मे ३ जून दरम्यान पार पडणार असून, यात विद्यार्थी नोंदणी, महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येणार आहे. अकरावीची प्रवेश प्रक्रिया १५ ऑगस्टपूर्वी पूर्ण करण्याचा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचा प्रयत्न आहे. राज्यात यंदा दहावीच्या परीक्षेत १३ लाख २ हजार ८७३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, अकरावी प्रवेशासाठी तब्बल २० लाख ९१ हजार ३९० जागा उपलब्ध आहेत.

पसंतीक्रमानुसार प्रवेश मिळणार

अकरावी प्रवेशासाठी अर्ज सादर करताना विद्यार्थ्यांनी प्राधान्यक्रम द्यायचा आहे. त्याला मिळालेले गुण आणि पसंतीच्या महाविद्यालयाचे कट-ऑफ यानुसार पुढील प्रक्रिया पार पडणार आहे. यात सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल. त्यानंतर गुणवत्ता यादीच्या आधारे विद्यार्थी आणि महाविद्यालय निवड/वाटप प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानंतर १० जूनला प्रवेशासाठी महाविद्यालयनिहाय विद्यार्थी वाटप यादी, कट-ऑफ जाहीर होणार आहे. त्यानंतर प्रवेश मिळालेल्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी प्रवेश घेणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे, प्रवेश निश्चिती करणे, प्रवेश नाकारणे आणि प्रवेश रद्द करणे ही प्रक्रिया पार पाडायची आहे.

'कॉलेज-ट्यूशन टायअप'ला ब्रेक लागणार

दहावी, बारावीत मिळालेल्या गुणांपेक्षा सीईटीत किती गुण मिळाले, याचा विचार सुरू झाल्यापासून विद्यार्थी आणि पालक दोघेही शाळा, महाविद्यालयांपेक्षा खासगी क्लासेसला प्राधान्य देऊ लागले. याचा परिणाम इतका झाला आहे की, विद्यार्थी कॉलेजला हजर राहण्यापेक्षा दिवसभर खासगी क्लासेसमध्ये गुंतून राहत असे. पुढे क्लासेसनेही आपली पोळी भाजून घेण्यासाठी 'कॉलेज-ट्यूशन टायअप' करून अधिकचे शुल्क मिळवत असे. त्याला ब्रेक लागणार आहे.

अधिकृत माहितीसाठी

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागातर्फे इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रियेसाठी 'https://whatsapp.com/channel/0029VbB2T6DBA1etT0dyi10C' हे अधिकृत व्हॉट्सॲप चॅनेल सुरू केले आहे. या चॅनेलद्वारे प्रवेश प्रक्रियेतील सर्व अद्ययावत माहिती, सूचना दिल्या जाणार आहेत. प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये याविषयीची माहिती जाणून घेता येणार आहे. विद्यार्थ्यांना त्याचा फायदा मिळणार आहे.

Hello Pune
Page No. 8 May 24, 2025
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

बी. एड्. महाविद्यालये आता पदवी महाविद्यालयांमध्ये होणार विलीन!

पुणे : पुढारी वृत्तसेवा

- **राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार होणार कारवाई**

'बॅचलर ऑफ एज्युकेशन' अर्थात बी.एड्‌चा अभ्यास आता फक्त बहु-विद्याशाखीय महाविद्यालयांमध्येच केला जाईल. राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेच्या (एनसीटीई) मार्गदर्शक तत्त्वांनुसार, तीन किलोमीटरच्या परिघात असलेली सर्व एकल बी.एड महाविद्यालये आता पदवी महाविद्यालयांमध्ये विलीन केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

'एनसीटीई'ने दिलेल्या निर्देशानुसार, १० किमीच्या परिघात येणाऱ्या एकल बी.एड् महाविद्यालयांना इतर पदवी महाविद्यालयांच्या सहकार्याने बी.एड्. अभ्यासक्रम चालवावा लागेल. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी ५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. देशातील सर्व १५ हजारांहून अधिक बी.एड्. महाविद्यालयांना बहुविद्याशाखीय महाविद्यालयांमध्ये रूपांतरित करण्यासाठी 'एनसीटीई'ने २०३० पर्यंतचा कालावधी दिला आहे. 'एनसीटीई'ने राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० अंतर्गत पूर्वीच्या एकल तांत्रिक शिक्षण संस्थांना बहुविद्याशाखीय उच्च शिक्षण संस्थांमध्ये रूपांतरित करण्यासाठी राज्यांना मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. तसेच एनईपी अंतर्गत शालेय रचनेत बदल करण्यात आला आहे. यामध्ये, शालेय शिक्षणाची विभागणी पायाभूत, पूर्वतयारी, प्राथमिक आणि माध्यमिक या आधारावर केली जाईल. यामध्ये ३ ते १८ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यामध्ये, विद्यार्थ्यांना विषयांच्या अभ्यासासोबत ज्ञान आणि कौशल्यांचा विकास बळकट करायचा आहे. या अंतर्गत बी.एड अभ्यासक्रमांमध्ये बदल केले जात आहेत. 'एनसीटीई'ने विद्यापीठ अनुदान आयोगाला (युजीसी) २०३० पर्यंत सिंगल डिग्री प्रोग्राम देणाऱ्या बी.एड्. कॉलेजांचे विलीनीकरण करून शिक्षण देण्याचा पर्याय दिला आहे. विद्यार्थी आणि आर्थिक संसाधनांच्या कमतरतेमुळे बंद पडण्याच्या मार्गावर असलेले असे बी.एड्. कॉलेज आता त्यांच्या शहरातील किंवा जवळपासच्या इतर पदवी महाविद्यालयांच्या सहकार्याने शिक्षण देऊ शकतील. यासाठी दोन्ही महाविद्यालयांना करार करावा लागेल. यामध्ये ते एकमेकांचे शिक्षक, इमारती आणि पायाभूत सुविधा वापरू शकतील.

Pudhari 24.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

१५ लाख विद्यार्थ्यांना मनस्ताप

राज्यात अकरावी प्रवेशाचा गोंधळ; प्रवेशासाठीची प्रतीक्षा वाढणार

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई/पुणे

अकरावीच्या नव्या प्रवेश प्रक्रियेत आयत्या वेळेस करण्यात आलेल्या अनेक बदलांमुळे; तसेच यंत्रणेने पूर्ण तयारी न केल्यामुळे पंधरा लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना दहावीत यश मिळवूनही पुढील शैक्षणिक प्रवासासाठी आणखी काही आठवडे काळजी करावी लागणार आहे. प्रवेशप्रक्रियेतील गोंधळामुळे विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना मनस्तापाचा सामना करावा लागत असला, तरी या गोंधळाची जबाबदारी घेण्यास कोणीही तयार नाही. यामुळे यंदा अकरावीत प्रवेश घेणाऱ्यांची संख्या कमी होण्याची भीती व्यक्त होत आहे.

प्रवेश प्रक्रिया किचकट

यंदा दहावीचा निकाल विक्रमी वेळेत आणि लवकर लागल्यामुळे अकरावी प्रवेशप्रक्रिया वेगात पूर्ण होऊन जूनच्या दुसऱ्या आठवड्यात वर्ग सुरू होणे अपेक्षित होते; परंतु आयत्या वेळी प्रवेशप्रक्रिया किचकट आणि राज्यस्तरावर केंद्रीय केली. आतापर्यंत प्रमुख शहरांचा अपवाद वगळता राज्यात इतरत्र संबंधित महाविद्यालयांमध्ये जाऊन अकरावी प्रवेश घेण्याची सुविधा होती. यंदा मात्र ही प्रक्रिया संपूर्ण राज्यासाठी केंद्रीय पद्धतीने करण्याचा निर्णय शेवटच्या क्षणी झाला.

विद्यार्थी संभ्रमावस्थेत

ग्रामीण आणि निमशहरी भागातील विद्यार्थी व पालकांना ही प्रक्रिया नक्की कशी आहे, याची माहिती पूर्ण मिळालेली नाही. त्यामुळे ते संभ्रमावस्थेत आहेत. त्यातच प्रक्रिया राबविणारी वेबसाइट बंद पडल्याने आणखी गोंधळ उडाला.

कंपनी अनुनभवी

राज्यस्तरावर ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी तशी क्षमता असणाऱ्या माहिती तंत्रज्ञान (आयटी) कंपनीची निवड शिक्षण विभागाने करणे अपेक्षित होते. देशातील नामवंत आयटी कंपन्या परीक्षा घेण्यासोबतच, प्रवेश प्रक्रिया, पदभरती अशा प्रकारची कामे करतात. यांपैकी **एका** कंपनीची निवड अपेक्षित **होती**. मात्र, फारसे नाव नसलेल्या कंपनीला प्रवेश प्रक्रियेचे कंत्राट देऊन, शिक्षण विभागाने काय साध्य केले, अशी विचारणा अभ्यासकांकडून होऊ लागली **आहे**. संबंधित कंपनीला मोठ्या प्रमाणात राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेच्या कामाचा अनुभव नसल्याने, अकरावी प्रवेश प्रक्रियेची वेबसाइट पूर्ववत होऊ शकलेली नाही. **या** प्रकारामुळे विद्यार्थी-पालक अस्वस्थ असून, २६ मे रोजी वेबसाइट सुरळीत सुरू होते का, याकडे लक्ष लावून आहेत. अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या गोंधळाबाबत सरकारची भूमिका जाणून घेण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याशी संपर्क केला असता, ते लग्न समारंभात व्यग्र असल्याचे त्यांच्या स्वीय सहायकांनी सांगितले.

➤ उर्वरित मजकूर...३

प्रातिनिधिक फोटो

इनहाउस कोट्याचा लाभच नाही

दहावीची शाळा आणि ज्युनिअर कॉलेज एकाच शैक्षणिक संकुलात असेल, तरच विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशासाठी इनहाउस (संस्थांतर्गत) कोट्याचा लाभ घेता येणार आहे. राज्यातील नामांकित शैक्षणिक संस्थांचे जाळे एकापेक्षा अधिक जिल्ह्यात विशेषतः ग्रामीण भागात असल्याने तेथील विद्यार्थ्यांनाही हक्काच्या इनहाउस (संस्थांतर्गत) कोट्याचा लाभ घेता येणार नाही. नामांकित ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी प्रवेशासाठी चुरस असते. अशा वेळी विद्यार्थी इनहाउस कोट्यातून आपल्या संस्थेच्या ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अर्ज करतात. या कोट्यातून प्रवेशासाठी १० टक्के जागा विद्यार्थ्यांसाठी राखीव असतात. या कोट्यातून अनेकांचा प्रवेश निश्चित होतो. त्यामुळे प्रवेशासाठी हक्काचा मार्ग म्हणून इनहाउस कोट्याचा विचार विद्यार्थी आणि पालकांकडून केला जातो. मात्र, बदललेल्या नियमामुळे विद्यार्थ्यांना कोटा असूनही त्याचा लाभ घेता येणार नसल्याचे चित्र आहे.

ग्रामीण भागात रोष; स्थगितीची मागणी

'ग्रामीण भागात मोबाइल नेटवर्कच्या समस्या असून, पुरेशी साधने नसल्याने ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत अडचणी आहेत. यामुळे, तसेच वाढीव खर्चामुळे ग्रामीण भागातील पालक, विद्यार्थी आणि शिक्षकात प्रचंड असंतोष आहे. ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेबाबत पालक, विद्यार्थी, शिक्षण संस्था यांची कोणतीही मागणी नाही. विद्यार्थी व पालक यांची ससेहोलपट टाळण्यासाठी ही प्रक्रिया तत्काळ थांबवावी आणि पूर्वीप्रमाणे प्रवेश देण्याची मुभा दिली जावी,' असे आवाहन महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने केले आहे.

---

१५ लाख विद्यार्थ्यांना मनस्ताप

(पान १ वरून)

मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, आदी काही शहरांपुरता मर्यादित असलेल्या केंद्रीय पद्धतीत आतापर्यंत दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर होण्यापूर्वीच अकरावीच्या प्रवेश अर्जातील भाग एक (विद्यार्थ्यांची माहिती) भरून घेतला जात असे. निकालानंतर भाग दोन (कनिष्ठ महाविद्यालयांचे प्राधान्यक्रम) भरून व्हायचा. त्यानंतर गुणवत्ता यादीनुसार विद्यार्थी प्रवेश निश्चित करीत. यंदा असे काही झालेले नाही. उलट तांत्रिक अडचणींमुळे अकरावीची वेबसाइटच ठप्प आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना माहितीपुस्तिकाही पाहता आलेली नाही. त्यामुळे अर्ज भरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. शिक्षक आणि मुख्याध्यापकांनाही पूर्ण माहिती नसल्याने, तेही हतबल असल्याचे चित्र आहे.

केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया काही महानगरांपुरता मर्यादित असतानाही ती दिवाळीपर्यंत रेंगाळते, असा अनुभव आहे. दोन वर्षांपूर्वी ही प्रक्रिया फेब्रुवारी महिन्यापर्यंत चालली होती. असे असतानाही राज्यातील सर्व जिल्ह्यांत ही पद्धत राबविण्याचा निर्णय घेतला गेला. प्रवेश प्रक्रिया सुरळीत, जलद आणि पारदर्शक होण्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग व्हायला हरकत नव्हती; मात्र फायद्यापेक्षा मनस्ताप अधिक होत असून, विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता अधिक दिसत आहे.

Maharashtra Times 24.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

नॅक मूल्यांकनाला सहा महिने मुदतवाढ

महाविद्यालयांवरील कारवाई टळली

पुणे : राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने सर्व महाविद्यालयांना व शैक्षणिक संस्थांना नॅक मूल्यांकन करून घेण्याचे निर्देश दिले होते. तसेच मूल्यांकन करून न घेतलेल्या महाविद्यालयांचे प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याची कारवाई राज्यातील काही विद्यापीठांकडून करण्यात आली होती. मात्र, नॅक मूल्यांकन करून घेण्यास सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे. परिणामी महाविद्यालयांवरील प्रवेश बंदीची कारवाई टळली आहे. राज्याचे प्र. उच्च शिक्षण सचालक डॉ.शैलेंद्र देवळाणकर यानी यासंदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

'नॅक'कडून बायनरी क्रेडिटेशन पद्धती लागू करण्यात आली आहे. ही पद्धती लागू करण्याच्या अनुषंगाने नॅक संस्थेकडून उच्च शिक्षण संस्थांसाठीचे लॉगिन पोर्टल अद्यावत करण्याची प्रक्रिया राबवली जात आहे. त्यामुळे सध्या नव्याने मूल्यांकन करून घेणे, पुनर्मुल्यांकन करणे, याबाबत कुठलीही कार्यवाही होते. ही बाब राज्याचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली २१ मे रोजी झालेल्या बैठकीत निदर्शनास आली. त्यानंतर विद्यार्थी हितास्तव नॅक मूल्यांकनासाठी महाविद्यालयांना मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यातील अमरावती विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि मुबइ विद्यापीठासह काही विद्यापीठांनी अनेक महाविद्यालयांवर कारवाईचा बडगा उगारला होता. मात्र,नॅक मूल्याकनाची प्रक्रियाच बद असल्यामुळे महाविद्यालयांवर कार्यवाही करणे उचित ठरणार नाही. त्यामुळे शिक्षण विभागाने नॅक मूल्यांकन करून न घेतलेल्या महाविद्यालयांवरील कारवाईला स्थगिती दिली असून यासंदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

Kesari 24.5.2025

'नॅक' मूल्यांकन सहा महिने शिथिल

उच्च शिक्षण संचालकांचे निर्देश

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेकडून (नॅक) लागू केलेल्या नव्या पद्धतीनुसार मूल्यांकन, पुनर्मूल्यांकनासाठी उच्च शिक्षण संस्थांच्या नोंदणीचे संकेतस्थळ अद्याप कार्यान्वित झालेले नाही. त्यामुळे राज्यातील उच्च शिक्षण संस्थांना त्याबाबत सहा महिने शिथिलता दिली आहे.

राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी याबाबतचे निर्देश विद्यापीठांच्या कुलसचिवांना परिपत्रकाद्वारे दिले आहेत. 'नॅक'च्या फेब्रुवारी, २०२५ च्या निर्देशानुसार एप्रिल २०२५ पासून दुहेरी मानांकन पद्धती लागू करण्यात आली आहे. ही पद्धती लागू करण्याच्या अनुषंगाने 'नॅक'कडून उच्च शिक्षण संस्थांसाठीचे संकेतस्थळ अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे सद्यस्थितीत नव्याने मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन करण्यासाठीची उच्च शिक्षण संस्था नोंदणी कार्यान्वित नसल्याने महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकनासाठी नोंदणी करणे शक्य होत नाही.

या पार्श्वभूमीवर, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री यांनी विद्यार्थी हितास्तव नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकनासाठी महाविद्यालयांना मुदतवाढ देण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यामुळे संबंधित महाविद्यालयांमधील विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत, या दृष्टीने मूल्यांकन, पुनर्मूल्यांकनासाठी सहा महिने शिथिलता दिली आहे.

योग्य प्राधिकरणामार्फत कार्यवाही

'नॅक'कडून उच्च शिक्षण संस्था नोंदणीचे संकेतस्थळ कार्यान्वित झाल्यावर मूल्यांकन, पुनर्मूल्यांकनाबाबतची प्रक्रिया तातडीने करावी, याबाबत विद्यापीठांनी योग्य प्राधिकरणामार्फत आवश्यक ती कार्यवाही करावी, त्याबाबत संबंधित महाविद्यालयाकडून आवश्यकतेनुसार लेखी हमीपत्र घ्यावे, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

गुणवत्तेचे मापदंड

नॅक मूल्यांकन महाविद्यालय, विद्यापीठाच्या गुणवत्तेचे मापदंड आहे. शैक्षणिक गुणवत्ता, दर्जा प्राप्त करण्यासाठी दर पाच वर्षांनी महाविद्यालयाचे मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे. त्यानुसार अकृषी विद्यापीठ, संलग्नित सर्व पात्र महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन करणे अनिवार्य आहे.

Loksatta 24.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

सकाळ

नॅक मूल्यांकनासाठी सहा महिने मुदतवाढ

पुणे, ता. २३ : राज्यातील विद्यापीठांनी संलग्न महाविद्यालयांना राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषदेकडून (नॅक) नॅक मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन न झालेल्यांवर कारवाईचा आदेश दिला आहे. अशा महाविद्यालयांमधील विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत, विद्यार्थिहितास्तव 'नॅक'कडून मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन करण्यासाठी सहा महिन्यांपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ५(८१) अन्वये शिथिलता दिल्याचे उच्च शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि संलग्न सर्व पात्र महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन व पुनर्मूल्यांकन करणे, हे ऑक्टोबर २०१० मधील शासन निर्णयानुसार अनिवार्य आहे. तसेच, वेळोवेळी राज्य सरकार, विद्यापीठ अनुदान आयोग यांनी अकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालये यांना नॅक मूल्यांकन करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. राज्यातील बहुसंख्य महाविद्यालयांनी मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन प्रक्रियेत सहभाग घेऊन नॅक मूल्यांकन दर्जा प्राप्त करून घेतला आहे. नॅक मूल्यांकन हे महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे मापदंड असून शैक्षणिक गुणवत्ता आणि दर्जा धारण करण्यासाठी दर पाच वर्षांनी महाविद्यालयाचे मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे.

'नॅक'ने फेब्रुवारी २०२५च्या आदेशानुसार एप्रिल २०२५ पासून दुहेरी मानांकन पद्धती लागू केली आहे. ही पद्धती लागू करण्याच्या अनुषंगाने 'नॅक'ने उच्च शिक्षण संस्थांसाठी लॉगिन पोर्टल अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. सद्यःस्थितीत नव्याने मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन करण्यासाठी उच्च शिक्षण संस्था नोंदणी तूर्तास कार्यान्वित नसल्याने महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकनासाठी नोंदणी करता येणे शक्य होत नसल्याचे दिसून आले.

दरम्यान, उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांनी विद्यार्थी हितासाठी मूल्यांकनासाठी महाविद्यालयांना मुदतवाढ देण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसार 'नॅक'कडून मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकनासाठी मुदतवाढ दिली आहे, असे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना परिपत्रकाद्वारे कळविले आहे.

Pune, Main
24/05/2025 Page No. 4

Sakal 24.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

सामना

अकरावी प्रवेशासाठी नोंदणी बंधनकारक

पुणे, दि. २४ (प्रतिनिधी) – राज्यभरात यंदा अकरावी प्रवेश प्रक्रिया केंद्रीय आणि ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी ही प्रक्रिया ठराविक महानगरपालिकांसाठी राबवली जात होती. अकरावी प्रवेशासाठी तब्बल २० लाख ९१ हजार ३९० जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश नोंदणी करणे बंधनकारक आहे. नोंदणी करतील असेच विद्यार्थी प्रवेशासाठी पात्र असणार आहेत. जे विद्यार्थी नोंदणी करणार नाहीत, त्यांना प्रवेश मिळणार नसल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

विद्यार्थी आयटीआय किंवा दहावीनंतरच्या विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात, त्यानंतर त्यांच्या निर्णयात बदल होतो. पण, दरम्यान अकरावी प्रवेश प्रक्रियेत नोंदणी केली नसेल तर त्यांना प्रवेश मिळू शकत नाही. त्यामुळे जे अकरावीला प्रवेश घेऊ इच्छितात, त्यांनी नोंदणी करणे बंधनकारक आहे.

राज्य मंडळाने यंदा दहावी आणि बारावीचा निकाल लवकर जाहीर केला आहे. मात्र, तांत्रिक बिघाडामुळे अकरावीच्या प्रवेशाचे ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी सोमवारपर्यंत प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यानंतर पहिल्या नियमित फेरीची अंतिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी ८ जूनला जाहीर होणार आहे. पहिली नियमित फेरी २६ मे ३ जून दरम्यान पार पडणार असून, यात विद्यार्थी नोंदणी, महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येणार आहे. अकरावीची प्रवेश प्रक्रिया १५ ऑगस्टपूर्वी पूर्ण करण्याचा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाचा प्रयत्न आहे.

Pune Edition
May 25, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

City 25 May 2025_01
25 May 2025
प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

कॉलेजांवरील कारवाई लांबणीवर

नॅक मूल्यांकन करण्यासाठी संस्थांना सहा महिने मुदतवाढ

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४ - नॅककडून उच्च शिक्षण संस्थांसाठीचे लॉगिन पोर्टल अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरु आहे. त्यामुळे महाविद्यालयांना नव्याने मूल्यांकन अथवा पुनर्मूल्यांकनासाठी नोंदणी करता येत नाही. त्या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण विभागाने नॅक मूल्यांकनासाठी उच्च शिक्षण संस्थांना सहा महिन्यांची मुदतवाढ दिली आहे.

उच्च शिक्षण विभागाने सर्व महाविद्यालये, शैक्षणिक संस्थांना नॅक मूल्यांकन करून घेण्याचे निर्देश दिले आहे. एवढेच नव्हे, तर विद्यापीठ कायद्यानुसार नॅक मूल्यांकन करून घेणे बंधनकारक आहे. मूल्यांकन न केल्यास विद्यापीठाची संलग्नता रद्द होणार असून, प्रथम वर्षाचे प्रवेशही रोखण्याचा इशारा उच्च शिक्षण विभागाने दिला होता. त्यासाठी महाविद्यालयांना नॅक मूल्यांकन करून घेणे क्रमप्राप्त होते.

उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी याबाबत पत्रक प्रसिद्धीस दिले आहे. नॅक संस्थेकडून शिक्षण संस्थांसाठीचे लॉगिन पोर्टल अद्ययावत करण्याची प्रक्रिया राबवली जात आहे. त्यामुळे सध्या नव्याने मूल्यांकन करून घेणे, पुनर्मूल्यांकन करणे, याबाबत कुठलीही कार्यवाही होत नाही. ही बाब उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली २१ मे रोजी झालेल्या बैठकीत निदर्शनास आली. त्यानंतर विद्यार्थी हितास्तव नॅक मूल्यांकनासाठी मुदतवाढ देण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यातील काही विद्यापीठांनी नॅक मूल्यांकन न केलेल्या महाविद्यालयांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. त्यामुळे शिक्षण संस्थांचे दाबे दणाणले होते. त्यातच नॅक मूल्यांकनाची प्रक्रियाच बंद असल्यामुळे कार्यवाही करणे उचित ठरणार नाही. त्यामुळे शिक्षण विभागाने नॅक मूल्यांकन करून न घेतलेल्या महाविद्यालयांवरील कारवाई आता लांबणीवर टाकली आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 25 May 2025_013
25 May 2025

ग्रामीण भागात ऑफलाइन प्रवेश हवे

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४ - यंदापासून राज्यात शहर व ग्रामीण भागात अकरावीचे प्रवेश ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येत आहे. या निर्णयाला कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाने विरोध केला आहे. या प्रवेश प्रक्रियेत अनेक अडचणी असल्याने ग्रामीण भागासाठी ऑफलाइन प्रवेश प्रक्रिया राबवावी, अशी मागणीही संघटनेने मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

ग्रामीण भागात नेटवर्क मिळत नाही, विशेषतः आदिवासी, डोंगराळ भागातील विद्यार्थी, पालकांकडे अँड्रॉइड मोबाइल नाहीत. ग्रामीण भागात अकरावीतील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध जागांपेक्षा विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे. ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची मागणी विद्यार्थी, पालक, शिक्षण संस्थांनी केलेली नाही. ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेबाबत जागृती झालेली नाही. ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेला साहाय्य करण्याच्या नावाखाली विद्यार्थी, पालकांची आर्थिक लूट होत आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीतही शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात सुटी न घेता या कामासाठी वेळ देऊनही काहीच निष्पन्न होत नाही. ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेमुळे वर्ग सुरू होण्यास उशीर होऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. ऑनलाइन प्रक्रियेसाठी अकारण खर्च करावा लागतो. प्रवेशप्रक्रियेच्या पहिल्याच संकेतस्थळाच्या तांत्रिक बिघाडामुळे प्रक्रिया खोळंबल्याने पालक, विद्यार्थ्यांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणेच ऑफलाइन पद्धतीने प्रवेश देण्याच्या मागणीचे पत्र मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, शिक्षणमंत्र्यांना दिल्याचे महासंघाचे समन्वयक प्रा. मुकुंद आंधळकर यांनी सांगितले.

City 25 May 2025_005
25 May 2025
प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

डिप्लोमाच्या प्रवेश नियमावलीत होणार सुधारणा

आता प्रवेशाच्या चार फेऱ्या; चौथ्या फेरीतील विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्तीचा लाभ

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४ - अभियांत्रिकी, हॉटेल मॅनेजमेंट, केटरिंग टेक्नॉलॉजी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी, वास्तुकला आणि फार्मसी या अभ्यासक्रमांच्या डिप्लोमाच्या (पदविका) प्रवेश प्रक्रियेत आता तीनऐवजी चार प्रवेश फेऱ्या घेण्यात येणार आहेत. त्यामुळे संस्था स्तरावर प्रवेशाच्या जागा रिक्त राहणार नाहीत. एक प्रवेश फेरी वाढल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळणार आहे.

राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने डिप्लोमाच्या प्रवेश

नियमावलीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई), फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (पीसीआय), आणि वास्तुकला परिषद यांच्या अंतर्गत येणाऱ्या विविध संस्थांच्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी हा नियम लागू राहणार आहे. त्याचप्रमाणे संस्थात्मक कोट्यातील व सर्व प्रवेश फेरीनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीनेच पार पाडावी लागेल. यात संस्थांना पात्र उमेदवारांची यादी, गुणवत्ता यादी, प्रवेश वेळापत्रक आदी गोष्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध कराव्या लागणार आहेत.

डिप्लोमाच्या तीन प्रवेश फेरीनंतर अनेक अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त राहात असत. त्यानंतर संस्था स्तरावर प्रवेश देण्यास अनुमती दिली जाते. संस्था स्तरावर प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्तीचा लाभ मिळत नाही. त्या पार्श्वभूमीवर अजून एक प्रवेश फेरी घेण्याची मागणी पालकांकडून होत होती. अखेर विद्यार्थी हिताचा विचार करून आणखी एक प्रवेश फेरी वाढवण्यात आली आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना चौथ्या फेरीतून प्रवेशाची संधी मिळणार आहे. याद्वारे मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त होणार आहे.

प्रवेश कन्फर्म करणे अनिवार्य

विद्यार्थ्यांना आता पसंतीक्रमानुसार महाविद्यालय मिळण्यासाठी आता चौथ्या फेरीपर्यंत प्रयत्न करता येणार आहे. पहिल्या फेरीत पसंतीक्रमानुसार महाविद्यालय मिळाल्यास तेथे प्रवेश घेणे अनिवार्य आहे. आता नव्या निर्णयानुसार दुसऱ्या फेरीत पसंतीनुसार पहिल्या तीन क्रमांकांत आणि तिसऱ्या फेरीत पसंतीनुसार पहिल्या सहा क्रमांकात प्रवेश मिळाल्यास, तेथे प्रवेश घेणे बंधनकारक आहे. प्रवेश न घेतल्यास संबंधित विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेतून बाहेर पडेल आणि त्याला प्रवेशापासून वंचित राहावे लागणार आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 25 May 2025_005
25 May 2025

इनहाउस कोटा प्रवेशासाठी जाचक नियम

अकरावी प्रवेश प्रक्रिया; राज्यातील संस्थाचालकांमधून नाराजीचा सूर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४ - अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील इनहाउस कोटा (संस्थांतर्गत) नुसार दिले जाणारे प्रवेश जाचक नियमावलीने वेढल्याने संस्थाचालकांमध्ये नाराजीचा सूर आहे. दहावीची शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच शैक्षणिक संकुलात असेल, तरच विद्यार्थ्यांना अकरावीसाठी इनहाउस कोट्याचा लाभ घेता येणार आहे. राज्यातील नामांकित शैक्षणिक संस्थांचे जाळे एकापेक्षा अधिक जिल्ह्यांत प्रामुख्याने ग्रामीण भागात असल्याने तेथील विद्यार्थ्यांना हक्काच्या इनहाउस कोट्याचा लाभ घेता येणार नाही.

शालेय शिक्षण विभागाकडून यंदा अकरावीसाठी राज्यात केंद्रीय ऑनलाइन प्रवेश पद्धती राबवली जात आहे. त्यातकॅप फेरीच्या जागांव्यतिरिक्त संस्थांतर्गत इनहाउस कोटा, व्यवस्थापन कोटा व अल्पसंख्याक शाळांसाठी अल्पसंख्याक कोटा ठेवला आहे. कोट्यांतर्गत प्रवेशासाठीही ऑनलाइन अर्ज आवश्यक आहे.

उच्च माध्यमिक आणि माध्यमिक शाळा एकाच परिसरात असतील, तर दहावी उत्तीर्ण विद्यार्थी इनहाउस कोट्याअंतर्गत प्रवेशासाठी पात्र असतील. त्यासाठी सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांत १० टक्के जागा राखीव असतील. त्याच संस्थेची, त्याच परिसरातील दहावी वर्ग असलेली माध्यमिक शाळा नसेल, तर अशा विद्यालयांना इनहाउस कोटा लागू होणार नाही, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. यामुळे फारशा विद्यार्थ्यांना इनहाउस कोट्यातून प्रवेश मिळणे कठीण होणार आहे.

व्यवस्थापन कोट्याअंतर्गत सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांमध्ये ५ टक्के जागा राखीव असतील. यामधील प्रवेश व्यवस्थापन संस्था ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतून करू शकतील. अल्पसंख्याक व बिगरअल्पसंख्याक उच्च माध्यमिक विद्यालयांना व्यवस्थापन कोट्यामधील जागा प्रवेश प्रक्रियेच्या चौथ्या फेरीपर्यंत भरता येतील. अल्पसंख्याक उच्च माध्यमिक विद्यालयात केवळ अल्पसंख्याक समुदायाच्या विद्यार्थ्यांसाठी ५० टक्के जागा राखीव असतील.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

'FORGET INTERNET, WE BARELY HAVE MOBILE NETWORK'

In rural Maharashtra, questions over need for online FYJC admission system

PALLAVI SMART
MUMBAI, MAY 24

THE ONLINE centralised admission process (CAP) for First Year Junior College (FYJC) students in Maharashtra was abruptly halted on Wednesday, shortly after its launch, due to a technical glitch that led to the website crashing. As a result, the entire process has now been delayed by at least five days, sparking criticism across Maharashtra — especially from rural regions — over the decision to expand the system statewide.

Until last year, the online process was limited to urban regions from the Mumbai Metropolitan Region (MMR), Pune-Pimpri Chinchwad, Nagpur, Nashik and Amravati, where tough competition and frequent malpractices made a centralised online system necessary. From this year, the process is being held across the state. However, educators and parents from rural areas argue that such issues do not exist in their regions, and college admissions have generally been smooth and timely.

Maruti Dhobale, principal of Adimaya Shakti Vidyalay in Inglun, a tribal-dominated village in Junnar taluka, Pune district, said, "Forget internet, we barely have reliable mobile networks. Now, to access this online system, students are forced to travel 20 to 30 km to the taluka centre just to have access to internet or a cybercafé. They will have to do this multiple times — to apply, check merit lists, and confirm admissions. It is completely unfair when earlier they could just walk to a nearby college and secure a seat."

Students huddled up at an internet cafe in Mumbai to register for the First Year Junior College admissions on Wednesday.

Dhobale noted that in rural areas, students usually opt for the nearest junior college to avoid hassles in commuting. He pointed out that there are only two junior colleges in Junnar taluka, making it completely unnecessary to have a centralised online system for admissions.

Similar concerns have been raised in other rural parts of the state, where infrastructure limitations such as poor internet access and frequent power outages have made the process highly impractical.

In Konkan, students and parents are already anxious as the application process is set to resume on Monday. "There has been no proper electricity in rural Sindhudurg for three days due to heavy rain," said Prashant Palav, a teacher from Avlegaon Junior College in Kudal. "How are students supposed to fill out forms online without power or internet? Those who turn to cyber cafés are being charged Rs 200. It has become a business, and banners are put up in nearby areas due to a lack of awareness of the system," he said.

Beyond accessibility, many have raised concerns about the lack of clear guidance and training. "Even schools and junior colleges have not received any formal instructions. We are clueless when parents come to us with queries," Dhobale added.

Sachin Parulkar, a parent from Vengurla taluka in Konkan, described the process as burdensome. "If any document is missing, we have to return home and come back — which could mean another 30 km trip. All this just for a seat in a junior college where there is no competition," he said.

Some institutions have taken it upon themselves to raise awareness. S V Thakar High School and K N Junior College in Dhadgaon taluka, Nandurbar, have put up banners asking Class 10 students to visit and learn about the new system. But Vijay Parmalkar, a teacher, said the response has been poor. "Many students come from tribal villages over 40 km inside the hills. They are unaware that the process has changed. Most will simply show up in June to confirm admissions as per the conventional practice," he said. Parmalkar highlighted that in their district, junior colleges start by mid-June, but this delay in the online system will now further delay their academic year.

Mukund Aandhalkar, state coordinator of the Junior College Teachers' Federation, has written to Chief Minister Devendra Fadnavis, urging a rollback of the statewide expansion. Former Maharashtra School Principals' Association head Mahendra Ganpule echoed these concerns and said, "If this had to be done, it could have been done in a phased manner and with proper training to schools."

The Indian Express 25.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
City 26 May 2025_013
26 May 2025

सीबीएसई शाळांमध्ये मराठी भाषेचे धडे

अंमलबजावणीसाठी समिती स्थापन

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २५ - केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) देशभरातील आपल्या सर्व शाळांमध्ये भाषा शिक्षणविषयक धोरण जारी केले आहे. त्यामुळे सीबीएसई शाळांमध्ये पायाभूत स्तरापासून मातृभाषा किंवा राज्यभाषा शिकविणे अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्यातील सीबीएसई शाळांमध्ये मराठी भाषा शिकवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

प्राथमिक भाषा ही विद्यार्थ्यास सर्वाधिक परिचित म्हणजेच मातृभाषा असावी. शक्य नसल्यास राज्यभाषा वापरली पाहिजे. मुलाला दुसऱ्या भाषेत मूलभूत साक्षरता येईपर्यंत ही भाषा सर्व विषयांसाठी शिक्षणाचे माध्यम म्हणून देखील काम करेल, असे सीबीएसईने स्पष्ट केले आहे. सीबीएसई शाळांसाठी मे अखेरीस मातृभाषेच्या अंमलबजावणीसाठी समिती स्थापन करण्यात येणार आहे. ही समिती विद्यार्थ्यांच्या भाषिक पार्श्वभूमीचे मूल्यांकन करेल, अभ्यासक्रमात आवश्यक बदल करेल आणि योग्य शिक्षण साहित्य निवडण्यासाठी मार्गदर्शन करेल. शिक्षकांनी जुलैपर्यंत बहुभाषिक शिक्षणाचे विशेष प्रशिक्षणदेखील पूर्ण केले पाहिजे. तीन ते आठ वयोगटांतील मुलांना त्यांच्या मातृभाषेत मूलभूत साक्षरता विकसित करण्याचे उद्दिष्टही ठेवण्यात आले आहे.

पूर्वप्राथमिक ते इयत्ता दुसरीपर्यंत मुलांच्या शिक्षणासाठी मातृभाषा किंवा राज्यभाषा एक अनिवार्य भाषा म्हणून शिकविली जाणार आहे. राज्यातील शाळांमध्ये इंग्रजी आणि हिंदी शिकवले जात असले, तरी मराठी शिकवणे अनिवार्य होईल. मुलांच्या प्रारंभिक वयात मातृभाषेतील शिक्षणामुळे मुलांच्या मानसिक आणि भावनिक विकासाला चालना मिळणार आहे.

संस्थांतर्गत कोट्यावर चर्चेची तयारी

अकरावी प्रवेशांसंदर्भात शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांचे आश्वासन

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत संस्थांतर्गत कोट्यातील प्रवेशांसाठीच्या बदललेल्या नियमाला संस्थाचालकांनी विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर, 'संस्थाचालकांचे म्हणणे ऐकून घेऊ, काही बदल आवश्यक असल्यास ते केले जातील,' असे आश्वासन शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिले.

शिक्षण विभागाने यंदा राज्यभर राबवल्या जाणाऱ्या अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत इनहाउस कोट्याबाबत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. त्यानुसार कनिष्ठ महाविद्यालय शाळेच्या संकुलात असेल, तरच मुले इनहाउस कोट्यासाठी पात्र ठरणार आहेत. मात्र, या निर्णयाला संस्थाचालकांनी विरोध केला आहे. त्याबाबत भुसे म्हणाले, 'विद्यार्थ्यांचे हित पाहून इनहाउस कोटा ठेवण्यात आला आहे. याबाबत संस्थाचालकांचे काही म्हणणे असल्यास ते ऐकून घेतले जाईल. बदल कोणालाही त्रास देण्यासाठी केलेले नाहीत. काही बदल आवश्यक असल्यास ते केले जातील.'

'इयत्ता अकरावीच्या प्रवेशाची ऑनलाइन कार्यपद्धती काही तांत्रिक कारणामुळे थांबली होती. मात्र, तांत्रिक दोष दूर करण्यात आले आहेत. सोमवारपासून ऑनलाइन कार्यपद्धती सुरळीतपणे सुरू होईल. विद्यार्थ्यांना अपेक्षित असलेली महाविद्यालये गुणवत्तेनुसार उपलब्ध होतील. चांगले गुण असूनही चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळत नव्हता. आता ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमुळे ती संधी मिळणार आहे. पालकांची आर्थिक बचत होणार आहे. मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती अशा ठिकाणी ऑनलाइन प्रवेश कार्यपद्धती अस्तित्त्वात होती. आता त्याची राज्यभर अंमलबजावणी केली जाणार आहे. ऑनलाइन कार्यपद्धतीचे फायदे काय आहेत, ते नक्कीच सांगितले जातील. अभ्यासपूर्ण पद्धतीने हा निर्णय घेण्यात आला आहे,' असेही त्यांनी नमूद केले.

शिष्यवृत्ती परीक्षांबाबत तज्ज्ञ समिती शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता चौथी आणि सातवीत घेण्याबाबत अभ्यास सुरू आहे. त्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमली आहे. मात्र, याबाबत अंतिम निर्णय अजून झालेला नाही, असेही दादा भुसे यांनी सांगितले.

Loksatta 26.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 26 May 2025_005
26 May 2025

अकरावी प्रवेशाचा आज मुहूर्त साधणार?

विद्यार्थी, पालकांच्या मनातील प्रश्न; तांत्रिक अडचण निर्माण होण्याची भीती

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २५ - राज्य सरकारच्या शालेय शिक्षण विभागाने केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू केली असून आता उद्याचा म्हणजे सोमवारचा (दि.२६) मुहूर्त तरी ही प्रवेश प्रक्रिया साधणार का, असा प्रश्न विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित करत आहेत.

यावर्षी राज्यात प्रथमच अकरावी प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला. त्यानुसार १९ मे ते १३ जून या कालावधीत ही फेरी राबविण्यात येणार होती.

प्रवेश प्रक्रियेवर एक नजर	
नोंदणीकृत कॉलेज	९ हजार ३७६
प्रवेश जागा	२० लाख ९२ हजार ३५०
कॅप फेरीसाठी जागा	१८ लाख ७७ हजार ८३९
कोट्यातील प्रवेश जागा	२ लाख १४ हजार ५११

विद्यार्थी नोंदणी व अर्ज भरण्याच्या पहिल्याच दिवशी म्हणजेच २१ मे रोजी संकेतस्थळावर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेचे काहीच कामकाज करता आले नाही. संकेतस्थळच ठप्प पडल्यामुळे पहिल्या प्रवेश प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले. त्यानुसार २६ मे पासून ते २० जून या कालावधीत ही फेरी राबविण्याची घोषणा करण्यात आली आहे.

अकरावी प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठी राज्यातील ९ हजार ३७६ कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी केलेली आहे. त्यात एकूण २० लाख ९२ हजार ३५० प्रवेशाच्या जागा उपलब्ध झालेल्या आहेत. कॅपअंतर्गत प्रवेशासाठी १८ लाख ७७ हजार ८३९ तर कोट्याअंतर्गत २ लाख १४ हजार ५११ एवढ्या प्रवेशाच्या जागा उपलब्ध झालेल्या आहेत.

आता विद्यार्थी नोंदणी व अर्ज भरण्याच्या प्रक्रियेसाठी संकेतस्थळ सुरळीतपणे सुरू होण्याची आवश्यकता आहे. यंत्रणेत कोणताही बिघाड होणार नाही याची दक्षताही घ्यावीच लागणार आहे.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 26 May 2025_005
26 May 2025

पहिलीपासून हिंदी भाषेचा निर्णय स्थगित : दादा भुसे

प्रचलित पद्धतीनुसार विद्यार्थ्यांना देणार शिक्षण

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २५ - राज्यात इयत्ता पहिलीपासून तृतीय भाषा म्हणून हिंदीची सक्ती करण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत प्रचलित पद्धतीनुसार विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाईल, अशी माहिती राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी रविवारी दिली. मात्र, हिंदीच्या सक्तीबाबत राज्यातील अभ्यासक, शिक्षणतज्ज्ञ, शिक्षकांकडून सूचना आल्या आहेत. या सूचनांचा विचार करून सुधारित निर्णय प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

दादा भुसे यांनी पुणे बाल पुस्तक जत्रेला भेट दिल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी राष्ट्रीय पुस्तक न्यासचे विश्वस्त राजेश पांडे, सागर वैद्य आदी उपस्थित होते. बालभारतीने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार शालेय शिक्षणात हिंदी भाषेच्या सक्तीबाबत संभ्रम निर्माण झाल्याची विचारणा भुसे यांना करण्यात आली. त्यावर भुसे म्हणाले की, हिंदी भाषेचा समावेश करण्याबाबतच्या निर्णयाला स्थगिती दिली असून, याबाबत कोणतेही दुमत असू नये. काही शिक्षणतज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार तिसरीपासून हिंदी भाषेचा पर्याय उपलब्ध होऊ शकतो, तर काहींनी निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत सूचना केल्या आहेत. या सर्व सूचनांचा विचार करून शिक्षण विभागाकडून निर्णय प्रसिद्ध करण्यात येईल, असे भुसे यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांचे हित पाहून इनहाउस कोटा

यंदापासून अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत इनहाउस कोट्याबाबत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. त्यानुसार एकाच संकुलात असलेली शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय इनहाउस कोट्यासाठी पात्र ठरवण्यात आल्या आहेत. मात्र, या निर्णयाला संस्थाचालकांनी विरोध केला आहे. याबाबत विचारले असता भुसे म्हणाले, विद्यार्थ्यांचे हित पाहून इनहाउस कोटा ठेवला आहे. याबाबत संस्थाचालकांचे काही म्हणणे असल्यास ते ऐकून घेतले जाईल. काही बदल आवश्यक असल्यास ते केले जातील, असेही भुसे यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आता देशभर शिकविला जाणार आहे. तसे निर्देशही केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सचिवांना दिले आहेत. केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानेही (सीबीएसई) इंग्रजीसोबतच प्रादेशिक भाषांना महत्त्व दिले आहे. त्यानुसार राज्यातील सीबीएसई शाळांना इंग्रजीसोबतच मराठी भाषेचे शिक्षण देण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. याची अंमलबजावणी यंदापासून सक्तीने करण्यात येईल, असेही भुसे यांनी सांगितले.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

news ☏020/67639900 पुणे शहर पुणे, सोमवार, २६ मे २०२५ ५

शिक्षणाचा गाडा यंदा वेगावर आरूढ

पुढारी विशेष

कोरोनानंतर पहिल्यांदाच विद्यापीठासोबत तंत्रशिक्षण डिप्लोमा, आयटीआयची प्रवेश प्रक्रिया सुरू

अकरावीसाठी आजपासून विद्यार्थी नोंदणी; दहावी-बारावीचा निकाल लवकर लागल्याने प्रक्रियेला वेग

गणेश खळदकर
पुढारी प्रतिनिधी

पुणे : दहावी-बारावीचे मे महिन्यातच लागलेले निकाल, आरटीईची जवळपास पूर्ण झालेली प्रवेश प्रक्रिया, विद्यापीठासोबत अकरावी, डिप्लोमा, आयटीआयची सुरू झालेली प्रवेश प्रक्रिया, यामुळे मे महिन्यातच विद्यार्थ्यांसह पालकांची शैक्षणिक प्रवेशासाठी लगबग सुरू झाली आहे. त्यामुळे कोरोनापासून सुरू असलेला बॅकलॉग भरून काढत शिक्षणाचा गाडा यंदा वेगावर आरूढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरवर्षी साधारण जून- जुलैमध्ये शैक्षणिक वर्ष सुरू व्हायचे. परंतु, २०२० मध्ये भारतात कोरोना आल्यानंतर शैक्षणिक वर्ष विस्कळीत झाले. गेल्या पाच वर्षांत हळूहळू ते पूर्वपदावर येत होते. परंतु, यंदा पहिल्यांदाच विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेने मे महिन्यातच वेग धारण केल्यामुळे शैक्षणिक वर्ष वेळेत सुरू होणार आहे.

कोरोनामुळे गेली काही वर्षे विद्यापीठांसोबतच विविध अभ्यासक्रमांचे शैक्षणिक वर्ष विस्कळीत झाले होते. दहावी- बारावीच्या परीक्षांवरही परिणाम झाला होता. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया उशिरा सुरू व्हायच्या, त्याचा थेट परिणाम प्रवेश, परीक्षा आणि निकालांवर होऊन शैक्षणिक वर्ष विस्कळीत झालेले दिसून यायचे. यंदा मात्र मे महिन्यातच पदवी, डिप्लोमा, आयटीआय अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रिया सुरू झाल्या आहेत. तर पदव्युत्तर पदवीच्या प्रवेशप्रक्रिया देखील लवकरच सुरू होणार आहेत. अकरावीची प्रवेशप्रक्रिया आज सोमवार (दि.२६ मे) पासून सुरू होणार आहे. तर राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेलकडून विविध सीईटी परीक्षा घेण्यात येत असून काही प्रवेश परीक्षांचे निकाल देखील जाहीर केले आहेत. त्यामुळे यंदापासून शैक्षणिक वर्ष कोरोनापूर्वी जसे होते तसेच सुरू होणार असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

इंजिनिअरिंग, डिप्लोमाचे वर्ग १७ जुलैपासून

तंत्रशिक्षण संचालनालयाकडून (डीटीई) इंजिनिअरिंग, फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी डिप्लोमा अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येत असून, सद्यःस्थितीत प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. तसेच, एमएसबीटीईकडून शैक्षणिक वर्षाचे कॅलेंडर देखील जाहीर केले आहे. त्यानुसार १७ जुलै ते १७ ऑक्टोबरदरम्यान प्रथम सत्र राबविण्यात येणार आहे. तर १५ डिसेंबर ते ४ एप्रिलदरम्यान दुसरे सत्र राबविण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

'आयटीआय' प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

व्यवसाय प्रशिक्षण आणि शिक्षण संचालनालयाकडून (डीव्हीईटी) आयटीआय डिप्लोमा अभ्यासक्रमाच्या प्रवेशप्रक्रियेत विद्यार्थ्यांची नोंदणी सुरू असून विद्यार्थ्यांचा देखील त्याला मोठा प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे आयटीआयचे वर्गदेखील यंदा लवकर सुरू होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

"कोरोनामुळे विस्कळीत झालेले शैक्षणिक सत्र यंदा वेळेवर सुरू होण्याचे चित्र आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पदवी अभ्यासक्रम जूनच्या तिसऱ्या आठवड्यात, तर पदव्युत्तर अभ्यासक्रम जुलै महिन्याच्या सुरुवातीला सुरू होतील, अशी अपेक्षा आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांची केंद्रीय प्रवेश प्रक्रियाही वेळेवर पूर्ण होईल, अशी शक्यता आहे. विद्यापीठाच्या संकुलातील पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया सुरू असून, जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सर्व अभ्यासक्रम सुरू करण्याचे नियोजन आहे. यामुळे विद्यार्थ्यांना निश्चितच दिलासा मिळणार आहे.

\- **डॉ. पराग काळकर,** प्र-कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pudhari 26.5.2025

'नॅक' मूल्यांकनाला मुदतवाढ

पुणे : राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने सर्व महाविद्यालयांना आणि शैक्षणिक संस्थांना 'नॅक' मूल्यांकन करून घेण्याचे आदेश दिले होते; तसेच मूल्यांकन करून न घेतलेल्या महाविद्यालयांचे प्रथम वर्षाचे प्रवेश थांबविण्याची कारवाई राज्यातील काही विद्यापीठांकडून करण्यात आली होती. मात्र, 'नॅक' मूल्यांकन करून घेण्यास सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

याबाबतचे परिपत्रक राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी प्रसिद्ध केले. 'नॅक'कडून बायनरी ॲक्रेडिटेशन पद्धती लागू करण्यात आली आहे. ही पद्धती लागू करण्याच्या अनुषंगाने नॅक संस्थेकडून उच्च शिक्षण संस्थांसाठीचे लॉगिन पोर्टल अद्यावत करण्याची प्रक्रिया राबविली जात आहे. ही बाब उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली २१ मे रोजी झालेल्या बैठकीत निदर्शनास आली. त्यानंतर नॅक मूल्यांकनासाठी महाविद्यालयांना मुदतवाढ देण्याचा आदेश दिला आहे.

Maharashtra Times 26.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

School edu min reiterates Hindi third language proposal on hold

SOHAM SHAH
PUNE, MAY 25

MAHARASHTRA'S SCHOOL Education and Sports Minister Dada Bhuse again clarified on Sunday that the proposal to introduce Hindi as the compulsory third language in the state had been put on hold.

Speaking to reporters at the Pune Children's Book Fair in Pune, Bhuse said, "At this time, the topic of third language has been put on hold. There should be no confusion in anyone's mind because of this. Previously, Hindi was decided to be the third language by a government resolution, a few issues came to light after that… Right now in this educational year, the procedure being followed in the previous years will be followed."

Confusion regarding Hindi being introduced as the third language flared up again as Balbharti, Maharashtra's Bureau of Textbook Production and Curriculum Research, released a circular on May 20 that included a point - "All concerned will be informed separately regarding the textbook "Khel Khel Mein Sikhe Hindi" (for Marathi and English mediums) for Class 1".

Denying that the language would be made compulsory, Bhuse added, "Because of this (the issues raised), in the coming time, students and parents expect education in which language and from which Class (will be taken into account). Some people said that Hindi should not be introduced from Class 1 but from Class 3. Many such issues came forward, so in the coming time all these issues will be taken into account and the decision will be taken."

An April 16 circular by the state government had declared that Hindi would be mandatory as the third language from Classes 1 to 5.

The govt had decided to make Hindi mandatory as the third language. However, it was opposed leading to a roll back.

However, strong opposition from political and cultural circles opposed this move.

A few days later Bhuse announced after a cabinet meeting that the move was being rolled back and said, "The word mandatory will be removed… The three-language formula remains, but schools must accommodate other language choices if a significant number of students in a class request it."

The Indian Express 26.5.2025

Decision to make Hindi compulsory stayed: Bhuse

TIMES NEWS NETWORK

Pune: School education minister **Dada Bhuse** on Sunday said the decision to make Hindi compulsory as a third language from Std I had been stayed and students would be educated according to the existing system.

After visiting the Pune Children's Book Fair organised by the National Book Trust, Pune Municipal Corporation (PMC) and Pune Book Festival Samvad at the Ganesh Kala Krida Manch on Sunday, Bhuse told reporters, "We have received various suggestions from educationists, experts and others regarding this subject and a decision would be taken after considering them."

About the confusion surrounding scholarship exams currently held in Std V and VIII, Bhuse said studies were under way to check if these should be for Std IV and VII. "A committee of experts has been appointed for this. A final decision has not been taken yet," he said.

Regarding confusions over the new in-house quota rule for the First Year Junior College (FYJC) admission, Bhuse said if the management of the institutions had an issue, they could send their suggestions to the education department. "A decision would be taken after scrutinising everything," he said.

The FYJC admission process is set to begin on May 26. The new rule states that even if a junior college and some schools belong to the same management and the same city, only students from schools within the premises of the junior college will be eligible for quota.

The Times of India 26.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

City | Pune Times Mirror Monday, May 26, 2025 | 3

Heavy burden on educators

Under Nipun Maharashtra, teachers have to register WhatsApp numbers of parents of students in the app

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
@YashPune_Mirror

It appears that the state government has gotten into the habit of putting the responsibility of non-academic work on teachers. Even though the main task is teaching, educators are constantly being asked to collect information for various schemes. Under the latest directive from the state government as part of the Nipun Maharashtra campaign, class teachers have been strictly instructed to register the WhatsApp numbers of parents of students from Classes I to XII in a designated app.

This move has sparked widespread discontent among thousands of teachers, who feel their core duty of educating students is increasingly being sidelined in favour of administrative tasks related to various government schemes.

Parents of students in zilla parishads, nagar parishads, municipal corporations and private aided schools will now be able to easily check their children's academic progress on their mobile phones. The State Council of Educational Research and Training (SCERT) has asked teachers to download a new app called 'Nipun Maharashtra SCERTM' available on Google Play Store. Teachers have been instructed to register the WhatsApp numbers of their students' parents in the app so that parents can see the subject-wise progress of their children, and to be able to contact the parents directly. Teachers of classes I to XII should register the WhatsApp numbers of their students in the app.

Speaking on the initiative, Sanjay Naikde, Administrative Officer, Education Department, said, "This app has been developed to increase the active participation of parents in the education of students. The main purpose of this app is to add support from parents to the hard work of teachers and to reach educational instructions effectively."

"This will be a step towards improving the quality of education in Maharashtra under the 'Nipun Bharat' initiative," Naikde added.

Teachers demand solution

While it is important for parents to stay informed about their children's progress, many teachers believe the constant demand for different types of information is excessive. Instead of repeated data collection, some educators suggest that the state government should develop a unified online system that consolidates all necessary information in one place, making the process more efficient and less burdensome.

The campaign

Teachers have to teach students even during summer vacations in schools. For this, the Education Department has decided to implement a special campaign for students of classes II to V. Under this, it has been made mandatory to check the progress of students every week and to enable them in language and number knowledge before June 30.

WHAT IS NIPUN MAHARASHTRA?



PIC FOR REPRESENTATIONAL PURPOSE ONLY

Under the 'Nipun Maharashtra' initiative, students from Classes II to V are expected to achieve 100 percent study capacity. For this, an action programme has been implemented in schools of all managements and mediums. This is to be implemented from March 5 to June 30. It is mandatory for all schools to implement it.

Pune Mirror 26.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

[SAYS MINISTER DADA BHUSE]

State edu dept shelves third language proposal in schools

Kimaya Boralkar
puneletters@hindustantimes.com

PUNE: After recent criticism over the move to make Hindi a compulsory third language from Class 1, the Maharashtra government has shelved the plan for now.

State school education minister Dada Bhuse on Sunday clarified that the existing two-language formula will continue in both Marathi and English medium schools.

Speaking at the Pune Children's Book Festival, Bhuse addressed the confusion around the state's language policy and said, "The decision to introduce Hindi from Class 1 as a third language was taken earlier. However, many parents have suggested it be introduced from Class 3 instead. We will consider these suggestions before taking any further decision."

He added, "As of now, the three-language formula is on hold. Schools will continue with the existing two-language system."

This comes days after Bhuse, on April 22, announced that Hindi would no longer be mandatory from Classes 1 to 5, following backlash from parents and educationists.

Dada Bhuse (R) attended the children's book fair in city jointly organised by the NBT, Pune Book Festival and PMC. HT

At the time, he had said that the Centre was not imposing Hindi, but implementing provisions of the National Education Policy (NEP) 2020.

"We had decided to issue a Government Resolution (GR) to remove the word 'mandatory'. New rules would be framed after reviewing the type of school, number of students, and available teachers.

However, the three-language formula will be implemented, and schools must accommodate other language choices," Bhuse had said.

Quoting NEP 2020, Bhuse said the policy promotes multilingualism and unity, but with flexibility.

"No language will be imposed. Students will be able to choose their languages, as long as two out of the three are native to India," he said.

A week before the latest announcement, the school education department had stated that Hindi would be made compulsory as the third language in Marathi and English-medium schools from Classes 1 to 5. Currently, only Marathi and English are compulsory in these schools up to Class 4.

New rule for in-house quota admissions

A new state government rule could disrupt in-house quota admissions for class 11 students in several junior colleges in Pune. The revised guideline—introduced ahead of the statewide online admission process starting May 26—states that in-house quota seats will be available only if the school and junior college operated by the same management are located on the same campus.

This marks a significant departure from previous practice, wherein colleges were allowed to reserve in-house seats even if they and the schools run by the same management were located on different campuses, often a few kilometres apart.

The change is likely to impact several prominent institutions in Pune that run their schools and junior colleges on different campuses.

Hindustan Times 26.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City 27 May 2025_015
27 May 2025
www.dainikprabhat.com

बीबीए, बीसीए परीक्षा कॉलेज स्तरावर

विद्यापीठाचा संलग्न महाविद्यालये, संस्थांना आदेश

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २६ - नव्याने सुरू झालेल्या बीबीए, बीसीए अभ्यासक्रमाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घेण्याचे आदेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिले आहेत.

विद्यापीठाचे कार्यक्षेत्र असलेल्या पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थांना वेळोवेळी प्रथम वर्षाच्या परीक्षाबाबत सूचित करण्यात आले होते. त्यात बीबीए, बीबीए

(आयबी) बीसीए (सीए) बीसीए (सायन्स) बीसीए (कॉमर्स) या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार प्रात्यक्षिक परीक्षा २ ते ७ जून आणि लेखी परीक्षा ९ ते २१ जून या कालावधीत घ्याव्यात, असेही परीक्षा विभागाने म्हटले आहे.

दरम्यान, विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात बीए, बीकॉम आणि बीएस्सी या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाची परीक्षा महाविद्यालयस्तरावर होतात. तसेच, निकालही महाविद्यालयाकडून होतात. त्याच धर्तीवर बीबीए, बीसीए या अभ्यासक्रमांची प्रथम वर्षाची परीक्षा घेण्याचा निर्णय पुणे विद्यापीठाने घेतला आहे. गतवर्षीपासून या अभ्यासक्रमाला व्यावसायिक दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांची पसंती वाढली आहे.

बीबीए व बीसीएच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावरच घ्या

- **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे संलग्न महाविद्यालयांना निर्देश**

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थांनी नव्याने सुरू झालेल्या बीबीए व बीसीए अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घ्याव्यात, असे निर्देश विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळातर्फे देण्यात आले आहेत. त्यानुसार प्रात्यक्षिक परीक्षा या येत्या २ ते ७ जून तसेच लेखी परीक्षा ९ जून ते २१ जून या कालावधीत घ्याव्यात, असेही परीक्षा विभागाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात स्पष्ट केले आहे.

पुणे विद्यापीठाचे संलग्न असणाऱ्या पुणे, अहिल्यानगर, नाशिक या कार्यक्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना वेळोवेळी प्रथम वर्षाच्या परीक्षाबाबत सूचित केले होते. त्यात बीबीए, बीबीए (आयबी), बीसीए (सीए), बीसीए (सायन्स), बीसीए (कॉमर्स) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा संबंधित महाविद्यालयांनी घ्याव्यात. विद्यापीठाने यापूर्वी २८ ऑक्टोबर २०२४, १५ मार्च २०२५ आणि १२ मे २०२५ या तारखांना परीक्षेसंदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले होते. या परिपत्रकांचा आधार घेऊन सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी व मान्यताप्राप्त संस्थांच्या संचालकांनी संस्थास्तरावर परीक्षेचे आयोजन करावे, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी स्पष्ट केले आहे.

Pudhari 27.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

'प्रथम वर्ष बीबीए, बीसीए परीक्षा महाविद्यालय स्तरावर घ्याव्यात'

पुणे, ता. २६ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या सर्व महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त संस्थांनी नव्याने सुरू झालेल्या बीबीए आणि बीसीए अभ्यासक्रमाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर . घ्याव्यात, असा आदेश विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने दिला आहे. त्यानुसार, अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा येत्या दोन ते सात जून, तसेच लेखी परीक्षा ९ ते २१ जून या कालावधीत घेण्यात याव्यात, असेही परीक्षा विभागाने स्पष्ट केले आहे.

पुणे, अहिल्यानगर, नाशिक आणि दादरा नगर हवेली या कार्यक्षेत्रातील विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या सर्व महाविद्यालय आणि मान्यताप्राप्त संस्था यांना वेळोवेळी प्रथम वर्षाच्या परीक्षाबाबत यापूर्वीच सूचित करण्यात आले होते. त्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नव्याने सुरू झालेल्या अभ्यासक्रमांच्या उन्हाळी प्रथम वर्ष परीक्षा (द्वितीय सत्र) महाविद्यालय स्तरावर आयोजित करण्याची सूचना विद्यापीठाने दिली आहे. त्यात बीबीए, बीबीए (आयबी), बीसीए (सीए), बीसीए (सायन्स), बीसीए (कॉमर्स) या अभ्यासक्रमाच्या परीक्षा संबंधित महाविद्यालयांनी घ्याव्यात, असे विद्यापीठाने परिपत्रकात नमूद केले आहे. विद्यापीठाने यापूर्वी २८ ऑक्टोबर २०२४, १५ मार्च २०२५ आणि १२ मे २०२५ या दिवशी परीक्षेच्या संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले होते. या परिपत्रकांचा आधार घेऊन सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी आणि मान्यताप्राप्त संस्थांच्या संचालकांनी आपल्या स्तरावर परीक्षेचे आयोजन करावे, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी स्पष्ट केले आहे.

Sakal 27.5.2025

सामना

बीबीए, बीसीएच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घ्याव्यात; विद्यापीठाचे निर्देश

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या सर्व महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्थांनी नव्याने सुरू झालेल्या बीबीए व बीसीए अभ्यासक्रमाच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर घ्याव्यात, असे निर्देश विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे देण्यात आले आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा येत्या २ ते ७ जून तसेच लेखी परीक्षा ९ ते २१ जून या कालावधीत घ्याव्यात, असेही परीक्षा विभागाने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. पुणे विद्यापीठाच्या संलग्न असणाऱ्या पुणे, अहिल्यानगर, नाशिक आणि दादरा नगर हवेली या कार्यक्षेत्रातील सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था यांना वेळोवेळी प्रथम वर्षाच्या परीक्षेबाबत सूचित करण्यात आले होते. त्यात बीबीए, बीबीए (आयबी), बीसीए (सीए), बीसीए (सायन्स), बीसीए (कॉमर्स) या अभ्यासक्रमाच्या परीक्षा संबंधित महाविद्यालयांनी घ्याव्यात, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी स्पष्ट केले आहे.

सामना

Pune Edition
May 27, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

'एनसीईआरटी'कडून २८ मोफत अभ्यासक्रम

पुणे : राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद अर्थात एनसीईआरटी शिक्षण मंत्रालयाच्या 'स्वयंम प्लॅटफॉर्म'द्वारे इयत्ता अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी २८ मोफत ऑनलाइन अभ्यासक्रम शिकवले जाणार आहेत. दर्जेदार शिक्षणाची उपलब्धता वाढवण्याच्या उद्देशाने, हे मॅसिव्ह ओपन ऑनलाइन कोर्सेस उपलब्ध केले आहेत. यामध्ये ११ मुख्य विषयांचा समावेश आहे. ज्यामध्ये गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, अकाउंटन्सी, व्यवसाय अभ्यास, अर्थशास्त्र, इंग्रजी, भूगोल, मानसशास्त्र आणि समाजशास्त्र यांचा समावेश आहे. सर्व विद्यार्थ्यांसाठी खुले असलेले हे अभ्यासक्रम २४ आठवड्यांमध्ये तयार केले आहेत आणि ते स्वयंम पोर्टल आणि मोबाईल ॲपवर उपलब्ध आहेत.

या अभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्यासाठी १ सप्टेंबर २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांना सामील होण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल. अंतिम परीक्षांसाठी नोंदणी ७ ते ९ सप्टेंबर दरम्यान होईल आणि परीक्षा १० ते १५ सप्टेंबर दरम्यान होणार आहेत, ज्या दरम्यान अभ्यासक्रमाचा कालावधी संपेल. प्रत्येक अभ्यासक्रमाची रचना आणि वितरण वरिष्ठ एनसीईआरटीच्या प्राध्यापक आणि प्रादेशिक शिक्षण संस्था आणि इतर विभागांमधील विषय तज्ज्ञांनी केले आहे.

Pudhari 27.5.2025

प्रभात City 27 May 2025_015 27 May 2025

ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश नको

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २६ - अकरावी ऑनलाइन प्रवेशसाठी ग्रामीण व दुर्गम भागातील साधनांचा अभाव, त्यासाठीचा खर्च आणि ग्रामीण भागातील सध्याच्या पारदर्शक अकरावी प्रवेश प्रक्रियेचा विचार करून ग्रामीण भागात ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवू नये, अशी मागणी विधान परिषदेचे आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.

ग्रामीण भागात अनेक ठिकाणी इंटरनेट सेवा नसल्याने विद्यार्थ्यांना तालुक्याच्या गावी जाऊन सायबर कॅफेतून अर्ज भरावा लागेल. अनेकांकडे ऑनलाइन प्रवेशास योग्य मोबाइल नाहीत. शहरातील ऑनलाइन प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सप्टेंबर महिना उजाडतो. त्यामुळे प्रथम सत्रात ११ वी चे वर्ग फारच कमी काळ भरविले जातात. ग्रामीण भागातही हेच चित्र असेल, असे अभ्यंकर यांनी म्हटले आहे.

प्रभात City 27 May 2025_015 27 May 2025

पहिलीच्या शिक्षकांना प्रशिक्षणाचे धडे

नवीन अभ्यासक्रमाची अंमलबजावणी

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २६ - राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणातील नवीन अभ्यासक्रमाची या शैक्षणिक वर्षापासून टप्प्याटप्प्याने अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्यासाठी पहिलीच्या शिक्षकांना प्रशिक्षणाचे धडे गिरवावे लागणार आहेत.

नवीन शैक्षणिक वर्ष १६ जून २०२५ पासून सुरू होत असल्याने त्यापूर्वी हे प्रशिक्षण पूर्ण होणे आवश्यक आहे.

प्रशिक्षण शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व खासगी अनुदानित शाळांमधील सर्व माध्यमांच्या शिक्षकासाठी असेल. याशिवाय खासगी विनाअनुदानित व स्वयंअर्थसहायित शाळांमधील शिक्षकासाठी स्वतंत्रपणे लागू असेल. प्रत्येक शाळेतील पहिलीच्या सर्व शिक्षकांना प्रशिक्षण मिळेल, अशा पद्धतीने नियोजन करावे लागणार आहे. शिक्षकांच्या एकूण संख्येनुसार ५० जणांची एक बॅच असणार आहे. त्यांच्या प्रशिक्षणाचा कालावधी एकूण ३ दिवस आहे. प्रशिक्षणार्थीसाठी पूर्वचाचणी, उत्तरचाचणी आणि अभिप्राय फॉर्म ऑनलाइन स्वरूपात भरून घेण्यात येणार आहेत. प्रशिक्षण हे मराठी, उर्दू व इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षकांसाठी स्वतंत्रपणे असेल.

जिल्हास्तरावर मराठी माध्यमांच्या शाळांसाठी २८ ते ३० मे, उर्दू व इंग्रजी माध्यमांसाठी २ ते १५ जून, तालुका स्तरावर मराठी माध्यमासाठी २ ते १५ जून या कालावधीत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. १५ जूनपर्यंत हे प्रशिक्षण पूर्ण होईल अशा पद्धतीने नियोजन करावे, असे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार यांनी स्पष्ट केले आहे.

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात City 27 May 2025_015
27 May 2025

पाचवीपासून तिसरी भाषा हवी- किर्दत

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि.२६ - राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये पाचवीपासून तिसरी भाषा शिकवावी, अशी मागणी आम आदमी पार्टीचे प्रवक्ता मुकुंद किर्दत यांनी राज्य सरकारकडे केली आहे.

पहिलीपासून तिसरी भाषा म्हणून हिंदी अनिवार्य केली होती. मात्र याला विरोध दर्शविण्यात आला. हिंदी सक्तीबाबत आपने स्पष्ट भूमिका घेतली होती. केवळ हिंदीची सक्ती नको अशी भूमिका न घेता तिसरी भाषा पहिलीपासून नकोच, अशी मागणी आपने केली होती.

लोकमत

पहिल्या दिवशी २० हजार ५११ नोंदी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : अकरावी प्रवेश प्रक्रिया सोमवारी (दि. २६) सकाळी सुरू करण्यात आली असून, प्रवेशाच्या पहिल्या दिवशी पुण्यात २० हजार ५११ नोंदी झाल्या आहेत, अशी माहिती शिक्षण संचालनालयाने दिली आहे. याचबरोबर पुणे विभागात १५२१ कॉलेजची नोंदणी झालेली असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

विनाअडथळा सुरळीत पार पडावी, यासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने विभागस्तरीय प्रवेश नियंत्रण समिती गठित केली असून, अध्यक्षस्थानी शिक्षण उपसंचालक सुनंदा वाखारे आहेत. सदस्य म्हणून सुधीर भोसले, विक्रम काळे, सचिन हलदले, सुवर्णा फणसे आणि सदस्य सचिव म्हणून सहायक संचालक डॉ. ज्योती परिहार सोळंकी यांच्यावर जबाबदारी आहे.

Pune Main
Page No. 2 May 27, 2025
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

नवभारत
www.navbharatlive.com

पहल | CBSE का स्कूलों को सख्त आदेश, मासूमों का बौद्धिक विकास होगा सरल

मातृभाषा में हो पहली पढ़ाई, इसमें ही भलाई

■ दिल्ली, नवभारत ब्यूरो. प्रारंभिक शिक्षा में भाषा आधारित सीखने की प्रक्रिया को बदलने की दिशा में एक बड़े कदम के रूप में केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड (सीबीएसई) ने सभी संबद्ध स्कूलों को शैक्षणिक सत्र 2025-26 से स्कूली शिक्षा के लिए राष्ट्रीय पाठ्यचर्या रूपरेखा (एनसीएफ-2023) के तहत भाषा निर्देश प्रावधानों को लागू करने का निर्देश दिया है. बोर्ड ने स्कूली शिक्षा के आधारभूत और प्रारंभिक चरणों में शिक्षा के माध्यम के रूप में मातृभाषा या घरेलू भाषा के उपयोग पर विशेष रूप से जोर दिया है. सीबीएसई ने स्कूलों को छात्रों के लिए तुरंत भाषा मैपिंग अभ्यास शुरू करने और मई 2025 के अंत तक एनसीएफ कार्यान्वयन समिति के गठन को पूरा करने का निर्देश दिया. यह निर्देश एनईपी 2020 के साथ व्यापक समन्वय का हिस्सा है, जो बहुभाषी शिक्षा के माध्यम से समानता, समावेशी और संज्ञानात्मक विकास को प्राथमिकता देती है.सीबीएसई के अनुसार साक्षरता की पहली भाषा (आर1) आदर्श रूप से छात्र की मातृभाषा या एक परिचित क्षेत्रीय या राज्य भाषा होनी चाहिए. सीबीएसई ने एनसीएफ-2023 (भाग सी, पृष्ठ 239) से उद्धृत किया, 'जब तक किसी अन्य भाषा में मूलभूत साक्षरता हासिल नहीं हो जाती, तब तक आर1 को शिक्षण माध्यम के रूप में काम करना चाहिए.

घरेलू भाषा ही होनी चाहिए प्राथमिक माध्यम

बोर्ड ने स्वीकार किया कि ऐसे मामलों में जहां कक्षा की विविधता या लिखित परंपरा की कमी के कारण मातृभाषा व्यावहारिक नहीं है, राज्य की भाषा आर1 के रूप में काम कर सकती है. सीबीएसई ने स्पष्ट किया कि फाउंडेशनल स्टेज (प्री-प्राइमरी से ग्रेड 2, उम्र 3-8) में बच्चे की घरेलू भाषा ही शिक्षा का प्राथमिक माध्यम होनी चाहिए. स्कूलों को यह सुनिश्चित करना चाहिए कि बच्चे आर1 में मूलभूत साक्षरता हासिल करें, जिसमें धाराप्रवाह पढ़ने, पाठों को समझने और व्यक्तिगत अनुभवों को व्यक्त करने वाले छोटे वाक्य लिखने की क्षमता शामिल है. इसके अलावा, छात्रों को मौखिक प्रदर्शन के माध्यम से दूसरी भाषा (आर2) सीखना शुरू करना चाहिए.

सीखने के संसाधन और शिक्षण शास्त्र

पूर्व-प्राथमिक स्तरों (बालवाटिका) के लिए सीबीएसई ने जादुई पिटारा और ई-जादुई पिटारा जैसे खेल-आधारित संसाधनों के उपयोग को प्रोत्साहित किया, जो कई भारतीय भाषाओं में उपलब्ध हैं. ग्रेड 1 और 2 के लिए एनसीईआरटी की पाठ्यपुस्तकों की सिफारिश की जाती है, जिनके हिंदी, उर्दू और अंग्रेजी में प्रिंट संस्करण उपलब्ध हैं और एनसीईआरटी की वेबसाइट पर कई अन्य भाषाओं में डिजिटल संस्करण उपलब्ध हैं. प्रारंभिक चरण (ग्रेड 3-5, आयु 8-11) में छात्र आर1 में सीखना जारी रख सकते हैं. हालांकि स्कूल आर2 में बदलाव की अनुमति दे सकते हैं, यदि बच्चा इसमें पर्याप्त साक्षरता हासिल कर लेता है. सीबीएसई ने एनसीएफ-2023 के खंड 1.6.1 (डी), पृष्ठ 36 का उल्लेख करते हुए कहा कि चूंकि आर1 में ही साक्षरता सबसे पहले प्राप्त होती है, इसलिए इसे अन्य विषयों के लिए शिक्षण माध्यम के रूप में इस्तेमाल किया जाना चाहिए.

Pune Edition
May 27, 2025 Page No. 1
Powered by: navbharatlive.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकमत

अकरावी प्रवेश अर्ज प्रक्रियेला अखेर सुरुवात

राज्य मंडळाने तांत्रिक बिघाड केले दूर

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : राज्यभरात अकरावीची प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. यंदा प्रथमच संपूर्ण राज्यात केंद्रीय, ऑनलाइन पद्धतीने ती राबविली जात आहे. यात काही तांत्रिक अडचणी येत होत्या. राज्य मंडळाने तातडीने उपाययोजना करून सोमवारपासून (दि. २६) ही प्रक्रिया पुन्हा सुरू केली आहे. राज्यातील उच्च माध्यमिक विद्यालयातील प्रवेशाकरिता विद्यार्थ्यांना https://mahafyjcadmissions.in या अधिकृत संकेतस्थळावरून घरबसल्या राज्यातील कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश घेता येणार आहे. प्रवेश अर्ज करण्याची अंतिम मुदत ३ जून आहे.

विशेष म्हणजे राज्य मंडळाने वरील अधिकृत संकेतस्थळावर करिअर पाथ (Career Path) अशी एक लिंक दिली आहे, ज्यामध्ये जवळपास १५० पेक्षा जास्त करिअर आणि संबंधित अभ्यासक्रमाची माहिती आहे. करिअर निवडीबाबत विद्यार्थी आणि पालकांना याचा निश्चित फायदा होणार आहे.

दरम्यान, विद्यार्थी नोंदणी बुधवारीच (दि.२१) सुरू केली होती. परंतु, तांत्रिक बिघाडामुळे विद्यार्थ्यांसह पालकांची गैरसोय झाला होती. याची दखल घेत शिक्षण विभागाने संकेतस्थळात येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्याचे काम हाती घेतले होते. पहिल्या नियमित फेरीसाठी विद्यार्थी नोंदणी आणि पसंतीक्रम भरण्याची सुविधा सोमवारी सकाळी अकरा वाजेपासून सुरू झाली आहे.

अशी राबविली जाणार फेरी

सोमवार (दि. २६) ते येत्या मंगळवारपर्यंत (दि. ३ जून) विद्यार्थी नोंदणी व महाविद्यालयांचा प्राधान्यक्रम निश्चित

तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी ५ जून रोजी जाहीर होणार. त्यानंतर दोन दिवस हरकती नोंदविता येतील.

अंतिम सर्वसाधारण गुणवत्ता यादी ८ जून रोजी जाहीर केले जाणार

महाविद्यालयनिहाय विद्यार्थी वाटप यादी १० जून रोजी जाहीर होईल.

विद्यार्थ्यांच्या लॉगइनमध्ये महाविद्यालय वाटप, कटऑफ जाहीर होणार.

मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे, प्रवेशनिश्चिती करणे आदी प्रक्रिया ११ ते १८ जूनदरम्यान पूर्ण करण्यात येणार आहे.

अधिकृत 'व्हॉट्सअॅप चॅनल'

अकरावीत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी आणि पालकांना मदत व्हावी म्हणून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागातर्फे https://whatsapp.com/channel/0029VbB2T6DBA1etTOdyi1OC हे अधिकृत व्हॉट्सअॅप चॅनल सुरू केले आहे. याद्वारे प्रवेश प्रक्रियेतील सर्व अद्ययावत माहिती, सूचना दिल्या जात आहेत.

Pune Main
Page No. 2 May 27, 2025
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

अकरावी प्रवेशाच्या संकेतस्थळावर 'करिअरच्या वाटा'

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : अकरावीच्या प्रवेशासाठीची ऑनलाइन नोंदणी अखेर सोमवारी सुरळीत सुरू झाली. पहिल्याच दिवशी राज्यभरातून २ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. विशेष म्हणजे, यंदा प्रथमच प्रवेशाच्या संकेतस्थळावर स्मार्टफोन दुरुस्तीपासून फॅशन डिझाइनिंगपर्यंतच्या १५०हून अधिक करिअर क्षेत्रांची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

संपूर्ण राज्यात यंदा प्रथमच अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन केंद्रीभूत पद्धतीने राबविण्यात येणार आहे. शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, १९ मेपासून नोंदणी सुरू होणार होती. मात्र, पहिल्याच दिवशी संकेतस्थळ कोलमडल्याने सुधारित वेळापत्रक जाहीर करावे लागले. संकेतस्थळातील अडचणी दूर करून सोमवारपासून नोंदणी प्रक्रिया सुरळीत सुरू झाल्याचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी सांगितले. दरम्यान, शिक्षण विभागाने यंदा अकरावी प्रवेशाच्या संकेतस्थळावर स्मार्टफोन दुरुस्ती, फॅशन डिझाइनिंग, चित्रपट, विपणन, कॅलिग्राफी, रेडिओ जॉकी, कंपनी सचिव, भारतीय प्रशासकीय सेवा अशा १५० हून अधिक क्षेत्रांची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे. करिअर क्षेत्रांबरोबर विविध अभ्यासक्रमांची पात्रता, कामाचे स्वरूप याबाबतची माहितीही प्रथमच देण्यात आली आहे.

लो

अखेर अकरावी प्रवेश सुरळीत सुरू झाले असून पहिल्या दिवशी २ लाखांवर विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व्हावे, म्हणून करिअर क्षेत्रांची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. सर्वसमावेशक पद्धतीने सर्व शाखांतील करिअरसंधी देण्यात आल्या आहेत, जेणेकरून विद्यार्थी करिअरचा विचार करू शकतील.
- **डॉ. महेश पालकर,** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक

जागांची आकडेवारी

कनिष्ठ महाविद्यालये - ९,३३७
उपलब्ध जागा - २०,८८,२९०
राखीव कोटा - २,१३,३५५
केंद्रीभूत प्रवेश - १८,७४,९३५

Loksatta 27.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकमत

नवीन शैक्षणिक धोरण : विद्यार्थी सक्षमतेचा आंतरशाखीय अभ्यासक्रम

भारतीय शिक्षण आजवर कला, विज्ञान आणि वाणिज्य या शाखांत बंदिस्त होते. जे अनेकदा विद्यार्थ्यांच्या अनुभवावर मर्यादा घालते. नवीन शैक्षणिक धोरणाच्या आधारे या सीमांना दूर करता येईल. यात विज्ञानाचा विद्यार्थीदेखील आता संगीत किंवा तत्वज्ञानाचा विषय ऐच्छिक म्हणून घेऊ शकतो. त्याचवेळी कला शाखेचा विद्यार्थी डेटा विश्लेषण किंवा पर्यावरण विज्ञानात खोलवर जाऊ शकतो. ही लवचिकता २१ व्या शतकातील नोकरी बाजारासाठी डिझाइन केलेली आहे.

नवी पॉलिसी

डॉ. दीपक ताटपुजे
तज्ज्ञ सल्लागार

विविध विषयांमधील अंतर्दृष्टी, पद्धती आणि संकल्पना एकत्रित करून अधिक व्यापक समज आणि कौशल्ये आत्मसात करण्याच्या दृष्टीने आंतरशाखीय (इंटरडिसीप्लिनरी) विषय अधिक पूरक ठरतात. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० यामुळे ही दृष्टी मिळवणे सोपे झाले आहे. विद्यार्थ्यांनी आंतरविद्याशाखीय विषय निवडल्यास मिळणाऱ्या संधी आणि फायद्यांबद्दल समजून घेणे गरजेचे आहे. या पद्धतीमुळे विविध विषय एकमेकांशी संवाद साधतात आणि एकमेकांवर प्रभाव पाडतात. विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पारंपरिक प्रणालीची सवय असलेले अनेक विद्यार्थी आंतरविद्याशाखीय शिक्षणाचे परिणाम किंवा फायदे पूर्णपणे समजून घेऊ शकत नाहीत. विषयांचे संयोजन केल्याने त्यांची समज कशी वाढू शकते, सर्जनशीलता कशी वाढू शकते आणि जटील वास्तविक जगातील आव्हानांना तोंड देण्यासाठी त्यांना व्यापक दृष्टिकोन कसा मिळू शकतो, याबद्दल त्यांना शिक्षित करणे आवश्यक आहे. हवामान बदलाला तोंड देण्यासाठी पर्यावरण विज्ञान, अर्थशास्त्र, समाजशास्त्र आणि अभियांत्रिकी या विषयांमधून अंतर्दृष्टी आवश्यक आहे.



आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रमात विषय

मूलभूत विषयाच्या कुशल विकासासाठी विद्यार्थी आंतर - विद्याशाखीय अभ्यासक्रमात इतिहास, पुरातत्व, मानव वंशशास्त्र, समाजशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, मानवी समाज, नैसर्गिक जग आदी विषय निवडू शकतात. यात सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक व पर्यावरणीय घटकांचे परीक्षण करून मानवी भूतकाळातील गुंतागुंत समजून घेता येईल. ही व्यापक समज प्राप्त करण्यासाठी इतिहासकार वारंवार इतर शाखांमधील सिद्धांत, पद्धती आणि डेटा वापरतात.

खोलवर रूजलेल्या मानसिकतेवर मात करा

आंतरविद्याशाखीय मार्ग आणि त्यांच्या करिअरच्या शक्यतांवर प्रकाश टाकण्यासाठी करिअर समुपदेशनाची आवश्यकता स्पष्ट झाली आहे. आंतरविद्याशाखीय पार्श्वभूमीच्या व्यावसायिकांसह कार्यशाळा, चर्चासत्र व परस्परसंवादी सत्र विद्यार्थ्यांना प्रेरणा देऊ शकतात. याव्यतिरिक्त, अभ्यासक्रम डिझाइनने आणि प्रकल्प - आधारित शिक्षणाद्वारे आंतरविद्याशाखीय समज वाढवण्याची आवश्यकता आहे. अंमलबजावणीतील आव्हानांमध्ये खोलवर रूजलेल्या मानसिकतेवर मात करणे, विविध विषयांसाठी पुरेशी संसाधने सुनिश्चित करणे व शिक्षकांना एकात्मिक पद्धतीने शिकवण्यासाठी प्रशिक्षण देण्याचा समावेश आहे.

Hello Pune
Page No. 7 May 27, 2025
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकमत

राज्य सरकारने ८ जुलै २०२४ रोजी परिपत्रक काढून मुलींना शंभर टक्के शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे जाहीर केले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर, मोठा गाजावाजा करत या योजनेची घोषणा झाली होती. उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण ५० टक्के असायला हवे, असा यामागचा उद्देश होता. सर्व जाती-प्रवर्गातील मुलींना लाभ देणारी ही योजना असून, सध्या योजनेच्या लाभाचे प्रमाण केवळ ३६ टक्के आहे. या योजनेचे बारकावे समजून घेऊयात.

योजनांचा पंचनामा

ॲड. कुलदीप आंबेकर
अध्यक्ष, स्टुडंट हेल्पिंग हँड्स

मुलींना खरंच शंभर टक्के शुल्क माफी मिळतेय का?

राज्य सरकारने ८ जुलै २०२४ रोजी परिपत्रक काढून मुलींना शंभर टक्के शुल्क माफ करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे जाहीर केले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर, मोठा गाजावाजा करत या योजनेची घोषणा झाली होती. खरं तर ही योजना अत्यंत चांगली आहे. त्यामागील हेतूही स्वच्छ आणि प्रामाणिक आहे. यावरून सदर योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत प्रशासन आणि शैक्षणिक संस्था इच्छुक नसल्याचे दिसते. उच्च शिक्षणात मुलींचे प्रमाण ५० टक्के असायला हवे, असा यामागचा उद्देश होता. सर्व जाती-प्रवर्गातील मुलींना लाभ देणारी ही योजना असून, सध्या या योजनेच्या लाभाचे प्रमाण केवळ ३६ टक्के आहे. यावरून सदर योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत प्रशासन आणि शैक्षणिक संस्था इच्छुक नसल्याचे दिसते. प्रथमदर्शनी तरी तसेच चित्र आहे. या योजनेचे हे पहिलेच वर्ष असल्याने फार अपेक्षा करू शकत नाही, पण या योजनेचे काही बारकावे आपण समजून घेणे आवश्यक आहे.

मुलींना शंभर टक्के शुल्क माफ ही योजना फक्त पदवी शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठीच आहे. शिवाय व्यावसायिक कोर्स करणाऱ्या ५४३ अभ्यासक्रमांनाच या योजनेचा लाभ मिळतो. काही अभ्यासक्रमांची भर घालण्यात आलेली आहे. मात्र, खासगी व अभिमत विद्यापीठांमध्ये शिकत असाल तर या योजनेचा लाभ मिळत नाही. उत्पन्न ८ लाखांच्या आत असावे, हा निकष आहे. पदव्युत्तर कोर्सला प्रवेश घेतला असल्यास याचा लाभ मिळत नाही. तसेच तुम्ही याव्यतिरिक्त कोणतीही शासकीय शिष्यवृत्ती घेत असाल, तर फक्त एकाच योजनेचा लाभ घेणे बंधनकारक आहे.

या योजनेसाठी वेगळी अर्ज प्रक्रिया नाही. आपण नेहमी ज्या पद्धतीने शिष्यवृत्तीचा अर्ज करतो, त्याच प्रकारे अर्ज भरायचा असतो. मुलींना प्रवेशाच्या वेळीच या योजनेचा लाभ मिळाला, तरच त्याचा खरा फायदा होतो. अन्यथा शैक्षणिक संस्थांचे अधिकारी सर्वप्रथम संपूर्ण शैक्षणिक फी भरण्याचा तगादा लावतात आणि वसुली करतात. नंतर परतावा दिला जाईल, असे सांगून वेळ मारून घेतात. परिणामी पालक व विद्यार्थ्यांवर मानसिक ताण येतो. परीक्षा देण्यासाठी संपूर्ण शुल्क भरले असेल, तरच विद्यार्थिनींना परीक्षेला बसू दिले जाते. अर्ज प्रक्रियेची गुंतागुंत असल्याने अनेक मुली अर्ज भरणे टाळतात.

सुरुवातीलाच या योजनेचा लाभ दिला गेला, तर लाखो मुलींना या योजनेचा फायदा होऊ शकतो. मात्र, आधी फी भरा, नंतर परतावा मिळेल असे म्हटले जाते, तेव्हा समजावे ही योजना केवळ कागदोपत्री आहे. विद्यार्थिनी केंद्रबिंदू ठेवून या प्रक्रियेत त्यांचे प्रतिनिधित्व समाविष्ट केल्यास ही योजना गरजूंपर्यंत पोहोचू शकते; अन्यथा आपण केवळ कोट्यवधींचे आकडे वाचत राहू, आणि मुलींची शैक्षणिक अवस्था 'जैसे थे' राहील.

मदत नाकारल्याने विद्यार्थिनींची कोंडी

सध्या दहावी-बारावीचे निकाल लागले आहेत. शैक्षणिक प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. तरीही या योजनेबाबत प्रशासन किंवा शैक्षणिक संस्था कोणतीही प्रसिद्धी करताना दिसत नाहीत. कुठेही कॅम्पस किंवा प्रसारमाध्यमांतून जाहिरात लावलेली नाही. पालक संभ्रमात आहेत. कोणीही माहिती देत नाही, काय करावे हे त्यांना सुचत नाही. दुसरी बाजू अशी की, सामाजिक क्षेत्रातील काही संस्था मुलींना शैक्षणिक फी माफ झालेली आहे, असे समजून मदत देण्यास नकार देत आहेत. यामुळे विद्यार्थिनींची कोंडी झाली आहे.

मागील शैक्षणिक वर्षातील या योजनेबाबतची माहिती घेतली असता, उच्च शिक्षण विभागाने केवळ ५ हजार ७२० मुलींचेच अर्ज पात्र ठरवले होते. त्यांचा फी परतावा अद्याप झालेला नाही. यासाठी शासन दरवर्षी ९०५ कोटींची तरतूद करणार आहे, असे शासन निर्णयात नमूद आहे. मात्र, यात समन्वयाचा अभाव आहे.

Hello Pune
Page No. 7 May 27, 2025
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Education

{ FYJC ADMISSIONS }

Chaos prevails as students face with technical glitch

The CAP, which was initially scheduled to begin on May 21, was postponed due to same technical fault

Kimaya Boralkar
puneletters@hindustantimes.com

PUNE: Despite the State School Education Department delaying the first-year junior college (FYJC) online admissions for 2025-26 for site maintenance, students still faced technical issues when the process resumed on Monday.

The centralised admission process (CAP), which was initially scheduled to begin on May 21, was postponed after students encountered issues accessing the portal.

Following these disruptions, the website was temporarily taken down for maintenance, with the system being brought back online on Monday.

This year, Maharashtra has introduced its first-ever centralised online admission system for Class 11 students.

The new digital initiative spans 9,281 junior colleges across the state, offering more than 20 lakh seats to students.

However, students argue that the admission process has been rushed, leaving them with little time to prepare for the various steps involved.



Students argue that the process has been rushed, leaving them with little time to prepare for admissions. REPRESENTATIVE PIC

Vedika Bhingare, a student from Vidya Vinay Niketan School, expressed her concerns: "I am stressed about admission as I won't be able to fill the form till May 31, when I will receive the school leaving certificate."

The state's sudden switch to a fully online, single-window allotment system has faced significant challenges. Many students claim that internet connectivity issues and slow speeds are hindering their ability to complete the process. Technical problems, including incorrect fee payment reflections persist even after the website's reopening.

Vinayak Madbhave from New English School shared his difficulties: "I've been trying to complete the admission form since this afternoon, but I'm facing multiple issues. First, I can't lock Part 1 of the form because it keeps showing 'missing registration details.'"

The digital divide, particularly in rural areas, is also a major concern. As per data, over 54 per cent of Maharashtra's population resides in rural areas, where access to reliable internet and digital devices is limited. This creates a serious obstacle for many students who are unable to navigate the online system effectively.

> THIS YEAR, MAHARASHTRA HAS INTRODUCED ITS FIRST-EVER CENTRALISED ONLINE ADMISSION SYSTEM FOR CLASS 11 STUDENTS

Sakshi Chintal from Seva Sadan School expressed her frustration with the OTP system: "Even though I've entered the correct mobile number, I'm not receiving the OTP. This whole process is extremely frustrating."

Under the revised schedule, the application process will close on June 3, 2025, and the provisional merit list is expected to be published on June 5, 2025.

However, there is growing demand from teachers, students, and parents for the option to conduct the admission process offline.

Ganesh Samant, a software professional and parent, shared his frustration: "I started the online application process today (Monday) and as I selected 'Pune City,' all the colleges did not appear in the drop-down list."

Hindustan Times 27.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
City 28 May 2025_005
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे 28 May 2025
www.dainikprabhat.com

अकरावी प्रवेशासाठी ४ लाख ६६ हजार नोंदणी

३ जूनपर्यंत अर्ज नोंदणीची मुदत

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २७ - राज्य शालेय शिक्षण विभागाने अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू केली असून दोन दिवसात ४ लाख ६६ हजार ४९९ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी नोंदणी केली आहे. सोमवार (दि.२६) पासून विद्यार्थी नोंदणी व महाविद्यालय पसंतीक्रम नोंदणी सुरू झाली आहे.

२ लाख २७ विद्यार्थ्यांनी अर्ज, शुल्क भरून नोंदणी केली आहे. १ लाख ७५ हजार ५८४ विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग १ भरला आहे. ८१ हजार ७६६ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदवून अर्ज लॉक केले आहेत. प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. येत्या ३ जूनपर्यंत अर्ज नोंदणी करता येणार असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ.महेश पालकर यांनी दिली.

प्राध्यापक भरती आता लोकसेवा आयोगामार्फत?

देवेश गोंडाणे, लोकसत्ता

नागपूर : राज्यातील विद्यापीठे आणि अनुदानित महाविद्यालयांत प्राध्यापक भरतीत मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार होत असल्याच्या तक्रारी असल्याने यापुढे महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा स्वतंत्र निवड मंडळाकडून प्राध्यापक भरती करावी, अशी सूचना राज्यपालांनी केल्याची माहिती आहे. त्यासाठी उत्तरप्रदेश, बिहारप्रमाणे महाराष्ट्रातही उच्च शिक्षण सेवा आयोग स्थापन करावे, अशी मागणी पुढे येत आहे.

जानेवारीत झालेल्या मुंबई विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यात राज्यपाल आणि कुलपती सी.पी. राधाकृष्णन यांनी विद्यापीठ आणि महाविद्यालयीन शिक्षकांची निवड 'पूर्णपणे गुणवत्तेवर' करण्यासाठी पारदर्शक व्यवस्था निर्माण करण्याची गरज व्यक्त केली होती. त्यानुसार, राज्यपाल कार्यालयाने राज्य सरकार आणि सार्वजनिक विद्यापीठांना महाराष्ट्र लोकसेवा आयोग किंवा वेगळ्या स्वतंत्र भरती मंडळामार्फत प्राध्यापक भरतीच्या शक्यतांचा शोध घेण्यास सांगितले. त्या अनुषंगाने, राज्यातील अकृषी विद्यापीठांमधील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापकांच्या निवड प्रक्रियेत अधिक पारदर्शकतेसाठी गुणांकन पद्धती निश्चित केल्याचे, उच्च शिक्षण मंत्र्यांनी जाहीर केले.

या निवड पद्धतीमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापनाला ८० टक्के गुण तर मुलाखतीसाठी २० टक्के गुण देण्यात येणार असले, तरी या निवड पद्धतीत गैरव्यवहार संपेलच, याची शक्यता कमी असल्याने अनुदानित महाविद्यालयातील सर्व पदे स्वतंत्र निवड मंडळाने करावी, अशा सूचना राज्यपालांनी केल्याचे समजते. यासंदर्भात प्रतिक्रियेसाठी उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांना संपर्क करूनही त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

बिहार, उत्तर प्रदेशात स्वतंत्र आयोग

उत्तर प्रदेशात १९८२ पासून उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांची भरती उत्तर प्रदेश उच्च शिक्षण सेवा आयोगाद्वारे केली जाते. उत्तर प्रदेश माध्यमिक शिक्षण सेवा निवड मंडळाद्वारेच माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भरती होते. आता, उच्च व माध्यमिक शाळांसाठी नव्याने उत्तर प्रदेश शिक्षण सेवा निवड आयोग तयार करण्यात आला आहे. बिहारमध्ये २०१७ मध्ये विद्यापीठ सेवा आयोगाची स्थापना स्थापन करण्यात आलीआहे.

महाराष्ट्रात उच्च शैक्षणिक संस्थांमधील शिक्षकांची भरती पारदर्शक व गैरव्यवहारमुक्त होण्यासाठी उत्तर प्रदेश, बिहारप्रमाणे महाराष्ट्र उच्च शिक्षण सेवा आयोग स्थापन करणे आवश्यक आहे. तसे निर्देश राज्यपालांनी शासनाला द्यावे.
- प्रा. डॉ. संजय खडक्कार,
माजी तज्ज्ञ सदस्य, विदर्भ वैधानिक विकास मंडळ.

Loksatta 28.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

अभियांत्रिकीच्या प्रवेश नियमावलीत बदल

पदविका अभ्यासक्रमांसाठी आता तीनऐवजी चार 'कॅप' होणार

पुणे, ता. २७ : राज्यात अभियांत्रिकी, हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी, वास्तूकला, औषधनिर्माणशास्त्र प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी तीनऐवजी चार केंद्रीय प्रवेश फेऱ्या (कॅप) होणार आहेत. या अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमावलीत बदल केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नव्या सुधारित नियमावलीनुसार प्रवेश प्रक्रिया राबविली जाईल, असे उच्च व तंत्रशिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

मिशन ॲडमिशन

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया आणि वास्तूकला परिषद यांच्या अंतर्गत असणाऱ्या पदविका अभ्यासक्रमांच्या विविध शिक्षण संस्थांमधील प्रवेशासाठी नियमावलीतील बदल लागू असेल. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांच्या अखत्यारितील प्रथम वर्ष पोस्ट एसएससी अभियांत्रिकी पदविका, थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका आणि प्रथम वर्ष पोस्ट एचएससी हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी पदविका, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी पदविका, तसेच वास्तूकला परिषद यांच्या अखत्यारित असलेल्या प्रथम वर्ष पोस्ट एसएससी वास्तूकला पदविका, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या अंतर्गत प्रथम वर्ष पोस्ट एचएससी औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश नियमावलीच्या बदलास उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाने सुधारित नियमावलींचा अध्यादेश जाहीर केला आहे. या निर्णयानुसार अभियांत्रिकी, हॉटेल मॅनेजमेंट, केटरिंग टेक्नॉलॉजी, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी, वास्तूकला आणि औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी 'केंद्रीय प्रवेश फेरी'ची नव्याने रचना केली आहे.

...असा असेल 'कॅप'अंतर्गत प्रवेश

- प्रवेश प्रक्रियेत यापूर्वी तीन कॅप फेऱ्या होत. नव्या निर्णयानुसार यंदापासून चार कॅप फेऱ्या होणार आहेत. त्यानंतर कोणत्याही सुधारणा फेऱ्या उपलब्ध नसतील. प्रवेश फेरीत दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या फेरीसाठी पात्र विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा ऑनलाइन प्राधान्यक्रम भरण्याची किंवा त्यात बदल करण्याची मुभा मिळणार आहे. विद्यार्थ्याला दुसऱ्या फेरीत त्याच्या पहिल्या तीन पसंतीपैकी आणि तिसऱ्या फेरीत सहा पसंतीपैकी महाविद्यालय मिळाल्यास, त्या जागांचे वाटप आपोआप स्थिर (ऑटो-फ्रिज) होईल आणि विद्यार्थ्यांना त्या जागेवर प्रवेश घेणे आवश्यक असेल.

प्रवेश रद्द केल्यास...

- प्रवेश रद्द करण्यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक असणार आहे. प्रवेश रद्द करण्याचा विनंती अर्ज केल्यानंतर त्याचा प्रवेश रद्द झाल्याचे समजले जाईल. अशा पद्धतीने प्रवेश रद्द केल्यानंतर विद्यार्थ्याचा त्या जागेवरील दावा संपुष्टात येईल आणि ती जागा पुढील वाटपासाठी उपलब्ध होईल. अंतिम मुदतीपूर्वी रद्द केल्यास विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्कातून एक हजार रुपये वजा करून शुल्क परतावा दिला जाईल. अंतिम मुदतीनंतर प्रवेश रद्द केल्यास शुल्काचा परतावा मिळणार नाही.

संस्थात्मक कोट्यातील प्रवेश

- संस्थात्मक कोट्यातील आणि कॅपनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीनेच करण्यात येईल. संस्थात्मक फेरीतील पात्र विद्यार्थ्यांची यादी, गुणवत्ता यादी, प्रवेश वेळापत्रक, अशी माहिती संस्थांना संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी लागणार आहे.

Sakal 28.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

विद्यापीठ घडवणार 'सीईओ'

सहकारी बँकांसाठी नव्या पदविका अभ्यासक्रमास जूनपासून सुरुवात

मटा विशेष

प्रथमेश गोडबोले
prathamesh.godbole
@timesofindia.com

पुणे : सहकारी बँकांचे अस्तित्व टिकविण्यासाठी आणि छोट्या नागरी सहकारी बँकांची घडी बसविण्यासाठी कार्यक्षम मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) मिळण्यासाठी 'पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन' आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. नागरी सहकारी बँकांमधील भावी अधिकाऱ्यांसाठी 'अॅडव्हान्स डिप्लोमा इन बँकिंग फॉर सीईओ' हा पदविका अभ्यासक्रम जूनपासून विद्यापीठात सुरू होणार आहे.

सहकारी बँकांना कार्यक्षम आणि अभ्यासू मुख्य कार्यकारी अधिकारी मिळत नाहीत, अशी गेल्या अनेक वर्षांपासूनची ओरड आहे. या बँकांमध्ये ज्येष्ठतेप्रमाणे 'सीईओं'ची नेमणूक होते. बऱ्याचदा बँकेतील कर्ज, ठेवी, मानव संसाधन, गुंतवणूक अशा विभागांत वर्षानुवर्षे राहिलेला कर्मचारी अनुभवामुळे कामांत निपुण होतो. त्यामुळे बँकेकडून त्याला तिथून हलविले जात नाही. त्यामुळे तो कर्मचारी, अधिकारी त्याच विभागात पदोन्नती घेऊन 'सीईओ' पदापर्यंत पोहोचतो.

अंतर्गत पदोन्नतीमुळे संबंधित कर्मचाऱ्याला अन्य कामांसाठी इतरांची मदत घ्यावी लागते. वास्तविक पाहता 'सीईओ'ला बँकेतील सर्व विभागांची माहिती असणे आवश्यक असते. 'रिझर्व्ह बँक' बँकांच्या सीईओ पदासाठी निश्चित निकष ठरवले आहेत. नागरी सहकारी बँकांकडे कौशल्यधारित मनुष्यबळ नसल्याने 'आम्हाला अपेक्षित असलेला कॉर्पोरेट गव्हर्नन्स तुम्ही देऊ शकत नाही,' अशी 'रिझर्व्ह बँके'ची नेहमी तक्रार असते. या पार्श्वभूमीवर असोसिएशनने गेल्या दोन-तीन वर्षांपासून या गोष्टीचा अभ्यास केला. बँकेमध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनाच 'सीईओ' पदासाठी तयार केल्यास संबंधित बँकेसाठी फायदेशीर ठरेल. पत्रव्यवहार, बैठका, करस्पॉन्डन्स, बँकेशी संबंधित सर्व अंगांची माहिती हवी असा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी एक समिती करण्यात आली. त्यामध्ये सेवानिवृत्त सीईओ, प्राध्यापक, सनदी लेखापाल, वकील यांचा समावेश होता. समितीने अभ्यासक्रम तयार केला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चर्चा केली. त्यांनी या कल्पनेचे स्वागत करून अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता दिली.

अभ्यासक्रमासाठी असोसिएशनकडून 'रिझर्व्ह बँके'चे सेवानिवृत्त अधिकारी, बँकिंग तज्ज्ञ, सनदी लेखापाल, माहिती तंत्रज्ञान क्षेत्र आणि विपणन क्षेत्रातील अधिकारी अशा तज्ज्ञांची नेमणूक करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या वाणिज्य विभागात हे वर्ग चालणार आहेत. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यापीठ परीक्षा घेऊन प्रमाणपत्रही देणार आहे. त्यासाठी विद्यापीठ आणि असोसिएशन यांच्यात करार करण्यात आला आहे. 'नागरी सहकारी बँकांमध्ये महत्त्वाचे पद असलेल्या सीईओ अधिकाऱ्यांसाठीचा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम जूनपासून वाणिज्य विभागात सुरू होत आहे. 'ग्रामीण भागातील नागरी सहकारी बँकांमध्ये 'सीईओ' म्हणून काम करण्यास अधिकारी तयार नसतात. ही गरज ओळखून या बँकांमधील अधिकाऱ्यांनाच प्रशिक्षण दिल्यास ते 'सीईओ' म्हणून काम करू शकतील,' असे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी सांगितले.

अभ्यासक्रमात काय?

- नागरी सहकारी बँकेत दहा वर्षांपासून कार्यरत अधिकारी या अभ्यासक्रमासाठी पात्र असतील.
- नागरी सहकारी बँकांच त्यांचे अधिकारी अभ्यासक्रमासाठी निवडतील.
- अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर किमान दहा वर्षे संबंधित बँकेतील नोकरी अधिकाऱ्यांना सोडता येणार नाही.
- हा अभ्यासक्रम म्हणजे संबंधित नागरी सहकारी बँकेची भांडवली गुंतवणूक असेल.
- दर वर्षी ३० अधिकारी अभ्यासक्रम पूर्ण करतील.

> "छोट्या नागरी सहकारी बँकांना सीईओ मिळत नाही; मिळाला तरी तो जास्त काळ टिकत नाही. ज्या नागरी सहकारी बँका अडचणीत येतात; त्यामागे मोठे कारण म्हणजे चांगला सीईओ नसणे हे आहे. या बँकांना त्यांच्याच स्टाफपैकी सीईओ मिळाल्यास त्या तग धरू शकतील. त्यामुळे लहान नागरी सहकारी बँकांनी त्यांचे अधिकारी या अभ्यासक्रमासाठी पाठवावेत. सहकारातील बँका सहकारातच राहण्यासाठी तेथे चांगले प्रशासकीय नेतृत्व तयार करणे हा या अभ्यासक्रमामागील हेतू आहे.
>
> – अॅड. सुभाष मोहिते, अध्यक्ष, पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन

(चित्र : एआय)

Maharashtra Times 28.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

Chandrakant Patil announces new grading criteria for libraries in state

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

PUNE: Maharashtra minister of higher and technical education, Chandrakant Patil, on Tuesday formally announced the classification criteria for libraries across the state, aimed at promoting modernisation, transparency, and wider access to library services. The new guidelines are expected to significantly benefit students and enhance the quality and availability of books in libraries.

According to Patil, "Libraries will now be classified into four categories - A, B, C, and D – based on the number of books available. An 'A' grade library must have more than 15,000 books; a 'B' grade library must house more than 5,000 books; a 'C' grade library must have at least 1,000 books; and a 'D' grade library must contain over 500 books. These revised benchmarks are designed to encourage libraries to expand their collections and improve overall standards."

Minister of higher & technical education, Chandrakant Patil

The announcement was made on Tuesday during a detailed presentation by the Directorate of Libraries at the state secretariat, with senior officials in attendance, including library director Ashok Gadekar and deputy secretary of the higher education department Ashok Mande.

ANNOUNCEMENT WAS MADE ON TUESDAY DURING A PRESENTATION BY THE DIRECTORATE OF LIBRARIES AT SECRETARIAT

Patil also emphasised the use of technology to streamline and make library processes more transparent. He directed officials to develop an online system for the classification and reclassification of eligible libraries, which would make the grading process more efficient and accessible.

"Library modernisation and ease-of-access must be prioritised. By adopting digital systems, library services can reach a much wider population," Patil said, underlining the importance of tech-driven solutions in the public library system.

The meeting also involved an in-depth discussion on library management systems; grant disbursement processes; functioning of divisional and district-level libraries; library committees; and the development of a new state library policy. As part of the new classification system, clear parameters have been set for upgrading a library's grade. For a 'D' grade library to be upgraded to 'C' grade, it must hold at least 1,001 books. Similarly, a 'C' grade library needs 5,001 books to move to 'B' grade whereas a 'B' grade library requires 15,001 books to qualify for the 'A' grade status.

Hindustan Times 28.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

SPPU issues circular for FY BBA, BCA exams

Kimaya Boralkar

kimaya.boralkar@hindustantimes.com

PUNE: The Savitribai Phule Pune University (SPPU) has issued a circular directing all affiliated colleges and recognised institutions to conduct first-year BBA and BCA examinations at the college level.

The circular issued on May 22 states that practical exams will be held from June 2 to June 7, followed by written exams from June 9 to June 21.

The exams are for the newly restructured BBA and BCA programmes introduced under the National Education Policy (NEP) 2020 and implemented from the 2024–25 academic year.

According to the circular issued by the university's examination department, the exams must be conducted for all first-year BBA and BCA courses, including BBA (general), BBA (international business), BCA (science), BCA (commerce), and BCA (computer applications).

The university had earlier issued circulars related to these exams on October 28, 2024; March 15, 2025, and May 12, 2025. Based on these, principals and directors of affiliated colleges and recognised institutions across Pune, Ahilyanagar, Nashik, and Dadra and Nagar Haveli have been instructed to make necessary arrangements.

Affiliated colleges

All affiliated colleges and recognized institutions affiliated to Pune University in Pune, Ahilyanagar, Nashik and Dadra Nagar Haveli were informed about the first year examination from time to time.

"Colleges are expected to conduct the exams at their level as per the directives issued," said Prabhakar Desai, director-in-charge, SPPU Examination and Evaluation Board.

Hindustan Times 28.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रभात
City 29 may 2025_015
29 May 2025

वरिष्ठ, निवडश्रेणीसाठी राज्यातील शिक्षकांना २ जूनपासून प्रशिक्षण

राज्यात एकाच वेळी मार्गदर्शन

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि.२८ - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे राज्यातील शिक्षकांना वरिष्ठ व निवडश्रेणीसाठी २ ते १२ जून दरम्यान ऑफलाइन प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

या प्रशिक्षणाची जबाबदारी एससीईआरटीकडे आल्यानंतर दोन वर्षे ऑनलाइन प्रशिक्षण दिले. यावर्षापासून ऑफलाइन प्रशिक्षण येणार आहे. याची नोंदणी झाली असून, तज्ज्ञ मार्गदर्शकाचे प्रशिक्षणही झाले आहे. जिल्हास्तरीय तज्ञांचे २९ पर्यंत मेपर्यंत प्रशिक्षण होईल. राज्यात एकाच वेळी नियोजित विषयाचे मार्गदर्शन केले जाईल. याशिवाय प्रशिक्षणार्थींचे एम सी क्यू पद्धतीने ऑनलाइन मूल्यमापन आणि ऑनलाईन उपस्थितीची नोंद होणार आहे. प्रशिक्षणासाठी वाचन साहित्य मराठी सोबतच इंग्रजी, उर्दूत उपलब्ध करून दिल्याची अशी माहिती प्रशिक्षण साहित्य लेखन व संपादन समिती सदस्य महेंद्र गणपुले यांनी दिली आहे. प्रशिक्षण प्राथमिक गट - पहिली ते आठवी, माध्यमिक गट - नववी, दहावी, उच्च माध्यमिक गट - अकरावी, बारावी आणि अध्यापक विद्यालय गट या चार गटासह कलाशिक्षक, शारीरिक शिक्षकासाठीही दिले जाईल.

बीबीए, बीसीएच्या जागा रिक्त राहण्याची चिन्हे

जागांच्या तुलनेत 'सीईटी'ला नोंदणीच कमी

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस, बीबीएम), संगणकशास्त्र पदवी (बीसीए) अभ्यासक्रमाच्या जागा यंदाही रिक्त राहण्याची चिन्हे आहेत. या अभ्यासक्रमाच्या सामाइक प्रवेश परीक्षेसाठी (सीईटी) उपलब्ध जागांपेक्षा कमीच नोंदणी झाली होती. नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी ८५ टक्के विद्यार्थ्यांनीच परीक्षा दिल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) बीबीए, बीएमएस, बीबीएम, बीसीए अभ्यासक्रम त्यांच्या अखत्यारित घेतले. त्यानंतर प्रवेश परीक्षा सीईटी सेलद्वारे घेण्यात आली. गेल्या वर्षी पहिले वर्ष असल्याने दोन वेळा सीईटी घेण्यात आली. सीईटी सेलने दिलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या वर्षी पहिल्या सीईटीला ५६ हजार ७९४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली, त्यापैकी ४८ हजार २१७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. दुसऱ्या सीईटीला नोंदणी केलेल्या ४९ हजार २२५ विद्यार्थ्यांपैकी ४२ हजार १२४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर यंदाच्या सीईटीसाठी ७२ हजार २५९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. त्यांपैकी ६१ हजार ६६६ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली आहे.

बीबीए, बीएमएस, बीबीएम, बीसीए अभ्यासक्रमांच्या राज्यभरात एक लाखांहून अधिक जागा उपलब्ध आहेत. गेल्या वर्षीही पुरेशा प्रतिसादाअभावी जागा रिक्त राहिल्या होत्या. उपलब्ध जागांच्या तुलनेत कमी झालेली नोंदणी, ८५ टक्केच विद्यार्थ्यांनी दिलेली परीक्षा यामुळे यंदाही या अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त राहण्याची चिन्हे दिसत आहेत.

> सीईटीला कमी प्रतिसाद मिळाल्याने जागा रिक्त राहण्याचा धोका आहे. शहरी भागातील नामांकित महाविद्यालयांतील ८५ टक्क्यांपर्यंत जागा भरू शकतात. मात्र, ग्रामीण भागातील महाविद्यालयांतील जागा अधिक प्रमाणात रिक्त राहतील. ही परिस्थिती लक्षात घेता पुरवणी सीईटी घ्यावी किंवा प्रवेशप्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागा भरण्यासाठी महाविद्यालयाच्या स्तरावर सीईटी घेऊन प्रवेश देण्याची मुभा द्यावी.
>
> **- प्रा. श्यामकांत देशमुख,** कार्यवाह, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

Loksatta 29.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

प्रवेशप्रक्रिया 'हँग'

अकरावी प्रवेशात तांत्रिक अडचणींची सरकारकडून कबुली

म. टा. प्रतिनिधी, पुणे

इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज नोंदणीला सुरुवात होऊन तीन दिवस झाले, तरीही अजून या प्रक्रियेतील अडथळे दूर झालेले नाहीत. वेबसाइटवर अर्ज भरताना बुधवारी विद्यार्थ्यांना अर्जाचा 'भाग दोन' भरताच येत नव्हता. वेबसाइटला काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याची कबुली सरकारने दिली असून त्यातील तांत्रिक दोष दूर करण्याचे काम बुधवारी रात्री तातडीने सुरू केल्याचा दावा शिक्षण संचालकांनी केला. विद्यार्थी व पालकांना गुरुवारपासून कोणत्याही अडचणी उद्भवणार नाहीत, असेही सरकारने स्पष्ट केले.

अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेच्या अर्जनोंदणीला २६ मे रोजी सुरुवात झाली. यंदा राज्यातील सर्व विभागात अकरावी प्रवेशप्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. यापूर्वी २२ मे रोजी अर्जनोंदणीच्या पहिल्याच दिवशी वेबसाइटमध्ये बिघाड झाला होता. त्यामुळे पुन्हा नव्याने वेळापत्रक जाहीर करण्यात आले होते. मात्र, अजूनही ही वेबसाइट सुरळीत कार्यान्वित झाली नसल्याचा फटका विद्यार्थी व पालकांना बुधवारी बसला. अनेक विद्यार्थ्यांना प्रवेश अर्जाचा भाग दोन भरता आला नाही, तर काही विद्यार्थ्यांना भाग एकची माहिती पूर्ण भरता आली नाही. अकरावी प्रवेश नियंत्रण समितीने विभागीय स्तरावर मदत कक्ष स्थापन केले असून विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी काही संपर्क क्रमांक जाहीर केले आहेत. मात्र, या क्रमांकावर संपर्क केला असता प्रतिसाद मिळत नसल्याचे विद्यार्थी आणि पालकांनी नाराजी व्यक्त केली.

तांत्रिक अडचणी किंवा इतर मार्गदर्शनासाठी ९०११६४३६४५, ८८५५०२९०६३, ९८९०७९३२३२ या क्रमांकावर किंवा dydpunefyjcadmissions@gmail.com या ईमेलवर संपर्क साधण्याचे आवाहन विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने केले आहे.

अकरावीच्या ऑनलाइन प्रवेशात सातत्याने तांत्रिक अडचणी येत असल्याने विद्यार्थी व पालकांना मनस्ताप होत आहे.

पुणे विभागात नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या

पुणे	६०,२०४
अहिल्यानगर	२२,३६४
सोलापूर	१४,६०५
एकूण पुणे विभाग	९७,१७३

"वेबसाइटला बुधवारी दुपारी काही वेळ तांत्रिक अडचण आली होती. ती तातडीने दूर करण्यात आली. या तांत्रिक अडचणी दूर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार बुधवारी रात्री दहानंतर या समस्या दूर करण्याचे काम हाती घेण्यात येईल. गुरुवारी दिवसभर अर्ज भरताना तांत्रिक अडचणी येणार नाहीत.

- डॉ. महेश पालकर,
शिक्षण संचालक, शिक्षण संचालनालय

संकेतस्थळ संथ

'अकरावी प्रवेश प्रक्रियेचे संकेतस्थळ अतिशय संथगतीने चालत आहे. प्रवेश अर्जाचा भाग दोन भरण्यास दिवसभरात अडचणी आल्या. संकेतस्थळ अतिशय संथगतीने चालणे, काही वेळा डेटा सेव्ह न होणे, वेबसाइटचे पेज न उघडणे अशा अडचणी येत आहेत,' असे शैलेंद्र भोसले आणि अर्णव लाहुडकर या विद्यार्थ्यांनी सांगितले.

■ नेमकी समस्या काय?

एकाच वेळी अनेकांकडून वेबसाइट उघडली जाते. त्यामुळे त्यावर काही वेळा ताण येऊन वेबसाइट संथगतीने चालते. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना इंटरनेट नसल्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी जाऊन सायबर कॅफेत तासाला पैसे मोजून अर्ज सादर करावा लागतो.

■ इनहाउस कोट्याचे काय?

यापूर्वी संस्थांतर्गत कोट्यात (इनहाउस) एकाच संस्थेची माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात असणे बंधनकारक नव्हते. त्यामुळे एकाच संस्थेच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याच संस्थेच्या शहरातील किंवा प्रतिष्ठित कनिष्ठ महाविद्यालयामध्ये प्रवेश घेता येणे शक्य होते. मात्र, यंदा संस्थेची माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय एकाच संकुलात नसतील, अशा शाळांमधील दहावी विद्यार्थ्यांना इनहाउस कोट्यातून त्याच संस्थेच्या अकरावीमध्ये प्रवेश घेता येणार नाही, असा नियम केला आहे. याबाबत मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्र्यांकडे संस्था, पालक, विविध संघटनांनी पत्र पाठवून आणि इतर माध्यमातून तक्रारी केल्या असून हा निर्णय राज्य सरकार स्तरावर होणे अपेक्षित आहे. तीन जूनपर्यंतच प्रवेश प्रक्रियेची मुदत असल्याने याबाबत कधी निर्णय होणार, अशी विचारणा होत आहे.

Maharashtra Times 29.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

'इनहाउस'बाबत वाढत्या तक्रारी

हिंदू महासंघाचे शालेय शिक्षणमंत्र्यांना निवेदन

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्य सरकारने लागू केलेल्या विविध नियमावली, ऑनलाइन प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना अपेक्षित महाविद्यालयांत प्रवेश मिळणे कठीण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या शाळेचेच महाविद्यालय संकेतस्थळावर दिसत नसल्याने संस्थांतर्गत कोट्यातील (इनहाउस) प्रवेशासाठीचा सुधारित नियम जाचक ठरत आहे. त्यामुळे तो तातडीने रद्द करावा आणि पूर्वीच्याच नियमाप्रमाणे अकरावी प्रवेशप्रक्रिया राबवावी, अशी मागणी पालकांनी बुधवारी केली.

अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेतील त्रुटींबाबत पालकांनी

मिशन ॲडमिशन

हिंदू महासंघाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली. महासंघाचे संस्थापक अध्यक्ष आनंद दवे, कविता दोशी, आदिती जोशी, तृप्ती तारे, नितीन शुक्ल, तृप्ती वाकडे आणि अजित जोशी आदी या वेळी उपस्थित होते. हिंदू महासंघाच्या पालक आघाडीने शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांची मुंबईत निवासस्थानी भेट घेऊन निवेदन दिले. अकरावी प्रवेशाच्या निर्णयामध्ये, आवश्यक बदल करण्याबाबत या वेळी चर्चा करण्यात आली. भुसे यांनी पालक आघाडीला सकारात्मक आश्वासन दिले आहे. मात्र, तीन जूनपर्यंतच प्रवेशप्रक्रियेची मुदत असल्यामुळे पालक आघाडी मागणीबाबत आक्रमक राहणार आहे. सीईटीप्रमाणे प्रवेशप्रक्रिया सुलभ असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, प्रत्यक्षात अडचणी येत आहेत. प्रवेशप्रक्रियेतील अर्ज भरण्यासाठी असलेल्या संकेतस्थळावर तांत्रिक अडचणी येत आहेत. विद्यार्थ्यांच्या शाळेचेच महाविद्यालय संकेतस्थळावर दिसत नाही. घरापासून जवळ असलेले महाविद्यालयदेखील संकेतस्थळावर दिसत नाही. महाविद्यालयात असलेल्या प्रशासकीय जागादेखील शासकीय जागा सरकारकडे जमा झाल्याने महाविद्यालयांकडे पर्याय शिल्लक नाही.

'याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याशी बोलणे झाले आहे. आज, गुरुवारी सकाळपर्यंत तोडगा काढण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, तीन जूनपर्यंत प्रवेशप्रक्रियेसाठी मुदत असल्याने तोवर निर्णय न झाल्यास हिंदू महासंघाकडून राज्यभर पालक आणि विद्यार्थ्यांना घेऊन आंदोलन करणार आहे,' असेही आनंद दवे यांनी सांगितले.

Maharashtra Times 29.5.2025

बीबीए, बीसीए अभ्यासक्रमांच्या परीक्षांची प्रवेशपत्रे उपलब्ध

पुणे, ता. २८ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील उन्हाळी सत्रात केवळ महाविद्यालय स्तरावर आयोजित केलेल्या प्रथम वर्ष बीबीए, बीबीए (कॉम्प्युटर ॲप्लिकेशन), बीबीए (इंटरनॅशनल बिझनेस), बीसीए (वाणिज्य), बीसीए (विज्ञान) या अभ्यासक्रमांचे नियमित अथवा पुनर्परीक्षार्थींची एकत्रित परीक्षा प्रवेशपत्रे संबंधित महाविद्यालयांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून दिली आहेत.

प्रवेशपत्रामध्ये दुरुस्तीचा कालावधी
२८ ते ३१ मे

अंतर्गत गुण भरण्याचा कालावधी
२८ मे ते १० जून

या परीक्षा प्रवेशपत्रात काही त्रुटी, आवश्यक विषयांचा समावेश नसणे, नावातील दुरुस्ती, अतिरिक्त/कमी विषय, ॲड ऑन क्रेडिट विषयांचा समावेश नसणे, असे असल्यास त्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती महाविद्यालयाने करावी, असा आदेश सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या छाननी व तालिनीकरण कक्षाने दिली आहे. विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल हे दिलेल्या मुदतीत जाहीर करण्याच्या अनुषंगाने यानंतर कोणत्याही परिस्थितीत अंतर्गत गुण भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात येणार नाही. असेही विद्यापीठाच्या छाननी व तालिनीकरण कक्षाचे उपकुलसचिव प्रदीप कोळी यांनी नमूद केले आहे.

Sakal 29.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

अकरावी प्रवेशातील बदल मागे घ्यावा

'सकाळ'चा पाठपुरावा : आमदार कांबळे यांची मागणी

पुणे, ता. २८ : दहावी उत्तीर्ण झालेल्या शाळेच्या आवरातच कनिष्ठ महाविद्यालय असल्यास इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्याला 'इन-हाउस' कोटा लागू असेल, असा बदल राज्य सरकारने यंदा केला आहे. या निर्णयाचा फटका विद्यार्थ्यांना बसणार असून, त्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. तरीदेखील सरकारने विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेता अद्याप कोणतीही ठोस पावले उचलली नाहीत. परिणामी अखेर आमदार सुनील कांबळे यांनीच राज्य सरकारला अकरावी प्रवेशाच्या सुधारित नियमाचा पुनर्विचार करण्याची सूचना केली आहे.

राज्यातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. दरम्यान, राज्य सरकारने संस्थात्मक (इन-हाऊस) प्रवेश नियमावलीत बदल केला आहे. विद्यार्थी एखाद्या शैक्षणिक संस्थेच्या शाळेतून दहावी उत्तीर्ण झाल्यास, त्याला त्या संबंधित संस्थेच्या कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयात आतापर्यंत 'संस्थात्मक' कोट्यांतर्गत प्रवेश मिळत होता. परंतु, या नव्या बदलानुसार, शाळेच्या आवारातच असणाऱ्या कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासाठी 'संस्थात्मक' कोटा लागू असणार आहे. नियमावलीतील या बदलामुळे विद्यार्थी-पालकांमध्ये नाराजी असून याबाबतचे वृत्त 'सकाळ'ने २३ मे रोजी 'इन-हाऊस कोट्यांतर्गत नियमात बदल' या शीर्षकाने प्रसिद्ध केले होते.

शिक्षणमंत्र्यांनाही निवेदन

"अकरावी प्रवेशाच्या संस्थात्मक कोट्यातील सुधारित नियमाचा पुनर्विचार करण्यात यावा. विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन हा बदल करण्यात यावा," अशी मागणी कांबळे यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाकडे निवेदनाद्वारे केली आहे. या मागणीचे निवेदन त्यांनी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागाचे उपसंचालक यांच्याकडेही दिले आहे.

Sakal 29.5.2025

News Paper Clippings During May 2025

Section: Education

लोकमत

अकरावी प्रवेशाच्या चौथ्या दिवशी राज्यात १ लाख ५१ हजार नोंदणी

पुणे विभागात १ लाख २६ हजार ७२४ जणांची नोंद

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेदरम्यान चौथ्या दिवशी गुरुवारी (दि. २९) राज्यात १ लाख ५१ हजार ७३३ विद्यार्थी नोंदणी झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांना मंगळवारी (दि. ०३ जून) सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत नोंदणी करता येणार आहे.

यासाठी https://mahafyjcadmissions. in या अधिकृत संकेतस्थळाचा वापर करावा. काही अडचणी आल्यास support@mahafyjcadmission s.in या ई-मेलवर आणि ८५३०९५५५६४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी केले आहे. याचबरोबर पुणे विभागात एकूण १ लाख २६ हजार ७२४ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

त्यापैकी ७५५१२ विद्यार्थी पुणे जिल्ह्यातील आहेत. त्याखालोखाल अहिल्यानगर ३० हजार १२९ आणि सोलापूर जिल्ह्यात २१ हजार ०८३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे.

Pune Main
Page No. 5 May 30, 2025
Powered by: erelego.com

लोकमत

१६ जून ते एक जुलैदरम्यान सर्वच अभ्यासक्रमांना प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : मागील काही वर्षांत कोलमडलेले शैक्षणिक कॅलेंडर पूर्वपदावर आणण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला यश आले आहे. बहुतांश विषयांच्या परीक्षांचे निकाल नियोजित वेळेत जाहीर केले आहेत. उर्वरित निकाल जूनमध्ये जाहीर केले जातील. पदवीचे वर्ग जूनच्या शेवटच्या आठवड्यात, तर पदव्युत्तर वर्ग जुलैच्या पहिल्या आठवड्यात सुरू करण्याचे नियोजन केले आहे, अशी माहिती प्र-कुलगुरू प्रा. पराग काळकर यांनी दिली.

दरम्यानच्या काळात कोरोनामुळे देशभरातील विद्यापीठांचे शैक्षणिक कॅलेंडर कोलमडले होते. प्रवेशप्रक्रिया राबविणे, प्रत्यक्ष वर्ग सुरू होणे, परीक्षा घेणे आणि निकाल जाहीर करणे, यात काही महिन्यांची तफावत निर्माण झाली होती. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने सर्व वेळापत्रक ट्रॅकवर आणले असून, यंदा बहुतांश विषयांच्या परीक्षांचे निकाल नियोजित वेळेत जाहीर केले आहेत. त्यामुळे २०२५-२६ हे शैक्षणिक सत्र नियोजित कालावधीत सुरू होणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांचे अनेक परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. बारावीच्या परीक्षांचा निकालही यंदा लवकर जाहीर झाल्याने विद्यार्थ्यांनी प्रथम वर्ष अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आहे.

Pune Main
Page No. 5 May 31, 2025
Powered by: erelego.com

News Paper Clippings During May 2025

Section: Career

व्यवस्थापन क्षेत्रातील करिअरच्या संधी

डॉ. पराग काळकर

डॉ. पराग काळकर

उच्च शिक्षणात व्यवस्थापन अभ्यासक्रमाची संकल्पना मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी मार्केटिंग, वित्त, मनुष्यबळ विकास, ऑपरेशन्स मॅनेजमेंट अशा विविध क्षेत्रांतील कामकाजाचे नियमन आणि नियंत्रण करण्यासाठी कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी झाली होती. ८०च्या दशकानंतर, व्यवस्थापन शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी एखाद्या बहुराष्ट्रीय किंवा राष्ट्रीय कंपनीच्या मुख्यालयात उच्च पगाराची नोकरी हेच बहुतांश उद्दिष्ट असे. वेगवेगळ्या वित्तीय कंपन्या, शेअर बाजारातील उत्तम कामगिरी करणाऱ्या मोठ्या कंपन्या आणि राष्ट्रीय बँका यांना समोर ठेवून अशा शिक्षणाची योजना आखली गेली होती.

काळ बदलला आणि व्यवस्थापन अभ्यासक्रम तयार करून ते शिक्षण सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणाऱ्या महाविद्यालयांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकी न राहता काही हजारांपर्यंत गेली. पूर्वी फक्त आयआयएम (अहमदाबाद, बंगळुरू आणि कोलकाता) अशा तीनच ठिकाणी होते; परंतु सध्या त्यांची संख्या २० पर्यंत गेली आहे. व्यवस्थापन शिक्षण देणाऱ्या संस्थांचे नियमन करणाऱ्या अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या आकडेवारीनुसार, सध्या व्यवस्थापन शिक्षण देणाऱ्या संस्थांची संख्या तीन हजारच्या आसपास असून, त्यांची प्रथम वर्षाची प्रवेश क्षमता पाच लाखांपर्यंत वाढली आहे. यात विद्यापीठ स्तरावरील व्यवस्थापन शिक्षण देणाऱ्या म्हणजेच एमबीए किंवा एमएमएस अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्था आणि स्वायत्त स्तरावर औद्योगिक गरजांचा अभ्यास करून 'पीजीडीएम'सारखे अभ्यासक्रम निर्माण करून चालवणाऱ्या संस्थांचा समावेश आहे. महाराष्ट्रात अशा अभ्यासक्रमांच्या संस्थांची संख्या तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या माहितीनुसार ४५०च्या आसपास असून, त्यांची एकत्रित प्रवेश क्षमता ६० हजारांच्या आसपास आहे. या सर्व आकडेवारीमध्ये पदव्युत्तर एमबीए किंवा एमएमएससारखे अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्थांचा समावेश आहे;

(चित्र : एआय)

परंतु याव्यतिरिक्त महाराष्ट्रात आणि देशात अनेक खासगी विद्यापीठेसुद्धा त्यांचे व्यवस्थापन अभ्यासक्रम स्वतंत्रपणे चालवत असून, पदवी स्तरावर बीबीए आणि बीएमएससारखे अभ्यासक्रम मोठ्या प्रमाणावर स्वीकारले गेले आहेत आणि अशा सर्व अभ्यासक्रमांना चांगला प्रतिसाद मिळत आहे.

एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात व्यवस्थापन शिक्षणाकडे काही प्रमाणात प्रतिसाद आणि विद्यार्थ्यांचा कल कमी झाला होता. याचे कारण म्हणजे मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या शिक्षण संस्थांनी आपापल्या संस्थांमध्ये एमबीए अभ्यासक्रम सुरू केले होते; परंतु बाहेरील व्यावसायिक आणि औद्योगिक जगात नव्या प्रकारच्या व्यवस्थापकांची गरज पूर्ण करण्यासाठी पूरक असे अभ्यासक्रम आणि विद्यार्थ्यांची मानसिकता यात पुरेसा बदल झाला नव्हता.

आज व्यवस्थापन आणि व्यवस्थापक ही संकल्पना अनेक लहान-मोठ्या उद्योगांची गरज बनली आहे. ग्राहक, ग्राहकांच्या गरजा, ग्राहकांच्या अपेक्षा, ग्राहकांच्या सेवेविषयी आणि दर्जाविषयक असणाऱ्या स्वतःच्या संकल्पना यांची पूर्तता करणे तुमच्या स्वतःच्या उत्पादनापेक्षा महत्त्वाचे झाले आहे. कोणताही ग्राहक आज त्याला असणाऱ्या सर्व पर्यायांचा विचार करूनच निर्णय घेत असतो आणि त्यामुळे पूर्वीच्या काळात एखाद्या दुसऱ्या ब्रँडकडे असणारा ग्राहकांचा कल हा आता सेवा-सुविधांच्या गुणवत्तेवर सातत्याने बदलताना दिसतो आहे.

मी अनेक वर्षे चांगली सेवा आणि चांगली गुणवत्ता दिली असेल, तर याचा अर्थ असा होत नाही, की माझे पूर्वीचे ग्राहक पुन्हा, एखादवेळी माझ्या गुणवत्तेत फरक पडला तरीही, माझ्यासोबत राहतील. त्यामुळे प्रत्येक वेळी तुमचे उत्पादन, तुमचे पॅकिंग, तुमची सेवा यात सातत्य राखणे आणि सतत नवनवीन प्रयोग करून ग्राहकांच्या अपेक्षांची पूर्तता करणे हे अपेक्षित असते. त्यामुळे नवीन व्यवस्थापन शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना व्यवस्थापन अभ्यासक्रमातील एकांगी बाजूचे शिक्षण न घेता सर्वांगीण विचार करणारे शिक्षण घेणे आवश्यक बनले आहे. ग्राहकाच्या मानसिकतेचा विचार करतानाच बाजारातली होणारी स्पर्धा, आमच्या उत्पादनाला किंवा सेवेला निर्माण होणारे पर्याय आणि त्या पर्याय उत्पादनाच्या किंवा सेवेच्या पार्श्वभूमीवर माझ्या औद्योगिक आस्थापने तयार केलेले धोरण आणि त्याची अंमलबजावणी ही सातत्यपूर्ण घडणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे आजच्या व्यवस्थापकाच्या अपेक्षा या पदवी आणि पदव्युत्तर पदवीपर्यंत मर्यादित नसून नवनवीन गोष्टींचा विचार करून त्या गोष्टी अंमलबजावणीत आणण्याच्या दृष्टिकोनातून आराखडा, निर्णय आणि अंमलबजावणीपर्यंत विद्यार्थ्यांची क्षमता विकसित झाली पाहिजे. विपणन व्यवस्थापन अशा स्वरूपाचे काम करणाऱ्या व्यक्तीलाही ग्राहकाच्या मानसिकतेचा, आर्थिक क्षमतेचा आणि निर्णय प्रक्रियेचा अभ्यास करूनच आपले काम करणे योग्य ठरते. नवनवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहोचण्याची अनेकविध माध्यमे तयार झाली आहेत आणि त्यामुळे तुमची उत्पादने आणि सेवा ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी वेगवेगळे प्रयोग करून त्यानुसार प्रत्येक ग्राहकाला त्याच्या अपेक्षेनुसार गुणवत्तापूर्ण उत्पादन आणि सेवा पोहोचवणे ही काळाची गरज आहे.

(पूर्वार्ध)

(लेखक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू आहेत.)

Maharashtra Times 26.5.2025

Upcoming Events

June 2025

MON	TUE	WED	THU	FRI	SAT	SUN
						1
2	3	4	5	6 ***Shivswarajya Din***	7	8
9	10	11	12	13	14	15
16	17	18	19	20	21	22
23	24	25	26 ***Rajarshi Shahu Maharaj Jayanti***	27	28	29
30						

Education is the movement from darkness to light

ALLAN BLOOM

KITESANDROSES.COM

Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.com